19-07-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGJ/ 11:00

19-07-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SGJ/ KTG/ D/ 11:00

(सभापीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.:तोंडी उत्तरे

राज्यात जातीचे प्रमाणपत्र एका कुटुंबास एक या पध्दतीने देण्याबाबत

(1) * 30062 श्री.सतीश चव्हाण , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे : तारांकित प्रश्न क्रमांक 29538 ला दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात जातीचे प्रमाणपत्र एका कुटुंबास एक या पध्दतीने देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावाची छाननी पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सचिन अहिर, श्री. शिवाजीराव मोघे यांच्या करिता : (1) व (2) अदिवासी विभाग, महसूल व वन विभाग तसेच विधी व न्याय विभागाच्या सहाय्याने प्रस्तावाची छाननी चालू आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात काल अर्धातास चर्चा असतांना माननीय मंत्रीमहोदयांनी यासंदर्भात उत्तर दिले आहे. आई व वडिलांकडे जात प्रमाणपत्र असले तर त्यांच्या मुलांना तेवढया अटी न लावता जात प्रमाणपत्र 15 दिवसात उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र या दोन वेगवेगळया बाबी आहेत. आई आणि वडिलांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र असेल तर याबाबतीत आपल्याला निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेता येईल. परंतु आई वडिलांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर नियमा प्रमाणे जात पडताळणी करुनच आपल्याला पुढचा निर्णय घ्यावा लागेल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, जात प्रमाणपत्र किती दिवसात दिले जाईल ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ठराविक कालावधीत जात प्रमाणपत्र दिले पाहिजे असा नियम आहे परंतु काही प्रकरणामध्ये पुरावे किंवा इतर माहिती दिली जात नसल्यामुळे असे होत नाही. जात वैधता प्रमाणपत्र असेल तर महिन्या भराच्या आत जात प्रमाणपत्र दिले जावे अशा प्रकारचे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30062 .....

श्री. अरुण गुजराथी : जात प्रमाणपत्र वेळेवर दिले गेले तर कुटुंबाना न्याय मिळू शकतो. जात प्रमाणपत्र पूर्वलक्षी प्रभावाने देता यावे यासाठी त्यामध्ये काय अडचणी आहेत, कोणते पुरावे पाहिजेत, यामध्ये कशा प्रकारे पुढे जाता येईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मागे मी उदाहरण दिले होते की, मुलगी मंत्रालयात सेवेत आहे, तिच्याजवळ जात प्रमाणपत्र आहे परंतु तिच्या वडिलांकडे जात प्रमाणपत्र नाही. या विषयाच्या संदर्भात अनेक अडचणी आहेत याची मला कल्पना आहे. परंतु पूर्वलक्षी प्रभावाने या कुटुंबाना जात प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जात व जातीपेक्षा त्यांचे जे संबंध असतात त्यासंदर्भात सत्यता मिळणे गरजेचे असते. जात प्रमाणपत्र देतांना पुराव्यालाच सत्य धरले जात असते. अनेक वेळा अशीही भूमिका घेण्यात आली आहे की, समजा वडिलांच्या प्रमाणपत्रात जातीचा उल्लेख असेल, प्रमाणपत्र असेल तर वडिलांच्या जातीचे प्रमाणपत्र मुलांना देणे अभिप्रेत आहे. परंतु जातीचे व्हेरिफिकेशन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जात प्रमाणपत्र दिले जात नाही. यासंदर्भात निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेतली जाईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, जात पडताळणीच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. परंतु आज जात पडताळणीचे प्रमाणपत्र मिळवायचे म्हटले तर वर्ष दोन वर्ष लागतात. जात पडताळणीच्या संदर्भात योग्य ते आदेश दिले जातील व जात पडताळणी वेळेवर करुन दिली जाईल यासंदर्भात शासनाकडून अनेक वेळा आश्वासने दिली गेली आहेत. 3 ते 6 महिन्यात जात पडताळणी करुन दिली गेली पाहिजे अशी अट आहे. परंतु महाराष्ट्रात 3 ते 6 महिन्यात कोठेही जात पडताळणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाने जातपडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात अगोदर जे आदेश दिले होते त्या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी पुन्हा आदेश दिले जातील काय ?

सभापती महोदय, या राज्यात राहणारे भटक्या विमुक्त जातीचे लोक आहेत ते गावोगावी भटकत असतात. नंदीबैलवाले, माकडवाले, आस्वलवाले असतील किंवा मेंढपाळ असतील ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30062 .....

श्री. रमेश शेंडगे....

गावोगावी 7-7,8-8 महिने भटकत असतात परंतु त्यांच्याकडून सुध्दा 50 वर्षापूर्वीचे पुरावे मागितले जातात. त्यामुळे भटक्या विमुक्त जातीचे प्रश्न प्रलंबित आहेत,जात पडताळणी प्रलंबित आहे त्यांच्या .जात पंचायतीकडून हे लोक या या जातीचे आहेत याची माहिती मिळाल्यानंतर या लोकांना ताबडतोब त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र दिले जाईल काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जात प्रमाणपत्राचा विषय हा किचकट स्वरुपाचा आहे परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये ग्रामीण भागातून लोक शिक्षणासाठी येत असतात. त्या त्या जिल्हयात न जाता ऑनलाईन माहिती घेता येईल काय यासंदर्भात मुंबईमध्ये मध्यंतरी एक प्रयोग करण्यात आला होता व हा प्रयोग यशस्वीही झाला होता. त्यामुळे संपूर्ण राज्यात ऑनलाईन प्रक्रिया करण्याचा शासनाचा मानस आहे. ऑनलाईन प्रक्रियेतील व्यक्तीला जातीचा दाखला मिळण्याच्या संदर्भात 15 दिवसात उत्तर देणे अभिप्रेत आहे अशा स्वरुपाचा प्रयोग आपण केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30062...

श्री.सचिन अहिर...

एवढेच नाही आपण एक पाऊल पुढे देखील टाकले आहे. जात पडताळणीसंबंधी अनेक तक्रारी येत होत्या. तसेच भ्रष्टाचाराचे आरोप होत होते. त्यामुळे आपण मुंबई शहरात जात पडताळणीची सुनावणी देखील सीसीटीव्ही द्वारे रेकॉर्ड करीत आहोत. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये आता कोणीही ती क्लीप मागू शकतो. तसा प्रयोग आम्ही मुंबईमध्ये यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे.तशीच भूमिका संपूर्ण राज्यात घेता येईल काय याबाबत विचार करून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. आज 50 वर्षे पुराव्याची अट ही एस.सी. आणि एस.टी.च्या लोकांसाठी आहे. व्हीजेएनटी, ओबीसी या सारख्या अन्य ज्या जाती आहेत त्यांना ती अट लागू होत नाही. मी फक्त एवढेच सांगतो की,सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक उदाहरण दिले तर त्यात निश्चितपणे लक्ष घालून न्याय देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी जो प्रश्न विचारला होता त्यास उत्तराच्या माध्यमातून वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. वडिलांकडे प्रमाणपत्र असताना देखील ते मुलाला किंवा मुलीला मिळत नाही. यासंबंधी मी व माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला होता. त्यासंबंधी तरी आदेश देणार की नाही ? मुलाला प्रमाणपत्र मिळाले तर ते वडिलांसाठी मानत नाही. त्यासाठी पुन्हा व्हेरिफिकेशन करण्यात येते. सभापती महोदय, आपण देखील यासंबंधी डायस वरून अनेक वेळा निदेश दिले आहेत. एवढेच नव्हे तर आपण आपले अनुभव देखील सांगितले आहेत. मुलाला प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते वडिलांना दिले पाहिजे आणि वडिलांना प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते मुलाला मिळायला पाहिजे. ही साधी गोष्ट आपण करू शकता. आज आपण प्रमाणपत्राची मागणी करण्यास गेलो तर लिपिकांपासून सर्व जण काही तरी क्वेरी काढून प्रमाणपत्र न देण्याची भूमिका घेतात. तेव्हा आपले जे अधिकार आहेत, आपल्या सदनाचे अधिकार आहेत, ते का डावलत आहात, त्यांच्याकडे का देत आहात ? तेव्हा या प्रश्नासंबंधी ठोस निर्णय घेऊन तत्संबंधीचे आदेश शासन निर्गमित करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, श्रीमती माधुरी पाटील विरूद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात सुप्रीम कोर्टाने निकाल दिला आहे. एकाला प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याच्या कुटुंबाला प्रमाणपत्र देता येणार नाही असे स्पेसिफाय करून निर्णय दिलेला आहे. एसडीओ हा देखील शासनाचा अधिकारी आहे. त्यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर व्हॅलिडिटीची आवश्यकता काय ? पण त्यांनी सांगितले की, व्हॅलिडिटी आवश्यक आहे. त्यांनी असेही सांगितले आहे की, कुटुंबातील एका सदस्याला प्रमाणपत्र दिल्यानंतर ते पूर्ण कुटुंबाला देता येणार नाही. प्रत्येकाचे प्रमाणपत्र हे तपासलेच पाहिजे. त्यामुळे आपण तसे करीत आहोत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या प्रश्ना संबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. मंत्रिमहोदय देखील सकारात्मक उत्तरे देतात. पण तो प्रश्न आहे तेथेच आहे. त्यातून फारसा तोडगा निघालेला दिसत नाही. आता सुद्धा विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत. ह्या महिन्यात त्यांना प्रवेश घ्यायचे आहेत. त्यामुळे ह्या महिन्याच्या अखेर पर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांना आपण प्रमाणपत्र देणार आहात काय व प्रमाणपत्र दिले आहे किंवा नाही याची खात्री आपण स्वत: करणार आहात काय ? याबाबत ड्राईव्ह घेण्यात यावा अशी देखील माननीय सदस्य मागणी करीत आहेत. एवढे काम आपण केले तरी लोक आपल्याला निवडून देतील. मी कुटुंब प्रमुख आहे. मला जात प्रमाणपत्र मिळाले. माझ्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतर माझ्या मुलाला देखील प्रमाणपत्र दिले पाहिजे. ते देऊ नका असे माझे म्हणणे नाही. ते दिले पहिजे. पण त्या मुलाला देखील जात पडताळणीसाठी एक ते दोन वर्षे थांबावे लागते. तेव्हा एकदा कुटुंब प्रमुखाची जात पडताळणी झाल्यानंतर त्याच्या मुलाला आठवीमध्येच प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था आपण करणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत आपुण व्यवस्था केली आहे. मेडिकल, इंजिनिअरिंगसाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्याने दहावी पास झाल्यानंतर अकरावीमध्ये अर्ज करायचा असा नियम आहे. म्हणजे अकरावी आणि बारावी या दोन वर्षामध्ये भरपूर कालावधी मिळतो. पण काही विद्यार्थी हे वेळेवर अर्ज करत नाही. ते ॲडमिशनच्या वेळी अर्ज करतात.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशावेळी सहानुभूती दाखवून त्यांना अलाऊ केले जाते. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळत नाही. विद्यार्थी व पालकांना अर्ज करण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी त्यांच्याकडे असतो परंतु ते अर्ज करीत नाहीत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने केलेल्या प्रस्तावाची छाननी केव्हापासून सुरु आहे व ती किती दिवस चालणार आहे?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी चांगला प्रश्न विचारला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देतांना हे काम ऑनलाईन करणार असल्याचे सांगितले. त्यामध्ये जर काही त्रुटी असतील तर त्या आपल्याला दुरुस्त करता येतील. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची व्यवस्था केली आहे. तसेच, तीन महिन्यांची वाट न पहाता जी कम्युनिटी डाऊटफुल नसेल तिला ताबडतोब प्रमाणपत्र दिले पाहिजे अशाप्रकारचे आदेश दिले आहेत.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये हा विषय चर्चेला आला होता. तेथील कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता आहे व जे कर्मचारी आहेत त्यांना योग्य प्रशिक्षण न दिल्यामुळे विलंब होत असल्याचे निदर्शनास आले. या करिता कर्मचाऱ्यांना तातडीने प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल काय?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, कर्मचाऱ्यांना यशदामार्फत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाईल.

सभापती : मंत्री महोदय, या प्रश्नावर सभागृहामध्ये सातत्याने चर्चा केली जाते त्यावेळी शासनाकडून या प्रश्नाला उत्तर मिळाले असे आम्हाला वाटत असते. परंतु एखाद्या कुटुंबाला जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दुर्दैवाने त्या कुटुंबातील मुला-मुलींना जात पडताळणी करुन घेण्यासाठी वारंवार जावे लागते. त्या अनुषंगाने शासनाने काळजी घेणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने एखाद्या प्रकरणामध्ये दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने सदर समाजावर अन्याय होत असेल तर त्या करिता शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद मागण्यासाठी जाणे गरजेचे आहे. आपण या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे उदाहरण सातत्याने देत असतांना राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये किंवा प्रत्येक तहसीलमध्ये हजारोंच्या संख्येने पालकांना जात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

पडताळणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पुन्हा त्याच कारणासाठी त्यांच्या मुलांना किंवा मुलींना या प्रकीयेमधून जावे लागते. यामध्ये सर्वात मोठे दु:ख असे की, या बाबतीत आपण एखाद्या ठिकाणी चौकशी केली तर क्वॉसी ज्युडिशिअल यंत्रणेच्या नावाखाली त्यांच्याकडून बरोबर उत्तरे मिळत नाहीत. तेव्हा यामध्ये आपण लक्ष घालून काटेकोर अशाप्रकारची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माथाडी कामगारांसाठी वडाळा व चेंबूर येथे घरे बांधण्यासाठी करावयाची कार्यवाही

(२) * ३०३०५ श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.अरुण गुजराथी , श्री.विनायकराव मेटे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कामगारांच्या घरांसाठी शासनाने वडाळा आणि चेंबूर येथील ५८ एकर जागा मंजूर केली आहे, हे खरे आहे काय, असल्यास केंव्हा मंजूर करण्यात आली आहे,

(२) असल्यास, सदर जागेवर माथाडी कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) होय, शासन ज्ञापन महसूल व वन विभाग, दिनांक २१ जानेवारी, २००६ अन्वये माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्यांच्या सदस्यांच्या घरासाठी शासनाने मौजे वडाळा व चेंबूर येथील जमीन मंजूर केली आहे.

(२) संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीवर माथाडी कामगारांसाठी घरे बांधणे किंवा इमारतीचे बांधकाम करणे ही बाब पूर्णत: माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये विशेषत: मुंबईमध्ये माथाडी कामगार हा कष्टकरी समाजातील फार महत्वाचा घटक असून पिढयान् पिढया कष्टाची कामे करीत आहे. या कष्टकऱ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळाले पाहिजे यासाठी शासनाने त्यांना वेळोवेळी आश्वासन दिले आहे. या ठिकाणी पहिला प्रश्न असा आहे की, "माथाडी कामगारांच्या घरांसाठी शासनाने वडाळा आणि चेंबूर येथील ५८ एकर जागा मंजूर केली आहे, हे खरे आहे काय?" त्यानंतर दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देतांना असे म्हटले आहे की, "संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीवर माथाडी कामगारांसाठी घरे बांधणे किंवा इमारतीचे बांधकाम करणे ही बाब पूर्णत: माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधित आहे". या ठिकाणी अशाप्रकारे उत्तर देत असतांना जर त्यांच्या गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या आहेत, जर त्या करिता शासनाच्या ताब्यात भूखंड आहे व त्यावर त्यांना घरे बांधून द्यावयाची आहेत तर मग हे करीत असतांना इतरांप्रमाणे त्यांना देखील आर्थिक पाठबळ आहे कां? हे लोक कष्टकरी समाजातून आलेले असल्यामुळे त्यांना ही घरे परवडणारी आहेत काय, वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेला हा प्रश्न सोडविण्याकरिता हे शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३०३०५...

श्री. हेमंत टकले....

त्यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता तरतूद करु शकेल काय? क ष्टकऱ्यांना त्यांचे हक्काचे घर लवकरात लवकर मिळण्याकरिता त्यामध्ये हस्तक्षेप करुन शासन ही संपूर्ण योजना पुन्हा एकदा तपासून घेऊन त्यांना घर बांधण्यासाठी मदत करण्याची भूमिका घेईल काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30305 . . . .

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी माथाडी कामगारांच्या घरासाठी खास करुन वडाळा येथे भूखंड क्र. 6 व 9 हा 65 हजार चौ.मी.इतका आहे.त्याचप्रमाणे चेंबूर येथे सर्व्हे क्र. 357 भूखंड 76,860 चौ.मी. आणि सर्व्हे नंबर 376 हा भूखंड 97,541 चौ.मी. जमीन या माथाडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्थेसाठी महसूल विभागाच्या माध्यमातून 2006 मध्ये देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर संस्थेने मागणी केल्याप्रमाणे त्यांना टीडीआर आणि 15 टक्के वाणिज्य वापरासाठी परवानगी सुध्दा देण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या माध्यमातून जमीन तारण ठेवण्यासाठी सुध्दा परवानगी दिलेली आहे. याठिकाणी जी जमीन भाडेपट्ट्याने दिलेली आहे त्यामध्ये अशी अट आहे की, 250 चौ.फू.घर एका माथाडी कामगाराला संबंधित संस्थेने दिले पाहिजे. या संस्थेमध्ये जवळजवळ साडेतीन हजार सभासद आहेत. या गृहनिर्माण संस्थेने विकासकाशी सुध्दा करार केलेला आहे आणि या कराराच्या माध्यमातून त्यांना 334 स्वे.फू.घर विकासकाने बांधून देण्याचे कबूल केलेले आहे. त्यासाठी या संस्थेला जी काही मदत लागेल ती सर्व मदत शासनाच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच भविष्य काळामध्ये देखील काही अडचणी निर्माण झाल्या तर शासनाच्या माध्यमातून त्या सोडविता येतील.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय धन्यवाद. महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करावयास पाहिजे की, त्यांनी गोरगरीब, कष्टाळू आणि माथाडी कामगारांसाठी या मुंबई सारख्या राजधानीमध्ये भूखंड उपलब्ध करुन दिला. शासनाने वडाळा व चेंबूर येथे जो भूखंड दिलेला आहे त्याठिकाणी जवळजवळ 75 टक्के जागेवर झोपडपट्टी वसलेली आहे. म्हणून कामगार संघटनांच्या मार्फत अनेक वेळा विनंती करण्यात आली की, आम्हाला सदरहू भूखंड रिकामा करुन देण्यात यावा.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या दृष्टीने काबाडकष्ट करणारे जे सर्व कामगार आहेत त्यांच्याकडेही सारख्याच दृष्टीने पाहिले पाहिजेत.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्य शासनाने आपल्या कामगारांसाठी 8 ते 9 माथाडी बोर्ड निर्माण केलेले आहेत आणि त्या ठिकाणी जे रजिस्टर कामगार आहेत, त्यांना हे भूखंड द्यावेत असा आदेश देण्यात आलेला आहे आणि यानुसार सदरहू घरे दिली पाहिजेत. म्हणून जे कामगार रजिस्टर आहेत त्यांना भूखंड दिला पहिजे असा आदेश देण्यात आलेला आहे. शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय क्रमांक सीआयडी-3, 3308/ 1851/ प्र.क. 14, नवी-10, मंत्रालय, 6 सप्टेंबर 2011 या आदेशानुसार मुंबईतून नवी मुंबईमध्ये जे बाजार स्थलांतरित झालेले आहेत त्यांच्यासाठी आपण धन्सोली येथे आणि त्याच्या बाजूला भूखंड देण्यात आलेले आहेत. तसेच तेथे रहाण्यासाठी धन्सोली आणि त्याच्या आजूबाजूला जागा दिलेली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे. मी आपल्याला यासाठी सांगत आहे की, ...

सभापती : सन्माननीय सदस्य आपण सातत्याने त्या निमित्ताने हा प्रश्न डेव्हलप करीतच राहणार काय ?

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सातत्याने आमच्यावर अन्याय होत आहे हे मला येथे नमूद करावयाचे आहे. मला माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, जे कामगार मंडळामध्ये रजिस्टर कामगार आहेत, या सगळया कामगारांना शासनातर्फे रजिस्टर असलेल्या सर्व संघटनांच्या, सर्व बोर्डामध्ये असलेल्या कामगारांना जे आपल्याला अभिप्रेत आहे, जे आदेश आलेले आहेत, त्याप्रमाणे सर्व कामगारांना घरे देणार आहात काय ? तसेच ज्या कामगारांचे जे बाजार स्थलांतरीत झालेले नाहीत उदाहरण द्यावयाचे तर रेल्वे बोर्ड तेथे स्थलांतरीत झालेले नाही. अशा कामगार संघटनांना त्यांच्या सभासद संख्येच्या प्रमाणात घरे देण्यात यावीत असे आदेश आहेत. त्याप्रमाणे या आदेशाचे पालन करुन त्याची अंमलबजावणी करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी जो प्रश्न विचारण्यात आला आहे त्यामध्ये वडाळा व चेंबूरच्या बाबतीत माहिती विचारलेली आहे आणि मी त्याचे उत्तर दिलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न देखील महत्वाचा आहे. याबाबतीत अन्य ठिकाणी जागेची मागणी आली तर शासनाच्या वतीने सहानुभूतीपूर्वक विचार करुन सदरहू जागा देण्याबाबत शासन प्राधान्याने विचार करील एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, वडाळा, चेंबूर येथे भूखंड दिलेला आहे. माथाडी कामगारांची जी सहकारी संस्था आहे, त्याला देखील एन.ओ.सी.दिलेली आहे.पण मला मिळालेल्या माहितीप्रमाणे विकासक आणि सहकारी संस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संस्था नाराज आहेत. बऱ्याच वेळा खेपा मारुन देखील त्यांचे काम होत नाही. म्हणून माझा याबाबत स्पेसिफीक प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माननीय महसूल मंत्री, प्रधान सचिव नगरविकास विभाग, प्रधान सचिव महसूल विभाग यांच्याबरोबर बैठक घेऊन याबाबत त्वरित निर्णय कधी घेण्यात येणार आहे?

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30305....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या संदर्भात संस्थेने 4 एफएसआय मिळावा अशी मागणी केलेली होती. त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि शासनाने 2.5 एवढा एफएसआय देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे आणि त्याची सर्व वैधानिक कार्यवाही सप्टेंबर अखेर आम्ही पूर्ण करु असे या निमित्ताने सांगितले आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोंदिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे शिक्षकांची यादी तयार नसल्याबाबत

(३) * ३११०८ श्री.केशवराव मानकर , श्री.विनोद तावडे , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात एकूण १ हजार ४९ जिल्हा परिषदेच्या शाळा असून त्यात मराठी माध्यमाच्या ९०५ आणि हिंदी माध्यमाच्या १३७ शाळांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षण विभागाकडे शिक्षकांची यादी तयार नसून नियमांचे उल्लंघन करून हिंदी माध्यमाच्या शिक्षकांची नियुक्ती थेट मराठी माध्यमाच्या शाळांवर केली असल्याने जिल्ह्यात एकूण ७७ हिंदी माध्यमाचे शिक्षक मराठी माध्यमातून शिक्षण देत असल्याचे माहे मे, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील : (१) होय.

(२) या बाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता मराठी माध्यमातून आहे. परंतु, व्यावसायिक पात्रता ही हिन्दी माध्यमातून किंवा मराठी माध्यमातून आहे असे उमेदवार मराठी शाळेत विषय शिकविण्यास पात्र असतात. त्यामुळे , गोंदिया जिल्हा परिषदेने सदर शिक्षकांची नियुक्ती ही मराठी माध्यम्थाचे शाळांवर केली आहे. यामध्ये नियमाचे उल्लघंन झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांचा हा प्रश्न आहे. तेथील शिक्षण अधिकारी श्री. निलेश पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी हिंदी आणि मराठी माध्यमाच्या शाळा आणि शिक्षक याची माहिती मागवितो असे सांगितले. म्हणजे शिक्षण अधिकाऱ्याकडे सुध्दा त्यासंबंधीची माहिती नसणे ही खेदाची बाब आहे. गोंदिया जिल्हा हा छत्तीसगड आणि मध्यप्रदेश राज्यांना लागून आहे. गोंदिया जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांमध्ये हिंदी माध्यमाच्या शाळा आहेत. त्या ठिकाणी हिंदी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकविणारे शिक्षक अनेक ठिकाणी लोधी समाजाचे असल्यामुळे त्यांच्या भाषेचा मोठा प्रश्न आहे. या ठिकाणी जे उत्तर देण्यात आले आहे त्याबद्दल माझा काहीही आक्षेप नाही. ते नियमात बसते हे मला माहीत आहे. पण मराठी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. आपल्याकडे हिंदीच्या शाळा आहेत. त्या ठिकाणी गोरेगाव तालुक्यात 8, माझ्या आमगाव तालुक्यात 11, सालेकसा तालुक्यात 15, अर्जुनी-मोरगाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31108 .... श्री. केशवराव मानकर ....

तालुक्यातील 10, तिरोडा तालुक्यातील 7 आणि देवरी तालुक्यातील 13 शिक्षक हे हिंदी माध्यमाचे आहेत. या शिक्षकांना मराठी शाळेतून हिंदी शाळेत पाठवावे आणि मराठी माध्यमाचे जे शिक्षक आहेत त्यांना आपण त्या ठिकाणी स्थलांतरित करणार का आणि मराठीचा दर्जा शासन कायम ठेवणार का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मी उत्तर देणारच आहे पण त्यापूर्वी मला एक बाब आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, शिक्षण विभागाचा जिल्हा परिषदेकडे असणारा जो विषय आहे त्याचे सर्व मॉनिटरींग हे शिक्षण विभागाकडून होते. अगदी इमारतीच्या बांधकामापासून अनेक असे विषय असतात की जे शिक्षण विभाग बघते. पण एकदा जिल्हा परिषदेचा उल्लेख आला की ते सर्व प्रश्न ग्रामविकास विभागाकडे येतात आणि आपले खालचे अधिकारी सांगतात की, आम्हाला बाकी काही माहीत नाही, यामध्ये जिल्हा परिषदेचा उल्लेख आहे त्यामुळे ग्रामविकास विभागाने उत्तर दिले पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर देण्याबाबत दुमत नाही पण या संदर्भातील प्रशासकीय अधिकार शिक्षण विभागाला आहेत हे मी सुरुवातीलाच नमूद करतो. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते योग्य आहे आणि त्याची अंमलबजावणी करण्यात येईल्.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३२८ शाळा मोडकळीस आल्याबाबत

(४) * ३०७०२ श्री.परशुराम उपरकर , श्री.दिवाकर रावते : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सुमारे ३२८ शाळा मोडकळीस आल्याचे नुकत्याच झालेल्या पाहणीस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येत्या पावसाळ्यात या शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळा तातडीने दुरुस्त करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये पूर्णपणे चुकीची माहिती दिलेली आहे. त्या ठिकाणी जवळजवळ 13 इमारती धोकादायक झाल्याचा व त्या निर्लेखित करण्याचा ठराव जिल्हा परिषदेने करुन तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. तेथील गट शिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना त्या वर्गात मुलांना बसवू नका अशा प्रकारचे आदेश सुध्दा दिलेले आहेत. याची माहिती सन्माननीय मंत्री महोदयांना आहे का आणि त्याबाबत माननीय मंत्री महोदय कार्यवाही करणार का ? त्या ठिकाणी 2001 मध्ये सर्व शिक्षा अभियानातून 328 शाळांची योजना झाली. आता 2011 मध्ये या 328 शाळांची छप्परे पूर्णपणे मोडकळीस आलेले आहेत. तेथील 147 शाळांसाठी जवळजवळ 1 कोटी 47 लाख रुपये एवढा निधी आलेला आहे अशी माहिती आहे. हा निधी आलेला आहे का ? उर्वरित ज्या शाळा आहेत त्यांना शासनाने तातडीने निधी देऊन ती सर्व छप्परे तातडीने दुरुस्त करण्याकरिता उपाययोजना करणार का ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30702...

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 193 शाळांची दुरुस्ती प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सन 2012-2013 या वर्षामध्ये 125 शाळांची दुरुस्ती करण्याचे ठरविण्यात आले आहे. ज्या शाळा बसण्यास पात्र आहेत किंवा त्या शाळांमध्ये बसू नये असे शिक्षणाधिकाऱ्यांनी मुलांना कळविले आहे अशा प्रकारची माहिती माझ्याकडे नये. परंतु सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी असली पाहिजे. त्या शाळांसाठी व उर्वरित शाळांसाठी डी.पी.डी.सी.ने सन 2010-2011 मध्ये 50 लाख रुपये दिले आणि सन 2011-2012 साठी 2 कोटी रुपये देण्यात आले आहेत. त्यातून 149 शाळांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होत आले आहे. सन 2012-2013 मध्ये 193 शाळांसाठी 50 लाख रुपये खर्च करावयाचा आहे. त्यातून 125 शाळा दुरुस्त होतील, उर्वरित शाळा पुढील वर्षी दुरुस्त होतील. अशा प्रकारचा कार्यक्रम डी.पी.डी.सी.ने ठरविलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सुमारे 328 शाळा मोडकळीस आल्याचे नुकत्याच झालेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे का, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी नाही असे उत्तर दिलेले आहे. परंतु त्यांनीच आता 193 शाळांची दुरुस्ती करावयाची आहे अशी माहिती दिलेली आहे. मग लेखी उत्तर खरे आहे की, आता दिलेले तोंडी उत्तर खरे आहे ? सर्व शिक्षा अभियान या योजनेंतर्गत गेल्या 11 वर्षांमध्ये किती शाळांची दुरुस्ती करण्यात आली आहे ?

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या 328 शाळा मोडकळीस आलेल्या आहेत का असा प्रश्न विचारला होता त्याला मी नाही असे उत्तर दिलेले आहे. त्या शाळांची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी डी.पी.डी.सी.ने कार्यक्रम निश्चित केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सर्व शिक्षा अभियान या योजनेतून गेल्या 11 वर्षात काही शाळांची दुरुस्ती करण्यात आली की नाही, झाली नसेल तर तो पैसा कोठे गेला ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

ता.प्र.क्र.30702...

श्री.जयंत पाटील : सर्व शिक्षा अभियान योजनेबरोबरच सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या डी.पी.डी.सी.मधून पैसा खर्च करण्यात आलेला आहे. सर्व शिक्षा अभियानातून खोल्या बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला जातो. सर्व शिक्षा अभियान योजनेतून नवीन शाळा खोल्या बांधण्यात आल्या असतील. सध्या माझ्याजवळ त्याची आकडेवारी उपलब्ध नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 45 दिवस अगोदर प्रश्न विचारला जातो. या अवधीमध्येही मंत्री महोदयांकडून उत्तर येत नसेल तर तो त्यांचा दोष नाही. मंत्री म्हणून आपण प्रशासकीय यंत्रणेला धारेवर धरणार आहात की नाही ? आपल्या सारख्या मंत्र्यांनी तर ते केलेच पाहिजे. या प्रश्नाला नकारात्मक उत्तरे देण्यात आलेली आहेत. मंत्री महोदयांनी धोकादायक शाळांबाबत किरकोळ असा शब्दप्रयोग करु नये. कारण मुलांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. पावसाळ्यात शाळा कोसळण्यासारखी परिस्थिती असल्यावर तो प्रश्न येथे उपस्थित करण्यात आल्यावर सरकारने त्याचे मूल्यमापन करुन, प्रश्नाचा आदर करुन योग्य कार्यवाही केली पाहिजे. विरोधी पक्ष म्हणून सरकारच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणून दिली जात असेल आणि मंत्री महोदयांच्या ती लक्षात येत नसेल तर आमचे प्रश्न फेटाळून लावण्यापेक्षा आपण प्रशासकीय अधिकाऱ्यांना धारेवर धरले पाहिजे. हे मी नम्रपणे मांडत आहे.

सभापती महोदय, दिनांक 6 फेब्रुवारी रोजी दैनिक 'पुढारी' या वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातमीचे माझ्याजवळ कात्रण आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ज्या शाळांचे निर्लेखन करावयाचे आहे त्या शाळांमध्ये शाळकरी मुलांना बसवू नका, अशा स्पष्ट सूचना प्रत्येक तालुक्याच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागाच्या नियोजन शाखेकडून देण्यात आली. ही माहिती मंत्री महोदयांकडे जुलै महिन्यात पोहोचणार नसेल तर प्रशासनाचे काम कोणत्या पध्दतीने चालू आहे ते समजत नाही. अशा प्रकारचे आदेश गट शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत काय आणि त्या शाळा धोकादायक आहेत का याची माहिती घेण्यात येईल का आणि आताच आपण असे म्हटले आहे की, शाळा मोडकळीस आलेल्या नाहीत, परंतु आमच्या माहितीनुसार त्या शाळा धोकादायक असल्याचे माहितीत सिध्द आले तर संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे का ?

यानंतर श्री.शिगम...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30702....

श्री. जयंत पाटील : हा प्रश्न आल्यानंतर या प्रश्नासंबंधी वर्तमानपत्रामध्ये कुठे उल्लेख आलेला आहे का याची चौकशी करण्यास मी सांगितले. तसेच शाळेच्या खोल्या विद्यार्थ्यांना बसण्यास कुठे अयोग्य झालेल्या आहेत काय याची देखील मी माहिती घेतली. त्यामध्ये शाळेच्या खोल्या बसण्यास अयोग्य असल्याचे कुठेही आढळून आले नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून कार्यवाही केली जाईल. परंतु प्रशासनाने जे उत्तर दिलेले आहे त्याप्रमाणे बसण्यास अयोग्य अशा प्रकारच्या खोल्या कुठे नाहीत. डीपीडीसीने या वर्षाचा जो दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्यामध्ये 193 खोल्यांची दुरुस्ती करावयाची असून 125 खोल्यांची दुरुस्ती पूर्ण झालेली आहे आणि उर्वरित खोल्यांची दुरुस्ती पुढील वर्षाच्या डीपीडीसीच्या दुरुस्ती कार्यक्रमामध्ये हाती घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दै. "पुढारी" या वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीचा उल्लेख केला. त्यामध्ये बसण्यास अयोग्य असलेल्या खोल्यांमध्ये मुलांना बसण्यास देऊ नका असे जे नमूद केलेले आहे, त्या सर्वसाधारण स्वरुपाच्या सूचना आहेत. सन्माननीय सदस्यांनी विशिष्ट शाळेसंबंधी माहिती दिली तर त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील धान, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शासनाने घोषित केलेल्या पॅकेजच्या अंमलबजावणीबाबत

(५) * ३००७९ श्री.विनोद तावडे , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.राजन तेली , श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धान, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने नुकसान भरपाईपोटी २ हजार कोटी रुपयांचे पॅकेज देण्याची घोषणा माहे डिसेंबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार महिन्यानंतर किती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली व किती शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही,

(३) तसेच राज्य सरकारने जाहीर केलेली नुकसान भरपाई न मिळाल्याने दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास मासळ (ता.कारंजा जि.वाशिम) येथील गजानन थोरात, वडनेर (ता.केळापूर जि. यवतमाळ) येथील कमलाबाई चव्हाण व कोठोडा येथील गजानन घोटेकर या तिघांनी आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) चार महिन्यानंतर सर्व विभागीय आयुक्तांना एकूण रू.१५२५.०८ कोटी इतका निधी देण्यात आला होता. त्यापैकी रू.१३०४.५० कोटी इतका निधी ३४३९३८५ इतक्या बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला आहे.२९५८११२ इतक्या बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर उर्वरित रक्कम जमा करणेची कार्यवाही सुरू आहे.

(३), (४) व (५) मौ.म्हसळा, ता.कारंजा, जि.वाशिम येथील श्री.गजानन थोरात यांनी मानसिक आजाराला कंटाळून आत्महत्या केली आहे. मौ.वडनेर, ता.केळापूर, जि.यवतमाळ येथील श्रीमती कमलाबाई चव्हाण या रागीट स्वभावामुळे चिडचिड करीत, त्यातच त्यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. मौजे कोठाडा, ता.केळापूर, जि.यवतमाळ येथील श्री.गजानन घोटेकर यांनी दिनांक २०/०४/२०१२ रोजी ट्रॅक्टर दुरूस्तीकरीता लागलेल्या खर्चामुळे कर्जबाजारी होऊन, कर्जाला कंटाळून आत्महत्या केली आहे. श्री.गजानन थोरात यांच्या वडिलांच्या नावावर शेत असून पीक नुकसानीची रक्कम दिनांक २८/५/२०१२ रोजी त्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. श्रीमती कमलाबाई चव्हाण यांना अद्याप निधीचे वाटप बाकी आहे. तसेच श्री.गजानन घोटेकर यांची त्यांचा भाऊ श्री.तुळशीराम घोटेकर यांच्यासोबत सामायिक मालकीची जमीन आहे. श्री.तुळशीराम यांच्या खात्यावर रू.४,०००/- इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : या प्रश्नाला शासनाने जे उत्तर दिले आहे त्यावरुन शेतक-यांच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे हे स्पष्ट होते. डिसेंबर २०११मध्ये नागपूरला झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी दोन दिवस सभागृहाचे कामकाज तहकूब करुन ठेवल्यानंतर शासनाने २ हजार कोटी रु.च्या पॅकेजची घोषणा केली. ती घोषणा केल्यानंतर

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरुवातीला काही रक्कम दिली. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सुरुवातीला थोडी आणि नंतर थोडी या प्रमाणे रक्कम दिली. त्यानंतर पुरवणी मागण्यामध्ये १५२५ कोटी म्हणजे ६० टक्के रक्कम दिली. अर्थसंकल्प सादर करताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सांगितले की, वर्षाच्या सुरुवातीस अपेक्षित ५८ कोटी २० लाखाचे उत्पन्न कमी होऊन ते रुपये २०५८ कोटी लाखाच्या तुटीत रुपांतरित झाले. कारण कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतक-यांसाठी निधी कमी पडू नये याची दक्षता घेतली आणि त्यामुळे ही तूट अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते. २००० कोटी रु. दिले म्हणून सांगितलेले आहे. ४०० कोटी रु.ची तरतूद ही पुढील बजेटमध्ये केलेली आहे. शेतक-यांना दिलेल्या नुकसान भरपाईमुळे तूट आली असे असत्य सांगितलेले आहे. हे पैसे शेतक-यांना केव्हा मिळाले ? हे पैसे शेतक-यांना उशिरा मिळाल्यामुळे शेतक-यांनी आत्महत्या केली. त्यासंदर्भात शासनाने उत्तरामध्ये असे नमूद गेलेले आहे की श्रीमती कमलाबाई चव्हाण या रागीट स्वभावामुळे चिडचिड करीत आणि त्यातच त्यांनी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केली. अशा प्रकारचे उत्तर देणे हा निर्लज्जपणाचा कळस आले. शेतक-यांनी मानसिक आजारातून आत्महत्या केली असे जे सरकारने उत्तर दिलेले आहे ते अयोग्य असून हा शेतक-यांचा अवमान आहे. शासनाने हे शब्द मागे घेऊन या सभागृहामध्ये शेतक-यांची माफी मागितली पाहिजे. सभापती महोदय, आपणाला तरी हे उत्तर पटते काय ?

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.30079...

श्री.विनोद तावडे...

आपणास हे उत्तर सत्य वाटते ? तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे, तेव्हा मंत्री महोदय शेतकऱ्यांची माफी मागणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी मागणी केलेली आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, त्यांनी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्याची सरकारची तयारी आहे. पोलीस तपासामध्ये ज्या गोष्टी आढळून आल्या त्या आधारावर ही माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, शासनाने डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. हे पॅकेज टप्प्या टप्प्याने देण्यात आले कारण कृषी विभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतरच त्या आधारावर शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यात येते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माहिती गोळा करण्यासाठी सहा-सहा महिने लागतात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे अशी त्यांना विनंती आहे. दिनांक 30.1.2012 रोजी 100 कोटी रुपये, दिनांक 6.2.2012 रोजी 200 कोटी रुपये , दिनांक 30.3.2012 रोजी 963.26 कोटी आणि 136.48 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. आपण या सर्व रकमांची बेरीज केल्यास ती साधारणत: 1300 ते 1400 कोटी रुपयांपर्यंत जाते. ही रक्कम मार्च महिन्यापूर्वी देण्यात आली आहे. दिनांक 2.7.2012 पर्यंत शासनाकडून 1585 कोटी रुपयांचे वितरण विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आले आहे. 1585 कोटी रुपयांपैकी 1343.12 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेले आहेत. तर काही शेतकऱ्यांचे खाते नंबर शोधण्याचे काम सुरु आहे. म्हणून उर्वरित 242 कोटी रुपये देण्याचे बाकी राहिले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30079...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेल्या पॅकेजच्या वाटपाची कशी हेराफेरी होत आहे हे आपण पाहत आहोत. पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी हा विषय काढला होता. त्यावेळी सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम यांना म्हणाले की, आपण दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले म्हणून ही वाढीव पुरवणी मागणी आली आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत की, पॅकेजमधील आणखी 200 कोटी रुपये द्यायचे आहेत. या सदनामध्ये सरकारकडून उत्तर घेताना आमची बनवाबनवी होत आहे. मी जे पटलावर आहे ते मांडत आहे. मला वाटते म्हणून बोलत नाही. हे सरकार अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार चालत आहे. राजकीय इच्छा शक्तीवर चालत नाही हा आमच्या सर्वांचा रोष आहे. अधिकाऱ्यांच्या मर्जीवर हे सरकार चालत आहे म्हणून 100 कोटी रुपये दिले नंतर 150 कोटी रुपये दिले असे प्रकार होत आहेत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30079..... श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय,आपणासही चीड येईल अशी वाईट गोष्ट या ठिकाणी मी नमूद करु इच्छितो. श्री. गजनान थोरात यांनी मानसिक आजाराला कंटाळून आत्महत्या केली आहे. मी वाशिम येथे त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कटुंबीयांची भेट घेऊन आलो आहे.वडनेर, ता.केळापूर, जि.यवतमाळ येथील श्रीमती कमलाबाई चव्हाण या रागीट स्वभावामुळे चिडचिड करीत, त्यातच त्यांनी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केली. पोस्ट मार्टेमचा अहवाल आला त्यात विषारी औषध घेऊन आत्महत्या झाली असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. माणूस चिडचिड कधी करतो. प्रश्नाच्या उत्तरातील शब्द मागे-पुढे झाल्या बरोबर माननीय मंत्री महोदयांनी चिडचिड करण्यास सुरुवात केली. मंत्री महोदयांच्या शब्दाचा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याबरोबर ते लागलीच चीडचीड करावयास लागले. जगण्याची परिस्थिती अशक्य होते, संसार करणे अशक्य होते, अशा वेळी माणसाची चिडचिड होते. श्रीमती कमलाबाई चव्हाण यांनी या वैफल्यातून आत्महत्या केली अशी माहिती या ठिकाणी माननीय मंत्री महोदय देत आहेत.

महोदय,पुढील आत्महत्या अतिशय गंभीर आहेत. श्री.गजानन घोटेकर या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. माननीय श्री.उध्दव ठाकरे आणि आम्ही त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या नातेवाईकांची भेट घेतली आहे. माननीय श्री.शिवाजीराव मोघे साहेब, आपण यवतमाळचे असल्यामुळे या शेतकऱ्याने आत्महत्या का केली या बाबतची माहिती आपणाला देखील आहे. शासनाचे उत्तर ऐकून माननीय श्री.मोघे साहेब हे देखील अस्वस्थ झाले असतील. श्री. गजानन घोटेकर यांनी ट्रॅक्टर दुरुस्तीकरिता लागलेल्या खर्चामुळे कर्जबाजारी होऊन आत्महत्या केल्याचे शासनाने उत्तर दिलेले आहे. या बाबतीत मी अतिशय गंभीर माहिती देऊ इच्छितो की, बँकेने या शेतकऱ्याला जुना ट्रॅक्टर दिला. त्याच्यावर असलेले ट्रॅक्टरचे कर्ज तसेच राहिले,दुरुस्तीवर जास्त खर्च होत राहिला. त्यामुळे तो शेतकरी कर्जबाजारी झाला व शेवटी त्याने आत्महत्या केली. आम्ही त्या ठिकाणी जाऊन वस्तुस्थिती जाणून घेतली आहे. माननीय श्री.शिवाजीराव मोघे यांच्या मतदार संघात झालेली ही घटना आहे. दारु पिऊन शेतकरी आत्महत्या करतात अशा प्रकारची माहिती देऊन माननीय मंत्री महोदय शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टिंगल टवाळी करतात ही अतिशय गंभीर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30079... श्री.दिवाकर रावते...

गोष्ट आहे. आम्ही सर्व माननीय श्री.उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली श्री.गजानन घोटेकर यांच्या घरी जाऊन भेटलो, तेथे त्यांच्या भावाची भेट घेतली. बँकेकडून कर्जाने घेतलेले ट्रॅक्टर बँकेच्या दरवाज्यात ठेवले होते म्हणून आम्ही अंदोलन करण्याच्या मन:स्थितीत आहोत, अशा प्रकारची माहिती आम्हाला त्या ठिकाणी दिली गेली. शासनाकडून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत अशा प्रकारचे उत्तर येते, त्यामुळे आम्ही कोणत्या सामाजिक भावनेतून शासनाकडे पहावे हा प्रश्न आमच्या समोर उभा राहिलेला आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या सारखा गंभीर विषय शासन टिंगल टवाळीने उडवून लावीत असेल तर ही गोष्ट बरोबर नाही. सदरचे शेतकरी कर्जबाजारी झाल्याने त्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एखादा शेतकरी कर्जबाजारी होऊन त्यास कुटुंब चालविणे अशक्य झाले तर तो शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. या सभागृहात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टिंगल टवाळी आम्ही सहन करुन घेणार नाही. पॅकेजचे पूर्णपणे पैसे दिले गेले नाहीत अशी माहिती शासनाकडून दिली जात आहे. शासन अजून 800 ते 900 कोटी रुपये देईल अशा प्रकारची देखील माहिती या ठिकाणी मंत्री महोदयांकडून दिली गेली आहे. पुरवणी मागणीच्या माध्यमातून 400 कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब, आपण सभागृहाची माफी मागा असे बोललो तर आपणास वाईट वाटले. या प्रश्नाच्या बाबतीत मंत्र्यांना आणि राज्यमंत्र्यांना माफी मागावी लागेल. माननीय मंत्री महोदय सभागृहाची माफी मागणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, पोलिसांनी जो तपास केला आहे, त्या तपासावर आधारित या ठिकाणी उत्तर देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितले की, त्यांना जुना ट्रॅक्टर देण्यात आलेला आहे. माझ्याकडे यासबंधीचे सर्व पुरावे उपलब्ध आहेत..

सभापती : त्या शेतकऱ्याला कंपनीकडून दुर्देवाने जुना ट्रॅक्टर देण्यात आला असेल तर त्या गोष्टींची गांभीर्याने दखल घेऊन त्या बाबतीत पोलीस केस करणे, त्या प्रकरणाचा पाठपुरावा करणे, त्या शेतकऱ्यावर जो अन्याय झालेला आहे, तो अन्याय निवारण करण्याच्या दृष्टीने शासनाने मदत करण्याची आवश्यकता आहे. या बाबतीत शासन मदत करणार काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30079...

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपल्या निदेशाप्रमाणे ते प्रकरण पुन्हा तपासून घेण्यात येईल. माझ्याकडे काही पुरावे उपलब्ध आहेत. त्याप्रमाणे हा जुना ट्रॅक्टर नव्हता, त्यांना देण्यात आलेला ट्रॅक्टर नवीन होता. माझ्याकडे आर.टी.ओ.कार्यालयाचे पुरावे आहेत. ट्रॅक्टरचे बील आहे. त्या कंपनीचे सर्टिफिकेट आहे, त्या ट्रॅक्टरचे चासीस नंबर माझ्याकडे आहे. ही सर्व कागदपत्रे पाहता ट्रॅक्टर नवीन होता. तरी सुध्दा आपल्या निदेशाप्रमाणे सदर प्रकरणाची पुन्हा तपासणी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सरकारने पहिल्यांदा कबूल केले पाहिजे की, डिसेंबर महिन्यामध्ये 2 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा झाली. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, 34 लाख 39 हजार 385 इतक्या बाधित शेतकऱ्यांना निधीचे वाटप करण्यात आले. 29 लाख 58 हजार 112 इतक्या बाधित शेतकऱ्यांना निधीचे वाटप व्हावयाचे आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30079....

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, पॅकेज घोषित करुन 7 महिन्यांचा कालावधी लोटलेला आहे. पेरण्या सुरु झाल्या आहेत.शेतकरी अत्यंत अडचणीत आहे. बुलढाणा, वर्धा, नागपूर या बँकांमध्ये विभागीय आयुक्तांनी शासनाकडून आलेले पैसे जमा केलेले आहेत. परंतु बँका सीक झाल्या असल्यामुळे शेतकऱ्यांना पैसे देत नाहीत. या 3 जिल्हयातील शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. अमरावती विभागीय आयुक्तांनी जाहीर केले की, कापसाच्या अनुदानापोटी सरकारने अमरावती विभागातील 5 जिल्हयांसाठी 365 कोटी रुपयांचे अनुदान सरकारने दिले आहे. 10 लाख 63 हजार 175 शेंतकऱ्यांना अनुदान द्यावयाचे होते. त्यातील 313 कोटी 46 लाख रुपयांचे 8 लाख 3 हजार 540 शेतकऱ्यांना वाटप झालेले आहे.14 कोटी रुपये अद्याप स्थानिक प्रशासनाकडे जमा आहेत.

सभापती : माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा. माननीय सदस्यांनी माहिती दिली तर केवळ 2/4 प्रश्नच होण्याची शक्यता आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,75 कोटी रुपयांपैकी फक्त 41 कोटी जमा झाले. शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप पैसे जमा झालेले नाहीत. एका बाजूला शेतकऱ्यांसाठी सरकार पॅकेजची घोषण करते. गेल्या डिसेंबरच्या अधिवेशनात अनेक पॅकेजची घोषणा झाली.पैसे शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या.शेतकऱ्यांच्या पॅकेजचे तीन-तेरा वाजलेले आहेत. डिसेंबरमध्ये पॅकेज जाहीर होऊनही शेतकऱ्यांच्या हातामध्ये पैसे जुलैपर्यंतपडलेले नाही. ज्या चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांची हे सरकार टिंगल-टवाळी करीत आहे. चिडचीड स्वभाव झाल्यामुळे, मानसिक आजारामुळे आत्महत्या झाल्या असे शासनाने सांगितले. मानसिक आजाराचे काय निदान झाले ? शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टिंगल-टवाळी करणाऱ्या या सरकारने शेतकऱ्यांची माफी मागितलीच पाहिजे. शेतकऱ्यांना अवमान सहन केला जाणार नाही. म्हणून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची माफी मागावी आणि चुकीचे उत्तर दिल्यामुळे क्षमायाचना करावी अशी माझी मागणी आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले होते त्याला उत्तर दिलेले आहे. आपण सूचना दिल्याप्रमाणे माहिती परत तपासून घेण्याची शासनाची तयारी आहे. परंतु कारण नसताना काहीतरी राजकीय मागणी करावयाची हे बरोबर नाही. काहीतरी चुकीचे आहे असे सांगून शासन माफी मागणार नाही. याठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये कोणत्याही प्रकाची चुकीची माहिती शासनाकडून देण्यात आलेली नाही.

श्री. एस.क्यू.जमा : सभापती महोदय, मला संधी द्यावी.

सभापती : प्रत्येक वेळी मी माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देण्याचा प्रयत्न करतो.एखाद्या वेळी संधी मिळाली नाही याचा अर्थ संधीच दिली नाही असा होत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की आम्ही आढावा घेत होतो. मार्चपर्यंत टप्प्याटप्प्याने 300-325 कोटी रुपये वाटप केले असे त्यांनी सांगितले....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, 300 कोटी रुपये नसून 1300 कोटी रुपयांचे वाटप झाले असे सांगितले.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, डिसेंबरमध्ये अधिवेशन सुरु झाल्यापासून आमची पहिल्या दोन दिवसापासूनची आग्रही मागणी होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आढावा घ्यावयाचा आहे. सर्व्हे करावयाचा आहे. ते झाल्यानंतर माहिती देतो. यासाठी तीन आठवडयांचा कालावधी लागला. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पॅकेजची घोषणा झाली.मागणी पहिल्या दिवशी केली घोषणा तीन आठवडयानंतर झाली. तीन आठवडे सर्व्हे केला. डिसेंबरअखेरपर्यंत किती पैसे दिले असे विचारले असता किती पैसे गेले ते सांगितले. उशिरा का गेले असे विचारल्यावर सर्वेक्षण झालेले नव्हते असे उत्तर दिले. पैसे आयुक्तांकडे गेले. शेतकऱ्यांना नंतर मिळाले. अजूनही 29 लाख 58 हजार शेतकऱ्यांना मदत मिळणे बाकी आहे.प्रोसेस चालू आहे.शासनाच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री. खर्चे....

ता. प्र. क्र. 30079..... श्री. विनोद तावडे .....

आपण आम्हाला संरक्षण द्यावे कारण वरिष्ठ सभागृहाच्या पातळीवर अशा प्रकारे प्रश्नोत्तराला दिलेल्या लेखी उत्तरात असत्य व संदिग्ध स्वरुपाची माहिती राहू नये. लेखी उत्तरात "श्रीमती कमलाबाई चव्हाण या रागीट स्वभावामुळे चिडचिड करीत" तसेच "मानसिक आजाराला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली" असा जो शब्दप्रयोग करण्यात आला तो रेकॉर्डवर राहणे चुकीचे आहे. अशा प्रकारचा उल्लेख राहणे म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांचा अपमान करणारे ठरेल. याबाबत मंत्री महोदय मृत शेतकऱ्याची माफी मागण्यास तयार नाही पण आपण मात्र असा उल्लेख कामकाजातून काढून टाकण्याच्या सूचना द्याव्यात अशी मी विनंती करतो.

श्री. प्रकाश सोळंके : श्रीमती कमलाबाई चव्हाण, रा. वडनेर यांचा दि. 20.4.2012 रोजी विषारी औषध प्राशन करुन मृत्यू झाला. त्याची पार्श्वभूमी अशी आहे की, ही महिला तिच्या पतीपासून विभक्त राहत होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पतीचे स्टेटमेंट पोलिसांनी रेकॉर्ड केले असून त्या आधारावर ही माहिती दिली आहे. तसेच त्यांचा स्वभाव चिडचिडा होता आणि रागाच्या भरात त्यांनी विष प्राशन केले असे तपासात निष्पन्न झालेले आहे. त्यांच्या कुटुंबातील लोकांनीच जर अशा प्रकारचे स्टेटमेंट दिले तर शासनाच्या वतीने काय करावे अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे ते सांगावे, त्यानुसार शासन करण्यास तयार आहे.

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, चिडचिड असा शब्दप्रयोग लेखी उत्तरात आला आहे तो आपण काढू शकाल काय? जर आपण काढू शकत नसला तर सभापती या नात्याने हा "चिडचिड" असा शब्दप्रयोग मला काढता येईल. कारण तो शब्द निवेदनात असला किंवा नसला तरी त्याने काहीच फरक पडत नाही.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, आपण दिलेल्या आदेशानुसार "चिडचिड" हा शब्द मागे घेण्यात येत आहे.

यानंतर श्री. एस.क्यू.जमा यांचा प्रश्न.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, आपने वह शब्द हटा दिया, उसके लिए धन्यवाद देता हूं. सरकार ने दिसम्बर में किसान के पॅकेज की जो घोषणा की, उसका जवाब आया. मगर मार्च तक कोई रिलिफ नहीं दिया गया. चाहे वह कपास के हो, सोयाबीन के हो या धान के हो. इन्होंने कहा है कि सभी डिविजनल कमिशनर को 1300-1400 करोड़ रुपये दिए है. लेकिन किसानों को अभी तक रिलिफ नहीं मिला है. नागपुर और विदर्भ के बारे में मैं आपको विश्वास के साथ जानकारी दे रहा हूं. नागपुर विभाग के जो आंकड़े सरकार के पास भेजे गए है, उसको मंत्रालय ने वापस किया. उसमें बहुत त्रृटी थी. बहुत सारी गलतियां थी. उसको दोबारा भेजा गया. उसमें सुधार कर के वह अभी गया है. जब खरीप की फसल हो रही थी, जिस समय उनको बीज और खाद लेना था, जितनी उनको मदद मिलनी चाहिए थी, वह मदद उनको नहीं मिली. अब उनको मदद दी जा रही है.

सभापति महोदय, शासन ने रिलिफ के बारे में यदि कोई घोषणा की है तो उसके लिए कोई समय-सीमा होनी चाहिए या नहीं ? कितने दिनों में मदद मिलेगी ? यदि उतने दिनों में मदद नहीं मिली तो उसके लिए रिस्पॉन्सब्लिटी फिक्स होनी चाहिए. किसकी गलती से वह काम नहीं हुआ ? इस बारे में सरकार कोई निर्णय लेगी क्या ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि जो आत्महत्या होती है वह किस कारण से हुई है, कर्ज के कारण हुई या अन्य किसी कारण से हुई, इस बारे में शंका होती है. क्या महाराष्ट्र सरकार इसमें एक सुधार कर सकती है कि किसी किसान ने आत्महत्या की है तो उस क्षेत्र के जो जनप्रतिनिधि है, तहसीलदार, बीडीओ, एसडीओ, पुलिस उसकी जो भी जांच करती है, उस टाईम आत्महत्या के बारे में वहां के जनप्रतिनिधि को शामिल क्यों नहीं किया जाता ? उनका दस्तखत क्यों नहीं लिया जाता है ?

यानंतर श्री जुन्नरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30079 .....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासंदर्भात समिती नेमली असून या समितीचे अध्यक्ष स्वत: जिल्हाधिकारी आहेत व या समितीमध्ये जिल्हयाचे एस.पी. तसेच कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या बाबतीत पूर्ण तपासणी केली जाते व ते पात्र ठरले तर त्यांच्या कुटुंबियांना मदत दिली जात असते. परंतु पुरावे आढळले नाही तर मदत दिली जात नाही. सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश केला जावा अशी सूचना केली असून त्यांच्या सूचनेचा विचार भविष्यकाळात निश्चितपणे केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील चर्चा नागपूर अधिवेशनामध्ये उपस्थित करण्यात आली होती. मी त्यावेळेस माननीय वित्तमंत्र्यांना विचारले होते की, गेल्या वर्षीचे 400 कोटी रुपये देणे बाकी असून आता 2000 कोटी रुपयांचे पॅकेज म्हणजे एकंदर 2400 कोटी रुपये शासनाला द्यावे लागणार आहे. त्यावेळी माननीय वित्त मंत्र्यांनी सांगितले होते की, 2400 कोटी रुपयांची अंमलबजावणी मार्च पूर्वी करण्यात येईल. खते, बी-बियाणे यासाठी शेतकऱ्यांना पैसे उपलब्ध करुन दिले जात असतात. आता जुलै महिना उलटून चालला असतांना सुध्दा राज्य शासन शेतकऱ्यांना मदत करीत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हे पैसे कधी पर्यंत दिले जाणार आहे ? कोकणातील बँकामध्ये यासंदर्भातील पैसे जमा झालेले नाही. या ठिकाणी जी माहिती दिली जात आहे ती चुकीची दिली जात आहे. त्यामुळे राज्यशासनाने नागपूरच्या अधिवेशनात जे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाची राज्य शासनाने फसवणूक केलेली आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशनाची सांगता होण्यापूर्वी राज्यशासन शेतकऱ्यांना हे पैसे घरपोहच करणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, शेतकऱ्यांना ही मदत देण्याचे जाहीर झाल्यानंतर कृषी विभागाकडून जी माहिती संकलित करण्यात आली होती त्या प्रमाणे कापूस, सोयाबीन व धान या पिकासाठी साधारणत: 1733 कोटी रुपये लागतील असा कृषी विभागाचा पहिला अंदाज होता. परंतु त्यांनतर शासनाने अशी भूमिका घेतली की, 7/12 पाहून, त्यावरील पेरा पाहून ही मदत दिली जावी व ही मदत जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावी व त्यानुसार हे पैसे जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30079 .....

श्री. प्रकाश सोळंके ...

करण्यात आले. या पैशाच्या संदर्भात विभागीय अधिकाऱ्यांनी 1733 कोटी रुपयांऐवजी 2096 कोटी रुपये लागतील हे सांगितल्यानंतर शासनाने 400 कोटी रुपयांची पुरवणी मागणी आणली व ही पुरवणी मागणी आता मंजूर देखील झालेली आहे. त्यामुळे या निधीचे वितरण विभागीय अधिकाऱ्यांना करण्यात येईल. शेतकऱ्यांना पैसे देण्यामध्ये विलंब कशामुळे झालेला आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे या निधीचे तातडीने वितरण करुन ते पैसे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे आदेश दिले जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे लिहिले आहे की, "ट्रॅक्टर दुरुस्ती करिता लागलेल्या खर्चामुळे घोटेकर यांनी आत्महत्या केलेली आहे." या गावात गेल्या सहा महिन्यात 24 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मी आत्महत्या का करीत आहे यासंदर्भात घोटेकर यांनी पत्र लिहून ठेवले होते व त्या पत्रात त्यांनी असे लिहिले होते की, "मी कर्जाला कंटाळून आत्महत्या करीत आहे. या गावात आत्महत्येशिवाय दुसरे काहीच निर्माण होत नसेल तर गावाने यापुढे काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मतदान करु नये."

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ट्रॅक्टर दुरूस्तीच्या खर्चासाठी त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. हे आपण लेखी उत्तरातच लिहिलेले आहे. त्या शेतकऱ्याच्या भावाला आपण चार हजार रूपये दिले आहेत. येथे अत्यंत हिडिस पद्धतीने आत्महत्येची विटंबना होत आहे. ते आम्ही सहनच करू शकत नाही. आपण आम्हाला नेहमीच सहकार्य करीत आला आहात. पण शासनाची आत्महत्येकडे पाहण्याची मानसिकता दुर्दैवी आहे. त्यामुळे आम्ही याचा निषेध करतो व सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहा समोर ठेवणे.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात विंधन विहिरी कार्यक्रमांतर्गत 12 ठिकाणी विंधन विहिरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील श्री.भगवान साळुंखे, डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.रामनाथ मोते, श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांच्या दिनांक 16 एप्रिल 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नक्रमांक 25049 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

(प्रेस :अधिक माहिती छापावी.)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल
सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 20 जुलै 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरूवार, दिनांक 19 जुलै 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांचे	40 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे	40 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011 श्री.विजय सावंत, वि.प.स.यांचे	40 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
4	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011. श्री.विनोद तावडे, वि.प.स.यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत.	30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीच अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "महापालिकेच्या 40-45 वर्षाच्या शाळा मोडकळीस आल्या असून दुरूस्तीकडे केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील बेलोरा-बोराळे रस्त्याच्या बांधाकामासाठी भूसंपादित केलेल्या जमिनीचे दर कवडीमोल ठरविल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शहराचे नकाशे, सोयीसुविधांचे नकाशे,उपग्रह इमेजने डेटाबेस बनविणे, पीआयएम व जीपीएस तंत्रज्ञानाने तयार करण्याकरिता महानगरपालिकेने केलेल्या तरतुदीमध्ये शहर अभियंता श्री.डगावकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून केलेला गैरव्यवहार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदमे यांनी "घाटकोपर (पश्चिम) मुंबई येथील श्री जिनेश्वर को-ऑप.क्रेडिट सोसायटी कर्जाची थकबाकी मंदावल्यामुळे डबघाईस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी यांनी "गोदावरी नदीच्या वाळू पट्टयात होत असलेली अवैध वाळू वाहतुकीस पायबंद घालण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "निर्यातवाढीच्या उद्देशाने जाहीर करण्यात आलेले विशेष आर्थिक क्षेत्राचे धोरण केंद्र सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे अडचणीत येऊन अनेक मंजूर झालेले प्रकल्प रद्द हाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील मरीन ड्राईव्ह येथे दिनांक 18 जुलै 2012 रोजी भरधाव वेगाने होंडासिटीकार चालविणाऱ्या उद्योगपतीच्या मुलाने 74 वर्षाच्या वृद्धाला चिरडून दोन कॉन्स्टेबलना धडक दिल्याची घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

त्यानंतर, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई विभागातील कार्यशाळा सहाय्यक शिक्षकांना तांत्रिक विद्याशाखेतून अतिरिक्त ठरवून निम्न स्तरावर समायोजित केल्याने शिक्षकांमध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यातील बहुतेक व्यवहारांवर आधारित इ-गव्हर्नन्सचे प्रकल्प महाऑनलाईनच्या माध्यमातून राबविण्याचा प्रयत्न असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी एक नियम 93 अन्वये सूचना दिली होती...

सभापती : माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सर्व सूचना येथे वाचून दाखवित नाही. आपण मला दालनामध्ये भेटावे, मी त्याबाबत जरुर लक्ष घालीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनासंबंधी

सभापती : नियम 93 अन्वये सूचनेवरील एकूण पाच निवेदने आलेली आहेत. यापैकी काही निवेदनांच्या बाबतीत संबंधित सन्माननीय सदस्य तर काही निवेदनांच्या बाबतीत संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. ज्यावेळी संबंधित माननीय सदस्य व संबंधित मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित होतील त्या वेळी ती निवेदने चर्चेला घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांन औचित्याचा मुद्या मांडण्यासाठी मी परवानगी दिलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्या मांडावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये स्त्री भ्रूणहत्येच्या प्रश्नाने मोठे रुप धारण केले आहे. या हत्या बंद होण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा तत्परतेने कामाला लागल्या आहेत. या निमित्त मला घाशीराम कोतवाल नाटकातील एका प्रसंगाची आठवण होत आहे. कारण नसतांना कुणालाही पकडून तुरुंगात टाकण्याचा हा प्रकार सुरु आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये दोन दिवसापूर्वी एक घटना घडली आहे. डॉ. मनिषा दमाणी नावाच्या स्त्री रोग तज्ज्ञ या गेली 22 वर्षे त्या जिल्ह्यामध्ये स्त्री रोग तज्ज्ञ म्हणून काम करीत आहेत. त्यांच्याकडे ज्या महिलेचा नैसर्गिक गर्भपात झाला त्या महिलेची पूर्णपणे कायदेशीर मान्यता घेऊन आणि तेथील पी.सी.पी.एन.डी.टी. च्या डॉ. निर्मला शर्मा यांना या सर्व गोष्टी सांगून त्या महिला पेशंटचा जीव वाचविण्यासाठी या महिला डॉक्टरने प्रयत्न केले. परंतु त्यामधून दगावलेले मूल त्याच्या पालकांनी बाहेर टाकून दिल्यामुळे त्याची बातमी प्रसिध्द झाल्यानंतर व जिल्हाधिकाऱ्यांना व शल्य चिकित्सकांना ही सर्व गोष्ट माहीत असतांना सुध्दा डॉ. मनिषा दमानी यांना हातकडया घालून पोलीस व्हॅनमधून पोलीस ठाण्यामध्ये आणण्यात आले.

गेली 22 वर्षे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि एका असहाय महिलेचा जीव वाचविणाऱ्या डॉक्टरांवर अशा रितीने जर कारवाई होणार असेल तर त्याचे फार गंभीर परिणाम या राज्यामध्ये झाल्याशिवाय राहणार नाहीत. माझ्या माहिती प्रमाणे जळगाव जिल्ह्यातील सर्व डॉक्टर्सनी या घटनेचा निषेध म्हणून आज संप पुकारला आहे. सभापती महोदय, माझ्या या औचित्याच्या मुद्दयामध्ये माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत देखील सहभागी झाले आहेत. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनाही म्हणणे मांडण्यासाठी आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, जळगावमध्ये डॉ.मनिषा दमाणी स्त्री-रोग तज्ज्ञ म्हणून प्रॅक्टीस करतात. मी त्यांना गेली 22 वर्षे वैयक्तिकरित्या ओळखतो.पी.सी.पी.एन.डी.टी. हा जो कायदा आहे, त्याचा कशा प्रकारे अतिरेक केला जातो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ.मनिषा दामाणी यांच्यावर झालेला अत्याचार आहे. त्यांनी माझ्याकडे एक डेथ सर्टीफीकेट पाठविलेले आहे आणि त्याला जळगाव म्युनसिपल कौन्सिलने सर्टीफाय केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, हे अबॉर्शन 18 आठवड्यामध्ये झालेले आहे.गर्भपात कायद्यानुसार 20 आठवड्यापर्यंत मान्यताप्राप्त अबॉर्शन होऊ शकते.डॉ.मनिषा दमाणी यांच्या हॉस्पिटलमध्ये गेली 15 वर्षे सदरहू महिला ट्रिटमेंट घेत होती. तिचे वारंवार अबॉर्शन होत होते. ती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाल्यावर डॉक्टरांनी तिला ट्रिटमेंट दिली. तसेच तिला एक अपत्य देखील आहे.

सभापती महोदय, त्यानंतर आता ती गर्भवती होती आणि 18 आठवडे झाल्यानंतर ती डॉक्टरांकडे आली तेव्हा तिचा अगोदरच गर्भपात सुरु झाला होता. वजायनल पोर्शन मध्ये त्या मुलाचे काही पार्टस् आले होते म्हणजेच ते नैसर्गिकरित्या अबॉर्शन होत होते. अबॉर्शन झाल्यानंतर डॉक्टरांनी सर्व काळजी घेतली आणि सगळ्या डॉक्टरांना, प्रशासकीय यंत्रणेला सांगितले तसेच डीन यांनाही सांगितले. याबाबतीत संबंधितांचा जाबजबाब नोंदविताना कायद्याप्रमाणे तेथे डीन उपस्थित असणे आवश्यक होते.पण ते त्याठिकाणी उपस्थित राहिले नाहीत आणि पोलिसांनी त्यांना बोलविले देखील नाही. श्रीमती ज्योती सोनावणे हिचा गर्भपात झाला असून अर्भक स्त्री जातीचे असल्याचे आम्हाला सांगण्यात आले आहे. दिनांक 16-7-2012 रोजी दुपारी 3.15 वाजता गर्भपात झाला असून ते अर्भक मृतावस्थेमध्ये असल्याचे दिसून आले. हे अर्भक आम्ही ताब्यात घेऊनत्याची वैदिक पध्दतीने अंतिम क्रिया करु" असे त्या महिलेल्या वडिलांनी लिहून दिलेले आहे आणि तो कागद माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, पण असे असताना देखील त्या मुलीच्या वडिलांनी ते अर्भक नेऊन हॉस्पिटलच्या बाहेर असलेल्या गटारामध्ये टाकून दिले आणि दुसऱ्या दिवशी सफाई कामगाराला ते अर्भक मिळाले. त्यानंतर सदरहू महिला डॉक्टर विरुध्द गुन्हा दाखल झाला. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या प्रथमच पोलीस स्टेशनमध्ये गेल्या. त्यावेळी सर्वकाही बरोबर आहे,तुमची काही चूक नाही असे सांगून डॉ.दमानी यांना सोडून देण्यात आले.परंतु दुसऱ्या दिवशी त्या पेशंट तपासत असताना महिला पोलीस बरोबर घेऊन तेथे पोलीस इन्स्पेक्टर आले आणि त्यांना भर रस्त्यातून अक्षरश:फरफटत त्यांच्या क्लिनिकमधून बाहेर काढले. त्यावेळी डॉ.दमानी यांनी असे सांगितले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

मी माझ्या गाडीतून येते पण त्यांना गाडीतून येऊ दिले नाही. त्यांना हातकड्या घातल्या आणि पोलीस व्हॅनमध्ये बसवून घेऊन गेले. हा फार मोठा अत्याचार आहे ही दुर्दैवी घटना आहे. हे सगळे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. त्यामुळे माझी आणि सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेबांची अशी विनंती आहे की, याठिकाणी हे सर्व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. त्यामुळे ताबडतोब तेथील पोलीस अधिकाऱ्यांवर, जिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. तसे झाले तरच डॉक्टर समाजामध्ये आपल्या यंत्रणेबद्दल एक विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या सदनामध्ये एक महत्वाचा प्रश्न मांडलेला आहे. भ्रूणहत्तेच्या बाबतीत कठोरता ठेवणे आवश्यक आहे आणि यासंदर्भात योग्य त्या कठोर सूचना विभागाने दिलेल्या असून गृह विभागाने याची नोंद देखील घेतली आहे.परंतु सर्व क्लिष्ट बाबींची नोंद करुन हॉस्पिटलमध्ये आलेल्या महिलेचे अबॉर्शन नैसर्गिकरित्या होत असताना ती हॉस्पिटलमध्ये आली आणि याबाबतीत जी सर्व प्रकारची काळजी घ्यावयाची असते ती घेत असताना सुध्दा भ्रूण हत्येचा गुन्हा असे समजून जर सदर महिला डॉक्टरवर काही कारवाई होत असेल तर मग आपण भ्रूण हत्येच्या बाबतीत जी काळजी घेतो त्याला कुठेतरी छेद देत आहोत असे वाटते. हे प्रकरण गंभीर असून माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये स्वत: लक्ष घालावे. मला असे वाटते की, सदरहू घटनेच्या बाबतीत डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हीसेसच्या पातळीवर संपूर्ण चौकशी करण्यात यावी. आपण भ्रूणहत्येच्या बाबतीत कठोर असणे जरुरीचे आहे. त्याबाबतीत या सदनातील कोणीही काहीही बोलणार नाही. पण हा जर नैसर्गिक अबॉर्शनचा प्रकार असेल, 20 आठवड्याच्या आतील बाळ असेल किंवा हॉस्पिटलमध्ये येण्यापूर्वीच जर अबॉर्शनची प्रक्रिया सुरु झाली असेल व अशा वेळी त्या अनुषंगाने ज्या काही कायदेशीर बाबी असतील त्याची त्या दवाखान्यातील स्त्री डॉक्टरांनी नोंद केली असेल, म्युनिसिपल कौन्सिलमध्ये त्याची नोंद केली असेल तर त्या नंतरही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या संबंधित महिला डॉक्टरची अवहेलना होणे ही गोष्ट बरोबर आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे आपण याबाबतीत स्वत: लक्ष घालावे आणि डायरेक्टर हेल्थ सर्व्हीसेसच्या पातळीवर याची चौकशी करण्यात यावी.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, होय. सन्माननीय सदस्य श्री.दीपक सावंत यांनी जे प्रकरण नजरेस आणून दिले आहे त्याबाबतीत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./ मु.शी. : शासनाच्या नवीन नियमामुळे विक्रमगड तालुक्यातील माता व बालक प्रकल्पांतर्गत आदिवासी मातांना सवलतीच्या दरात सोनोग्राफीची पुरविण्यात येत असलेली सेवा बंद करावी लागणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवते.. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छिते. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील परिच्छेद क्रमांक 2 मधील दुसऱ्या ओळीत 'करण्यासाठी गेले' या शब्दांऐवजी 'करण्यास गेले नाहीत' असे शब्द वाचावेत.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या आठवड्यात सुध्दा या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली आणि माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी उत्तर दिले. दुर्गम भागामध्ये एका डॉक्टरला दोनच केंद्रासाठी रजिस्ट्रेशन वैध राहील असा जो केंद्राचा नियम आला त्यामुळे हे डॉक्टर्स जास्त ठिकाणी जाऊ शकत नाहीत. मी डॉ. आनंद कापसे यांचा उल्लेख केला होता. जे दवाखाने धर्मादाय म्हणून चालतात त्या ठिकाणी असे रेडिऑलॉजिस्ट मिळणे अवघड झाल्यामुळे त्या ठिकाणी अडचणी निर्माण होत आहेत. राज्य सरकारने केंद्र शासनाकडे आदिवासी भाग, कोकणासारखा डोंगराळ, दुर्गम भाग किंवा विदर्भातील भागासाठी त्या कायद्यात काही विशेष सूट मागणार का ? परवा सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितले की, सिंधुदुर्ग जिल्ह्याची लोकसंख्या साडेआठ लाख धरली तरी त्यासाठी 5 रेडिऑलॉजिस्ट आहेत. म्हणजे दीड लाख लोकसंख्येमागे 1 रेडिऑलॉजिस्ट आहे. दीड लाख लोकसंख्येमागे 1 रेडिऑलॉजिस्ट असेल तर तो किती ठिकाणी जाणार ? त्याला दोनच ठिकाणी जाता येईल. जोपर्यंत त्या ठिकाणी नवीन रेडिऑलॉजिस्टच्या पदाची निर्मिती होत नाही तोपर्यंत उपयोग होणार नाही. कायदा आला आणि कमतरता असल्यामुळे नवीन रेडिऑलॉजिस्ट येतीलही परंतु ते येण्यास जर सहा महिने, आठ महिने लागणार असतील तर तोपर्यंतच्या काळात त्या ठिकाणी जे काम बंद पडत आहे ते कसे चालू राहील यासाठी राज्य सरकार केंद्राकडे डोंगराळ, आदिवासी भागासाठी त्या कायद्यात काही सूट मागू शकते का आणि मागणार आहे का ? जर मागणार नसेल तर या बाबतीत शासनाचा काय विचार आहे ? कायदा आला आणि त्याची अंमलबजावणी केली यापेक्षा या बाबतीत शासन काय व्यावहारिक उत्तर काढणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा सेंट्रल सुपरवायजरी बोर्डाचा निर्णय आहे. त्याचे नोटिफिकेशन 5 जूनला काढण्यात आलेले आहे. जे रेडिऑलॉजिस्ट आणि गायनॅकॉलॉजिस्ट आहेत त्यांना दोन ठिकाणीच काम करण्याचे कायद्यानुसार बंधनकारक आहे. राज्य शासन स्वत:हून त्यामध्ये काही बदल करु शकेल असे मला वाटत नाही. राज्य शासनाचे जे उपलब्ध मॅनपावर आहे त्यामध्ये आपल्या राज्यात 2795 खाजगी रेडिऑलॉजिस्ट उपलब्ध आहेत आणि शासकीय ठिकाणी 244 रेडिऑलॉजिस्ट उपलब्ध आहेत. सोनोग्राफी सेंटर्स जवळपास 8 हजार आहेत. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

रेडिऑलॉजिस्ट आणि गायनॅकॉलॉजिस्ट मिळून आपल्याकडे पुरेसे मॅनपावर उपलब्ध आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, रेडिऑलॉजिस्ट हे मुबई, पुणे अशा प्रमुख शहरांमध्ये जास्त आहेत. पण ग्रामीण भागामध्ये उपलब्ध नाहीत त्यामुळे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून दिशाभूल होते आणि प्रश्न बाजूला पडतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, यामध्ये दिशाभूल करण्याचा प्रश्न नाही. जी सोनोग्राफी केंद्रे आहेत त्या ठिकाणी मॅनपावर उपलब्ध आहे असे माझे म्हणणे आहे. धावडे हॉस्पिटल, पालघर च्या बाबतीत माननीय सदस्यांनी सूचनेमध्ये उल्लेख केलेला आहे. डॉ. उदित अवाशिया यांचे कार्यकर्ते त्या ठिकाणी महिला रुग्ण घेऊन यावयाचे त्यांची त्या मानाने थोडी असुविधा होत आहे असा उल्लेख सूचनेमध्ये करण्यात आलेला आहे. आपली जी जननी शिशू सुरक्षा योजना आहे

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

त्या योजनेनुसार 102 हा टोल फ्री नंबर फिरविला तर शासकीय ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन पेशन्टवर उपचार करण्याची सोय करण्यात आलेली आहे. त्यानुसार तेथे शासकीय ॲम्ब्युलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे महिलांची असुविधा होत आहे असे म्हणण्याचे कारण नाही.

सभापती : राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे आहे की, शहरी विभागामध्ये अशा प्रकारची भरपूर सेंटर्स आहेत. परंतु रिमोट एरियामध्ये अशा प्रकारची सेंटर्सची संख्या कमी असण्याची शक्यता आहे. ती सेंटर्स वाढविण्याच्या दृष्टीने व परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने आपण लक्ष द्यावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या कायद्याची अंमलबजावणी करणे राज्य सरकारांवर बंधनकारक आहे. त्यात शासनाला काही करता येत नाही.

सभापती : राज्य शासन केंद्र सरकारला आपली भूमिका कळवू शकते.

प्रा.फौजिया खान : जर कमतरता आढळली तर तसे शासनाला कळविता येईल. परंतु सध्या 8500 सेंटर्स आहेत आणि तेथे पुरेसे मनुष्य बळ उपलब्ध आहे असे अशी शासनाची माहिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी.:दि.1.11.2005 पूर्वी विना अनुदान तत्वाच्या शाळांमधील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांच्या जुन्या पेन्शनसंबंधीचा हा प्रश्न आहे. दिनांक 1.11.2005 पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षण सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. न्यायालयानेही शासनाला निर्देश दिलेले आहेत. शेवटी शासनाने आमच्या विनंतीचा आदर करुन त्या शिक्षकांसाठी जी.आर.निर्गमित केला. परंतु त्यातून दुसरा एक गट राहिला आहे. ज्यांच्या नियुक्त्या दिनांक 1.11.2005 पूर्वीच्या आहेत त्यांच्यामध्ये फरक एवढाच आहे की, त्यावेळी त्या शाळा विना अनुदानित किंवा अंशत: अनुदानित होत्या. दि.1.11.2005 नंतर 100 टक्के अनुदानित झाल्या आहेत. शासनाने दिनांक 1.11.2005 ही डेड लाईन ठरविलेली आहे. त्यापूर्वीच त्यांनी सेवेत प्रवेश केलेला आहे. राज्याच्या शिक्षण संचालकांनी सर्व जिल्ह्यांना असे आदेश दिले आहेत की, ज्यांच्या नेमणुका दि.1.11.2005 पूर्वीच्या आहेत त्या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. त्यानुसार या शिक्षकांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली होती. परंतु शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानंतर त्या शिक्षकांची सुरु झालेली खाती बंद करण्यात आली. त्यामुळे ते शिक्षक कोर्टात गेल्यानंतर कोर्टाने सुध्दा या शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू असल्याचा निर्णय दिलेला आहे. यासाठी किमान 400-500 शिक्षक कोर्टात गेले होते आणि शासनानेही ते मान्य केलेले आहे. केवळ त्या 500 शिक्षकांचा प्रश्न नाही तर राज्यातील सर्व शिक्षकांसाठी लागू असलेला हा निर्णय आहे.

शिक्षण सेवकांपैकी 10 हजार शिक्षण सेवक कोर्टात गेले होते. आता हे शिक्षक कोर्टात जावेत अशी शासनाची अपेक्षा आहे. एका शिक्षकाला कोर्टात केस दाखल करण्यासाठी 25 हजार रुपये खर्च येतो. म्हणून दि.1.11.2005 पूर्वी सेवेत असलेले व त्यानंतर 100 टक्के अनुदानावर आलेल्या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना न्यायालयाच्या निर्णयानुसार लागू केली जाईल काय ? हा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे, पण शासनाने याबाबत तातडीने निर्णय ध्यावा अशी अपेक्षा आहे. शासनाचा जी.आर.निर्गमित होईपर्यंत या शिक्षकांची खाती सुरु होती, पगारातून कपात होत होती. त्यांची खाती बंद करण्यात आली आहेत. ही कपात पूर्ववत सुरु करण्याचे आदेश आजच्या आज देण्यात येतील काय ?

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

प्रा.फौजिया खान : दि.1.11.2005 रोजी ज्या शाळा 100 टक्के अनुदानित आहेत आणि ज्या शिक्षण सेवकांची सेवा नियमित झालेली आहे त्यांच्यासाठी ही योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यानंतर दिनांक 29.11.10 रोजी वित्त विभागाने सुधारित निर्णय घेऊन जुन्या जी.आर.मधील दुसरी अट वेगऑफ केली. पण ज्या अंशत: अनुदानित शाळा आहेत त्यांना व ज्यांची सेवा नियमित झालेली नाही त्यांना सुध्दा ही जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याबाबतीत अनेक लोक हायकोर्टामध्ये गेलेले आहेत. हायकोर्टाने अंतरिम आदेश देऊन याबाबतीत शासनाने पॉलिसी तयार करावी असे सांगितलेले आहे. हायकोर्टाच्या आदेशानुसार ॲफिडेव्हिट कण्याची प्रक्रिया सुरु आहे. ॲफिडेव्हिट करुन शासन आपली भूमिका निश्चित करणार आहे.

श्री. रामनाथ मोते : ज्यांची खाती सुरु होती ती त्यांना बंद करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी दिले होते. ज्यांची खाती आधीच सुरु झालेली आहेत ती सुरु ठेवण्याच्या बाबतीत आदेश देण्यात येतील काय ?

प्रा.फौजिया खान : यामध्ये खूप गुंतागुंत निर्माण होईल. जो पर्यन्त कोर्टामध्ये ॲफिडेव्टि केले जात नाही तोपर्यन्त निर्णय घेणे योग्य होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहापुढील कामकाजाबाबत

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, अन्न व नागरीपुवठा विभागाच्या संदर्भातील सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 32 आज चर्चेसाठी आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे सभागृहामध्ये नाहीत. तेव्हा सदरहू निवेदन उद्या चर्चेसाठी घेण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवर एकूण 57 निवेदने करावीत असे निदेश मी दिलेले आहेत. दिनांक 18 जुलै 2012 रोजी 6 निवेदनांवर चर्चा झाली. एक निवेदन पटलावर ठेवण्यात आले. आज एकूण 5 निवेदने चर्चेसाठी होती त्यापैकी 2 निवेदनांवर चर्चा झाली. म्हणजे आतापर्यन्त एकूण 9 निवेदने चर्चेसाठी आली आहेत.

मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या संदर्भात माझ्या दालनामध्ये मुख्य सचिवांना बोलावून त्यांना देखील मी सूचना केल्या आहेत. नियम 93 अन्वयेच्या ज्या सूचनांवर "शासनाने निवेदन करावे" असे निदेश दिले जातात ती निवेदने 5 दिवसामध्ये सदनात चर्चेसाठी आली पाहिजेत असा दंडक आहे. यानुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी. मी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना कळवून कोणत्याही परिस्थितीमध्ये निवेदन करा असे सांगितलेले आहे. सर्व निवेदने 5 दिवसाच्या आत सभागृहामध्ये चर्चेला येणे गरजेचे आहे. यांची नोंद माननीय मंत्री महोदयांनी घेणे आवश्यक आहे. आजच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील मी यासंबंधी चर्चा करणार आहे.

आज सकाळी माझ्या दालनामध्ये सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीमध्ये आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या कामकाजामध्ये पुढील प्रमाणे बदल करण्याचे ठरले आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आज चर्चेसाठी घेण्यात येणार नाही. हा प्रस्ताव उद्या दिनांक 20 जुलै 2012 रोजी चर्चेसाठी घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

काल दिनांक 18 जुलै 2012 रोजी सत्ताधारी पक्षातर्फे देण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर अपूर्ण राहिलेले आहे. ते उत्तर आज दुपारी 2.00 वाजता मध्यंतराच्या सुट्टीनंतर सुरु करुन एक तासाच्या आत पूर्ण करावयाचे आहे.

निवृत्त होणा-या सदस्यांच्या निरोपाचा कार्यक्रम आज न घेता तो मंगळवार दिनांक 24जुलै 2012 रोजी घेण्याचे निश्चित झालेले आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन विधेयके चर्चेसाठी आहेत. सदरहू दोन्ही विधेयकावर चर्चा करुन ती संमत करावयाची आहेत. या बाबतीत दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य सहकार्य करतील अशी मला अपेक्षा आहे. तसेच आज कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या 2 अर्धा-तासाच्या चर्चा आपल्याला आजच चर्चेसाठी घ्यावयाच्या आहेत. याप्रमाणे कामकाज ठरलेले आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील कांजूरमार्ग (पूर्व) येथील क्षेपणभूमीमध्ये टाकलेल्या कच-यामुळे कन्नमवारनगर येथे पसरलेली दुर्गंधी व रोगराई

मु. शी. : मुंबईतील कांजूरमार्ग (पूर्व) येथील क्षेपणभूमीमध्ये टाकलेल्या कच-यामुळे कन्नमवारनगर येथे पसरलेली दुर्गंधी व रोगराई यासंबंधी श्री. हेमंत टकले ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगरपालिकेकडून कांजूरमार्ग (पूर्व) येथे सुरु करण्यात आलेल्या क्षेपणभूमीमध्ये सर्व नियमांचे उल्लंघन करुन टाकलेल्या कचऱ्यामुळे विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप, नाहूर, पवई व घाटकोपर तसेच, सन १९६६ साली निर्माण झालेली माजी मुख्यमंत्री कै.दादासाहेब कन्नमवार यांच्या नावाने आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली म्हाडा वसाहत - कन्नमवार नगर येथे पसरलेली दुर्गंधी व रोगराई, नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, क्षेपणभूमी काम सुरु असताना कांदळवनाची झालेली कत्तल, तसेच लाखो मासे, विविध किटक व परदेशातून येणारे फ्लेमिंगो सारखे पक्षी यांच्या अस्तित्वाचा निर्माण झालेला प्रश्न, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, सदरचा भूखंड हा झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत घरे बांधण्यासाठी राखीव असतांना सदर भूखंड क्षेपणभूमीसाठी चुकीच्या पध्दतीने वापरणे, त्यामुळे मुंबई शहरात रहात असलेल्या ५५ % झोपडपट्टीवासियांच्या घरांचा निर्माण झालेला प्रश्न, नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आणि संवेदनशील बनलेल्या विषयावर मी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. चिंचोली डंम्पींग ग्राऊंड बंद करावे आणि त्याऐवजी पर्यायी डंम्पींग ग्राऊंड कांजूरमार्ग सर्व्हे क्रमांक 275 येथे हस्तांतरण करण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेला दिले होते. परंतु तसे न करता कांजूरमार्ग येथील कन्नमगार नगर येथे असलेल्या मोकळ्या जागेमध्ये हे डम्पींग ग्राऊंड सुरु केले. त्यामुळे तेथील कांदळवनाची कत्तल झाली आहे. तेथील लाखो मासे आणि विविध किटक मेले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे त्या भागात तापमानानुसार स्थलांतर करणारे परदेशातील फ्लेमिंगोसारखे पक्षी येतात. त्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड केल्यामुळे या सर्वांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, हे डम्पींग ग्राऊंड आरक्षण बदलून करण्यात आलेले आहे. शास्त्रोक्त पध्दतीने डम्पींग ग्राऊंडचा वापर व्हावयाला पाहिजे अशा शर्तीवर केंद्र सरकारच्या परवानगीने अशी कामे करायची असतात. परंतु या ठिकाणी तसे न होता केंद्र सरकारच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. आज त्या भागातील जवळपास पाच लाख नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. त्या भागातून गेल्यास त्या सर्व भागात सर्वत्र दुर्गंधी आणि प्रदूषित हवा पसरल्याचे दिसून येते. डम्पींग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा दिलेली असताना त्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड करण्यात आलेले नाही. तसेच हे डम्पींग ग्राऊंड करताना केंद्र सरकारच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. या कामासाठी जवळपास 4 हजार 500 कोटी रुपये उपलब्ध झाले असताना कोणत्या कारणासाठी येथील नागरिकांचे जीवन असह्य करीत आहात ? ही जागा मुंबईतील सर्वसामान्य व झोपडपट्टीवासियांसाठी घरे बांधण्यासाठी राखीव ठेवण्यात आली असताना त्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड कसे करण्यात आले ? त्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड केल्यामुळे तेथे आरोग्याचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, आपल्या भागात डम्पींग ग्राऊंड नसावे असे कोणालाही वाटत असते. परंतु डम्पींग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा निर्माण केली असताना, तसेच केंद्रीय पर्यावरण विभागाने घालून दिलेल्या अटी आणि शर्तींचे उल्लंघन झालेले असताना तसेच तेथे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे तो थांबविण्यात येईल काय ? पर्यायी डम्पींग ग्राऊंड शास्त्रोक्त पध्दतीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

केले पाहिजे. नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याच्या दृष्टीने शासन योग्य ती कारवाई करणार काय ? तसेच या प्रकरणी गैरप्रकाराने वागलेल्या अधिकाऱ्यांवर अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अत्यंत कळकळीने आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने त्यांच्या व्यथा सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, निवेदनात सविस्तर व स्पष्ट माहिती दिलेली आहे. या प्रकल्पाला केवळ शासनाने मान्यता दिली असे नाही किंवा त्याबाबत शासनाने निर्णय घेतला असे नाही. हा विषय माननीय सर्वोच्च न्यायालयात गेला होता. गोराई येथे डम्पींग ग्राऊंड होते. त्या संदर्भातील मुद्दा माननीय उच्च न्यायालयात गेला होता. चिंचोली येथील डम्पींग ग्राऊंडचा मुद्दा सुध्दा सर्वोच्च न्यायालयात गेला होता. सर्वोच्च न्यायालयाने हे दोन्ही डम्पींग ग्राऊंडस बंद करण्याचे आदेश देताना सांगितले की, पर्यायी जागा शोधल्यानंतर हे डम्पींग ग्राऊंडस बंद करावेत कारण मुंबईतील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबईत रोज जवळपास साडेसहा हजार टन कचरा गोळा होतो. हा कचरा कोठे टाकायचा हा देखील प्रश्न आहे. ज्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड करण्यात आले आहे ती जागा सॉल्टपॅन लॅन्डची आहे. केंद्र सरकारला आपण ही जागा सुचविल्यानंतर त्यांनी त्यास मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

श्री.भास्कर जाधव...

आणि 141.77 हेक्टर जागा मुंबई महानगरपालिकेला क्षेपणभूमी म्हणून देण्याचा निर्णय सन 2008 मध्ये सुप्रीम कोर्टाने घेतला. त्यानंतर ही जागा तत्काळ मुंबई महानगरपालिकेस देण्यात आली. त्या जागेवर कांदळवन आहे, तेथे नियमांचे उल्लंघन झाले आहे अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दिली आहे.

या बाबतीत मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आज त्या ठिकाणी सी.आर.झेड.चे क्षेत्र वगळून 65.96 हेक्टर एवढी जागा त्या ठिकाणी उपलब्ध आहे. त्या जागेवर दररोज 1 हजार टन कचरा टाकण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. त्या ठिकाणी टाकण्यात आलेल्या कचऱ्याची शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावली जात आहे. त्यामुळे कोणाला त्रास होतो आहे असे वाटत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या ठिकाणी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होतो आहे, तेथे नियमबाह्य काम होत आहे. केंद्र शासनाने, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निदेशा व्यतिरिक्त अन्य काही चुकीच्या पध्दतीचा वापर होत असेल तर त्याची निश्चितपणे चौकशी करता येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, त्या ठिकाणी खत प्रकल्प कार्यान्वित करुन तेथून वीज निर्मिती करण्यात येणार आहे. ती वीज निर्मिती केव्हा होणार आहे, मुंबई पूर्व उपनगर व पश्चिम उपनगर मध्ये लोडशेडींग होते, या परिसरासाठी सदर वीज वापरण्यात येईल काय ? सदर प्रकल्प होऊ नये अशी आमची मागणी होती, परंतु मुंबई महानगरपालिकेमध्ये वेगळी माणसे बसलेली आहेत, आमची मागणी त्यांनी मान्य केली नाही. सदर प्रकल्प निर्मितीच्या बाबतीत जो काही गोंधळ चाललेला आहे तो कधी बंद होणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यानी पहिला प्रश्न विचारला त्या बाबतीत सांगू इच्छितो की, या खत प्रकल्पातून वीज निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वीज निर्मिती करावी असे प्रस्तावित आहे, त्या ठिकाणी वीज निर्मितीस अद्याप सुरुवात झालेली नाही ही गोष्ट खरी आहे. त्यांनी पुढील प्रश्न विचारला आहे की, या प्रकल्पातून वीज निर्मिती झाल्यानंतर ती वीज पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगरात दिली जाईल काय? या खत प्रकल्पामधून 6 मे.वॅ.वीज निर्मिती होणार आहे. 4 हजार टन कचरा त्या ठिकाणी जाईल त्यावेळी 12 मे.वॅ.वीज निर्मिती होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : "आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी". असे येथे चालू आहे. या ठिकाणी प्रश्न कचऱ्याचा आहे आणि आपण वीज निर्मितीकडे जात आहात.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्या ठिकाणी वीज निर्मितीचा प्रस्ताव प्रस्तावित आहे. अद्याप वीज निर्मिती प्रकल्प सुरु झालेला नाही. त्यामुळे त्या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज कोणाला द्यावी याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मुंबईकरांना वीज नक्की मिळेल. सन्माननीय सदस्यांनी गोंधळाच्या बाबतीत प्रश्न विचारला. गोंधळ कसला आहे तो मला काही समजला नाही. त्यामुळे त्या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना माझाच गोंधळ उडाला आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1.....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी गंभीर प्रश्नाचे विषयांतर होत आहे. या प्रकल्पातून वीज निर्मिती होणार आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु लक्षवेधीच्या निवेदनामध्ये शासनाने जी माहिती दिलेली आहे ती धादांत खोटी आहे. अधिकाऱ्यांनी उत्तर तयार केलेले आहे. या उत्तराबाबत माझा आक्षेप आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, लोकवस्तीपासून 200 मीटर दूर डंपिंग ग्राऊंड असल्यामुळे दुर्गंधीचा त्रास होणार नाही. हा जावईशोध कुणी लावला ? 200 मीटरवर दुर्गंधी येत नाही असा निष्कर्ष काढणारे हे अधिकारी कोण ? 500 मीटरवर लोकवस्ती आहे त्यामुळे रोगराई होणार नाही अशा प्रकारची उत्तरे दिलेली आहेत. सामान्य माणसाच्या जीवनाशी खेळणारा हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी ज्या सायंटिफिक गाईडलाईन्स दिलेल्या आहेत त्या पाळल्या जात नाहीत. आयबीएन लोकमतवर 4 दिवसापूर्वी चर्चा झाली होती त्यावेळी हा रिपोर्ट दाखविला होता. एजन्सीने काय केले यापेक्षा प्रत्यक्षात तेथे काय आहे हे महत्वाचे आहे. अँथोनी लारा नावाच्या एजन्सीला हे काम दिलेले आहे. काही अटी आणि शर्तीवरच हे काम दिलेले आहे. या भागातील पायाभूत सुविधा असतील त्यात रस्ते असतील, शास्त्रशुध्द पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट असेल या गोष्टी केल्यानंतर त्याच्या बदल्यात दुसरी जागा एजन्सीला वापरास द्यावयाची आहे. एजन्सीने त्याठिकाणी गॅरेज उभे केले आहे. गॅरेजचे काम जोरात सुरु आहे. परंतु सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निदेशानुसार शास्त्रशुध्द पध्दतीचा वापर करुन कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, चुकीचे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे कोणालाही अशा पध्दतीने कचरा टाकण्याची परवानगी दिली जात नाही. कचरा टाकल्यानंतर त्याची लेव्हल करावी लागते. कचऱ्याचा वास येऊ नये म्हणून केमिकल टाकावे लागते. केमिकल मारल्यानंतर कॅपिंग करावे लागते. अशा पध्दतीच्या अनेक अटी त्यामध्ये असतात. त्याच्यावर पैसा खर्च केला जातो. माननीय सदस्यांनी सांगितले की, एजन्सीमार्फत सायंटिफिक प्रोसेसनुसार काम केले जात नाही. जर असे होत नसेल आणि अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर याबाबतीत मी एवढेच सांगेन की, एका आठवडयात याच जागेवर म्हणजे जेथे डंपिंग ग्राऊंड आहे तेथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली जाईल आणि अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली अशी खात्री झाली तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1 .....

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आयबीएन लोकमतच्या बातमीचा याठिकाणी उल्लेख केला आहे. भाईंना मी आयबीएन लोकमतवर खूप वेळा पाहतो आहे. कधीतरी हा विषय सुध्दा मी बघेन.

उप सभापती : मंत्रीमहोदयांनी मूळ प्रश्नाला बगल दिलेली आहे. कारवाई करीन असे सांगितले पण नेमकी कोणती कारवाई करणार हे सांगितले नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे. माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई त्या भागात राहतात. मी सुध्दा कांजूरमार्ग भागात 6-7 वर्षे राहिलो आहे. तेव्हा तेथे डंपिंग ग्राऊंड नव्हते. सुप्रीम कोर्टाच्या निदेशानुसार सायंटिफिक प्रोसेस पाळली जात नाही असा माझा आक्षेप होता. आजच कोणाला जरी आपण पाठविले तर आपल्या लक्षात येईल. सायंटिफिक पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने शासन काही पावले उचलणार आहे काय ?

नंतर श्री. खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1....

उप सभापती : मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार हे मात्र मंत्री महोदयांनी सांगितलेच नाही. खरे तर या सर्व अधिकाऱ्यांना याच भागात राहण्यासाठी सक्तीने पाठवून त्यांनाच अनुभव घ्यायला लावले तरच त्यांना समजू शकेल.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, एखाद्या अधिकाऱ्याना डंपिंग ग्राऊंडच्या ठिकाणी पाहणी करण्यासाठी पाठवावे. पण या ठिकाणी मी स्वत:च जाण्यास तयार आहे. अशा प्रकारे कोणता अधिकारी असत्य माहिती देत असेल तर मी स्वत:च भेट देण्यासाठी तयार आहे. तसेच सन्माननीय सदस्यांची तयारी असेल आणि माननीय उप सभापतींना वेळ असेल तर त्यांच्याच नेतृत्वाखाली सर्व पक्षाचे एक-एक आमदार मिळून आपण केव्हाही जाऊ शकतो. त्यासाठी माननीय उप सभापती महोदयांनी वेळ द्यावा अशी विनंती करतो.

श्री. हेमंत टकले : महोदय, डंपिंग ग्राऊडसाठी केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानगी घेतली जाते तशी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची सुध्दा परवानगी घ्यावीच लागत असणार. या ठिकाणी केंद्राचे किंवा राज्याचे अधिकारी भेट देत असतीलच. तशी भेट केंद्रीय पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे काय ? समजा आम्ही सर्वांनी असा मुद्दा उपस्थित केला की डंपिंग ग्राऊंडमुळे दुर्गंधीचा त्रास होऊन आरोग्याला धोका निर्माण होतो. अशा प्रकारे या भागात राहणाऱ्या 5 लाख लोकांच्या आरोग्याला धोका होऊ नये म्हणून प्रत्येकाला सुरुवातीला शासनाच्या वतीने एक मास्क देण्याची व्यवस्था केली जाणार काय ? तसेच ज्या पध्दतीने मंत्री महोदय सांगता त्यानुसार तातडीने कोणती उपाययोजना करणार आहे, तसेच सीपीसीबी आणि एमपीसीबी अशा दोन्ही पोल्यूशन कंट्रोल बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी या भागाची तपासणी करुन शासनाला अहवाल दिलेला आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे या प्रकल्पासाठी सीपीसीबीचा रिपोर्ट आणि मान्यता देखील मिळालेली आहे. त्याचबरोबर आपल्या एमपीसीबीची सुध्दा परवानगी आहे. तसेच आजूबाजूच्या वस्तीला दुर्गंधीचा त्रास होतो असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, मुंबई शहरासारखी राज्यातील इतर महत्वाच्या व मोठ्या शहरांमधून कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. पूर्वीची

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ..... लक्षवेधी सूचना क्र. 1....

सन 1960-70 वर्षापासून जी वस्ती आहे त्या वस्त्यांना आता डंपिंगचा त्रास होऊ लागल्याने तेथील लोक सांगायला लागले की, आम्हाला या डंपिंगचा त्रास होत असल्याने हा प्रकल्प बाहेर कोठे तरी घेऊन जावा. पण डंपिंग ग्राऊंड कोठे जाणार हा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. कारण पूर्वी डंपिंगच्या भागात किंवा आजूबाजूला वस्ती नव्हती. आता वस्ती झाल्यामुळे त्यांचीच मागणी आहे की, आम्हाला दुर्गंधीचा त्रास होतो. यासाठी एमएमआर रिजनमध्येच शीळ फाट्याजवळ 125 एकर जागा घेण्याचा विचार एमएमआरडीए करीत आहे. या ठिकाणी एमएमआर रिजनमधील संपूर्ण कचऱ्याची विल्हेवाट भविष्यात लावावी लागणार आहे. हाच प्रश्न राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समोर देखील प्रकर्षाने निर्माण होत आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर न देता आपण एमएमआर रिजनमध्ये फिरुन आलात असे मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर योग्यच आहे. कारण मोठमोठ्या शहरांमधून बाहेर निघणारा कचरा इतक्या मोठ्या प्रमाणात निघतो की, त्याची विल्हेवाट लावण्यासाठी जे डंपिंग ग्राऊंड्स आहेत त्यांनाही विरोध होत आहे. परवा सभागृहात कचऱ्यासंबंधी लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती. त्यात 130 कोटी रुपये नाले सफाईवर खर्च केले जातात अशीही चर्चा झाली. अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात गाड्यांचा वापर होतो. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीचा विचार करणेही आता गरजेचे झाले आहे. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, "शून्य-कचरा" मोहीम राबविण्याचा विचार शासन करणार काय ? तसेच परदेशात वापरतात तशा "यूज अँड थ्रो" सारख्या वस्तूंचा उपयोग करुन कचरामुक्त शहर बनविण्याचा विचार करणे आवश्यक आहे.

महापालिकेने आता नुकतीच प्लास्टिक बंदी घोषित केलेली आहे. कारण प्लास्टिकच्या बाटल्या कचरा म्हणून कोणी गोळा करीत नाहीत, याउलट कागदाच्या पिशव्या अथवा कागद तरी उचलतात.

यानंतर श्री. जुन्नरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

लोक वाटेल तसा कचरा फेकत असतात. आज प्लॅस्टिकला भाव मिळत नसल्यामुळे प्लॅस्टिक कोणी उचलत नाही. परंतु कागदाला बरा भाव असल्यामुळे केवळ कागदच उचलला जातो. कचरा होऊ नये यासाठी येणाऱ्या पिढीला पर्यावरण व नागरिक शास्त्राचा विषय शालेय अभ्यासक्रमात अनिवार्य केला तर पुढील अवास्तव कचरा टाकला जाणार नाही. कचरा टाकून आपण मुंबईतील मॅन्ग्रोव्हज नष्ट करीत आहोत, पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहोत. त्यामुळे शून्य कचरा मोहीम राबविण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रबोधनाचा भाग आहे. स्वत:पासून यासंदर्भात शिस्त लावावी असे मी समजतो. शहरांनी जर प्लॅस्टिक मुक्तीचा निर्णय घेतला तरच प्लॅस्टिक पासून आपण मुक्त राहू शकू. मी आपल्याला उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, रत्नागिरी जिल्हयामध्ये दापोली नगर पंचायत असून दापोली नगर पंचायतीच्या विकासाची मी जबाबदारी घेतलेली आहे. या शहरात प्लॅस्टिकची पिशवी, मग ती कितीही मायक्रॉनची असली तरीही ती वापरायची नाही, कोणत्याही कारणासाठी वापरायची नाही असा निर्णय घेतलेला आहे. या कामासाठी संपूर्ण शहरातील नागरिकांनी भरभरुन प्रतिसाद दिलेला आहे. प्लॅस्टिक बंदीच्या संदर्भात संपूर्ण शहराने सहकार्य केलेले आहे. या ठिकणची रद्दी जमा करुन कागदी पिशव्या बनविण्याचे काम महिलांना दिले असून सर्व व्यापाऱ्यांनी कागदाच्याच पिशव्या घ्याव्यात अशा प्रकारचे प्रबोधन केल्यामुळे दापोली नगरपालिका राज्यातून पहिली आलेली आहे. दापोली नगरपालिकेचे अनुकरण सर्व राज्याने करावे अशा प्रकारची मोहीम सुरु करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आता मी राधापूर शहराचा विकास करण्याचे काम हाती घेतले असून त्या ठिकाणीही प्लॅस्टिकची मोहीम यशस्वी झाल्यानंतर या प्रमाणे सर्व ठिकाणी आपल्याला प्रबोधनात्मक काम करता येईल असे मला वाटते.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, प्रती दिनी 100 टन कचऱ्यापासून खत निर्मिती व 3000 टनाच्या कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्यात येईल अशी माहिती उत्तरामध्ये देण्यात आलेली आहे. त्यामुळे कचऱ्यापासून खत व वीज निर्मितीच्या संदर्भात खाजगी संस्थांशी काही बोलणी झाली आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, कचऱ्यापासून खत निर्मिती व वीज निर्मितीचा प्रयोग पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत होत आहे. मुंबई महानगर पालिकेत या संदर्भात प्राथमिक स्तरावर बोलणी सुरु असून यासाठी ओपन टेंडर काढले जाणार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकल यांनी प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, केंद्रशासन व राज्य शासनाकडून तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संदर्भात मान्यता मिळालेली आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये डम्पींग ग्राऊंड मध्ये जो भूखंड आहे तो भूखंड झोपू योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी राखीव होता काय ? मुंबई, नवी मुंबई, नवी मुबई या ठिकाणच्या कचऱ्यासाठी एमएमआरडीएने शिळफाटा येथे डम्पींग ग्राऊंडसाठी जागा दिलेली आहे. जर हा भूखंड धरांसाठी राखीव असेल व या भूखंडाचा वापर आता डम्पींग ग्राऊंडसाठी होणार असेल तर या ठिकाणची घरे बांधून देण्यासाठी दुसरा कोणता भूखंड उपलब्ध करुन दिला जाणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या भूखंडावर रिझर्व्हेशन होते ही गोष्ट खरी आहे. सदर भूखंड सुप्रीम कोर्टाने डम्पींग ग्राऊंडसाठी दिलेला असून या ठिकाणची घरे बांधण्यासाठी दुसरी जागा उपलब्ध करुन देण्याचा निश्चितपणे विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

उप सभापती : राज्यशासनाने जर एखाद्या पर्टीक्युलर जागेसाठी रिझर्व्हेशन्स ठेवले असेल तर हे रिझर्व्हेशन्स बदलण्याचे अधिकार कोर्टाला आहेत काय ?

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धारित प्रत / मुद्रणदोषांसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक प्रश्न पडतो. शासनाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. प्रत्येक वेळी कोर्टामध्ये निर्णय का बदलला जातो ? मंत्रिमंडळ घटनेच्या कक्षेत राहून काम करते. मंत्रिमंडळाच्या कामकाजात न्यायालय हस्तक्षेप करतेच कसे ? न्यायालय स्वतंत्र, स्वायत्त आहे. शासनाला जाब विचारण्याचा अधिकार या सदनातील सन्माननीय सदस्यांना आहे. या सार्वभौम सभागृहाला आहे. हे सभागृह न्यायालयाच्या वर आहे. प्रत्येक गोष्ट आज न्यायालयात जात आहे. त्यामुळे विधी व न्याय विभागामध्ये कोण अधिकारी आणून ठेवले आहेत हे शासनाने तपासण्याची वेळ आलेली आहे. ते अधिकारी कशालाही विरोध करीत नाही. शासनाने जे केले ते योग्य आहे असे कधीच म्हणत नाही. आपण उच्च न्यायालयाला विचारावे की, आपणास स्थगिती देणे सोपे आहे, पण हा जो कचरा आहे तो टाकायचा कुठे? आज सर्व जबाबदारी सकारलाच घ्यावी लागते.

उप सभापती : या संबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करायला पाहिजे. राज्य शासनाने एखादा निर्णय घेतला असेल तर तो निर्णय बदलण्याचा अधिकार कोर्टाला आहे काय ? शेवटी शासन हे आपण चालविणार आहात की, कोर्ट चालविणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी तर आपलाच कार्यकर्ता असल्यामुळे बऱ्या पैकी माहिती घेत असतो. मी ग्रामीण भागातील माणूस आहे. मी शहरी जीवनात जगलो नाही हे मान्य करतो. सुदैवाने हे खाते माझ्याकडे आल्यामुळे मला अभ्यास करावा लागतो. हा प्रश्न का उपस्थित झाला हे मी मघाशी सांगितले. आपण सुप्रीम कोर्टापर्यंत का गेलो हे सांगतो. आपले गोराई येथे डंपिंग ग्राऊंड होते. तसेच चिंचोली येथे देखील डंपिंग ग्राऊंड होते. तेथील लोकांनी तक्रार केली की, हे डंपिंग ग्राऊंड बंद करा. डंपिंग ग्राऊंड बंद करण्याच्या निर्णयाप्रत आल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने कोर्टाला विचारले की, आम्ही कचरा टाकायचा कुठे ते सांगा. तेव्हा कोर्टाला निर्णय घेणे कठीण झाले. त्यावेळी कोर्टाने विचारणा केली की, आपल्याकडे काही जागा आहे काय ? तेव्हा मुंबई महानगरपालिका आणि शासनाने सेंट्रल गर्व्हमेंटची जागा असल्याचे सांगितले. त्यावेळी कोर्टाने सांगितले की, केंद्र सरकार ती जागा देत असेल तर त्यातून मार्ग निघू शकतो. त्यानंतर कोर्टाने केंद्र सरकारकडे विचारणा केली की, आपण ही जागा देण्यास तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

आहात काय ? देशातील ही पहिली केस आहे की, सदर जागा देण्यास केंद्र सरकार कबूल झाले. त्यानंतर कोर्टाने असे सांगितले की, ही जागा आपल्याला अन्य कोणत्याही उपयोगासाठी वापरता येणार नाही. ही जागा केवळ डंपिंग ग्राऊंड करिताच वापरता येईल. त्यामुळे ती जागा डंपिंग ग्राऊंड करिता गेली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेद्वारे एक चांगला विषय चर्चेला आणला आहे. या चर्चेतून मला एक गोष्ट सुचवायची आहे. या विभागाचे सचिव अत्यंत हुशार आहेत. महाराष्ट्रात जेथे डंपिंग ग्राऊंड असेल तेथून अमुक एका अंतरापर्यंत कोणत्याही वस्तीला परवानगी नसेल अशा प्रकारचा कायदा निर्माण करावा. आता तसा कायदा नसल्यामुळे डंपिंग ग्राऊंडच्या आजूबाजूला झोपड्या तयार होतात. नंतर मग काही जण म्हणतात की, हा माझा प्लॉट आहे. त्यावर मी इमारत बांधतो. असा कायदा केला तर भविष्यात अशा तक्रारी येणार नाहीत. तेव्हा असा कायदा आपण निर्माण करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. असा कायदा केला तर डंपिंग ग्राऊंडसंबंधी जे प्रश्न निर्माण होत आहेत ते थांबतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. असाच प्रश्न नागपूर मध्ये देखील निर्माण झाला होता. नागपूर येथील डंपिंग ग्राऊंड 60 वर्षापासूनचे आहे. आता त्याच्या आजूबाजूला लोकवस्ती झाली आहे. लोकांची मागणी आहे की, हे डंपिंग ग्राऊंड हलवावे. याबाबत काही सन्माननीय सदस्य माझ्यावर नाराज देखील होतात. मी व्यावहारिक विचार करतो. पण सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असते की, सभागृहात आपणाला "होय" म्हणायला काय जाते. कमीतकमी आपण "होय" म्हणावे. "होय" म्हणत असताना संभाव्य कोणत्या अडचणी निर्माण होतील याचा विचार एक नागरिक या नात्याने देखील मी करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. यासंबंधी आम्ही एक निर्णय घेतला आहे. आता नवीन डी.पी.होणार आहे. त्यात डंपिंग ग्राऊंड करिता जागा राखून ठेवणे, वेगवेगळ्या धर्माच्या अत्यंविधीकरिता स्मशानभूमीसाठी जागा राखून ठेवणे अनिवार्य करणार आहोत. सामाजिक प्रश्न भविष्यात निर्माण होऊ नये यासाठी अशा प्रकारची तरतूद डी.पी.तयार करताना करावी लागेल.

यानंतर श्री.सरफरे .....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

अर्थात ज्यावेळी अशाप्रकारे डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये जागा ठेवली जाते त्यावेळी त्याच्या आजूबाजूला रेसिडेंन्शिअल झोन दाखवू नये अशाप्रकारची सक्ती केली आहे. तरी देखील या संबंधी कायदा करीत असतांना त्यामध्ये अधिक स्पष्टता आणण्याबाबत विचार करण्यास हरकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुणे महानगरपालिकेने केलेली पाणी कपात

मु. शी. : धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुणे महानगरपालिकेने केलेली पाणी कपात यासंबंधी श्रीमती दीप्ती चवधरी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे येथील धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात पुणे महानगरपालिकेने एकवेळ कपात सुरु करणे, जून महिना व जुलै महिन्यातील १५ दिवस उलटूनही पुण्यात व धरण क्षेत्रात पावसाने दडी मारल्याने पुण्यातील पाणी समस्या चिंताजनक असणे, पाणी टंचाईच्या वेळी अनेक पुणेकरांना पाणी विकत घेण्याची वेळ येणे, पाणी पुरविण्यात काळा बाजार होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून उपस्थित होणे, झपाट्याने वाढणाऱ्या पुणे शहरात पाणी समस्येवर कायम स्वरुपी उपाय योजना न केल्यास शहराला भविष्यात गंभीर प्रश्नाला सामोरे जावे लागण्याची शक्यता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. जवळपास 40 लाख लोकसंख्या असलेल्या पुणे शहरातील धरणामधील पाणीसाठा कमी झाल्यामुळे अनेक वेळा पाणी कपातीला पुणेकरांना तोंड द्यावे लागत आहे. या पाणी समस्येवर कायम स्वरुपी उपाय योजना केली नाही तर भविष्यात गंभीर प्रश्नांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. पुणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन केले आहे. परंतु बाहेरगावाहून शहरामध्ये आलेले नागरीक आणि विद्यार्थी यांची अधिकृत नोंद केलेली नसतांना ते शहराच्या विविध भागामध्ये रहात असून पुणे महानगरपालिकेचे पाणी वापरीत आहेत. त्याचप्रमाणे पुणे शहरातील नागरीक रोज 200 ते 300 लिटर पाणी वापरतात अशी नेहमी ओरड केली जाते. मला आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, पुणे शहरालगत दोन कॅन्टॉनमेंट आहेत, पुणे शहराच्या हद्दीलगत 23 गावे आहेत त्यांना देखील पाणी पुरवठा केला जात आहे. तसेच, पाणी पुरवठा होत असतांना त्यामध्ये 30 टक्के पाण्याची गळती होत असते. या गोष्टी लक्षात घेता पुणेकर जास्त पाणी वापरतात असे म्हणणे चुकीचे आहे हे आपल्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.

येत्या काही दिवसात पाऊस पडला नाही तर पाणी पुरवठयाची परिस्थिती अतिशय गंभीर होणार आहे. या बाबतीत मला काही महत्वाचे प्रश्न विचारावयाचे आहेत. पुणे शहराला एका वर्षाला साडे बारा एमएलडी इतके पाणी लागते व तेवढे पाणी उचलले जाते. परंतु पुणे महानगरपालिकेने पुणे शहरासाठी 16 टीएमसी इतके पाणी मागितले आहे, ही मागणी आपण पूरी करणार काय? दुसरा प्रश्न असा की, साडे सात एमएलडी इतके पाणी सिव्हरेज ट्रीटमेंट प्लॅटमध्ये ट्रिटमेंट करुन आम्हाला मिळाले पाहिजे. त्या ठिकाणी ट्रिटमेंट प्लँट कार्यान्वित करावयाचा असेल तर त्यासाठी दरवर्षी 25 कोटी रुपये इतके इलेक्ट्रिसिटीचे बिल एमएसईबीला द्यावे लागणार आहे. सद्या एमएसईबीकडून साडे चार रुपये प्रति युनिट इतका दर लावला जात आहे. एम.एस.ई.बी. सिंचनासाठी 30 पैसे प्रति युनिट इतका दर लावते तोच दर ट्रिटमेंट प्लँटसाठी लावणार काय? हा दर लावला तरच हे ट्रिटमेंट प्लँट सुरु करता येईल. याचे कारण या ट्रिटमेंट प्लँटच्या केवळ विजेच्या बिलासाठी 25 कोटी रुपये खर्च करणे शक्य होणार नाही. म्हणून आपण ट्रिटमेंट प्लँटसाठी वीजेच्या दरामध्ये सवलत देणार काय?

सभापती महोदय, तेथील भामा आसखेड या धरणामधून 200 एमएलडी इतके पाणी मिळावे अशी पुणे महानगरपालिकेने मागणी केली आहे. शासनाने 100 एमएलडी इतका पाण्याचा कोटा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी....

मंजूर केला आहे. ही योजना राबविण्यासाठी येणारा 300 कोटी रुपयांचा खर्च पुणे महानगरपालिकेने करावा असे सांगितले आहे. हा खर्च करण्यास महानगरपालिका तयार आहे, परंतु धरणासाठी 750 कोटी रुपये इतका खर्च देखील पुणे महानगरपालिकेने करावा अशी करण्यात आलेली मागणी अन्यायकारक आहे. वडगाव शेरी, नगर रोड या भागातील पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी 200 एमएलडी पाणी पुरवठयाची आवश्यकता आहे, तितका कोटा पुणे महानगरपालिकेला वाढवून देणार काय, वॉटर ऑडीट करणार काय व धरणासाठी येणारा खर्च शासन करणार आहे काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,ही गोष्ट खरी आहे की, पुणे शहराला दिवसेंदिवस पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.आपण पाहिले तर दरवर्षी आपण पाहिले तर इरिगेशन विभाग पाणी वाढवून देत आहे आणि त्यासंदर्भात तात्पुरत्या उपाय योजना केल्या जातात आणि नागरिकाना पाण्याच्या समस्येला सातत्याने सामोरे जावे लागू नये म्हणून शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, आज पुणे शहराला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणामधून पाणी पुरवठा होत आहे. आज पुणे शहराला साडेबारा टीएमसी इतके पाणी दिले जात असल्याचे कागदोपत्री जरी दिसत असले तरी ही वस्तुस्थिती नाही. उलट 15 टीएमसी पाणी पुणे शहराला दिले जात आहे. आज पुणे शहराची लोकसंख्या जवळजवळ 40 लाख इतकी आहे. म्हणून पाणी पुरवठा तात्पुरता करण्यापेक्षा आता पुणे महानगरपालिकेने आणि तेथील पालक मंत्री आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री महोदय श्री.अजिदादा पवार यांनी यासाठी सातत्याने बैठका घेतल्या. तसेच मध्यंतरी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे देखील या संदर्भात बैठक झाली. या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला आहे की, केवळ तात्पुरता उपाय करण्यापेक्षा 2044 सालापर्यंत या शहरामधील लोकसंख्या किती वाढण्याची शक्यता आहे, त्या अनुषंगाने किती पाणी लागेल याचा आढावा घेण्यासाठी एक एजन्सी नेमण्यात आलेली आहे. त्या एजन्सीमार्फत या शहराला पाणी कुठून उपलब्ध केले जाईल, ते एकंदर किती लागेल आणि सध्या मिळणारे जे पाणी आहे त्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन कसे करता येईल याबाबत आढावा घेण्याचे काम सुरे आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सांगितल्याप्रमाणे यातील 30 टक्के पाणी पाईपच्या ऐवजी कॅनॉलमधून जात आहे आणि अशा वेळी ते पाणी 100 टक्के पाईप लाईन मधून कसे जाईल यादृष्टीने काम करण्याचा प्रयत्न सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे साडेसहा टीएमसी पाण्याचे शुध्दीकरण करणे म्हणजे रि-सायकलींग करणे ही बाब आम्हाला न परवडणारी आहे. मात्र तसे असले तरी ज्यावेळी 2000 सालामध्ये पाणी देण्याबाबत करार झाला आणि आता तेथून साडेअकरा टीएमसी पाणी उचलले जात आहे. त्यावेळी असे ठरले होते की, तुम्ही यातील साडेसहा टीएमसी पाणी तुम्ही आम्हाला पुन्हा रिसायकल करुन द्यावयाचे आणि आम्ही ते पाणी शेतीसाठी वापरु असा करार झालेला असून प्रत्यक्षपणे याला 2000

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये मान्यता मिळाली आणि त्यासंबंधीचा करार 2007 मध्ये झाला. त्यामुळे पुणे महानगरपालिकेला हा करार पाळणे बंधनकारक आहे. आपण जर हा करार पाळला तर पुणे महानगरपालिकेला साडेसहा टीएमसी पाणी पुन्हा मिळेल आणि आपल्याला इरिगेशनमधून जास्तीचे पाणी मिळू शकते हा एक मार्ग आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी भामा आसखेड या धरणाचा उल्लेख केला आहे. तेथून पाणी आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झालेले आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाचा उल्लेख केला आहे की, वॉटर ऑडीटींग होणार आहे काय? मला यानिमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना विनम्रपणे विनंती करावयाची आहे की, पुण्यासारख्या मोठ्या शहरामध्ये पाण्यासाठी मीटर सिस्टीम लागूच नाही. वास्तविक छोट्या-छोट्या शहरांमध्ये सुध्दा मीटर पध्दतीने पाणी घ्यावे आणि तशा पध्दतीने बिल भरावे असा आग्रह करीत आहोत. परंतु पुण्या शहरामध्ये पाण्यासाठी मीटर नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपण सर्वांनी याबाबतीत पुढाकार घेतला पाहिजे. 2000 सालापर्यंत तेथे मीटर होते आणि त्यानंतर तेथील मीटर बंद करण्यात आले. मात्र आता तेथेही मीटर लावले पाहिजेत. जर मीटरप्रमाणे पाणी आणि त्याचे बिल आल्यानंतर 24 तास पाणी आणि समान पाणी वाटप हे तत्व आपल्याला अंमलात आणता येईल आणि तसे झाले तर निश्चितपणे पुणे शहरातील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सदरहू विषयावर लक्षवेधी सूचना दिल्यानंतर मी व्यवस्था केली. 17 तारखेला चांगला पाऊस पडला आणि 18 व 19 तारखेला सुध्दा जास्त पाऊस पडत असल्याने पाण्याच्या संबंधातील बरीचशी अडचण दूर होईल असे वाटते.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, मला माझ्या महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. पुणे महानगरपालिकेची 16 टीएमसी पाणी उपलब्ध करुन द्यावे अशा प्रकारची मागणी आहे. या अनुषंगाने शासन कोटा वाढवून देणार आहे काय? तसेच 200 एमएलडी बाबत मागणी आहे, तो कोटा वाढवून देणार आहात काय? तसेच आमच्या जनरल बॉडीच्या बैठकीमध्ये मीटर सिस्टीम बाबत ठराव मान्य झालेला आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे त्याबाबत टेंडर सुध्दा काढण्यात आले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांना

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सांगितले की, 16 टीएमसी पाणी उपलब्ध करुन भागणार नाही. त्यापेक्षाही जास्त पाणी लागणार आहे. मध्यंतरी साठ्यातील 14 टीएमसी पाणी कमी झाले होते. त्यामुळे पाणी कमी करण्याच्या बाबतीत निर्णय झालेला होता. पण काल जो पाऊस झालेला आहे त्यामुळे 2.14 टीएमसी पाणी कमी झाले होते. परंतु आता जवळजवळ पूर्वीच्या लेव्हल इतकेच पाणी आहे त्यामुळे पाण्याचा साठा 16 टीएमसी पर्यंत वाढवून मिळेल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, सवलतीच्या दराच्या बाबतीत काय करणार ?

श्री.भास्कर जाधव : याबाबतीत आता बोलणे शक्य नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी रात्री टी.व्ही.वरील बातम्यांमध्ये पहात होतो की, जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तामध्ये पुणे शहरातील पाणी कुठे नेते? त्यासाठी शहरातील सर्व पक्षांचा त्याला विरोध होता. पण बातमीमधील खवचटपणा असा होता की, तेथील पोलीस बंदोबस्त पाहून याला विरोध करणारे कोणी तेथे गेले नाहीत. परंतु काल पुणे शहरातील पाणी कुठे नेले? आज सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी पुणे शहराला 17 टीएमसी पाणी देणार का असा प्रश्न विचारलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी कौतुकाने सांगितले की, आता पाऊस पडला आहे. आता 60 टक्के पाण्याचे शुध्दीकरण झाले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

जल शुद्धिकरणाबाबत आपण सांगितल्याप्रमाणे ते शक्य नाही. ते काम महानगरपालिकेने करावे हे बरोबर आहे. पण धरणाचा जो विषय आहे त्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्या धरणाचे काम चालू आहे त्यामध्ये 70 टक्के पैसे महानगरपालिकेचे, 20 टक्के पैसे राज्य शासनाचे आणि 10 टक्के पैसे केंद्र शासनाचे अशा पध्दतीने धरणाचे काम चालू आहे. त्याच पध्दतीने त्यांचा जो 700 कोटी रुपयांच्या धरणाचा प्रश्न आहे ते धरण कोणी बांधावयाचे आहे आणि त्या संदर्भात काय परिस्थिती आहे ? त्या बांधलेल्या धरणाच्या पाण्यावर वीज निर्मिती करतो. ज्यावेळेला धरणाचा पूर्ण खर्च महानगरपालिकेकडून होतो त्या वीज निर्मितीच्या उत्पन्नाचा सर्व लाभ महानगरपालिकेला मिळाला पाहिजे. मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या धरणातून होणाऱ्या वीज निर्मितीचा लाभ मुंबई महानगरपालिकेला मिळत नाही. पुण्यामध्ये ते धरण झाल्यानंतर त्याचा लाभ कोण घेणार ? ते काम कोणती कंपनी करीत आहे हे मी मुद्दाम या ठिकाणी सांगत नाही. परंतु अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी 700 कोटी रुपयांच्या धरणाचा जो मुद्दा उपस्थित केला त्या बाबतीत मुंबईच्या धर्तीवर ते धरण होणार आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की आता प्रत्येक शहराने स्वत:च्या पाण्याची व्यवस्था करण्याच्या मागे लागले पाहिजे असे मी वारंवार सांगतो. त्या संदर्भात मी मुंबईचे, नवी मुंबईचे उदाहरण देतो. धरणाचा जो विषय आहे त्याबाबत मी अधिक माहिती घेतली त्यानुसार तिकडच्या खोऱ्यामध्ये कोणतीही साईट उपलब्ध नाही. आज त्यासाठी एकच मार्ग आहे की, पाणी वाटपाच्या संदर्भात कृष्णा लवादानुसार मिळणारे जे पाणी आहे ते आपण अडविलेले आहे. त्यानंतर आता लवादाचा जो नवीन निर्णय येणार आहे त्या संदर्भात माझी अशी माहिती आहे की, लवादाच्या नवीन निर्णयाप्रमाणे आपल्याला 80 टीएमसी अधिकचे पाणी मिळणार आहे. त्या 80 टीएमसी पाण्याचे वाटप कसे करावे हे सुध्दा तात्पुरते ठरलेले आहे. ते ठरलेले असताना त्या पाण्याचा वापर सुध्दा पुणे शहर आणि बाजूच्या परिसरात करण्याबाबत सुध्दा विचार करावा लागेल. भामाखेडच्या धरणाला सुध्दा इरिगेशन खात्याकडून, शासनाकडून आपल्याला मदत होईल. हा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

विषय पूर्णपणे महानगरपालिकेवर टाकला जाणार नाही. लवादामध्ये मिळणारे जे पाणी आहे त्यातील पाणी सुध्दा पुणे शहराला द्यावे लागेल. धरणाच्या खर्चाच्या बाबतीत मी सांगितले की, त्याचा सर्व खर्च शासन पूर्णपणे महानगरपालिकेवर टाकणार नाही. त्यामधील शासनाचा जो हिस्सा तो खर्च शासन करील आणि महापालिकेला सुध्दा स्वत:चा हिस्सा द्यावा लागेल.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 15 टीएमसी पाणी पुण्याकरिता वापरले जाते. या 15 टीएमसीमधून 70 टक्के पाणी नदीमध्ये सोडले जाते. ते पाणी शुद्ध न करता उजनीमध्ये येते. ते पाणी शुद्ध करण्याची व्यवस्था करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, होय. येत्या दोन ते तीन वर्षामध्ये ते पाणी शुद्ध करुनच सोडले जाईल आणि ते पाणी शेतीकरिता दिले जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये जे पाणी आणले जाते त्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होते. सिंहगड परिसरामध्ये पाण्याची गळती होत असताना ती गळती रोखण्यासाठी शासनाने काय पावले उचललेली आहेत ? बंद पध्दतीने पाणी आणण्याच्या योजनेच्या संदर्भात शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ? हा प्रश्न अडीच वर्षापासून प्रलंबित आहे. पाण्याची गळती रोखण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दोडामार्ग तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) केरळीयन लोकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली जमीन खरेदी

मु. शी. : दोडामार्ग तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) केरळीयन लोकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली जमीन खरेदी यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दोडामार्ग, ता.सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग येथे परप्रांतीय केरळीयन लोकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली जमीन खरेदी, जमीन खरेदी करतेवेळी केरळीयन भाषेत असलेल्या "शेतकरी असल्याच्या" दाखल्यांचे भाषांतर करुन खोटे दाखले सादर करणे, या केरळीयन लोकांनी गुन्हेगारी प्रवृत्तीने लगतच्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करुन कब्जा करणे, अशा तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, सबरजिस्ट्रार कार्यालयाकडून या केरळीयन लोकांकडून वारेमाप पैसे घेऊन जमिनीचे खरेदी व्यवहार करण्यास मदत करणे, अशा प्रकारे सावंतवाडी तालुक्यातील केसरी सर्व्हे नं.88 हिस्सा नं.0 प्रद्युम्न वासुदेव दाभोळकर यांच्या मालकीची कुळकायद्याची जमीन "43- ग" ची परवानगी न घेता परस्पर खरेदी करण्याचा प्रकार उघड होणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, केरळीयन लोकांकडून कोकणातील जमिनी खरेदी केल्या जातात. त्याबाबतचा प्रश्न मी अनेक अधिवेशनात मांडलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हा महत्वाचा प्रश्न आहे. सावंतवाडी, दोडामार्ग व वैभववाडी या तीन तालुक्यात केरळीयन परप्रांतीय लोक बोगस दाखले देऊन व बोगस खरेदी खत तयार करुन तेथील सह निबंधकांच्या मदतीने जमिनी खरेदी करतात अशा प्रकारच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालय व तत्सम कार्यालयात करण्यात आलेल्या आहेत. केरळीयन परप्रांतीय लोकांच्या नोंदी केल्या जातील असे मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते. माझ्या माहितीप्रमाणे अशा नोंदी केल्या जात नाहीत. त्यामुळे केरळ राज्यातील कम्युनिस्ट पक्षाचे नेते श्री.टी.चंद्रशेखरन यांची हत्या करणारा रजिश हा दोडामार्ग तालुक्यात पकडला गेला. त्याला केरळच्या पोलिसांनी पकडले होते. त्याबाबतची नोंद आपल्या राज्यात असती तर तो येथील पोलिसांना सापडला असता. कारण त्याचे साथीदार पळून गेलेले आहेत. अशा प्रकारे परप्रांतीय लोक कोकणात येऊन दादागिरी करुन जमिनी खरेदी करीत आहेत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समोर आलेल्या आहेत. दोडामार्ग तालुक्यातील बोडदे गावामधील एका कुटुंबातील एक महिला हयात नसताना आणि तिचा आजारी भाऊ मुंबईला असताना त्यांचे बोगस फोटो लावून जमीन खरेदी करण्यात आल्याची तक्रार श्री.सुरेश भोकटे नावाच्या माणसाने केलेली आहे.

त्याचप्रमाणे केसरी गावामध्ये स.नं.88/10 वरील जमीन खरेदी करण्यात आलेली आहे. कुळ कायद्याच्या कलम 43-ग नुसार कुळाची परवानगी घ्यावी लागते. परंतु तशी परवानगी न घेता जमीन खरेदी केल्याची तक्रार श्री.रवींद्र सावंत यांनी केलेली आहे. त्याचप्रमाणे पाळीये गावात स.न.30/11 व स.न.90 येथील जमीन खरेदीसाठी खोटे दाखल आणल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यांच्यावर गुन्हेही दाखल करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची 121 प्रकरणे तपासण्यासाठी पाठविण्यात आलेली आहेत. हे केरळीयन लोक तिकडच्या भाषेतील दाखले आणतात. ते दाखल जोडतात. सह निबंधकांना हाताशी धरुन, आर्थिक व्यवहार करुन जमिनी खरेदी करतात. या सर्व व्यवहारांची चौकशी करण्यात येईल असे दोन वर्षापूर्वीच्या अधिवेशन उत्तर दिले होते. शासनाने काही प्रकरणांबाबत चौकशी केलेली आहे. परंतु चौकशीचे काम दोन वर्षानंतरही अपूर्ण राहण्याचे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

कारण काय, या केरळीय परप्रांतीयांची नोंद महसूल विभाग, पोलीस विभाग व कामगार विभागांकडे असणे आवश्यक होते. तशी नोंद का ठेवण्यात आली नाही ?

श्री.प्रकाश सोळंके : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, कुडाळ, दोडामार्ग व काही प्रमाणात वैभववाडी या तालुक्यांमध्ये केरळ प्रांतातील लोकांनी जमिनी खरेदी केलेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. या तीन तालुक्यात एकूण 2034.88 हेक्टर क्षेत्र आहे. खरेदीदार व विक्री करणारे या दोघांच्या संमतीने हे व्यवहार होत असतात. कुळ कायद्याच्या कलम 63 नुसार खरेदीदार शेतकरी असणे बंधनकारक आहे. ज्यावेळी राज्यांतर्गत व्यवहार होतात त्यावेळी खरेदीदाराने त्याचा 7/12 दिला तरी चालतो. जर परप्रांतातील खरेदीदार असेल तर तो शेतकरी असल्याचे, त्या प्रांतामध्ये त्याची जमीन नेमकी कोठे आहे याबाबत तहसीलदारांचे प्रमाणपत्र मागितले जाते. त्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचे काम महसूल विभागाकडून केले जाते. 212 प्रकरणांपैकी जवळजवळ 102 प्रकरणांची पडताळणी झालेली आहे. त्यामध्ये 2 प्रकरणांमध्ये बोगस प्रमाणपत्र आढळून आले होते. त्याबाबत पोलीस केसेस दाखल झालेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

उरलेल्या प्रकरणांची पडताळणी चालू असून येत्या 3 महिन्यामध्ये ही पडताळणी पूर्ण केली जाईल. गरज पडली तर आपले अधिकारी केरळ प्रांतात पाठवून तेथील तहसीलदारांनी जे सर्टिफिकेट दिलेले आहे ते खरे असल्याची पडताळणी करतील. सन्माननीय सदस्यांनी नोंद ठेवण्याबाबत सांगितले. तशी नोंद ठेवण्याची तरतूद नाही. हे लोक केवळ प्रांतातूनच नाही तर मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, आदी राज्यातून येतात. त्यांची वेगळी नोंद ठेवणे बंधनकारक करता येणार नाही.

श्रीमती अलका देसाई : महाराष्ट्रातील एखाद्या व्यक्तीला जमीन खरेदी करायची असेल तर त्यांच्या पूर्वजांच्या नावावर 7/12चा उतारा आहे का, अशी विचारणा केली जाते. अशी विचारणा या बाहेरच्या प्रांतातील लोकांना जमीन खरेदी करताना केली होती काय ? 3 प्रकरणे बोगस निघाली, बाकीच्या प्रकरणी पडताळणी करण्यात येणार आहे. जोपर्यन्त सर्व प्रकरणांची पडताळणी होत नाही तोपर्यन्त जमीन खरेदीदारांच्या नावे करण्याचे थांबविण्यात येणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सर्वसाधारणपणे एखाद्या व्यवहाराची नोंदणी झाली की त्याचे उतारे तलाठयाकडे येतात आणि फेरफाराच्या माध्यमातून जमीन खरेदीदाराच्या नावावर केली जाते. सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की पडताळणी होईपर्यन्त त्यांच्या नावावर जमीन करु नये. मी सांगू इच्छितो की, खरेदीदार हा शेतकरी नसल्याचे आढळून आल्यानंतर त्याच्यावर फौजदारी केस दाखल केलेली आहे. 102 प्रकरणापैकी फक्त 2 प्रकरणे बोगस झालेली आहेत. इतर प्रकरणी खरेदीदार हे शेतकरी असल्याचे प्रमाणित झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : राज्यामध्ये केरळीयन गुन्हेगारीचा विषय निर्माण झालेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी काही माहितीतील नावे देखील सांगितली. आता परिस्थिती अशी आहे की तेथील भविष्यातील सरपंच हा देखील केरळीयन असेल. तेव्हा हे जे स्थलांतर होत आहे त्याबाबतीत काही बंधन घातले जाणार आहे की नाही ? सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर मागील दोन-तीन वर्षापासून हा प्रश्न सातत्याने सभागृहामध्ये मांडत आहेत. तरी देखील या प्रश्नासंबंधी शासनाचे "चौकशी करु" असेच उत्तर असेल तर शासनाकडून आम्ही काय अपेक्षा करायची ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : या प्रकरणी पडताळणी करु असे मी सांगितले. ते केरळ राज्यातील शेतकरी असल्यामुळे त्यांना शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र केरळ राज्यातील तहसीलदारांनी दिलेले आहे. ते खरेच शेतकरी आहेत का एवढेच पाहण्याचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले. त्याबाबतीत 3 महिन्याच्या आत तपासणी करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे केरळीयन लोकांकडून खरेदी केल्या जाणा-या जमिनीचा विषय सातत्याने सभागृहामध्ये मांडत असतात. तिलारी धरणाच्या बॅकवॉटरच्या मागे जे जंगल लागते तेथील हा भाग आहे. त्याठिकाणी सुरुवातीला रबराची लागवड केली जाते आणि आत दूरवर गांजा पिकविला जातो. जमीन कोणी घेतली, का घेतली, एवढयापुरता हा विषय मर्यादित नाही.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

केरळमध्ये एकमेकांवर होणारे हल्ले,हायडींग प्लेस असा टापू तेथे डेव्हलप होत आहे. कोकणामध्ये जमिनींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराची चौकशी खालच्या पातळीवर झाल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु त्या ठिकाणी ज्या प्रकारची शेती आणि गुन्हेगारी सुरु आहे ते पाहता या सर्व जमिनींच्या व्यवहारांची फेरतपासणी वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल काय ?

श्री.प्रकाश साळुंके : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मागणी केल्याप्रमाणे पुन्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत संपूर्ण प्रकरणाची फेरतपासणी करण्यात येईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात केरळीयन आणि दिल्लीवाले मोठ्या प्रमाणावर जमिनी विकत घेत आहेत. आपली स्वत:ची जागा कोणी विकत असेल, परंतु जमिनींच्या व्यवहारामध्ये काही शेतकऱ्यांना फसविले आहे, त्यांना वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखविण्यात आली आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केरळीयनच्या बाबतीतील गैरप्रकार सांगितले. तेव्हा महसूल विभागामार्फत जमिनींच्या खरेदी-विक्री संदर्भात काही बंधने घालता येतील काय ? किंवा अशा प्रकारच्या खरेदी-विक्रीच्या नोंदी ठेवता येतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, अशा प्रकारच्या नोंदी ठेवण्याबाबत कोणत्या प्रकारच्या अडचणीत आहेत हे मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे. तेव्हा परप्रांतियांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदी ठेवणे आपल्याला शक्य होणार नाही. परंतु त्या जिल्ह्यातील सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील त्याची तपासणी करुन निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, दोन प्रकरणांमध्ये असत्य दाखले असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तेव्हा त्या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांना परत करण्यात येतील काय ? "शिरंगे गावातील धरणाच्या पात्राच्या पलीकडील 1200 हेक्टर जमिनीवरील जवळपास दीड लाख झाडे तोडण्यात आली. ही जमीन वन विभागाची असल्याची नोंद करण्याकरिता वन विभागाने सन 2011 मध्ये जिल्हाधिकाऱ्यांवर प्रस्ताव पाठविला आहे" असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. तेव्हा शासन ती जमीन अधिग्रहीत करणार काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, केरळीयन लोक सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जमीन विकत घेत आहेत त्या जमिनीवर ते कोणत्या प्रकारची शेती करणार आहेत ? आपल्या राज्यातील सिंधुदुर्ग जिल्हा हा "पर्यटन जिल्हा" म्हणून जाहीर झालेला आहे. त्याचे सोशल इम्लीकेशन्स नंतरच्या काळात काय होणार आहेत याचा सरकारने विचार करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी केरळीयन लोकांची संख्या वाढली आणि आपण पर्यटनाच्या दृष्टीने तेथे ज्या ज्या योजना आणणार त्याचा लाभ केरळीयन लोक निवासी झाले तर त्यांना अधिक होणार आहे. आपला सर्व प्रदेश इतरांच्या हवाली केल्यानंतर आपल्या सर्वच वातावरणावर त्याचा परिणाम होणार आहे. तेव्हा या सर्व गोष्टींचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.प्रकाश साळुंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितले की, दोन प्रकरणांमध्ये फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, महसूल विभागाने हे गुन्हे नोंदविले आहेत. परंतु पोलीस तपासाच्या माध्यमातून जे काही निष्पन्न होईल त्याच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांनी शिरंगे गावातील जमिनीच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या प्रश्नाची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. तेव्हा या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्याबाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्यात आली आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : मोबाईल टॉवरमधून निघणाऱ्या लहरीमुळे कर्करोग होण्याची शक्यता याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, देशभरात मोबाईल ग्राहक वाढत असून त्यांच्या कनेक्टीव्हीटीसाठी सर्वत्र मोबाईल टॉवर बसवण्यात आले असून या टॉवरमधून निघणाऱ्या लहरीमुळे कर्करोग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, तर मनुष्यांचे व पक्षांचे जीव धोक्यात येत आहेत. कर्करोगाप्रमाणेच, निद्रानाश, डोकेदुखी, एकग्रतेचा अभाव, थकवा, सांधेदुखी, चिंता अशा अनेक रोगास माणसांना बळी पडावे लागत आहे. हे सर्व दुष्परिणाम टाळण्यासाठी घराच्या किंवा कामाच्या ठिकाणापासून टॉवर 50 मीटरच्या अंतरावर असावेत असे तज्ज्ञांचे मत आहे. 2010 मध्ये विद्युत अभियंता गिरीषकुमार यांनी मोबाईल ऑवर सबंधात सर्व्हे करुन एक अहवाल तंत्रज्ञान विभागाला दाखल केला होता. शासनाने त्यावर एक समिती नेमली होती. या कमिटीने टॉवरमधून निघणाऱ्या 450 मे.वॅ.पेक्षा जास्त नसाव्यात असा अहवाल शासनास दिला, परंतु त्यावर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत अशी शिफारस या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत झालेला गैरव्यवहार याबाबत श्री. विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यातील अन्वी,वडोचाथा, आधारवाडी, धारला, कोरहाला तांडा, केळगाव, घाटनांद्रा, शिरसाळा तांडा, तळणी, चारणेवाडी, गव्हाली, बोरगाव बाजार, बहुली, छिग्रस या गावात 2009-10 या वर्षात रोजगार हमी योजने अंतर्गत 8 महिन्यात वन विभाग, कृषी विभाग तसेच पंचायत समिती अंतर्गत माती नाला बांध, माती बांध, बंधारे, तळे आदी प्रकारची को करण्यात येणे, या मजुरांना रितसर मजुरी न देता आठवडी बाजारासाठी किरकोळ रक्कम मध्यस्थांमार्फत देण्यात येऊन नियमाप्रमाणे मिळणारी कामाची मजुरी बोगस लोकांची नावे नोंदवून हडप करण्यात येणे, हा घोटाळा सुमारे 6 कोटी रुपयांपेक्षा अधिकचा असणे, या घोटाळया प्रकरणी 21 मार्च, 2012 रोजी 9 सदस्यांच्या स्थापन केलेल्या समितीने आपल्या चौकशी अहवालात गैरव्यवहार झाल्याचे निश्चित होणे, परंतु या गैरव्यवहार प्रकरणात सहभागी असल्याचा संशय असलेले कंत्राटदार, ग्रामसेवक, अभियंता, लेखापाल, गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद तसेच पोस्ट खात्यातील अधिकारी यांच्या विरुध्द कारवाई न करणे, केवळ मराठवाडा विभाग श्रमीक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुकाराम नवले यांच्यावरच गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात येणे, तरी या घोटाळयात सहभागी असलेल्या उपरोक्त सर्व संबंधितांवर योगय कारवाई करण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे करीत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : माथेरान (नेरळ) इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये वाहन शर्यतीचा सराव सुरु असल्याने त्या परिसरातील आदिवासी व वन्य प्राण्यांचे घाबरुन होत असलेले स्थलांतर याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, माथेरान (नेरळ) इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये पर्यावरणाच्या दृष्टीने अतिसंवदेनशील असलेल्या बेडीसगाव भागात मॅडकॅट संस्थेच्या वतीने गेले तीन महिने वाहन शर्यतीचा सराव सुरु असणे, या शर्यतीसाठी नवक्षेत्रात नवा मार्ग तयार करण्यात येणे, या परिसरात गेल्या 10 वर्षापासून अधिक वाहनांना आतापर्यंत परवानगी दिलेली नसतानाही घुसखोरी करुन वाहने नेण्यात येणे, त्यामुळे या परिसरातील आदिवासी भयभीत होऊन वनातील प्राण्यांनीही घाबरुन स्थलांतर करणे, याकडे वनखात्याने दुर्लक्ष केलेले असून त्यांच्यावर अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने पाहणी वा चौकशी करुन वन कायद्यानुसार आयोजक, वाहनचालक व सबंधित व्यक्तींवर गुन्हा नोंदवून तातडीने कारवाई करण्याची गरज, सदर विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने मी विशेष उल्लेख सूचनेव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गुणवंत शिक्षकांना दोन जादा वेतनवाढी न मिळणे या बाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाकडून दरवर्षी राज्यातील निवडक गुणवंत शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक म्हणून राज्य, राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

सभापती महोदय, या गुणवंत शिक्षकांना दोन जादा वेतनवाढी देण्याची योजना शासनाने सुरु केलेली आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये तशा प्रकारचा उल्लेखही आहे. परंतु गेल्या तीन वर्षापासून ज्या शिक्षकांना राज्य, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे, त्या शिक्षकांना अद्यापही या वेतनवाढीचा लाभ देण्यात आलेला नाही. नवीन वेतन संरचना लागू झाल्यानंतर सन्माननीय श्री. हकीम साहेबांनी जो अहवाल सादर केला आहे, त्यात शिक्षकांना कशा प्रकारे वेतनवाढी द्याव्यात यासंबंधीचा उल्लेख आहे.

सभापती महोदय, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू असूनही शासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. त्यासंबंधी शासनाने अद्यापही जी.आर. काढलेला नाही. म्हणून माझी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती आहे की, आदर्श शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या दोन आगावू वेतनवाढी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. धन्यवाद.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कुर्ला-पूर्व परिसरातील ठक्करबाप्पा चौकात मोठया आवाजाचे ध्वनीकर्णे लावल्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"मुंबई येथील कुर्ला-पूर्व परिसरातील ठक्करबाप्पा चौकामध्ये शाने अहमदी युसुफ हॉटेल आणि आल्ट्रा सिमेंट दुकानाच्यावर मोठया आवाजाचे तीन ध्वनीकर्णे दररोज मोठया आवाजात इकोसाऊंड पध्दतीने पहाटे 5.30 वाजल्यापासून रात्री 8.45 वाजेपर्यंत म्हणजे सकाळी 5.10 वाजता 5 वेळा पाच ठिकाणी 4 कर्णे, 1.30 ते 1.45 वाजेपर्यंत एक ते दीड कि.मी.आवाज येतो. 4.30 ते 5.45, 6.40 ते 7.00 व 9.30 पर्यंत वाजविण्यात येणे, याचा आवाज 80 डेसिबल पेक्षाही जास्त आहे. शासनाने ध्वनीक्षेपणाच्या आवाजावर मर्यादा घालूनही हयांच्या नियमबाहय कृत्यामुळे आसपासच्या आणि शिवसृष्टी परिसरातील शांतता बिघडवली जात आहे. दि. 24.1.2012 रोजी दिल्ली हायकोर्टाने एका याचिकेवर निकाल देताना "धार्मिक स्थळांनी ध्वनीप्रक्षेपकांचा वापर करुन लोकांना त्रास देण्याचा अधिकार नाही, असा स्पष्ट निर्णय देण्यात येणे,त्याचबरोबर हे ध्वनीकर्णे अनधिकृत केलेल्या बांधकामावर असून परिसरातील सर्व आबालवृध्द व रुग्णांना ध्वनीप्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत परिसरातील नागरिकांनी स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार करुनही कोणतीच कारवाई न झाल्याने परिसरात तीव्र संतापाचे वातावरण आहे. याबाबत शासनाने तातडीने ध्वनीकर्णे हटविण्याची कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तत्काळ निवेदन करावे."

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" राज्यातील अनेक खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेश घेणाऱ्या सन 2011-12 या वर्षातील आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची 50 टक्के प्रतिपूर्ती बाबतचे अर्ज दिलेल्या तपासणी केंद्राकडून विहीत मुदतीमध्ये तपासून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या, परंतु अनेक संस्थांनी आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन घेण्यास दिरंगाई केलेली असणे, त्यामुळे तपासणी केंद्राकडून संस्थेला आवश्यक असणारी ईबीसी च्या रकमेचा प्रस्ताव कार्यालयाला उशिराने प्राप्त होणे, त्यामुळे विभागीय कार्यालयाकडून अनेक संस्थांस आवश्यक असलेली ईबीसी रकमेची मागणी मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर करण्यास विलंब झालेला असल्याने सदर विलंबाने सादर केलेले ईबीसी मा.संचालक कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेले नसणे,त्यामध्ये अनेक संस्था असणे, त्यामुळे विनाकारण व्यावसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांवर आर्थिक भुर्दंड पडणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सदर विषय महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :उज्ज्वल प्रा.शाळा,ओमनगर,नागपूर येथील शिक्षकांना माहे जानेवारी,2012 पासून वेतन न मिळण्याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" उज्ज्वल उच्च प्राथमिक शाळा, ओमनगर,नागपूर ही शासनमान्य व 100 टकके अनुदानप्राप्त शाळा असणे, या शाळेत वर्ग 1 ते 7 पर्यंतच्या 14 तुकडया सुरु असणे, मंजूर पदांपैकी 1 मुख्याध्यापक व 15 शिक्षक या शाळेत कार्यरत असणे, या शाळेची माहे जाने,2012 पासूनची वेतन देयके सादर झालेली असतानाही अधीक्षक वेतन पडताळणी (प्राथ) जि.नागपूर यांनी ही वेतन देयके रोखून ठेवणे, त्यामुळे 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांना शिकविणारे शिक्षक माहे, जानेवारी 2012 पासून वेतन न मिळाल्याने उपाशीपोटी शिक्षण देत असणे, त्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन अधीक्षक, वेतन पथक (प्राथ) यांना वेतन काढण्याबाबत द्यावयाचे आदेश व करावयाची कार्यवाही."

....4

अशुधारित प्रत / प्रारूप सारांश नाही

पृ.शी./मु.शी. : राईट टू एज्युकेशनप्रमाणे ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागातही मुलांसाठी त्या त्या भागातच प्रवेश मिळणे, याबाबत डॉ.रणजित पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम, 2009 नुसार 6 ते 14 वयोगटातील (अपंगांसाठी 18 वर्षे) बालकांना त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत परिसरातील जवळच्या शाळेत शिक्षण घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात येणे, या तत्वानुसार सर्व बालकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे परिसरातील मागेल त्या शाळेत प्रवेश देणे बंधनकारक असणे, प्रवेश नाकारता येणार नसणे, अमरावती महानगर क्षेत्रामध्ये झोन वा परिसराच्या सीमा निश्चित करुन त्याच परिसरात राहणाऱ्या किंवा निवासस्थान असणाऱ्या पालकांच्या मुलांना त्याच परिसरातील शाळेत लॉटरी पध्दतीने प्रवेश देण्यात यावा, प्रवेश देते वेळी त्या शाळेतील अभ्यासाचे माध्यम (सेमी इंग्लीश, हिंदी, गुजराती, मराठी, उर्दू) इ. व कन्या विद्यालय, सह शिक्षण शाळा यांचा विचार करुन मुला-मुलींना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे, सर्व शाळांमध्ये क्षमतेनुसार प्रवेशाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक श्रेणीचे विद्यार्थी प्रत्येक शाळेत असावेत यादृष्टीने लॉटरी पध्दतीचा वापर करताना श्रेणीचे (अ-ई-2) गट तयार करुन त्या त्या गटातून प्रवेश क्षमतेनुसार कोटा निश्चित करुन ईश्वर चिठ्ठया काढण्यात येणे, प्रत्येक शाळेला व्यवस्थापन कोटा देण्यात येतो त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेला त्या शाळेतील शिक्षक वा कर्मचाऱ्यांसाठी स्टाफ कोटा देण्यात येणे, शिक्षक वा कर्मचाऱ्यांची मागणी असेल तर त्या शाळेची प्रवेश क्षमता अपल्या परवानगीने वाढवून देण्यात यावी, वर्तमान पत्रातून निवेदन करुन व सर्व शाळांना सूचित करुन प्रवेशापासून वंचित मुलांच्या पालकांचे अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयात मागण्यात यावेत, त्या अर्जामध्ये त्यांचे निवासस्थानाचे परिसरातील शाळांचा प्राधान्यक्रम पालकांना मागण्यात यावा, या सर्व प्रक्रियेवर शिक्षण विभागाचे नियंत्रण असावे, मागील दोन वर्षांपासून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी आहे की, वर्ग 5 वी करिता अमरावती महानगर क्षेत्रामध्ये झोन नुसार केंद्रीय प्रवेश पध्दतीचा अवलंब करण्यात यावा, पुढील वर्षापासून तरी या मागणीचा विचार व्हावा, बालकांचा मोफत व सक्तीचा

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील.....

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 नुसार वर्ग 1 ते 8 पर्यंत वर्गोन्नती देणे बंधनकारक असल्यामुळे श्रेणी दर्शविण्यात येऊ नये, म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेचा भेदभाव दिसणार नाही, शाळेच्या रेकॉर्डला मात्र श्रेणीची नोंद ठेवण्यात यावी, कँपस कोटा निश्चित करण्यात यावा, यामध्ये सुध्दा प्रवेश देताना परिसराला (झोन) प्राधान्य देण्यात यावे, झोन नुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी झोन नुसार प्रवेश समिती गठित करण्यात यावी, या समितीमध्ये संबंधित झोन मधील शाळा प्रमुख, पालक प्रतिनिधी, शिक्षक प्रतिनिधी व शिक्षण विभागाचा शासकीय प्रतिनिधी असावा (लोकल मायग्रेशन) स्थानिक शाळा बदल करण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना असावा, परंतु शाळा बदल करीत असताना ज्या शाळेत विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छितो तेथे क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी, किमान अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रवेश प्रक्रिया समान असावी, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

यानंतर श्री. खर्चे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सोलापूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम न मिळणे याबाबत श्री.दीपक साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "सोलापूर जिल्ह्यातील 88 हजार 750 विद्यार्थ्यांपैकी केवळ 675 विद्यार्थ्यांनाच चालू शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मिळाली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे जिल्ह्यातील 88 हजार विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. कर्मचाऱ्यांच्या कामचुकार पणामुळे 5 कोटी 67 लाख रुपये थकीत राहिल्याने जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी तेथील समाजकल्याण सभापती यांनी वरिष्ठांकडे करणे, राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी राज्य शासन हजारो कोटी रुपयांची आर्थिक मदत करते परंतु अशा बेजबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांमुळे तेथील गोर-गरीब मुलींना सध्या शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत आहे. सोलापूर जिल्ह्यातील 88 हजार विद्यार्थी पात्र असून त्यापैकी केवळ 645 विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती मिळाली आहे तर राज्य शासनाकडे जिल्ह्याचे 7 कोटी 55 लाख रुपये थकीत आहेत. त्यापैकी गेल्या वर्षीचे 4 कोटी 15 लाख रुपये आहेत. तेव्हा शासनाने सदरची रक्कम तातडीने द्यावी, तसेच जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ही तातडीने देऊन बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने तातडीने करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :औचित्याचा मुद्दा

सभापती : आता औचित्याचा मुद्दा घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, "भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांच्या क्रिकेट नियामक मंडळामध्ये झालेल्या एकमतानुसार पाकिस्तानची टीम येत्या डिसेंबर, 2012 किंवा जानेवारी, 2013 दरम्यान तीन एक दिवसीय सामने व दोन 20-20 सामन्यांच्या मालिका खेळण्यासाठी भारतात येण्याकरिता नुकतेच आमंत्रित करण्याचा निर्णय बीसीसीआयने घेण्यात येणे, या निर्णयास भारतीय विशेषत: मुंबईतील जनता या निर्णयाने नाराज असणे, भारतावर वारंवार होणारे अतिरेकी हल्ल्यामागे पाकिस्तान देशाचा हात असतानाही या देशाबरोबर आपल्याच देशात हे सामने खेळू नये असे सर्वसामान्य जनतेचे मत असणे, त्याचबरोबर क्रिकेट जगतातील विख्यात खेळाडू सुनील गावस्कर यांनीही मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या चौकशीसाठी पाकिस्तान सहकार्य करीत नसल्याने या क्रिकेट मालिका आयोजनाची गरज काय, असे मत त्यांनीही व्यक्त करणे, त्याचबरोबर माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही या सूचनेचा विरोध केला आहे. राज्य शासनाने या क्रिकेट मालिकांसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

उप सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.44 ते 2.15 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(स्भापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.:विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, 1) श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण. 2) श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "महाराज, माफ करा ...!!" या पुस्तकातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण, या दोन विषयावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण

मु.शी.: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण या विषयावर डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री दीपकराव साळुंखे, अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. राजन तेली यांचा प्रस्ताव

चर्चा पुढे सुरु .....

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी उभा आहे. काल या विषयाच्या संदर्भातील काही मुद्यांबाबत माहिती दिलेली आहे. कालच्या उत्तरात दोन तीन मुद्याचे उत्तर देण्याचे राहून गेले होते त्या दोन तीन मुद्यांच्या संदर्भात मी विचार व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये ड्रायव्हींग लायसन्सचे नुतनीकरण करण्यासाठी ड्रायव्हर मंडळी येतात तेव्हा चालकांना ड्रायव्हींगच्या नियमांची माहिती करुन देण्यासाठी, रस्त्यावरील चिन्हांच्या संदर्भात चालकांची जबाबदारी काय असते, अपघातांची कारणे काय असतात यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन व्हावे यादृष्टीकोनातून ऑडीओ-व्हीडीओ कॅसेटच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची सुविधा राज्यातील सर्वच परिवहन कार्यालयात करण्यात आलेली आहे. वाहन चालकांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. वाहन चालविण्याच्या प्रशिक्षणासाठी अभ्यास करण्यासाठी सह परिवहन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

सर्व मोटार ट्रेनिंग स्कूलच्या शिक्षकांना देखील चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण दिले पाहिजे, नियमांचे काटेकोरपणे पालन कसे केले पाहिजे आणि पुढच्या कालावधीत चांगल्या पद्धतीचे चालक निर्माण झाले पाहिजेत यासाठी देखील आपण व्यवस्था करीत आहोत. सदर प्रशिक्षण देण्याची तयारी CIRT, भोसरी यांनी दर्शविली आहे. त्याप्रमाणे आपण व्यवस्था करीत आहोत.

राज्यात जानेवारी महिन्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबवितो. पूर्वी आपण 7 दिवस हे अभियान राबवत होतो. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सूचना केली होती की, 7 दिवसां ऐवजी 15 दिवस हे अभियान राबविण्यात यावे. राज्यातील सर्व वाहन चालकांना, जनतेला या माध्यमातून प्रबोधन व्हावे म्हणून विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन आपण करीत असतो. यात प्रामुख्याने आपण वाहन चालकांचे प्रबोधन करतो. शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो. बॅनर्स, होर्डिंग्ज लावतो. माहितीपत्रके वाटतो. अपघाताच्या भीषणतेबद्दल जनतेमध्ये प्रबोधन करतो. अशा प्रकारे आपण पंधरवडा साजरा करतो. अशा प्रकारे राज्याचा परिवहन विभाग उपाययोजना करून काळजी घेत असतो.

येथे एस.टी.संबंधी देखील काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. चालकांसाठी कोणत्या सुविधा करीत आहोत, आरोग्यासाठी कोणत्या सुविधा करीत आहोत हे देखील सांगणार आहे. चालकांच्या डोळे तपासणीचा महत्त्वाचा कार्यक्रम घेण्यात येतो. चालकाची दृष्टी कमी झाली असेल किंवा दृष्टिदोष झाला असेल तर काही वेळा अपघात घडण्याची शक्यता असते. त्यामुळे चालकाची नियुक्ती झाल्यानंतर 40 वर्षा पर्यंत दर दोन वर्षांनी डोळयांची तपासणी होते. 40 वर्षा नंतर दरवर्षी डोळे तपासणी करण्याचा उपक्रम आपण सुरू केला आहे. तसेच सर्व बसस्थानकांमधील कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, बसस्थानकातून सुटणाऱ्या गाडीचा चालक सुस्थितीत आहे किंवा नाही हे पहावे. त्याने मद्यप्राशन केले आहे किंवा नाही हे सर्व तपासण्याची जबाबदारी वाहतूक नियंत्रकावर सोपविलेली आहे. चालकाने मद्यप्राशन केले आहे असे आढळून आले तर त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाते. अशा प्रकारे आपण काळजी घेतलेली आहे. त्याच बरोबर चालकांना आरोग्यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. चालकांची सर्वसामान्य रूग्णालयांमध्ये वारंवार तपासणी केली जाते. अशा प्रकारे परिवहन विभागातर्फे व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला जातो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

येथे ज्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. या सूचनांचे बारकाईने पालन केले जाईल. त्यावर उपाययोजना करण्यासंबंधी अधिकाधिक प्रयत्न या विभागाच्या माध्यमातून केले जातील एवढेच आश्वासन मी या ठिकाणी देतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.सरफरे ....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री): सभापती महोदय, काल सभागृहामध्ये नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने उत्तर देतांना त्या चर्चेला निश्चितपणे न्याय देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, अरुंद रस्ते व रस्त्यावरील खड्डे यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे असा अनेक माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये उल्लेख केला आहे. मी आपणास प्रथम एक गोष्ट सांगू इच्छितो की, रस्त्यावर अपघात होतात हे मी नाकारीत नाही. परंतु ते अरुंद रस्ते व रस्त्यावरील खड्डे यांमुळे होतात हे त्याचे एकमेव कारण नाही. त्याचबरोबर रस्ते मोठे झाल्यामुळे व रस्त्यांवर नवीन वाहने आल्यामुळे त्यांचा स्पीड वाढल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

सभापती महोदय, तसे पाहिले तर सन 2001 मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या जवळपास 9 कोटी इतकी होती. सन 2011 मधील जनगणनेच्या आधारे महाराष्ट्राची लोकसंख्या 11 काटी 23 लाख इतकी आहे. म्हणजेच मागील दहा वर्षामध्ये लोकसंख्येमध्ये 19 टक्के वाढ झाली. त्या तुलनेत सन 2005 मध्ये 99 लाख नवीन वाहने रजिस्टर झाली व सन 2010 मध्ये 1 कोटी 57 लाख नवीन वाहने रजिस्टर झाली. म्हणजेच मागील 5 वर्षामध्ये वाहनांच्या संख्येमध्ये 50 टक्के वाढ झाली.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 1 कोटी इतकी वाहनांची संख्या वाढली असेल तर शासनाच्या महसुलामध्ये किती वाढ झाली ते सांगा.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रश्न महसुलाचा नाही हे आपण लक्षात घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चर्चेला सामोरे जात असतांना तिला सन्मानित केले पाहिजे, हा गंमतीचा विषय नाही. या नवीन आलेल्या वाहनांमुळे आपणाला मिळणाऱ्या उत्पन्नामधून आपण रस्त्यासाठी किती टक्के खर्च करता? बुलढाण्याला मोठा अपघात झाला त्या प्रमाणे ज्या ज्या ठिकाणी मोठे अपघात होतात त्या ठिकाणी मंत्री म्हणून आपण स्वत: जावून भेट दिली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री अशा ठिकाणी जाऊ शकत नसल्यामुळे आपण स्वत: त्या ठिकाणी गेले पाहिजे. सोबत आपल्या अधिकाऱ्यांनाही बरोबर घेतले पाहिजे. त्या ठिकाणी आपल्याला अभ्यास करता येईल आणि त्याच्या आधारे सभागृहातील आपल्या उत्तराने महाराष्ट्रालाही चांगले मार्गदर्शन घडेल. या विषयावर एवढी चर्चा झाल्यानंतर मी कोणत्या उद्देशाने विचारले हे भाईंच्या पटकन लक्षात आले. आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नामधून आपण किती टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

रक्कम रस्त्यावर खर्च करता हा विषय उपस्थित होतो. ज्यावेळी तुम्ही लोकांकडून पैसे घेता त्यावेळी लोकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देणे तुमचे काम आहे. त्यामुळे मिळणारा महसूल किती आहे हे सुध्दा आम्हाला जाणून घेणे आवश्यक आहे, ते आपण सांगितले पाहिजे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी उत्तर देण्यास सुरुवात केली की, माननीय सदस्य प्रश्न उपस्थित करतात. सभागृहामध्ये अधिक वेळ चर्चा झाल्यानंतर त्यांनीच उपस्थित केलेल्या प्रश्नांना मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीत असतांना पुन्हा त्यांनी प्रश्न उपस्थित करु नयेत. सभापती महोदय, देशाच्या पातळीवर आपल्या महाराष्ट्रामध्ये सर्वात मोठी रोड नेटवर्क आहे. त्याचप्रमाणे आपल्या राज्यामध्ये स्टेट हायवे, नॅशनल हायवे, एम.डी.आर., ओ.डी.आर. किंवा व्ही.आर. धरुन जवळपास 2 लाख 41 हजार 712 कि.मी. इतके मोठे रोड नेटवर्क आहे. स्टेट हायवे आणि एम.डी.आर. यांचे कॅरेज 7 मीटर इतके राहिले पाहिजे, ओ.डी.आर. आणि व्ही.आर. यांचे कॅरेज 3.75 मीटर इतके राहिले पाहिजे असे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो की, स्टेट हायवे, एम.डी.आर. आणि मेजर स्टेट हायवे हे राज्यामध्ये सरासरी 7 मीटरचे करावयाचे आहेत. त्या करिता आपल्याला 32 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. उर्वरित 3.75 मीटरचे व्ही.आर., ओ.डी.आर. रस्ते पूर्ण करण्यासाठी 28 हजार 700 कोटी रुपये लागणार आहेत. त्यामुळे विभागाच्या एक गोष्ट लक्षात आली आहे की, 70 ते 75 टक्के वाहतूक स्टेट हायवे, मेजर स्टेट हायवे, नॅशनल हायवे वर होत असते. एम.डी.आर., व्ही.आर. आणि ओ.डी.आर. वर फक्त 25 टक्के वाहतूक होत असते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत/शोधनीसाठी नाही

त्यामुळे राज्य शासनाने मागील दोन वर्षापासून कॉन्शसपणे एक निर्णय असा घेतला की आपण नवीन ॲसेट्स क्रिएट न करता एमडीआर, ओडीआर, व्हीआर जे आहेत त्यांना आहे तसेच ठेवून त्यांच्या गुणवत्तेवर भर दिला पाहिजे व त्यादृष्टीनेच काम केले पाहिजे. त्याचबरोबर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उल्लेख केला की, शासनाने ग्रामीण रस्त्यांच्या बाबतीत जास्तीत जास्त कनेक्टिव्हीटीवर भर दिला पाहिजे. या निमित्ताने मी असे स्पष्ट करु इच्छितो की, मागील चार-पाच वर्षांमध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून आपल्याकडे जवळपास 61300 हॅबिटेशन्स होते. मार्च, 2010 पर्यंत आपल्याकडे 1248 हॅबिटेशन्स होते, ज्यांची कनेक्टिव्हिटी नव्हती. आता जो नवीन कार्यक्रम मंजूर झाला आहे त्यानुसार 4165 ॲक्शन्स आपण प्रस्तावित केल्या म्हणजे उरलेल्या गावांना या हॅबिटेशन्स राहणार आहेत. याचे कारण असे की जागेचा अभाव किंवा वन जमिनीच्या अडचणींमुळे या गावांना कनेक्टिव्हिटी होणे शक्य नाही.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला की, रस्ते तयार करताना एवढी मेहनत करुन रस्ते तयार होतात पण त्यांच्या मेंटेनन्स बाबत काय करणार? या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, रस्त्यांच्या मेंटेनन्ससाठी जेवढा निधी आवश्यक असतो तेवढा मिळत नाही. त्यासाठी मागणीच्या फक्त 35 टक्के रक्कम मिळते. तरी देखील मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन 2007-08 मध्ये आम्ही जवळपास 4 हजार किलोमीटर रस्त्यांचे रिनोव्हेशन केले होते.मागील वर्षात सन 2011-12 मध्ये माननीय बांधकाम मंत्री यांनी असा निर्णय घेतला की यापुढे ज्या रस्त्यांचे रिनोव्हेशन करावयाचे असेल त्या रस्त्याच्या परिस्थितीबाबत अगोदरचे व नंतरचे फोटो घेण्यात यावेत. त्यामुळे सन 2010-11 मध्ये 7265 किलोमीटरचे काम केले होते पण सन 2011-12 मध्ये, म्हणजेच या निर्णयानंतर 11 हजार किलोमीटर रस्त्याच्या रिनोव्हेशनचे काम आपण करु शकतो. यात आणखी अशी अपेक्षा आहे की,येणाऱ्या दोन वर्षात 15 हजार किलोमीटर रस्त्यांचे रिनोव्हेशन झाले पाहिजे असे शासनाने ठरविले आहे.

सभापती महोदय,शासनाने आणखी एक महत्वाचा निर्णय घेतला आहे की, केवळ खड्डे भरण्याचेच काम न करता त्यात रिनोव्हेशनचे काम किमान 2 किलोमीटरचे असले पाहिजे.तसेच 13 व्या वित्त आयोगाकडून रस्त्यांसाठी जेवढा पैसा येतो त्यासंबंधी जी.आर.मध्ये स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, फक्त खड्डे भरण्याचे काम न करता त्यात रिनोव्हेशनचे काम सुध्दा घेण्यात यावे.

सभापती महोदय,अपघाताची अनेक कारणे आहेत.अपघाताच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे .....

की,पोलिसांच्या अहवालानुसार जवळपास 80 टक्के अपघात ड्रायव्हर्सच्या चुकांमुळे व ओव्हर स्पीडमुळे होतात, व्हेईकल्सच्या चुकांमुळे 3.6 टक्के अपघात होतात, खराब हवामानामुळे 2.8 टक्के, खराब रस्त्यांमुळे 4.6 टक्के अपघात होतात, अशी ही टक्केवारी आहे.आणखी एक गोष्ट मी सदनाच्या निदर्शनास आणून देतो की, यापूर्वीची परिस्थिती पाहता सन 2006-07 पासून जवळपास हीच टक्केवारी आहे. सध्याच्या स्थितीत गाड्यांची संख्या वाढलेली आहे,रस्त्यांचे रुंदीकरण झालेले आहे या सर्व गोष्टींचा विचार करता सन 2008-09 मध्ये 10789 अपघात झाले होते.सन 2011 मध्ये 11 हजार अपघात झाले होते.सन 2008 मध्ये अपघातामध्ये झालेले मृत्यू 12400 एवढे होते व जखमींची संख्या 13057 एवढी होती. त्यात गंभीर जखमी आणि मायनर जखमी असा विचार करता सन 2008 मध्ये 33 हजार मायनर जखमी होते.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

त्या शिवाय गंभीर जखमी, किरकोळ जखमी तसेच ज्या अपघात कोणतीही जखमी झाले नाही त्यांची संख्या पाहिली तर 2008 मध्ये किरकोळ जखमींची संख्या 33 हजार होती ती संख्या 2011 मध्ये 20 हजार पर्यंत खाली आलेली आहे. अपघात झाला पण त्यामध्ये कोणीही जखमी नाही त्यांची संख्या 33570 होती. आता ती संख्या 29526 पर्यंत खाली आलेली आहे. गंभीर जखमींची संख्या 26605 होती ती संख्या आता 24865 वर आलेली आहे. मी याचे समर्थन करीत नाही. अपघात होतात पण आपण या बाबतीत जास्त भर दिला पाहिजे.

सभापती महोदय, गाड्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्यानंतर, रस्ते रुंदीकरण झाल्यानंतर सुध्दा अपघाताच्या संख्येमध्ये गेल्या चार पाच वर्षामध्ये काही ना काही प्रमाणात घट झालेली आहे. हे सर्व लक्षात ठेवून आम्ही ॲक्सिडेंटल स्पॉट कमिटी निर्माण केली होती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही टीम पाठवून जवळपास 18258 किलोमीटर रस्त्याचे इन्स्पेक्शन त्या कमिटीच्या माध्यमातून केले. त्यानुसार जी अपघाताची 7228 ठिकाणे आयडेंटिफाय केली ती ठिकाणे रेक्टिफाय करण्याचे काम चालू आहे. त्यापैकी 6553 ठिकाणाची दुरुस्ती केलेली आहे आणि 82 ठिकाणाच्या बाबतीत काम प्रगतिपथावर आहे. आता 593 अपघाताची ठिकाणे आयडेंटिफाय केली आहेत आणि त्यांच्या दुरुस्तीचे काम करणे आवश्यक आहे. आतापर्यंत आम्ही जवळपास 92 कोटी रुपये खर्च केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, पुलांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. या कामामध्ये पुलाचे रुंदीकरण सुध्दा घेतलेले आहे. त्याशिवाय रोडची मॅनेजमेंट सिस्टिम कशी करावयाची या दृष्टीने काम चालू आहे. केरळ, तामिळनाडू, गुजराथ या राज्यांमध्ये रोड मॅनेजमेंटची जी सिस्टिम आहे त्यामध्ये गुजरातमध्ये रोड मॅनेजमेंटची चांगली सिस्टिम आहे. त्याचा सर्व अभ्यास करुन त्यामध्ये काही भर घालून आमची रोड मॅनेजमेंट सिस्टिम तयार करण्याचे काम चालू आहे. त्यामध्ये अनेक गोष्टींचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये रोड इन्फॉर्मेशन सिस्टिम, ट्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिम, पेमेंट मॅनेजमेंट सिस्टिम, रुटीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

मेन्टेनन्सची सिस्टिम, ॲक्सिडेंटल इन्फॉर्मेशन सिस्टिम, वर्क क्वालिटी, एन्व्हायर्नमेंट, सोशल मॅनेजमेंट आणि डॉक्युमेंटेशन या सर्व गोष्टी त्यामध्ये आहेत. त्याचे काम प्रगतिपथावर आहे. पहिल्या टप्प्यामध्ये रोड इन्फॉर्मेशन सिस्टिमच्या बाबतीत काम चालू आहे. काही दिवसामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेबसाईटवर ही सर्व माहिती आपल्याला उपलब्ध होईल.

सभापती महोदय, याशिवाय आम्ही दरवर्षी 1 ते 15 जानेवारी या कालावधीमध्ये रोड सेफ्टीच्या संदर्भात कार्यक्रम घेतो. त्यामध्ये वाहन चालकांची वैद्यकीय तपासणी करतो. त्यांच्यामध्ये रोड सेफ्टीच्या संदर्भात जागृती निर्माण करतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे रेडिओ आणि टीव्हीच्या माध्यमातूनही आपण हे काम करतो. पोस्टर असतातच पण टी.व्ही. आणि एफएम रेडिओ यांची सुध्दा मदत निश्चितपणे घेतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अमेरिकेला गेलो होतो तेव्हा तेथील रस्ते आणि तेथील सिस्टिम पाहिली होती. पण त्यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला नाही. आपल्याकडे लायसन्स असते. त्या ठिकाणी आपल्याला ओव्हर स्पिडींगचे तिकीट मिळते. त्या ठिकाणी लायसन्स आणि इन्शुरन्स हे कोठे ना कोठे लिंकअप केलेले असते. त्या ठिकाणी इन्शुरन्स फार जास्त असतो. तिकडे गाडी घेणे सोपे असते पण दरवर्षी जो इन्शुरन्स भरावा लागतो तो फार जास्त असतो. आपल्याला एक ब्लॅक स्टार मिळाला तर आपला इन्शुरन्स वाढतो. त्यामुळे आपल्याला कोठेही असे तिकीट मिळू नये आणि आपले स्टार वाढू नयेत यासाठी लोक फार सावध असतात. त्या ठिकाणी तीन स्टार मिळाले की आपले लायसन्स जप्त होते. जर दारु पिऊन गाडी चालविताना सापडलो तर जोपर्यंत आपण अल्कोहोलच्या संदर्भातील त्यांचा एक महिन्याचा कोर्स करणार नाही तोपर्यंत आपल्याला आपले लायसन्स परत मिळत नाही. रोड डिसिप्लीन आणि ट्राफिक सेन्स या गोष्टीवर त्या ठिकाणी जास्त भर दिला जातो. त्यामुळे तिकडे अपघाताचे प्रमाण आपल्यापेक्षा थोडे कमी आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

मी असे म्हणत नाही की, तेथे आपल्यापेक्षा अपघाताचे प्रमाण फार कमी आहे. परंतु तेथे अपघातांचे प्रमाण थोडेसे कमी आहे. त्यावर त्यांचे नियंत्रण आहे.

चांगले रस्ते करण्यासाठी स्टेट हाय-वे, एक्सप्रेस-वे, नॅशनल हाय-वे, मेजर्स हाय-वे या सर्व हाय-वे चे खाजगीकरणातून व बजेटच्या माध्यमातून दुपदरीकरण, चौपदरीकरण, सहापदरीकरण करणे यावर भर दिला जातो. या महामार्गांवरुन 70 ते 75 टक्के वाहतूक होत असते. त्यामुळे त्या रस्त्यांचा दर्जा चांगला राहिला पाहिजे. त्यासाठी 13 हजार कोटी रुपये किंमतीचे 7670 कि.मी.लांबीच्या 136 प्रकल्पांचे काम हाती घेतले आहे. त्यापैकी दुपदरीकरणाचे 1733 कि.मी.लांबीच्या रस्त्याचे 90 प्रकल्प आहेत. चौपदरीकरणाचे 13 हजार 32 कोटी रुपये किंमतीचे 525 कि.मी.लांबीच्या रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असलेले 150 कि.मी.लांबीचे 16 प्रकल्प चालू आहेत. निविदा स्तरावर 14 प्रकल्प आहेत. त्यातून 13 हजार 80 कि.मी.लांबीचा रस्ता कव्हर करावयाचा आहे. ते काम खाजगीकरणाच्या माध्यमातून करावयाचे आहे. त्याशिवाय राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरण करण्याच्या दृष्टीने 4 रस्त्याचे काम हाती घेतलेले आहे. ती कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी सातारा-कोल्हापूर रस्त्याचे काम निविदा स्तरावर आहे. चांगल्या दर्जाचे रस्ते उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्रामध्ये 8 पदरी रस्ता केवळ सातारा-कोल्हापूर येथे होत आहे. परंतु मुंबई-गोवा महामार्ग मात्र सिंगलच राहिलेला आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या मुद्याला उत्तर देणार आहे. मुंबई-घोटी या रस्त्याच्या चौपदरीकरणाबद्दल त्यांनी मुद्दा मांडला होता. एमएसआरडीसीने सिन्नर-घोटी हा रस्ता दुपदरी करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तसेच शिर्डी येथील रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सी.आर.एफ.मध्ये प्रस्तावित आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी शिर्डीच्या पालखी रस्त्यावर 11 ठिकाणी बायपास रस्ता करणे आवश्यक आहे असे सांगितले होते. 2001-2021 या कालावधीत रस्ते विकासाचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणच्या रस्त्याला बायपास किंवा रिंग रोडची तरतूद केलेली आहे. हे प्रस्तावित केलेले आहे. पालखी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

रस्त्यावर 11 ठिकाणी बायपास रस्ता तयार करण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. ते काम टप्प्याटप्प्याने पूर्ण होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव नुकताच सादर झालेला आहे. भूसंपादन केल्यानंतरच रस्ते तयार करुन सोई सुविधा करु शकतो.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्याचा उल्लेख केला होता. या अभयाण्याचा काही भाग मुंबई-गोवा महामार्गात येतो. त्यामुळे तेवढया भागासाठी टनेलचे काम प्रस्तावित केलेले आहे. नॅशनल हाय-वे वरील हा प्रकल्प आहे. साधारणपणे 2 कि.मी.पर्यंत त्या अभयारण्याचा भाग आहे. त्यासाठी एक तर तेथे टनेल बांधावे लागेल किंवा रिंग रोड बांधवा लागेल. त्याची लांबी 18 ते 20 कि.मी.पर्यंत होईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी आंबोली घाटासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. त्या बाबतीत संबंधितांशी चर्चा चालू आहे. त्या ठिकाणी भूसंपादन आणि वन जमीन असे दोन प्रश्न आहेत. आंबोली घाटामध्ये आता पर्यन्त कोणत्याही प्रकारचे लॅण्ड स्लाईड झालेले नाही. त्या ठिकाणी नेटस् लावण्यात येणार आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नक्षलींच्या धमक्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील सरपंचांनी दिलेले राजीनामे</u>

<u>मागे घेतल्यासंबंधीचा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला आताच अशी माहिती प्राप्त झालेली आहे की, गडचिरोली जिल्हयात नक्षलींच्या धमक्यामुळे सरपंचांनी दिलेले राजीनामे परत घेतलेले आहेत. यासंबंधी सभागृहाला माहिती मिळाली तर बरे होईल.

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी सरपंचानी दिलेल्या राजीनाम्या संबंधीचा मुद्दा उपस्थित केला. ही गोष्ट खरी आहे की, काल जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सरपंचांची भेट घेतली होती. यापूर्वी सरपंचानी 22 मागण्यांचे निवेदन दिले होते आणि मोर्चा देखील काढला होता. आमच्या मागण्या मान्य करा अशी भूमिका त्यांनी घेतली होती. पण पोलीस पाटील, सरपंच यांनी दिलेले राजीनामे हे नक्षलींच्या धमकीला घाबरुन दिले जात आहेत का, असे वातावरण राज्यभर निर्माण झाले होते. यामध्ये किती तथ्य आहे ही बाब देखील आम्ही तपासून पहात आहोत. त्यांना खरेच कुणी धमकावले होते काय, नक्षलींच्या धमकीमुळे त्यांनी राजीनामे दिले होते की त्या भागामध्ये विकास कामे होत नाहीत या नाराजीतून राजीनामे दिले होते ?

काल जेव्हा चर्चा झाली त्यावेळी त्यांनी ज्या 22 प्रमुख मागण्या केल्य होत्या त्यातील 17 मागण्याबाबत सरकारने यापूर्वी कार्यवाही सुरु केलेली आहे. जिल्हा प्रशासनाने काही निर्णय घेतलेले आहेत. उर्वरित मागण्यांच्या बाबतीत त्यांना ठामपणे आश्वासन देण्यात आले त्यावेळी त्यांनी आपले राजीनामे पाठीमागे घेण्याची भूमिका घेतली. 17 सरपंचांनी तसे लिहून देखील दिलेले आहे. त्यांच्या संघटनेच्या अध्यक्षांनी राजीनामा परत घेण्यासंबंधी बीडीओंना विनंती केलेली आहे. लोकशाहीच्या दृष्टीने अलीकडच्या काळामध्ये वातावरण दूषित झाले होते. त्यामुळे कालचा सरपंचांनी घेतलेला निर्णय हा अतिशय चांगला निर्णय आहे. मी जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देऊन सरपंचांचे अभिनंदन करतो. ज्या जिल्हा प्रशासनाने त्यांच्या मागण्या मान्य केलेल्या आहेत त्या मागण्यांबाबत कार्यवाही करण्याची आग्रही भूमिक गृहविभाग आणि शासनाकडून घेतली जाईल.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण

मु.शी.: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण या विषयावर डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री दीपकराव साळुंखे, अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. राजन तेली यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, रस्ते अपघाताच्या बाबतीत माननीय परिवहन राज्यमंत्र्यांनी आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांनी सविस्तर पणे उत्तर दिलेले असल्यामुळे मी सविस्तर बोलण्याची आवश्यकता नाही. परंतु जेव्हा अपघात होतो त्यावेळी पोलिसांना पंचनामे करावे लागतात. जनरल पब्लिक पर्सेप्शन असे आहे की, अपघात झाला की त्याची विचारणा ही पोलिसांकडेच केली जाते आणि पोलीस काय करीत होते अशी विचारणा नेहमी होताना दिसते. राज्यामध्ये जे अपघात होतात त्याचे प्रमाण खूप मोठे आहे. या सदनातील ज्येष्ठ सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी एका अतिशय महत्वाच्या अशा प्रश्नावर या सदनामध्ये चर्चा घडवून आणलेली आहे. महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक मृत्यू नंतर सर्वाधिक मृत्यू हे रस्त्यावरील अपघातामध्ये होत आहेत. खूप मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ वाया जात आहे, तरुण मनुष्यबळ जखमी होत आहे, जवळ जवळ 50 हजाराहून अधिक कुटुंबे दरवर्षी रस्त्यावरील अपघातामुळे बाधित होत आहेत.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

एवढ्या मोठ्या अपघांताचे विश्लेषण आमच्या दोन्ही माननीय राज्यमंत्री महोदयांनी केलेले आहे. ज्या मानवी घटकांमुळे अपघात होतात, त्यामध्ये अतिवेगाने वाहन चालविणे, धोकादायक पध्दतीने वाहन पुढे नेणे म्हणजे लेन कट करणे, मद्यपान आणि नशापान करुन वाहन चालविणे, वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेणे, वाहन चालविण्याचे असलेले अज्ञान आणि वाहतूक शिस्तीचे अपुरे ज्ञान असणे, सतत वाहन चालविल्यामुळे थकवा येऊन अपघात होणे, वाहन चुकीच्या पध्दतीने उभे करणे, वाहतुकीचे नियम तसेच सांकेतिक मार्गदर्शक चिन्हांकडे दुर्लक्ष करणे, वाहन सुस्थितीमध्ये न ठेवणे, मानसिक व शारीरिक स्थिती दुर्बल असताना वाहन चालविणे अशा दहा मानवी चुकांमुळे 70 ते 75 टक्के अपघात होतात.

सभापती महोदय, नैसर्गिक चुकांमुळे 7 ते 9 टक्के अपघात होतात. त्यामध्ये मुसळधार पाऊस आणि धुक्यामध्ये गाडी चालविणे, धुक्यामध्ये रस्ता न दिसणे, अतितापमानामुळे टायर फुटणे, दरड कोसळणे, महापूर यामुळे मृत्यू होतात. ही नैसर्गिक कारणे अपघाताला कारणीभूत आहेत.

सभापती महोदय, कायद्याची अंमलबजावणी न केल्यामुळे 5 ते 7 टक्के अपघात होत आहेत. यामध्ये वाहतूक अमंलदारांचे अपुरे संख्याबळ, महत्वाच्या जागी कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नसणे, देखरेखीची कमतरता, मोटार वाहन कायद्याची परिणामकारकरित्या अंमलबजावणी न करणे इत्यादी कारणामुळे अपघात होत आहेत.

सभापती महोदय, वरील कारणांव्यतिरिक्त रस्त्यांवर मोकाट गुरे सोडणे, पादचाऱ्यांच्या चुका, वाहतुकीची कोंडी, अरुंद रस्ते, रस्त्यांची खराब स्थिती, अपघात स्थळांवर योग्य उपाययोजना नसणे, धोकादायक व मार्गदर्शक सूचनांच्या फलकांचा अभाव या कारणांमुळे 13 ते 14 टक्के अपघात होत आहेत.

सभापती महोदय, दरवर्षी साधारणत: 13 हजार माणसांचा रस्त्यांवरील अपघातांमध्ये मृत्यू होत आहे आणि 45 हजार लोक गंभीर जखमी होत आहेत. जखमी आणि मृत्यु पावलेल्यांचे वयोगट पाहिल्यास त्यामध्ये 15 ते 17 वयोगटामध्ये 443 मुले आणि 64 मुलीं आहेत, 21 ते 24

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

वयोगटामध्ये 1714 मुले तर 221 मुलीं आहेत. 25 ते 34 वयोगटातील 3089 मुले आणि मुलीं आहेत, 35 ते 44 या वयोगटातील 2500 मुले आणि मुली आहेत. 18 ते 44 या वयोगटातील लोकांचा जास्त मृत्यू झाल्याचे दिसून येते. राज्यातील तरुण मनुष्यबळ अशा पध्दतीने वाया जात असेल तर या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची निश्चितपणे आवश्यकता आहे.

सभापती महोदय, देशाचा जी.डी.पी. वाढायला लागल्यानंतर आणि लोकांचे उत्पन्न वाढू लागल्यानंतर देशात वाहनांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. देशामध्ये 1 लाख 10 हजार लोकांचा मृत्यू हा रस्त्यांवरील अपघातांमध्ये होत आहे.

सभापती महोदय, देशात रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण पाहिले तर तामिळनाडू राज्याचा पहिला क्रमांक आहे. दुसऱ्या क्रमांकावर आंध्र प्रदेश राज्य आहे, तिसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश राज्य आहे. महाराष्ट्र राज्यात दरवर्षी 13 हजार 600 जणांचा मृत्यू रस्त्यांवरील अपघातांमध्ये होत आहे.

सभापती महोदय, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये होणारे अपघात लक्षात घेऊन केंद्रीय समितीने या अपघातांच्या बाबतीत खूप चांगल्या पध्दतीने अभ्यास केलेला आहे. केंद्र सरकारने काही उपाययोजना करण्याचे ठरविलेले आहे. या प्रश्नाबाबतीत राज्य सरकारने, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने तसेच अनेक एनजीओनी खूप चांगला अभ्यास केला आहे. जे लोक या अपघातामुळे बाधित झाले, ज्यांनी अत्यंत जवळच्या व्यक्ती गमावल्या आहेत अशा नागरिकांसोबत माझ्या भेटी झालेल्या आहेत. त्यांनी आपल्या उत्पन्नातील खूप मोठा हिस्सा भविष्यातील अपघात टळावेत म्हणून खर्च केलेला आहे.

सभापती महोदय, या प्रश्ना संबंधी खूप अभ्यास झालेला आहे, खूप निर्णय झालेले आहेत, पण सर्वच विभागांचे निर्णय पूर्णपणे अंमलात येतात असा दावा कोणताही विभाग करु शकत नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा दावा कुठलाही विभाग करु शकत नाही. मी या ठिकाणी तिन्ही राज्यमंत्र्यांची भाषणे ऐकल्या नंतर असे सांगू इच्छितो की, राज्यात होणारे अपघात टाळण्याच्या संदर्भात शासनाने जे काही निर्णय घेतलेले आहेत, त्या निर्णयाची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व्हावी, गृह, परिवहन, सार्वजनिक बांधकाम आणि आरोग्य या विभागामध्ये समन्वय रहावा म्हणून चार तरुण राज्यमंत्र्यांची एक समिती गठीत करण्यात येईल. अपघाताच्या संदर्भात केंद्रीय समितीने आणि राज्यातील स्वयंसेवी संघटनांनी जे निर्णय घेतले आहेत, त्याची अंमलबजावणी योग्य रित्या होत आहे काय या बाबत ही समिती आढावा बैठक घेईल. या चारही विभागांमध्ये चांगल्या प्रकारचा समन्वय रहावे, निर्णयांची अंमलबजावणी करणे यासाठी या चारही तरुण मंत्र्यांवर जबाबदारी टाकण्यात येत आहे. या सदनाला पुढील वर्षात निश्चितपणे अपघाताचे प्रमाण कमी दिसून येईल एवढे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, सभागृहात बोलायला मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन मी राज्यातील जनतेला आवाहन करतो की, कायदे करण्याच्या बाबतीत आपला हात कोणी धरु शकणार एवढे चांगले कायदे राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने केलेले आहे. कायद्याला केवळ विधानसभेचे आणि विधानपरिषदेचे पाठबळ मिळून चालणार नाही. कोणताही कायदा अंमलात येण्यासाठी जनमताचे पाठबळ मिळण्याची आवश्यकता आहे. एकंदर कायद्याचे पालन करण्याची प्रवृत्ती ही सर्वांमध्ये असावी लागते, त्यावेळी कायद्याचे हेतू सफल होत असतात. राज्य शासनाने अतिशय चांगले कायदे केलेले आहेत. मुंबईमध्ये मध्यंतरीच्या काळात ड्रंक ॲन्ड ड्राईव्हची मोहिम हाती घेण्यात आली. मद्यसेवन करुन वाहन चालविणारे मालक आणि वाहन चालक सापडले. त्यातील काही वाहन चालक आणि मालकांकडे यु.के. आणि यु.एस.मधील वाहन चालविण्याचे लायसन्स आढळून आले. तुम्ही त्या देशात मद्यसेवन करुन वाहन चालविता काय असे विचारले असता त्यांनी नाही असे सांगितले. परंतु तीच माणसे या ठिकाणी येऊन मद्यसेवन करुन वाहने चालवितात. आपण या ठिकाणच्या कायद्या बरोबर खेळलो तरी चालते अशी भावना त्या लोकांमध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, प्रशासनामध्ये काही त्रुटी आहेत ही गोष्ट मी मान्य करतो. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांकडे दुर्लक्ष होत आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती पळवाटा शोधत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. त्यांना मोकळीक मिळते. एका बाजूला प्रशासनामध्ये जशा उणिवा आहेत, तसे प्रत्येक ठिकाणी पोलीस ठेवूनच किंवा यंत्रणा उभ्या करुनच कायद्याचे पालन करावे अशा पध्दतीची अपेक्षा लोकशाही सिस्टीमध्ये कशी काय केली जाऊ शकते? लोकांनी सुध्दा लोकशाहीमध्ये केलेल्या कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी स्वीकारली, स्वंयशिस्त पाळली, स्वत: कायदा पाळण्याचे ठरविले तरच कायद्याचे हेतू सफल होत असतात.

सभापती महोदय, 2006 पासून ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह संदर्भात महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत मोहिम सुरु केली आहे. आतापर्यंत 2 लाख 3 हजार 34 लोकांवर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. 33 कोटी 67 लाख रुपये या लोकांकडून दंड वसूल करण्यात आला. आपण कल्पना करा की, अनेक ठिकाणी ब्रीद अनॉलायझर चालत नाहीत. वाहन चालक हा मद्यसेवन केलेला आहे हे कसे काय ओळखावयाचे ? आमचे पोलीस त्या वाहन चालकांच्या तोंडाचा वास घेत होते. परंतु चालकांचा तोंडाचा वास पोलिसांनी घेऊ नये अशा सूचना आम्ही दिलेल्या आहेत. त्या पोलिसांना ब्रीद अनॉलायझर घेऊन दिलेले आहेत. 2 लाख लोकांचा श्वास तपासणे हे काम काही सोपे नव्हते. युरोप खंडातील प्रगतशील देशामध्ये या संदर्भात टोटल पाच वर्षात जेवढे काम केले नसेल तेवढे काम मुंबईत परिवहन विभागाच्या पोलिसांनी केलेले आहे. या संदर्भात लोकांविरुध्द एवढया मोठया प्रमाणात केसेस दाखल झाल्यानंतर सुध्दा लोकांनी शिस्त पाळावयाची नाही असे ठरविले तर सगळयांसाठी किती प्रमाणात यंत्रणा उभारावयाच्या हाही एक मोठा प्रश्न आहे.

महोदय,आम्ही या संदर्भातील कारणे शोधलेली आहेत. आमच्या दंडाची रक्कम अतिशय जुजबी स्वरुपातील आहे. एखाद्याने लेन कटींग केले तर त्या व्यक्तीस फक्त 100 रुपये दंडाची शिक्षा होते. पोलिसाने हात वर केला तर वाहनातूनच 100 रुपये फेकतात आणि चुकीच्या लेनने प्रवास करतात. हे 100 रुपये घे आणि दंडाची पावती फाड अशा प्रकारे पोलिसाला सांगितले जाते. दंडाची रक्कम वाढविणे, कमी करणे ही गोष्ट केंद्र सरकारच्या हातात आहे. या संबंधी केंद्र शासनाचा कायदा आहे. त्यात काही बदल करावयाचे असतील तर त्या संदर्भात केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावे लागतात.

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

याबाबतीत दंड वाढविण्याचा अधिकार हा केंद्र सरकारचा आहे. तसेच कोणत्याही कायद्यात बदल करावयाचा म्हटले तर केंद्र सरकारकडे तसा प्रस्ताव पाठवावा लागतो. गेल्या पाच वर्षात काही प्रस्ताव केंद्र शासनाकडे आम्ही पाठविले आहेत. संपूर्ण देशात सारखा कायदा पाहिजे पण त्यालाही मान्यता लवकर मिळत नाही आणि दंडाची रक्कमही वाढत नाही त्यामुळे यंत्रणेची दमछाक होते आणि त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

महोदय, राज्यात दरवर्षी 10 टक्के वाहने वाढत आहेत पण त्या प्रमाणात रस्ते मात्र वाढत नाही, त्यासाठी निधी कमी पडतो व त्याचा परिणाम अपघातांची संख्या वाढण्यावर होतो. या चर्चेच्या दरम्यान काही चांगल्या सूचनाही केल्या आहेत. प्रत्येक विभागाने अपघात टाळण्यासाठी आपले मनुष्यबळ वाढविणे आवश्यक आहे. मी माझ्या विभागाची माहिती घेतली असता राज्यभरातील सर्व हायवेजवर डी.जी. पासून कान्स्टेबल पर्यंत एकूण 1219 अधिकारी व कर्मचारी काम करतात, ही संख्या देखील अपुरी आहे. मंजूर पदे जास्त आहेत पण प्रत्यक्षात मात्र 1219 एवढेच कर्मचारी या कामासाठी आहेत. माझ्या विभागापुरते तरी मी सांगू इच्छितो की, येत्या तीन वर्षात वाढलेली वाहने लक्षात घेता रस्त्यावरील मनुष्यबळ वाढवून रिक्त पदे भरली जातील व आवश्यकतेनुसार पदांमध्ये वाढ केली जाईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. त्यांनी सुचविले की केवळ कायदे करुन सर्व प्रश्न संपत नाहीत तर लोकांची जनजागृती करण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना करणे तितकेच महत्वाचे आहे. त्यासाठी ड्रायव्हिंगचे नियम माहीत असणे, वाहतुकीची शिस्त माहीत असणे यासाठी मुलांना अभ्यास क्रमाच्या माध्यमातून जर शिकविले तर आयुष्यभर त्याचा परिणाम होईल म्हणून शिक्षण विभागाला खास विनंती करण्यात येईल आणि अभ्यासक्रमात कोठे ना कोठे तरी ड्रायव्हिंगच्या बाबतीत, वाहतुकीच्या बाबतीत अभ्यासक्रम तयार करुन विद्यार्थ्यांना त्याचे ज्ञान मिळाले तर तसाही प्रयत्न केला जाईल.

महोदय, आणखी एक गोष्ट लक्षात आली की अपघातानंतर मदत करण्यासाठी कोणीच पुढे येत नाही, त्यामुळे जखमींना दवाखान्यात नेण्यास कोणी तयार नसते. वास्तविक अपघातानंतर पहिला तास गोल्डन अवर मानला जातो व त्यात उपचार झाला तर अनेक मृत्यू टळू शकतात.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

पण एकदा साक्ष झाली की कोर्टात वारंवार हेलपाटे घालावे लागतात असे अनुभव आहेत. त्यामुळे संवेदनशील माणसे सुध्दा तडफडत मरणाच्या वाटेवर असणाऱ्या अपघात ग्रस्ताची मदत करणे म्हणजे पोलिसांचा आणि न्यायालयाचा ससेमीरा लागणे अशी परिस्थिती नको म्हणून सरळ पुढे निघून जातात. या सर्व गोष्टींचा विचार करुन अशा प्रकारे जे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा मदत करणारे असतील त्यांचा जबाब टेप करुन त्यांना पुन्हा हेलपाटे घालावे लागणार नाही यादृष्टीने कायद्यात बदल करता येतो काय त्याचाही अभ्यास करण्यात येईल.

तसेच अपघातानंतर जे मदत करतात त्यांचा सन्मानाने सत्कार व गौरव करण्याचा आमचा विचार आहे. माझ्याकडे रेस कोर्स नावाचा फंड असतो. त्या फंडातून या वर्षी राज्यात जे नागरिक अशा अपघात ग्रस्तांच्या मदतीला गेले, दवाखान्यात उपचारासाठी घेऊन गेले अशा नागरिक अथवा संस्थांबाबतचे रिपोर्ट मागवून त्या नागरिकांना अथवा त्या त्या संस्थांना 1.50 लाख पहिले बक्षिस, दुसरे बक्षिस 1 लाख रुपये तिसरे बक्षिस 50 हजार रुपयाचे ठेवण्यात येईल. तसेच अपघात स्थळावर मदत करणाऱ्यांचा योग्य सन्मान करण्याची भूमिका स्वीकारली जाईल. त्याचबरोबर जे मदत करतात त्यांना त्रास होणार नाही, वारंवार हेलपाटे घालावे लागणार नाही यासाठी प्रक्रियेत दुरुस्ती कशी करता येईल असा प्रयत्न करण्यात येईल. तसेच दंडात्मक रकमेत वाढ करणे, गृह विभागाचे मनुष्यबळ वाढविणे, शालेय अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश करणे या उपाययोजनांबरोबरच मुंबई पोलिसांनी स्वीकारलेल्या भूमिकेमुळे आज काही वाहतूक परवाने रद्द करणे, शिक्षा होणे हे करु शकलो, त्याची अंमलबजावणी राज्यात सर्व ठिकाणी करणे या सर्व गोष्टींना प्राधान्य दिले जाईल. दुसऱ्या विभागाशी संबंधित प्रश्न होते त्याचा संबंध कोठे ना कोठे आमच्याशी येतो. आज अनेक ठिकाणी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे, वाजवीपेक्षा आणि क्षमतेपेक्षा अतिरिक्त माल वाहनांमध्ये घातला जातो...

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ...

सभापती महोदय, ट्रक ड्रायव्हर्सकडून, वाहन चालकांकडून, मोठया प्रमाणात लाच घेतली जाते व चुकीच्या पध्दतीने वाहतूक केल्यामुळे अपघात होतात अशा प्रकारची तक्रार सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी केलेली आहे. हा प्रकार गुजरातमधून सुरु होतो असाही उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केलेला आहे. यासंदर्भातील काही माहिती माझ्याकडेही आलेली आहे. परिवहन विभागाकडून चुकीचे लायसन्स देतांना तसेच अवैध रीतीने होत असलेल्या वाहतुकीला पाठबळ देतांना, जी रॅकेट्स काम करीत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेऊन ती निश्चितपणे उध्वस्त केली जातील. तसेच या रॅकेट्सला सहकार्य करणारे जे अधिकारी सापडतील त्यांच्यावर सुध्दा कठोर कारवाई करण्यात येईल. वेळ प्रसंगी ॲन्टी करप्शन ब्युरो तसेच शासनाच्या पोलीस दलातील सर्व यंत्रणा वापरुन चुकांना भ्रष्टाचारासाठी पाठबळ देणारे जे घटक असतील त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका स्वीकारली जाईल. अपघातामध्ये स्वयंशिस्तीचा अभाव हे सर्वात महत्वाचे कारण असते. लोकांनी सुध्दा अपघात होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भातील यंत्रणा निश्चितपणे सक्षम केली जाईल.

सभापती महोदय, हा प्रस्ताव सन्माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी मांडला असून या प्रस्तावावर विरोधी पक्ष नेत्यांसह अनेक सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांसदर्भात मी इतकेच सांगू इच्छितो की, या संवेदनशील विषयावर तुम्ही ज्या पोटतिडकीने आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्या लक्षात घेता ही चर्चा वाया जाणार नाही या गोष्टीची डोळयात तेल दक्षता घालून घेतली जाईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, एक अतिशय महत्वाची चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे. वाहनाच्या संदर्भात रस्त्यावरील परिस्थिती खूप बदलली आहे. काही वर्षांपूर्वी देशाची लोकसंख्या वाढली होती. लोकसंख्या नियंत्रणात रहावी यासाठी शासनाने परिवार नियोजनाची कार्यक्रम हाती घेतला होता तशाच प्रकारची उपाययोजना आपल्याला वाहनाच्या संदर्भात करावी लागणार आहे. वाहंनाची संख्या नियंत्रणात रहावी यासाठी आपल्यला वाहंनाचे नियोजन करावे लागणार आहे. "Goverment has to rise of occasion गव्हर्मेंट हॅज टू राईज ऑफ ओकेजन". अपघातांच्या संदर्भात बहुतेक सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले बहुमोल विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. अपघातांच्या मुकाबला करण्यासाठी आरोग्य विभागाने जी काही उपायोजना केलेली आहे त्याची मी या ठिकाणी माहिती देऊ इच्छिते.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये 68 ट्रॉमा केअर सेंटर्स उघडण्यात आलेले आहेत. प्रत्येक ट्रॉमा सेंटर्स 20 खाटांचे असून त्या ठिकाणी 15 पदे नियुक्त करण्यात आलेली आहेत. यामध्ये 5 वैद्यकीय अधिकारी व बाकीचे दुसरे कर्मचारी आहेत. आता हा आकृतीबंध 12 पर्यंत करण्यात आलेला आहे. सर्व ट्रॉमा केअरमध्ये आता 880 खाटांची सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. 27 ट्रॉमा केअरचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. 26 ट्रॉमा केअरचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. 11 कामे प्रशाससकीय पातळीवर आलेले असून एक ट्रॉमा केअर पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या द्वारे करीत आहोत. यासंदर्भात जो बृहत आराखडा करण्यात आलेला आहे त्यामध्ये 42 नवीन ट्रॉमा केअर युनीट प्रस्तावित केलेले आहेत. आपल्याकडे काही केंद्र पुरस्कृत ट्रॉमा केअर असून चार महानगरे एकमेकांना जोडण्यासाठी पंतप्रधान सुवर्ण चतुष्कोन महामार्गावर प्रत्येक 100 कि.मी. च्या अंतरावर ट्रॉमा केअर युनीट उभारण्यासाठी आर्थिक मदत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

कोल्हापूर, सातारा, पुणे, नाशिक, डहाणू, हिंगणघाट येथे ट्रॉमा केअर युनिट उभारण्यात येणार आहेत. डहाणू येथील बांधकाम अंतिम टप्प्यामध्ये आहे. राज्यात 2434 रूग्णवाहिका आहेत. त्यापैकी 2271 रूग्णवाहिका रस्त्यावर आहेत, 163 रूग्णवाहिका रस्त्यावर नाहीत. यापैकी 34 दुरूस्त करण्या सारख्या आहेत. उर्वरित रूग्णवाहिका दुरूस्ती करण्याच्या स्थितीत नाही. आरोग्य विभागामध्ये आपण EMS ही महत्त्वाची योजना आणत आहोत. त्याचा उल्लेख येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी केला आहे. आपण सुसज्ज अशा 937 रूग्णवाहिका आणत आहोत. या रूग्णवाहिका हायटेक असतील. यासाठी टोल फ्री नंबर असेल. प्रत्येक एक लाख लोकसंख्येच्या मागे एक रूग्णवाहिका असेल. त्यातील 233 रूग्णवाहिका ॲडव्हान्सड पद्धतीच्या असतील. त्यात वैद्यकीय अधिकारी असतील. गोल्डन अवरमध्ये सेवा मिळाली तर रूग्णाचे जीव वाचू शकतील अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. त्याच धर्तीवर आपण सदर रूग्णवाहिका सेवा सुरू करणार आहोत. सदर सेवा ही जगातील सर्वात मोठी आहे. यासाठी 233 ॲडव्हान्सड् तर 704 बेसिक रूग्णवाहिका आपण घेणार आहोत. हा उपक्रम आपल्याला दोन वर्षामध्ये पूर्ण करावयाचा आहे. यासाठी निविदा देखील काढण्यात आल्या आहेत. एजन्सी देखील निश्चित करण्यात आली आहे. प्रायव्हेट पब्लिक पार्टनर्शिपवर काम करण्यात येणार आहे. औंध रूग्णालय, पुणे येथे कंट्रोल रूम राहणार आहे. सॉफ्टवेअर, सिस्टीम, मॅनपॉवर, ट्रेनिंग सर्व एजन्सी करणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प 1096.60 कोटीचा आहे. या प्रकल्पाची संपूर्ण प्रक्रिया झाली होती. पण एक एजन्सी हायकोर्टामध्ये गेली. हायकोर्टाचा निकाल शासनाच्या बाजूने लागला आहे. तरी देखील ती एजन्सी सर्वोच्च न्यायालयामध्ये गेली आहे. परवा सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी होणार आहे. सदर प्रकल्प दोन वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन शासनाने केलेले आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद सुद्धा झाली आहे. केंद्र शासनाने रूपये 60.86 कोटीचा ॲडव्हान्स खरेदीसाठी दिलेला आहे. यातून 50 रूग्णवाहिका ग्रामीण भागासाठी आपण घेणार आहोत. राज्य शासनाने नागरी भागासाठी देखील स्वत:ची तरतूद केलेली आहे. यावर्षासाठी रूपये 75.30 कोटींची तरतूद केली आहे. या प्रकल्पाचा खर्च रूपये 1096 कोटीच्यावर आहे. आरोग्य विभागाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

एक अतिशय चांगली योजना राज्या समोर येत आहे. आपल्या समोर जी आव्हाने उभी राहिली आहेत त्यांना तोंड देण्याचा आरोग्य विभागाच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत. भविष्यामध्ये आरोग्य विभागासंबंधात ज्या काही अपेक्षा राहतील त्या पूर्ण करण्यासाठी शासनातर्फे निश्चित प्रयत्न करण्यात येतील.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेला सर्वच माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय चांगली उत्तरे दिलेली आहेत. तरी देखील यातील काही विषय हे खूप महत्त्वाचे आहेत. मी येथे तामिळनाडू मॉडेलचा उल्लेख केला आहे. आताच सन्माननीय आरोग्य मंत्र्यांनी सविस्तर असे उत्तर दिलेले आहे. शासनाचे ट्रॉमा केअर सेंटर किंवा रूग्णवाहिका असण्या पेक्षा आपण खाजगी रूग्णालय किंवा रूग्णालयांसाठी प्रायोजक घेतल तर आपण अजून चांगल्या पद्धतीने सेवा देऊ शकू.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

आपल्याला माहीत आहे की, आपण अनेक चांगल्या गोष्टी आणल्या आहेत. अनेक ठिकाणी सिटी स्कॅन मशिन्स बसविण्यात आल्या आहेत, आज त्यांची अवस्था कशी आहे? माझी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना व सर्व संबंधित मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्याकडे लायन्स क्लब आणि रोटरी क्लब खूप चांगल्या प्रकारे काम करु शकतात. त्याचप्रमाणे आय.एन.ए. ही एक संस्था देखील चांगले काम करीत असून तिला यामध्ये समाविष्ट करुन घेतले तर ही योजना अधिक प्रभावीपणे आपण राबवू शकतो अशी महत्वाची विनंती मला आपल्याला करावयाची आहे.

सभापती महोदय, बऱ्याच वेळी एखादे वाहन आपल्याला धडक देऊन जाते. त्यावेळी अत्यंत गंभीर अवस्थेत असलेल्या त्या रुग्णाला खाजगी रुग्णालयामध्ये नेले जाते. खाजगी रुग्णालयामध्ये त्याच्यावर औषधोपचार करीत असतांना करावयाच्या खर्चाची जबाबदारी कुणी घ्यावी हा प्रश्न निर्माण होतो. या करिता ती व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यानंतर अपघात विम्याच्या माध्यमातून तिला तातडीने आर्थिक मदत मिळण्याकरिता कायद्यामध्ये काही तरी सुधारणा केली पाहिजे. त्या करिता आपल्याला मोटर व्हेईकल ॲक्टमध्ये दुरुस्ती करावी लागली तर ती करावी अशी माझी विनंती आहे.

या ठिकाणी माननीय गृह मंत्र्यांनी सुचविल्याप्रमाणे या बाबतीत चारही विभागांनी एकत्रित येऊन तामिळनाडू सरकारने राबविल्याप्रमाणे एक प्रभावी असे मॉडेल आपण तयार केले तर निश्चितपणे मोठया प्रमाणावर अपघातांची संख्या कमी होऊ शकते असे मला वाटते. आपण मला या ठिकाणी माझे विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी व इतर माननीय सदस्यांनी हा विषय सभागृहामध्ये चर्चेला आणला. सुरुवातीला या प्रस्तावावर किती मंत्री उत्तर देणार आहेत अशाप्रकारची चर्चा झाली. परंतु परिवहन, सार्वजनिक आरोग्य, गृह, सार्वजनिक बांधकाम या विभागांनी सामुदायिक जबाबदारी मानून आणि या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन या वर तातडीने आणि दीर्घकालीन उपाय योजना करण्यासंबंधी सविस्तर उत्तरे दिली आहेत. फक्त प्रश्न एवढाच आहे की, आपला हेतू चांगला असतो आणि आपण त्या दृष्टीने चांगले नियोजन करता. परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेवर अकाऊंटीबिलिटी निश्चित केली जात नाही. आपण केलेल्या कायद्याचे आणि नियमांचे त्यांनी पालन केले नाही तर संबंधितांवर कारवाई केली जाईल अशाप्रकारचा धाक आपल्या सिस्टीममध्ये घालण्याची आवश्यकता आहे. ती व्यवस्था जोपर्यन्त होणार नाही तोपर्यन्त हे प्रश्न अधिकाधिक कठीण होत जातील या कडेही आपण लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी एक हजार हून अधिक ॲम्बुलन्सचा प्रकल्प हाती घेण्याची महत्वाकांक्षी योजना सभागृहामध्ये मांडली आहे. त्यामध्ये ज्या तांत्रिक अडचणी असतील, त्या सुप्रीम कोर्टापर्यंत गेलेल्या असतील. परंतु ट्रॉमा केअर ॲम्बुलन्स आणि रेग्युलर ॲम्बुलन्स यामध्ये फार फरक असून ट्रॉम केअर ॲम्बुलन्सची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. आपली ही योजना राबविण्यामध्ये जर अधिक काळ जाणार असेल तर या मध्ये स्वयंसेवी संस्थांना "अमुक एवढया सेक्टरमध्ये तुमचा भाग येत असल्यामुळे तुम्ही ही सेवा पुरवावी" असे आपण त्यांना आवाहन करावे. अशाप्रकारे नाशिक मध्ये अनेक संस्थांनी ही कामे करण्यासाठी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला असल्यामुळे तेथील महामार्गांवर सहा ॲम्बुलन्सचा एक ट्रस्ट जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला आहे. त्या ट्रस्टमार्फत सहा ॲम्बुलन्स अपघाताच्या ठिकाणी तत्काळ जाऊन पोहोचतात. या योजनेचे विकेंद्रीकरण करुन लहान लहान स्तरावर त्याची अंमलबजावणी परिणामकारकरित्या कशी करता येईल या दृष्टीने देखील आपण विचार करावा. त्या करिता आपण यामध्ये सर्व संबंधित यंत्रणांना एकत्र आणावे . जेणेकरुन दुर्दैवी अपघातामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी होईल, अपघातामध्ये जखमी झालेल्या व्यक्तीला योग्य वेळी तत्काळ औषधोपचार मिळेल. त्यासाठी तातडीने उपाय योजना करावी अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, डॉ.तांबे यांनी नियम 260 अन्वये खूप चांगला विषय या सभागृहात उपस्थित केलेला आहे. गेल्या अधिवेशनात या विषयाच्या संदर्भात मी प्रस्ताव मांडला होता त्या प्रस्तावाला उत्तर देतांना माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी महत्वाकांक्षी योजना सांगितल्या होत्या व त्याच महत्वाकांक्षी योजनांची माहिती माननीय मंत्री महोदया प्रा.फौजिया खान यांनी दिलेली आहे.त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, गोल्डन अवर प्रोजेक्ट आणि ॲम्ब्युलन्सेस या नेमक्या कधी सुरु होणार आहेत? एक्सप्रेस-वे वर वऱ्हाडाच्या मिनी बसला दुर्दैवी अपघात झाला होता त्यावेळेस अपघातग्रस्तांना वैद्यकीय मदत मिळाली असती तर त्यातील बऱ्याच व्यक्तींना आपण वाचवू शकलो असतो. परंतु त्या ठिकाणी ॲम्ब्युलन्सची सोय पुरवली गेली नसल्यामुळे जास्त लोक मृत्युमुखी पडले.आपण जर एक्सप्रेस-वे वरुन गेलात तर त्या ठिकाणी आपल्याला एकही ॲम्ब्युलन्स दिसणार नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या ज्या घोषणा केल्या आहेत, त्या स्वागतार्ह आहेत. ट्रॉमा केअर सेंटर्सची परदेशातील संकल्पना आपल्या येथे 100 टक्के प्रत्यक्षात येईल असे आम्हालाही वाटत नाही परंतु त्यातील चांगल्यात चांगली संकल्पना आपण कधी पर्यंत सुरु करणार आहात ?

सभापती महोदय, रात्री रोडवर ट्रक उभे असतात परंतु ट्रकला रिफ्लेक्टर नसतात, ब्रेक लाईट, इंडीकेटर, टेल लॅम्प नसल्यामुळे मागून येणाऱ्या वाहन चालकाला काहीच दिसत नसल्यामुळे अपघात होतात. त्यामुळे विशेष मोहीम राबवून गाडयांना रिफ्लेक्टर्स, ब्रेक लाईट, इंडीकेटर्स लाईट लावणे कम्पलसरी करण्यासाठी मोहीम हाती घेतली जाणार आहे काय ? याची माहिती माननीय परिवहन मंत्र्यांनी देण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय आरोग्य मंत्र्यांना मी विचारु इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ.तांबे यांनी आपल्या प्रस्तावात मूळ विषय आरोग्य विषयाचाच घेतला होता. ट्रक वाहनांमुळे मोठया प्रमाणात अपघात होत असतात. संपूर्ण देशात आपल्या राज्याचा एड्समध्ये दुसरा क्रमांक आहे.जसे माणूस मेल्यानंतर कुटुंब उध्वस्त होते तसेच एड्समुळेही संपूर्ण कुटुंब उध्वस्त होत असते. ट्रक वाहतुकीमुळे एडस् फैलावत आहे. आता एड्सवर सुध्दा औषध उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे वाहन चालकांची एड्सची रक्त तपासणी करण्याच्या संदर्भात शासनाची कोणती भूमिका राहणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी वाहनांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रिफ्लेक्टर व टेल लॅम्प नसल्यामुळे जास्त अपघात होतात अशी सूचना केलेली आहे. अशा प्रकारचे वाहन रस्त्याने जाताना आम्हाला दिसले तर आम्ही टोल-फ्री नंबरवर कळवू शकतो व अशा पध्दतीची तक्रार नोंद झाल्यानंतर काय ॲक्शन घेतली याची सुध्दा माहिती दिली गेली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल व अशा वाहनांनाही आळा बसेल.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, मला या विषयाच्या अनुषंगाने एकच सूचना करावयाची आहे. रस्त्यावरुन मोठया प्रमाणात ट्रॅक्टर, बैलगाडया ये-जा करीत असतात. त्यामुळे ट्रॅक्टर-बैलगाडीला रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक केले तर अपघातांच्या संख्येत निश्चित घट होईल. बऱ्याच ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर तर सोडाच पण लाईट सुध्दा लावलेले नसतात. ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला तर लाईटच नसतात त्यामुळे ट्रॉलीला रिफ्लेक्टर लावण्यासाठी शेतकऱ्यांना मोटीव्हेट केले तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, आपल्याकडे रस्त्याच्या टोल नाक्याची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. टोलनाक्यावर पाच सहा लेन असतात परंतु त्यापैकी एक किंवा दोनच लेन सुरु ठेवल्यामुळे टोलनाक्यावर वाहनांची खूप मोठी रांग लागते व लोक आपले वाहन पुढे कसे जाईल यासाठी प्रयत्न करतात व त्यामुळेही अपघात होत असतात.

(सभापतीस्थानी तालिका सभापती - श्री.विनायक मेटे)

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे.....

त्यामुळे सगळे टोल नाके रोज सुरु राहण्याच्या दृष्टीने संबंधित टोल नाक्यांना सूचना देणे गरजेचे आहे असे मला वाटते.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जे ट्रक उभे असतात त्यांना रिफ्लेक्टर्स लावलेले वगैरे नसतात, टेल लॅम्प नसतात या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सूचना केली. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी एक महत्वाची सूचना केली की, जर आपण एक टोल फ्री नंबर दिला तर आपल्याला चांगल्या प्रकारे सूचना करता येतील. या गोष्टीची व्यवस्था निश्चितपणे करता येईल. जे ट्रक उभे असतील किंवा बैलगाड्या असतील, ट्रॅक्टर्स असतील त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे अनेक ठिकाणी रिफ्लेक्टर्स देण्याची व्यवस्था करीत आहोत. टोल नाक्याच्या ठिकाणी एखादा स्टॉल लावून त्या ठिकाणी बोर्ड किंवा जाहिरात लावून येणाऱ्या वाहनांपैकी ज्यांना रिफ्लेक्टर लावावयाचे असतील त्यांनी ते लावून घ्यावेत, टेल लॅम्प नसतील तर त्याची सूचना दिली गेली पाहिजे या दृष्टीने अनेक प्रकारच्या उपाययोजना करण्याच्या संदर्भात लवकरात लवकर धोरण तयार करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी टॅक्सेसच्या माध्यमातून किती उत्पन्न मिळाले याची माहिती विचारली होती. या बाबतीत मी नमूद करु इच्छितो की, 2011-2012 मध्ये वाहनांकडून दंडाचे उत्पन्न, वाहनाचे शुल्क किंवा इतर जे उत्पन्न असेल ते सर्व मिळून जवळपास 4197 कोटी रुपये राज्याला उत्पन्न मिळाले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, इएमएस सिस्टिमच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहेत. मी नमूद करु इच्छिते की, हा प्रोजेक्ट तीन वर्षात करण्याची मूळ संकल्पना होती परंतु आता ही योजना दोन वर्षातच पूर्ण करावी असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या संदर्भात संपूर्ण प्रक्रिया करण्यात आलेली आहे. टेंडर सुध्दा काढण्यात आले आहे. एजन्सी नियुक्त झाल्यानंतर कोर्टात प्रकरण गेले. हायकोर्टाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतर ते प्रकरण सुप्रीम कोर्टामध्ये गेले. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना मी सांगू इच्छिते की, सगळी प्रक्रिया झाल्यानंतर ही बाब अंतिम टप्प्यामध्ये असताना ते कोर्टात गेले आहेत. उद्या सुप्रीम कोर्टामध्ये ते प्रकरण ॲडमिट करावयाचे की नाही याबाबत निर्णय होईल आणि जर त्यांनी ॲडमिट केले नाही तर ही योजना ताबडतोब सुरु करता येईल. एजन्सी नियुक्त झाल्यानंतर आपण त्यांना पुण्याच्या औंध हॉस्पिटलमध्ये जागा दिलेली आहे. त्या एजन्सीने ताबडतोब सॉफ्टवेअर, सिस्टिम, मॅनपावर, प्रशिक्षण हे सर्व सुरु करावयाचे आहे. आपल्याला खरेदीची प्रक्रिया सुध्दा ताबडतोब करता येईल. कोर्टामध्ये रिट दाखल करणे हेच या योजनेला उशीर होण्याचे कारण आहे. शासनाकडून यामध्ये कोणताही उशीर झालेला नाही. प्रायव्हेट पब्लीक पार्टनरशीपमधून आरोग्य योजनेच्या बाबतीत विचार करावा अशी सूचना केली गेली. ते अवश्य करण्यात येईल. डायग्नोस्टिक्स वगैरे बाबतीत असा विचार चालू आहे.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. X OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, सन 2012 चे वि. प. वि. क्रमांक 10 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. प. वि. क्रमांक 10 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती :: विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. प. वि. क्रमांक 10 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाची प्रत सर्व सन्माननीय सदस्यांना दिलेली आहे. या विधेयकावर सभागृहात सविस्तर चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. कारण या विधेयकामध्ये काही विशेष सुधारणा आपण केलेल्या आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील..

पूर्वी ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेण्याची तरतूद होती. आता ग्रामसभेच्या आदल्या दिवशी महिला सभा घेण्याची आणि त्या महिला सभेमध्ये ज्या शिफारशी केल्या जातील त्या ग्रामसभेत मांडता येतील आणि त्या बाबतीत ग्रामसभा सहमत किंवा असहमत आहे याची नोंद घेण्यात येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सर्वच ग्रामसभांना महिला येतातच असे नाही. महिलांची विशेष सभा आदल्या दिवशी घ्यावी एवढीच कायद्यामध्ये तरतूद होती. आता आपण महिलांच्या विशेष सभेमध्ये जे ठरेल त्यांची नोंद दुस-या दिवशीच्या ग्रामसभेमध्ये घेऊन त्यावर टिपणी होईल अशा प्रकरची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, या आधी एका वर्षात 6 ग्रामसभा घ्याव्यात आणि दोन ग्रामसभांतील अंतर 3 महिन्यापेक्षा जास्त नसावे अशी तरतूद होती. आता किमान चार ग्रामसभा घ्याव्यात आणि दोन ग्रामसभातील अंतर 4 महिन्या पेक्षा जास्त नसावे असा बदल आपण कायद्यामध्ये करीत आहोत. आणखी जो एक बदल या कायद्यामध्ये केला आहे त्याला गावातील लोकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. "ग्रामसभा ठरावाद्वारे शासकीय, निमशासकीय आणि पंचायत कर्मचा-यांच्या बाबतीत आपल्या कामाच्या ठिकाणी नियमित व वेळेवर उपस्थितीसह त्यांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करण्याचे आपले प्राधिकार पंचायतीला सोपवू शकेल. उपस्थिती नोंदवण्याची आणि पर्यवेक्षणाची रीत शासन राजपत्रातील आदेशाद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल" अशी तरतूद करण्यात आलेली आहे. हा एक महत्वाचा आणि गुणात्मक बदल आपण कायद्यात केलेला आहे. ग्रामपंचायतीमध्ये जे शासकीय, निमशासकीय कर्मचारी काम करतील त्यांची हजेरी ग्रामपंचायतीमध्ये घेण्यात येईल. कर्मचा-यांच्या हजेरीच्या बाबतीत यापूर्वी ग्रामसभेला मत मांडण्याचा आणि ते मत पंचायत समितीला पाठविण्याचा अधिकार होता. आता ते सर्व अधिकार आणि कर्मचा-यांची हजेरी घेण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात आलेला आहे. यासाठी ग्रामपंचायत एक स्वतंत्र नोंदवही ठेवील अशा प्रकारे कायद्यामध्ये बदल केलेला आहे.

सभापती महोदय, या कायद्यामध्ये आणखी महत्वाचा बदल केलेला आहे तो म्हणजे सरपंच आणि उपसरपंच यांच्यावर जर अविश्वासाचा ठराव आणला गेला तर त्यावर अपिल करणे आणि त्याचा निर्धारित वेळेत निपटारा करणे या बाबतीत काही मर्यादा नव्हती. कागदोपत्री ही मर्यादा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

होती, परंतु त्याची अंमलबजावणी होत नव्हती. आता अशी तरतूद केलेली आहे की, जर ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि उप सरपंचावर अविश्वासाचा ठराव आला आणि तो पारित झाला तर त्या दिवसापासून तो सरपंच/उप सरपंच म्हणून काम करणार नाही. परंतु त्या बाबतीत जिल्हाधिका-यांचा निर्णय हा अंतिम असेल आणि 7 दिवसाच्या आत अपिल केल्यानंतर जिल्हाधिका-यांनी त्यावर 30 दिवसाच्या आत निर्णय दिला पाहिजे. जिल्हाधिका-यांनी दिलेला निर्णय हा अंतिम असेल.

.....नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

आयुक्तांकडे जाण्याचे सोपस्कार आपण थांबविले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयावर काही आक्षेप असेल तर संबंधितांना न्यायालयात जाता येईल.

सभापती महोदय, माझ्या असे निदर्शनास आले आहे की, सरपंच सरळ काम करीत नाही आणि आपल्याला तसा अधिकार आहे किंवा नाही याची त्याला फारशी माहिती देखील नसते. पाच-सहा महिने लढवालढवी चालते. त्यामुळे ती ग्रामपंचायत पूर्णपणे डिफंक्ट होते. तेव्हा हे प्रकार थांबविण्यासाठी ज्या दिवशी सरपंचावर अविश्वास ठराव येईल त्याच दिवशी त्याचा अधिकार जाईल आणि त्या संदर्भातील निर्णय तीस दिवसांत होईल. समजा त्याच्या बाजूने निर्णय लागल्यास त्याला आपोआप चार्ज मिळेल. पण त्याच्या विरोधात निकाल लागला तर नवीन सरपंच निवडण्याची प्रक्रिया देखील तीस दिवसांत पूर्ण होईल. पूर्वी असे व्हायचे की, नवीन सरपंचाची निवडणूक कधी लावायची यामध्ये दोन-तीन महिने निघून जायचे. तेव्हा आता हे प्रकार बंद होणार आहेत. तीस दिवसांच्या आत नवीन सरपंचाची निवड करावी लागणार आहे अशी तरतूद आपण केलेली आहे.

सभापती महोदय, आपण 61(अ) मध्ये एका गोष्टीचा समावेश करीत आहोत तो म्हणजे आता ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वेगवेगळी कामे करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्रामपंचायतींना वेगवेगळी साधनसंपत्ती वाढवावयाची असेल, विकासाची कामे करायची असतील, उपजीविका व रोजगार विकास योजना, भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधा विकास योजना आणि इतर संबंधित कार्यक्रम आखणे, तयार करणे, राबविणे, त्यांची अंमलबजावणी करणे, व्यवस्था पाहणे, देखभाल करणे व देखरेख ठेवणे यासाठी कंत्राटी तत्त्वावर किंवा सल्लागार तत्त्वावर तज्ज्ञ, तांत्रिक सहाय्य अभिकरणे आणि कुशल मनुष्यबळ नेमता येईल अशी तरतूद आपण केलेली आहे. उद्देश एवढाच आहे की, ग्रामपंचायतींना ठराविक काळासाठी एखादी सर्व्हीस लागत असेल तर त्यांना ती तेवढ्या पुरता घेता येईल. थोडक्यात विशिष्ट मर्यादेमध्ये काम होत असेल तर त्यासाठी सर्व्हीस घेण्याची मुभा ग्रामपंचायतीला दिलेली आहे. त्यासाठी कायम स्वरुपी नोकर भरती करण्या ऐवजी त्यांना बाहेरुन सेवा घेता येईल.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

सभापती महोदय, आपण ज्या सुधारणा आहोत त्या मागील उद्देश एवढाच की, ग्रामपंचायतीच्या कामकाजामध्ये अधिक पर्फेक्शन यावे, ग्रामपंचातीच्या ग्रामसभेला अधिक अर्थ प्राप्त व्हावा.

सभापती महोदय, आज सकाळीच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी माझ्याकडे एक चिठ्ठी पाठविली. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, वाड्यावस्त्यांवरील व्यवस्थेचे प्रतिबिंब ग्रामसभेत आले पाहिजे. आपण या विधेयकामध्ये तरतूद केलेली आहे की, ग्रामसभेच्या आदल्या दिवशी महिलांची सभा होईल आणि त्यातील सर्व नोंदी ग्रामसभेत घेतल्या जातील. पण त्यापूर्वी ग्रामपंचायतीचा सभासद आपल्या वॉर्डात सभा घेईल. त्यासभेमध्ये जे निर्णय होतील ते लिखित स्वरुपात ग्रामपंचायतीला सादर करेल आणि तो ग्रामसभेच्या रेकॉर्डचा भाग राहील. परंतु त्यावरील अंतिम निर्णय ग्रामसभेचा राहील. प्रत्येक वॉर्डामध्ये आणि विशेषत: आदिवासी भागामध्ये लहान लहान गावे, वाड्या वस्त्या असतात तेथील लोकांचे म्हणणे नेहमीच ग्रामसभेमध्ये येते असे नाही. तेव्हा सर्व विभागाला समान न्याय मिळावा ही यातील कल्पना आहे. म्हणून प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्याला ग्रामसभेच्या आधी आपल्या वॉर्डामध्ये एक सभा घ्यावी लागेल. त्या सभेमध्ये वॉर्डातील विकासाचे प्रश्न असतील किंवा ग्रामसभेमध्ये जे विषय येणार असतील त्या विषयावर ते चर्चा करतील. यामुळे गावातील प्रत्येक वॉर्डामध्ये सर्वच प्रश्नांची चर्चा होईल. तसेच ग्रामसभेत देखील चर्चा होईल.

सभापती महोदय, माझ्या असे लक्षात आले आहे की, ग्रामसभेमध्ये सदस्य हजर नसतात.

यानंतर श्री.गिते..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

सभापती महोदय, आज सकाळी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी एका ग्रामपंचायतींच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये फक्त 106 रहिवाशी हजर होते. एवढया लहान लहान सभा होतात. एवढया लहान सभा का या बाबतचे कारण आम्ही शोधून काढले आहे. फार प्रमाणात आपण ग्रामसभा घ्यावयास लागलो तर ग्रामसभेचे महत्व कमी होते. म्हणून 6 ग्रामसभा घेण्याऐवजी 4 ग्रामसभा घेण्यासभा घेण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे व तशी सुधारणा या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. गरज वाटली तर ग्रामपंचायत जास्तीची ग्रामसभा घेऊ शकते. परंतु मिनिमम 4 ग्रामसभा घेण्यात याव्यात अशी सुधारणा या विधेयकात केलेली आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या कामकाजात अधिक चांगल्या पध्दतीने अकाऊन्टीबिलिटी आणणाऱ्या या सुधारणा आहेत.

मी मधल्या काळात महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये फिरलो. त्यावेळी ग्रामस्थांना अनेक मुद्दे सांगावयाचो. त्यातील एका मुद्याला खूप ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला. गावातील ग्रामस्थांना मी प्रश्न विचारीत होतो की, तुमच्या गावात सरकारी कर्मचारी काम करतात काय तर त्या प्रश्नास ग्रामस्थ नाही असे सांगावयाचे. सरकारी कर्मचारी गावात येतात काय, तर ग्रामस्थ नाही असे सांगावयाचे. तीन गावात ग्रामसेवक असतील, तलाठी चार गावात असतील, ते गावामध्ये काम करण्यासाठी येतात काय, याबद्दल ग्रामस्थांना फारशी माहिती नसते. पाटबंधारे विभागाचा पाटकरी असेल, एम.एस.ई.बी.चा वायरमन असेल, प्रत्येक गावात सरकारी सेवा आहेत, त्या सेवेशी संबंधित कर्मचारी येतात काय यासंबंधी ग्रामस्थांना माहिती नसते, तसेच ते कर्मचारी गावात येतील की नाही या बाबतीत ग्रामस्थांना कधीच आत्मविश्वास नसतो. ते कर्मचारी गावात येतात, परंतु ते आल्याची कोठेही नोंद होत नाही. त्यामुळे ग्रामपंचायती कार्यालयामध्ये या सर्व कर्मचाऱ्यांचे उपस्थिती बाबत एक रजिस्टर ठेवावयाचे असा सरकार विचार करीत आहे.

आज आपण रजिस्टरची भाषा बोलत आहोत. परंतु थोडासा निधी मिळाला तर भविष्यकाळात ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक सिस्टीम सुरु करावयाची या दृष्टीने सरकार पावले टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीच्या कामकाजात भविष्यकाळात अधिक सुधारणा आणावी म्हणून हे बेसीक चेंजेस करीत आहोत. महाराष्ट्रातील जनतेच्या प्रती आपले जे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

उत्तरदायीत्व आहे, ते आमचे सरकार या निमित्ताने पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीत राहणाऱ्या ग्रामस्थांना सरकारच्या या व्यवस्था अस्तिवात आहेत याची माहिती व्हावी म्हणून बेसीक चेंजेस करीत आहोत. ग्रामपंचायतीमध्ये या व्यवस्था आहेत काय हे बघण्याचे काम सरकारही करीत आहे. त्यासाठी या बेसीक व्यवस्था सरकार निर्माण करीत आहोत. राज्यातील ग्रामपंचायती एक शाश्वत, विश्वासार्ह, अधिक प्रभावी यंत्रणा आहे असा महाराष्ट्रातील ग्रामीण भागात समज निर्माण होईल. विश्वास निर्माण होईल आणि त्यांना अनुभव येईल यासाठी हे विधेयक महत्वाचे आहे. सभागृहाने सदर विधेयक मान्य करावे, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ग्रामीण भागात 73 व्या घटना दुरुस्तीनुसार सत्तेचे विकेंद्रीकरण करुन ग्राम पंचायतींना जास्तीत जास्त अधिकार ग्राम सभेला देण्यासाठी विविध माध्यमातून ग्रामीण व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याचा प्रयत्न झाला त्यात आणखी दुरुस्ती करण्यासाठी मंत्री महोदयांनी हे विधेयक आणले आहे.

महोदय, यापूर्वी ग्राम सभेच्या किमान 6 बैठका तरी झाल्या पाहिजेत असा कायदा होता. वास्तविक या सभा प्रत्यक्षात होतच होत्या असे नाही तर केवळ रेकॉर्डिंग करुन दाखविल्या जात होत्या, काही ठिकाणी होत असतीलही पण त्या त्या भागात ज्यांचे प्राबल्य असेल तसे होत होते. ग्रामीण व्यवस्थेत जो शेवटचा घटक आहे, जो त्या गावचा नागरिक आहे त्या शेवटच्या माणसाचे सुध्दा मत ऐकले पाहिजे, त्याला काय हवे हे अधिकार मिळवून देण्यासाठी ही व्यवस्था आहे. या दुरुस्तीच्या माध्यमातून आता ग्राम सभा किमान चार झाल्या पाहिजे व दोन सभांमधील अंतर चार महिन्यापेक्षा जास्त असणार नाही अशी सुधारणा केली आहे. यातील पृ.क्र.2 वर म्हटले आहे की, "सरपंच अशा सभेची कार्यवृत्ते ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेसमोर आणील किंवा आणण्याची व्यवस्था करील, आणि ग्रामसभा महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशींचा विचार करील, आणि पंचायत अशा शिफारशींच्या अंमलबजावणीची खात्री करील." पण महिलांची वेगळी सभा अगोदर घ्यावी असे म्हटले असून त्यातून असे स्पष्ट होत नाही की ही सभा ग्रामसभेच्या पूर्वी किती कालावधी अगोदर घ्यावी.

श्री. जयंत पाटील : ग्रामसभेपूर्वी महिला सदस्यांची सभा पोट कलम (1) अन्वये बोलावली जाते ही पूर्वीचीच तरतूद आहे.

श्री. दिवाकर रावते : यात प्रश्न असा आहे की, आपण म्हटल्याप्रमाणे 11 वाजता ग्रामसभा भरली तर तत्पूर्वी महिलांची सभा किती अगोदर घ्यावी व नंतर ग्रामसभा सुरु होईल किंवा ग्रामसभेसाठी आलेल्या महिला सदस्यांची बैठक झाली अशी फक्त नोंद होईल असे काहीच स्पष्ट होत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, माझा विषय असा आहे की, कायद्यातील तरतूद अंमलबजावणीच्या बाबतीत तोकडी पडते त्यामुळे घटनात्मक, बंधनकारक निर्मिती कशी करणार ती या विधेयकात स्पष्ट होत नाही. ग्रामसभेत महिलांनी बोलण्यास सुरुवात केल्यानंतर पुरुष मंडळी बाजूला येऊन बसली तर महिलांची बोलण्याची हिंमतच होणार नाही. त्यामुळे असे झाले तर महिलांना मोकळ्या पणाने त्यांच्या समस्या मांडताच येणार नाहीत. सर्व ग्रामसभेत आमच्या गावात दारुचे दुकान नको असा विषय महिला मांडत असतात. पश्चिम महाराष्ट्रात तर आडवी बाटली, उभी बाटली हा विषय जोरदार सुरु आहे. पश्चिम महाराष्ट्राला निवडणुकीचे वेड फार मोठया प्रमाणात आहे. पश्चिम महाराष्ट्रात सतत निवडणुका सुरु असतात. साखर कारखान्याच्या निवडणुका झाल्या की, खरेदी-विक्री, खरेदी-विक्रीच्या निवडणुका झाल्या की, बँकेची निवडणूक होते व कोणतीच निवडणूक नसेल तर अडवी बाटलीची होते. महिलांना आपली व्यथा बिनदिक्कत मांडण्यासाठी स्वतंत्र ग्रामसेभेची आवश्यकता आहे. पंचायत समितीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महिलांच्या सभेसाठी महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. महिला अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालीच महिलांची ग्रामसभा झाली तरच त्याला महत्व प्राप्त होईल, निर्विवाद बंधन येईल. या या महिला अधिकाऱ्याच्या उपस्थित सभा झाली अशी नोंद होईल व महिलांच्या ग्रामसभेला महत्व येईल. अन्यथा त्या बैठकीचा काही एक उपयोग होणार नाही. विधेयकात असे म्हटले आहे की, "पंचायत अशा शिफारसींच्या अंमलबजाणीची खात्री करील." पुढे असेही म्हटले आहे की, "जर ग्रामसभा, महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारसींशी सहमत नसेल तर, ती त्याबद्दलच्या कारणांची नोंद करेल."

सभापती महोदय, कोणत्याही गावातील महिलांनी आमच्या गावात दारुचे दुकान नको असा ठराव केला व हा ठराव ग्रामसभेपुढे आला तर ग्रामसभा महिलांचा ठराव एकमुखाने नाकारणार हे नक्की. त्यांनी दिलेले कारण योग्य आहे की अयोग्य आहे हे कोण ठरविणार ? बहुमताच्या जोरावर लोकांनी ठराव घेतला की, आमच्या गावात दारु पाहिजे, मटका पाहिजे, गुटखा पाहिजे तर तुम्ही काय करणार ? त्या निर्णयाच्या संदर्भातील योग्यता, अयोग्यता या विधेयकात काहीच दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, या विधेयकात जर त्रुटी असेल तर ती आपल्याला बदलावी लागेल. प्रथम दर्शनी मला असे वाटते की, पहिल्यांदा महिलांनी सभा घ्यावी, त्यामध्ये त्यांना जो काही विषय मांडायचा असेल तो महिलांनी ग्रामसभेपुढे मांडावा, ग्रामसभेने त्यांचे म्हणणे ऐकावे म्हणणे ऐकल्यानंतर त्यासंदर्भात विधेयकात असे म्हटले आहे की, "ग्रामसभा, महिला सदस्यांनी केलेल्या शिफारशींशी सहमत नसेल तर त्या बद्दलची कारणे नोंद करेल."

सभापती महोदय, महिलांनी अयोग्य मागणी केली व ग्रामसभेने महिलांची अयोग्य मागणी फेटाळून लावली तर ते एक वेळ आम्ही समजू शकतो परंतु तसे नसेल तर ? गोहट्टीमध्ये आता जे काही सुरु आहे ते भीषण आहे. त्या ठिकाणी घटनादत्त काम सुरु आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पूर्वी आपण बहिष्कृत केल्याचे ऐकले आहे. त्यांना बाहेर बसवत होतो. तो जातीभेद आपल्याकडे प्रथम दर्शनी, सकृत दर्शनी संपलेला आहे. गुवाहटीतील ग्रामसभा भयानक निर्णय घेते. त्यांना ऐकायचे असेल तर ऐकतील असे मला वाटते. येथे फक्त नोंद करणार आहात. त्यांनी फेटाळले तरी चालेल. असा त्याचा अर्थ मला अभिप्रेत होत आहे. महिलांनी घेतलेला निर्णय ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अंमलात आणणारी यंत्रणा आज तरी मला गावात दिसत नाही. ती असेल तर मला आनंद आहे.

यातील एक तरतूद चांगली आहे. आज कोणीही अधिकारी कसाही येतो. आपण येथे अशी तरतूद केली आहे की, "ग्रामपंचयातीचा संबंधित सचिव या मजकूरानंतर "एक स्वतंत्र नोंदवहीमध्ये" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. आज नोंदवही आहे काय हे मला माहीत नाही. त्या नोंदवहीमध्ये त्याने नोंद करायची आहे. ही चांगली तरतूद आहे. हा कयद्यातील बदल आनंददायी आहे.

उप खंड (ख) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

परंतु, ग्रामसभेची कार्यवृत्त नोंदवही, हजेरी पुस्तक व इतर संबद्ध अभिलेख सुरक्षित अभिरक्षेत ठेवणे आणि त्यांची योग्य ती सुरक्षितता राखणे ही संबंधित पंचायतीच्या सरपंच व सचिव यांची संयुक्त जबाबदारी असेल." हे बरोबर आहे. कारण बँकेतील खाते हे दोघाच्या सहीने असते. दोघांनी सही केली नाही तर पैसे काढता येत नाही आणि अन्यथा शाबीत केले असेल त्या खेरीज अशा अभिलेखाच्या नोंदीमध्ये किंवा त्याच्या आशयामध्ये कोणतेही अनधिकृत फेरबदल करणे, फेरफार करणे, लबाडीने खोट्या नोंदी करणे, किंवा अशा अभिलेखास हानी पोहोचवणे किंवा त्यास विरूपित करणे यासाठी त्यांना जबाबदार धरले जाईल. हे ही बरोबर आहे आणि ते भारतीय दंड संहितेच्या संबंधित तरतुदीन्वये खटला भरण्यास पात्र असतील."

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

ग्रामसेवकाने भानगड केल्यानंतर आपण खटला भरतो. तो चालतो. पण पुराव्या अभावी तो सुटतो. आपण त्याची खातेनिहाय चौकशी करतो. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत खातेनिहाय चौकशी करण्यात येते व गुन्हा दाखल करण्यात येतो. गुन्हा दाखल केल्या नंतर 48 तास पोलीस कस्टडीमध्ये राहीला तर निलंबन करण्याची तरतूद कायद्यान्वये आहे. पण त्या पेक्षा कमी तास राहिला तर निलंबित करता येत नाही. तो कामावर राहू शकतो. पण खातेनिहाय चौकशी होऊ शकते. काही वेळा असेही घडते की, खातेनिहाय चौकशीत तो दोषी ठरतो. त्यानुसार त्याच्यावर नियमाप्रमाणे कारवाई देखील करतो. त्याची आपण वेतनश्रेणी देखील थांबवतो. एवढेच नव्हे तर काही जणांना कामावरून देखील कमी करण्यात येते. एवढे गंभीर गुन्हे त्यांनी केलेले असतात. पण न्यायालयामध्ये ते निर्दोष सुटतात. त्यामुळे येथे सचिवा विरूद्ध खाते निहाय चौकशी करण्याचा उल्लेख नाही. तो नसेल तर येथे होणार आहे काय ? सरपंच कसे असतात हे आपणा सर्वांना माहिती आहे. लाखो रूपये ते हडप करतात. ते पैसे बिनव्याजी वापरतात. उघडकीस आल्या नंतर दोन-पाच वर्षात हप्त्याहप्त्याने ते पैसे त्यांच्या पगारातून कापून घेतले जातात. ते शासनाचे जावई आहेत काय ? बँकेतून पाच लाख रूपये उचलले की, त्यावरील व्याज द्यावे लागते. शासनाच्या तिजोरीतील पैसे काढून वापरायचे व नंतर भरायचे असे प्रकार सुरूच असतात. एवढे असून ते कामावर असतात. ग्रामपंचायतीच्या अनैतिकतेवर संपूर्ण नियंत्रण आणायचे असेल तर ते अत्यंत कडक असले पाहिजे. हा एक भाग झाला.

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, उद्या काहीही झाले तरी त्या सचिवावर कारवाई करण्याचे अधिकार शासनाला मिळाले आहेत तर मग सरपंचाच्या बाबतीत काय? ग्राम सचिवाला तुरुंगामध्ये 48 तास ठेवल्यानंतर त्याला सेवेतून निलंबित केले जाते. परंतु सरपंच त्यामध्ये सामील असतांना त्याच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? त्या करिता या विधेयकामध्ये अशी तरतूद केली पाहिजे की, अफरातफरीमध्ये सापडलेल्या सरपंचावर गुन्हा दाखला झाला तर त्या गुन्ह्याचा निकाल लागेपर्यन्त त्याचे सरपंच पद तहकूब केले पाहिजे. त्याला त्या ठिकाणी काम करण्यास प्रतिबंध केले पाहिजे. तसे केले नाही तर त्याच्या ताब्यात दफ्तर असल्यामुळे त्याला पुरावे नष्ट करण्याचा अधिकार मिळतो.

सभापती महोदय, शासनाने संपूर्ण महाराष्ट्राला एक संदेश देऊन टाकला आहे. या सभागृहामध्ये तीन मंत्री महोदयांकडून मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये कागदपत्रे जळाल्याचे सांगण्यात आले. तुमचे कार्यालय जळाले असेल, परंतु आमची नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे अंतिम सही करण्यासाठी गेली होती ती देखील जळाली. म्हणजे शासनाने हे काम सोपे करुन ठेवले आहे. काही भानगड झाली व त्यामध्ये ग्राम सचिव आणि सरपंच जबाबदार असतील तर ती कागदपत्रे जाळूनच टाकायची आणि रेकॉर्ड जळाले असे सांगून टाकायचे. अशाप्रकारचा एक नवीन मंत्र या सरकारने देऊन टाकला आहे. काहीही भानगडी करा आणि रेकॉर्ड जाळून मोकळे व्हा. मंत्रालयाच्या आगीमध्ये नस्त्या जळाल्यानंतर आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या नस्ती आम्ही पुर्नप्रस्थापित करीत आहोत. 45 हजार फाईल्स जळाल्या आहेत त्यातील 1200 फाईल्स नव्याने तयार झाल्या आहेत व आणखी फाईल्स हळू हळू तयार होतील असे त्यांनी सभागृहामध्ये सांगितले. अशाप्रकारे या ठिकाणी सरपंच आणि ग्राम सचिव सुध्दा सांगणार. त्या जळालेल्या फाईल्स पुर्नप्रस्थापित होईपर्यन्त ग्रामसचिवांची बदली होणार नाही. म्हणजे घोटाळा कायम झाला आणि फाईल पुर्नप्रस्थापित करण्याच्या नावाखाली ग्रामसचिव देखील कायम झाला. हे सर्व धोके मला या विधेयकामध्ये दिसत आहेत. त्यामध्ये सरपंचांचे काय होणार आहे, हे मला समजत नाही. या करिता सरपंचाचे पद तहकूब केले पाहिजे तरच यामध्ये न्याय मिळणार आहे. नाही तर सचिव बदलून गेला परंतु सरपंच तिथेच राहिला, नवीन सचिव आला आणि पुन्हा नवीन घोटाळयाला सुरुवात झाली अशी परिस्थिती निर्माण होईल. या बाबतीत आपल्या विधेयकामध्ये असलेला हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

परिच्छेद बोलत नाही. त्याला इंग्रजीमध्ये "सायलेंट ऑन दी इश्यू" असे म्हटले जाते. म्हणून त्यामध्ये मला जाणून घेण्याची खूप इच्छा आहे.

सभापती महोदय, खंड 3 मध्ये, मुख्य अधिनियमाच्या कलम 35 मध्ये (क) मध्ये असे म्हटले आहे की, "याचे, त्याने आधीच राजीनामा दिलेला नसेल," या मजकुराने सुरु होणाऱ्या व "धारण केलेले अधिकारपद रिकामे झाल्याचे मानण्यात येईल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :- "त्या पदाच्या अधिकारांचा वापर करण्याचे आणि त्याची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील आणि त्यानंतर जर सरपंचाच्या विरुध्द प्रस्ताव संमत करण्यात आला असेल तर असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये उप-सरपंचाकडे निहित होतील, आणि जर सरपंच व उप-सरपंच या दोघांविरुध्द प्रस्ताव संमत करण्यात आला असेल तर, ते अधिकार, पोट-कलम (3ब) अन्वये निर्दिष्ट केलेला विवाद, कोणताही असल्यास, निर्णीत होईपर्यंत, गटविकास अधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा विस्तार अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडे निहित होतील". हे तुमचे नियोजन आहे.

या पानावरील पुढील भाग महत्वाचा आहे. या ठिकाणी विधेयक मांडीत असतांना आपण जे निवेदन केले आहे तोच भाग या ठिकाणी आहे. तो असा आहे की, "परंतु, अशा प्रकारे निर्देशित केलेल्या विवादाचा निर्णय सरपंचाच्या किंवा यथास्थिति, उप-सरपंचाच्या बाजूने झाला असेल तर, त्याव्दारे असा प्रस्ताव रद्द होईल". या ठिकाणी प्रश्न असा आहे की, दोन-तृतियांश मतदान झाल्यानंतर त्या ठिकाणी सरपंच आणि उप-सरपंच यांना आणले जाणार, त्याबाबत अपिलात गेल्यानंतर त्यांची पुर्ननियुक्ती कशी होईल. हीच परिस्थिती नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये होती. आता लोकसभेच्या निवडणुका झाल्या, राज्यसभेच्या निवडणुका झाल्या. त्याप्रमाणे इथे होत नाही म्हणून गोंधळ निर्माण होतो व आपण हे सर्व पहातो. परंतु आता नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये हात वर करुन मतदान केले जाते. मतदान केल्यानंतर मी मतदान केले आहे म्हणून त्या ठिकाणी सही घेतली जाते व त्याचे तुम्ही व्हिडिओ शूटींग करता.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायद्यातील तरतुदीप्रमाणे दोन तृतियांश मतदान झाले तरी त्यांचे मत नोंदविले जाणार आणि त्या आधारावर पदाधिकारी पदमुक्त होणार आहेत. याप्रमाणे प्रचलित कायदा असेल तर या विधेयकाचा संबंध येतो कोठे? प्रस्ताव मंजूर करण्यासाठी बनावट सदस्य बसविले जातात की निश्चित काय आहे, हे मला कळलेले नाही. एखादा पदाधिकारी पक्षाच्या बाहेर गेला तरी त्याचे पद रद्द होते, मग या अपिलाचे नियोजन काय आहे, हे मला कळलेले नाही. ते चुकीचे होते आहे हे तरी कसे कळणार, हा खरा प्रश्न आहे. जर चुकीच्या पध्दतीने काम होत असेल तर या विधेयकात कशासाठी ही सुधारणा आणत आहात? मला तरी असे वाटते की, अशा रितीने सुधारणा करणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, शासनाकडून सकाळी सभागृहात विधेयक चर्चेला आणले जाते आणि सायंकाळीच ते मंजूर झाले पाहिजे, अशी अपेक्षा असते. बऱ्याच वेळेला आम्ही विरोधी पक्षातील सदस्य असताना देखील सहजपणे विधेयक मंजूर करण्यासाठी सहकार्य केलेले आहे, परंतु काही वेळेला आम्हाला उप सूचना मांडावयाच्या असतात. या विधेयकाचा अभ्यास करण्यासाठी आम्हाला देखील वेळ हवा असतो. आपल्या नियमात तरतूदच अशी केलेली आहे की, सभागृहात विधेयक इन्ट्रोड्युस झाल्यानंतर तीन दिवसात ते चर्चेला येणे आवश्यक असते.मधल्या तीन दिवसाच्या कालावधीत विधेयकाचे वाचन करुन त्यासंबंधी उप सूचना मांडता येतात. काल सभागृहात काय चर्चा झाली आहे, त्यासबंधी विधानसभेत कोणते मुद्दे मांडले, या बाबतची माहिती घेऊन त्यावर अभ्यास करुन सभागृहात उप सूचना मांडण्यासाठी वेळ मिळतो. परंतु वेळेवरच विधेयकाची प्रत मिळत असल्याने असा आम्हाला वेळच मिळत नाही. सभागृहात आम्हाला सांगण्यात येते की, काम करा, काम करा. आम्ही काम करायलाच तर येथे आलो आहोत, आमची त्यासाठी काहीच हरकत नाही. पण असा अधिकार आमच्याकडून हिरावून घेतला जातो, त्याचे उत्तरच आम्हाला मिळत नाही.

सभापती महोदय,माझी अशी सूचना आहे की, या विधेयकातील उपसूचनेचा परिच्छेद काढून टाकावा. अशा उपसूचना मांडण्यास मला संधी मिळायला पाहिजे ती मिळाली नाही. दोन तृतीयांश बहुमत याचा अर्थ अजून मला कळलेला नाही. जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (आस्थापना) अविश्वासाच्या ठरावांच्या वेळी तेथे हजर असले पाहिजे आणि संबंधित अधिकारी तेथे उपस्थित असले आणि त्यांनी सांगितले की अमुक यांनी मतदान केले तर हा विषय तेथेच संपेल, अन्यथा हा गोंधळ चालूच राहणार आहे. मतदान पैसे घेऊन केलेले असो, दबावाने केलेले असो ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

किंवा कोणत्याही प्रकारे केलेले असो, तेथे एकूण सदस्य संख्येच्या दोन तृतीयांश सदस्यांनी बोट वर केले की, हा अविश्वासाचा ठराव मंजूर झाला.मतदानाच्या ठिकाणी सक्षम अधिकारी हजर ठेवला तर अशा अडचणी येणार नाहीत.जिल्हा परिषदांच्या निवडणुका असतील तर तेथे उप विभागीय अधिकारी यांच्यावर ही अधिकृतपणे जबाबदारी सोपविली पाहिजे आणि त्याला जेव्हा वेळ असेल त्या दिवशी सभा आयोजित करणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे काम विस्कळित करणारी ही तरतूद आहे, ती अत्यंत गंभीर आहे.

सभापती महोदय, विधेयकातील 61 (अ) मधील 3 नंबरवर असे म्हटले आहे की, "राज्य शासन किंवा केंद्र सरकार पुरस्कृत कोणतीही योजना, प्रकल्प, कार्यक्रम किंवा काम यांच्या निधीतून अनुज्ञेय असल्याप्रमाणे किंवा ग्राम विकास निधीतून किंवा अशा व्यक्तिंच्या नेमणुकीस वापरता येईल अशा पंचायतींच्या किंवा पंचायतीच्या गटांच्या मालकीच्या अन्य साधन संपत्तीतून निधीचा असा भाग वाटून देण्यासाठी राज्य शासन अशा पंचायतींना किंवा पंचायतींच्या गटाला निदेश देऊ शकेल." ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याच्या ज्या योजना आहेत त्यांचे संपूर्ण अधिकार ग्रामसभेला आहेत. ग्रामसभेने पाणी पुरवठा योजनेसंदर्भात एक कमिटी नियुक्ती करावयाची असून त्या कमिटीने पाणी पुरवठा योजनेसाठी ठेकेदाराची नियुक्ती करावयाची आहे. या योजनेतंर्गत बऱ्याच ग्रामीण भागात पाण्याची टाकी बांधून झाली असून पाईपलाईन टाकून काम पूर्ण झाले आहे, परंतु पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नाहीत, अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपल्या पाणीपुरवठा योजनांवर 80 टक्के खर्च झालेला आहे पण गावामध्ये पाणी नाही. आपण गावाला अधिकार दिलेले आहेत. कोणत्याही सहकारी संस्थेमध्ये एकदा निवडणूक झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्याला कायद्यानुसार इंडेम्निटी बाँड भरुन द्यावा लागतो. त्या ठिकाणी काही गडबड झाली, घोटाळे झाले तर त्या बाबत माझी वैयक्तिक जबाबदारी राहील असा बाँड भरुन द्यावा लागतो आणि त्यामुळे त्याची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार कायद्याने प्राप्त झालेले आहेत. या ठिकाणी गावाला अधिकार दिल्यानंतर त्या गावाने निवडलेल्या लोकांना जर पाणीपुरवठा योजना किंवा अन्य योजना राबवावयाची असेल तर त्या समितीवर ही जबाबदारी राहील अशी तरतूद आपण केली पाहिजे. अनेक योजनांसाठी शासनाने कोट्यवधी रुपये दिले. 10 टक्के वर्गणीच्या बाबतीत आपल्याला माहीत असेल की, ठेकेदारच ती वर्गणी भरतात. गावाने वर्गणी जमा करावयाची पण वर्गणी जमा होत नाही त्यामुळे ठेकदारच 10 टक्के वर्गणी भरतात. 15 कोटीची योजना असेल तर त्याच्या 10 टक्के वर्गणीची रक्कम ठेकदारच भरतो आणि त्या योजनेचे काम चालू होते. ते योग्य आहे की, अयोग्य आहे हा नंतरचा भाग आहे पण त्या योजनेचे काम चालू होते. पहिला मलईचा जो भाग असतो तो संपतो पण पाण्याचा स्त्रोत नसतो. मग आम्ही सर्व आमदार सभागृहामध्ये कागद घेऊन आपल्यासमोर पाणी का देत नाही हे विचारण्यासाठी उभे राहतो. त्या ठिकाणी स्त्रोत चुकलेला आहे, दुसरा स्त्रोत घ्या असे सांगतो.

सभापती महोदय, त्या ठिकाणी एका-दीड फुटावर पाईपलाईन कशी तरी टाकली जाते त्यामुळे त्यावरुन जनावरे जरी गेली तरी पाईपलाईन विस्कळित होते. काही गावात पाणीपुरवठ्याची योजना चालू असते पण मध्येच ती योजना बंद पडते. कारण पाईपलाईनवरुन जनावरे गेल्यामुळे मध्येच पाईपलाईन तुटलेल्या असतात. त्या ठिकाणी योजना आहे, पाणी आहे, टाकी आहे पण पाईपलाईन अशा पध्दतीने टाकलेली असते की, मुले जरी खेळली तरी ती तुटते. त्यामुळे पाणीपुरवठा होत नाही. या लहान लहान, क्षुल्लक गोष्टी आहेत पण त्याचे नियोजन आणि नियंत्रण होत नाही. त्यांना उपयुक्त असेल असे तंत्रज्ञ वगैरे बोलविण्याच्या बाबतीत या बिलामध्ये उल्लेख केलेला आहे. पण ते बोलविता की नाही हे माहीत नाही. पण अशा पध्दतीने योजनेचा खेळखंडोबा होणे योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, ही तरतूद बदलावी असे मी सांगत नाही. गावाला जो अधिकार दिलेला आहे तो बरोबर आहे. गावाने समिती नेमावयाची आहे ही बाब अयोग्य आहे असेही मी म्हणत नाही. पण जसा सहकारी संस्थांसाठी कायदा केलेला आहे तशा प्रकारची तरतूद भविष्यामध्ये जर या समित्यांसाठी करु शकला तरच आपण दिलेल्या निधीचा योग्य विनियोग होईल आणि आपला मूळ हेतू सफल होईल. डॅम्बीस लोक पाच ते दहा टक्केच निघतील. प्रामाणिक लोक 25 टक्के निघतील आणि गावात योजना राबविल्या जातील. म्हणून तशा पध्दतीचे निर्बंध घालणे आवश्यक आहे. गेली अनेक वर्षे मी ग्रामीण भागातील योजनांशी परिचित आहे. आपणही परिचित आहात. आपले अनुभव आपण सांगावेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पाणीपुरवठा योजनेचा कसा खेळखंडोबा झाला आहे हे आपण आम्हाला अधिकृतपणे सांगू शकाल. यामध्ये शासनाचा दोष नसून तेथील लोकांचा दोंष आहे. त्यांच्या स्वार्थाकरिता सरकार दोषी ठरते. आमदार शासनाच्या मागे लागतात. गावकरी घरी येऊन सांगतात की, आमच्याकडे पाणी नाही. मग आम्ही सरकारला धारेवर धरतो. ते पाणीपुरवठा योजना ताब्यात का घेत नाहीत ? त्यामुळे कायद्यामध्ये तरतूद केली पाहिजे. पाणीपुरवठ्याचे पैसे ग्रामपंचायत जमा करणार आणि योजना मात्र सरकारने चालवावी, आमच्या ताब्यात योजना नको असे म्हणावयाचे यावर निर्बंध कसे निर्माण करणार ? आपण असे निर्बंध घातले तर योजनेबाबत लोकांच्या सामाजिक जाणिवा तयार होतील.

सभापती महोदय, ज्या चार पाच सभा घ्यावयाच्या आहेत त्या सभेमध्ये चर्चा होईल. गावातील जे दोन चार जाणकार असतात ते नक्की या संदर्भात वाचा फोडतील आणि आपले जे उद्दिष्ट आहे ते साध्य करण्याकरिता या कायद्याचा उपयोग होईल असे मला वाटते. मला जे अनुभव आले ते मी अत्यंत नम्रपणे मांडले. ते चुकीचेही असू शकतील. ते बरोबरच असतील असे मी म्हणत नाही पण ते अयोग्य असतील असे मला वाटत नाही म्हणून मी ते मांडले आहेत. आज जरी हे विधेयक मंजूर केले तरी या त्रुटी असतील तर पुन्हा त्या कायद्यामध्ये बदल करावा. आपल्याला कायदा कधीही बदलता येतो. त्या केल्या तर आपल्या मनामध्ये असलेली ग्रामीण भागाचे सक्षमीकरण करण्याची जी योजना आहे ती आपल्याला राबविता येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता जे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे त्याचे स्वागत करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाला पाठिंबा देत असताना एक गोष्ट मी आवर्जून सांगू इच्छितो की, ग्रामीण विकासाच्या संदर्भातील अतिशय क्रांतिकारक अशा प्रकारचे हे विधेयक आहे. यामधील कलम 61अ हे अतिशय चांगल्या प्रकारचे कलम आहे. यापुढे ग्रामपंचायत ही विकास केंद्र राहील. या विधेयकातील कलम 61अ मध्ये असे नमूद केलेले आहे की, "पंचायतीस किंवा पंचायतींच्या गटांस, पंचायतींचा योजनाबद्ध विकास करण्यासाठी पंचायत विकास योजना, जमीन विकास योजना व पर्यावरण विकास योजना, उपजीविका व रोजगार विकास योजना, भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधा विकास योजना अशा प्रकारच्या योजना तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, व्यवस्था पाहणे देखभाल करणे व देखरेख ठेवणे यासाठी कंत्राटी तत्वावर किंवा सल्लागार तत्वावर तज्ज्ञ, तांत्रिक सहाय्य अभिकरणे आणि कुशल मनुष्यबळ नेमता येईल". अतिशय महत्वाचे असे हे कलम आहे. वृक्ष संवर्धनाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय हे संपूर्ण जिल्ह्यामध्ये फिरले. गावे हिरवीगार व्हावीत, वृक्षांचे संवर्धन व्हावे आणि ग्रामपंचायतीला चार पैसे मिळावेत अशा प्रकारची योजना हाती घेतलेली आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात पाच-सहा बाबी मला येथे मांडावयाच्या आहेत. पहिली बाब ही ग्रामसेवकाच्या संदर्भातील आहे. अनेक वेळा ग्रामसेवक हे गावामध्ये उपस्थित रहात नाहीत. ग्रामसेवकाला, तलाठ्याला, वायरमनला शोधायला तालुक्याच्या ठिकाणी यावे लागते. एका ग्रामसेवकाकडे जर दोन-तीन ग्रामपंचायती असतील आणि एका गावात तो उपस्थित नसला तर तो सांगतो की मी दुस-या गावामध्ये होतो आणि दुस-या गावामध्ये उपस्थित नसला तर तो सांगतो की मी तिस-या गावात होतो. ग्रामसेवक हा लहान माणूस नाही. गावाच्या विकासासाठी जेवढा सरपंच महत्वाचा आहे तेवढाच ग्रामसेवक महत्वाचा आहे. हे ग्रामसेवक गावात उपस्थित रहात नाहीत, ते सरपंचाचे ऐकत नाहीत. महिला सरपंच असेल तर ते अजिबात ऐकत नाहीत. अनुसूचित जाती, जमातीचे सरपंच आणि उपसरपंच असतील तर ते काहीच करत नाहीत, अशा प्रकारे ग्रामसेवकांचे वागणे आहे. मी येथे टीकात्मक बोलत नाही. परंतु यामध्ये काही तरी सुधारणा करण्याची गरज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

आहे. माननीय मंत्री महोदय हे दोन-तीन वेळा माझ्या तालुक्यामध्ये येऊन गेले. आता आमच्या तालुक्यातील एका गावामध्ये सरपंच बी.ई.(इलेक्ट्रानिक्स) आहेत. महिला सरपंच एम.ए., एम.कॉम. अशा पदवीधर आहेत. महिला सरपंचांना प्रशिक्षण देऊन सांगितले पाहिजे की, तुम्ही दिलेले निदेश ग्रामसेवकाने कधीही ओलांडता कामा नयेत. या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे.

ग्रामसभेने सूट दिली नसेल तर गावात काम करणे, शासकीय, निम-शासकीय अधिका-यांनी ग्रामसभांना उपस्थित राहिले पाहिजे अशी तरतूद आहे. हे अधिकारी ग्रामसभेला उपस्थित राहिले नाहीत तर आपण काय करणार या संबंधी कायद्यात काही तरतूद केलेली आहे काय ? डीपीडीसीच्या बैठकीला अधिकारी उपस्थित रहात नाहीत, तालुक्याच्या समन्वय समितीला अधिकारी उपस्थित रहात नाहीत. ज्या दिवशी समितीच्या बैठका असतात त्या दिवशी आजारपणाची रजा घेऊन बैठकांना अनुपस्थित रहातात.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

तेव्हा आपण कायद्यामध्ये, नियमामध्ये तरतूद केली पाहिजे की, जर ते उपस्थित राहिले नाहीत तर त्यांच्यावर शासन कारवाई करील. आपण अशा पध्दतीचे धोरण स्वीकारल्यास ही उपस्थिती अनिवार्य होईल.

सभापती महोदय, महिला ग्रामसेवकांची संख्या वाढविली पाहिजे. आपण विधेयकामध्ये सचिव शब्द वापरला आहे. आता अर्ध्या टक्क्यापर्यंत महिला सचिव आणि ग्रामसेविका आलेल्या आहेत. परंतु त्यांची संख्या वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. आपणास पदवीधर किंवा त्यापेक्षा जास्त शिकलेल्या महिला ग्रामसेविका किंवा सचिव मिळू शकतील. त्यादृष्टीने आपण प्रयत्न करावेत अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प कमी असतो. परंतु ग्रामपंचायतीने किमान 30 टक्के रक्कम महिलांसाठी वापरली पाहिजे अशाप्रकारचा कायदा केला पाहिजे. ही 30 टक्के रक्कम महिलांसाठी शौचालये, मुलींच्या शाळा आणि पाळणा घर यासाठी खर्च करावी. सर्व ग्रामपंचायतींचे पाळणा घर असावे असे माझे म्हणणे नाही. परंतु ज्या ग्रामपंचायती नगरपालिका किंवा नगरपरिषद होऊ शकल्या नाहीत इतक्या मोठ्या आहेत. ज्या ठिकाणी 15-20 हजारांची वस्ती आहे अशा ठिकाणी पाळणा घर असावे. माझ्या जळगाव जिल्ह्यातील आडावद ग्रामपंचायतीची लोकसंख्या 25 हजार आहे. परंतु ती अजून ग्रामपंचायत आहे. सरकारला देखील गरज नाही आणि तेथील ग्रामस्थांना देखील गरज नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 30 टक्के रक्कम महिलांवरील सुविधांसाठी खर्च करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महिलांनी दारुबंदीचा ठराव मंजूर केला तर दारुबंदी होते, परंतु अशा महिलांच्या सभा झाल्याचे कुठे दिसत नाही. सभा उधळण्याचा प्रयत्न होतो. काही वेळा ग्रामसभा देखील उधळण्याचा प्रयत्न होतो. कोणी ग्रामसभा उधळण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कडक आणि कठोर कारवाई केली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, एका वर्षामध्ये ग्रामसभेच्या सहा सभा होत्या आता त्या चार केलेल्या आहेत. "ग्रामसभेद्वारे महिला सदस्यांच्या शिफारशींचा विचार करणे" अशी तरतूद या विधेयकामध्ये केलेली आहे. ही फार चांगली तरतूद आहे. ग्रामसभेच्या अगोदर महिलांची सभा होईल. माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

मंत्री महोदयांनी अत्यंत पोडतिडिकीने या सुधारणा केलेल्या आहेत. वॉर्डावॉर्डात महिलांच्या सभा झाल्या पाहिजेत. किमान तीन-चार सभा झाल्या तर कोणत्या प्रभागामध्ये कोणत्या सुविधांची गरज आहे हे लक्षात येऊ शकेल.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीच्या सरपंचावर अविश्वासाचा ठराव आला तरी तो काम करीत असतो. या संदर्भात जी तरतूद करण्यात आलेली त्याचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

सभापती महोदय, सरपंचाने किंवा उप सरपंचाने ग्रामसभा बोलाविण्यात कसूर केली तर सचिवांनी ती सभा बोलाविली पाहिजे अशा पध्दतीची तरतूद या विधेयकात केलेली आहे. सचिवांनी सभा बोलाविली नाही तर त्यांच्यावर जिल्हाधिकाऱ्याच्या माध्यमातून कारवाई होईल असे विधेयकात नमूद केलेले आहे.

सभापती महोदय, ग्रामसभा आणि त्यातील नियमबाह्य गोष्ट - यासाठी आपण तीन महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. नियमबाह्य गोष्टीचे प्रकरण पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्याकडे जाईल त्यानंतर जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे जाईल आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद या विधेयकामध्ये केलेली आहे. ही एक चांगली तरतूद आहे.

सभापती महोदय, सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर अजून काही जबाबदाऱ्या टाकण्याचा विचार शासनाने केला पाहिजे. त्याच बरोबर गावातील आरोग्य आणि पर्यावरणाची काळजी कशी घेतली जाईल या बाबत देखील विचार झाला पाहिजे. जितकी लोकसंख्या आहे तितकी झाडे लावण्याबाबत सांगण्यात येते. परंतु अशी तरतूद कायद्यामध्ये करता येईल काय ?

यानंतर श्री.गिते..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (पुढे सुरु..)

झाडे किती जगतील ती गोष्ट वेगळी आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, मागच्या वर्षापासून ग्रामीण भागामध्ये वृक्ष संवर्धनाच्या दृष्टीकोनातून एक चांगली जागृती निर्माण झालेली आहे. अजूनही सरपंच, ग्रामसेवक, सचिव यांच्या माध्यमातून कोणती कार्ये वाढविता येतील याचा शासनाने विचार करावा, अशा प्रकारची विनंती करतो आणि पुन:श्च सांगू इच्छितो की, आपण या विधेयकात चांगल्या बाबींचा उल्लेख केला गेलेला आहे, त्या निश्चितपणे विचार करुन आणलेल्या आहेत. या अनुषंगाने अजून एखादे विधेयक आणले तर इंटिग्रेटेड असे मी म्हणत नाही, हे विधेयक थोडे पीसमील आहे. आपण काही कलमात सुधारणा केलेली आहे. अनेक कलमांमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात सरकारने विचार करावा अशा प्रकारची मी पुन:श्च विनंती करतो आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार मानतो व या विधेयकावरील माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : या विधेयकावर बोलण्यासाठी 11 सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत. आणखी काही सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी हात वर करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर किती बोलावे यावर मला बंधन घालता येणार नाही. परंतु एका सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले त्या मुद्यांचे रिपिटेशन होऊ नये याची कृपया दक्षता घ्यावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय चांगले विधेयक या सभागृहात माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी आणले आहे, त्याबद्दल मी त्यांना प्रथम धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पूर्वी ग्रामसभा 6 घेण्यात येत होत्या, त्या आता 4 करण्यात आलेल्या आहेत. मी एका गोष्टीकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. त्यानंतर ग्रामसभा ठरविल तो अध्यक्ष होतो. ग्रामीण भागात अडचण अशी आहे की, ग्रामसभेच्या ठिकाणी एखादा मोठा गट येतो, तो गट प्रेशर करतो आणि त्या प्रेशरमुळे त्या गटाच्या व्यक्तीला ग्रामसभेचे अध्यक्षपद दिले जाते. जर त्या गटाच्या व्यक्तीला अध्यक्षपद दिले नाही तर तो गट हाणामारीपर्यंत येतो. माझी या निमित्ताने विनंती आहे की, सरपंचाची निवड ग्रामस्थांच्या माध्यमातून होते. प्रत्येक ग्रामसभेमध्ये सरपंच हाच ग्रामसभेचा अध्यक्ष असला पाहिजे अशी माझी सूचना आहे. ही सूचना माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी मान्य करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, ग्रामसभेला आणि ग्रामपंचायतीला फार मोठे अधिकार प्राप्त झालेले आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचे सभापती होण्यापेक्षा ग्रामपंचायतीमध्ये सरपंच झालेले बरे असे स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी म्हणू लागले आहेत. जलस्वराज्य योजना, भारत निर्माण योजना, राष्ट्रीय पेजयल योजना, सर्व शिक्षा अभियान यासाठी कोटयावधी रुपये राज्य शासनाकडे येतात. राज्य शासनाच्या माध्यमातून ते जिल्हा परिषदेकडे वर्ग होतात. आता 13 वा वित्त आयोग सुरु झालेला आहे. आता या योजनांचे पैसे डायरेक्ट ग्रामपंचायतीकडे येतात. ग्रामपंचायतीकडे निधी प्राप्त झाल्यानंतर तेथे ग्राम कमिटी तयार होते. ग्राम कमिटीत देखील ग्रामसभेसारखाच प्रकार होतो. ग्राम कमिटी ठरवील त्यास अध्यक्षपद दिले जाते. ग्रामपंचायतीकडे तांत्रिक कर्मचारी नसतो. 40 लाख, 50 लाख ते 1.50 कोटी रुपयांची कामे काढली जातात. सदर कामांचे पैसे ॲडव्हान्समध्ये काढले जातात. ते पैसे काढण्यावर जिल्हा परिषदेचा अंकुश नाही, पंचायत समितीचा अंकुश नाही. राज्य सरकारचा अंकुश नाही. सर्व अधिकारी ग्राम कमिटीला दिलेले आहेत. कामाचे पैसे ॲडव्हान्समध्ये ठेकेदारास दिल्यानंतर तो ठेकेदार आणि तेथील सरपंच अथवा सचिव हे संगनमताने गोंधळ घालतात. शेवटपर्यंत ते काम कधीही पूर्ण होत नाही. कारण कायद्यात या संदर्भात काही तरतूदच नाही.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

ज्या वेळी आपण सर्वेक्षण करण्यासाठी जातो, लेखे तपासणीसाठी जातो, त्या वेळी असे दिसते की, अनियमितता झालेली आहे असा शेरा दिसून येतो. पैसे खाल्याचे कोठेही दिसून येत नाही. ते सांगतात की, काम चालू आहे. त्या ठिकाणी फक्त अनियमितता झालेली आहे. त्या ठिकाणचा सरपंच,सचिव, ग्राम कमिटीचे अध्यक्ष यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. अशा प्रकारचे गैरव्यवहार करणाऱ्या किती व्यक्तींवर कारवाई करण्यात आलेली आहे याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

महोदय,जलस्वराज्य, भारत निर्माण, राष्ट्रीय पेयजल या योजनांसाठी केंद्र सरकारकडून मोठया प्रमाणात पैसे आलेले आहेत....

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

टंचाईग्रस्त गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. अशा प्रकारे पिण्याच्या पाण्यासाठी केंद्र आणि राज्याकडून भरपूर निधी मिळतो, वेगवेगळ्या योजना घेतल्याजातात पण तरी देखील पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्स लावावे लागतात. एवढे पैसे खर्च करुन देखील त्या गावातील संबंधित ग्राम समितीचा पाणी समितीचा अध्यक्ष किंवा सरपंच असेल हे जबाबदार असून त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. या निमित्ताने आमची विनंती आहे की मंत्री महोदयांनी अशा अयशस्वी झालेल्या योजना, ज्याला पाणी समितीचे अध्यक्ष जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करण्याची तरतूद करावी. याचे मुख्य कारण म्हणजे आपण ग्राम सभेला इतके अधिकार दिलेले आहेत की, मोठमोठ्या रकमेचा चेक ते आगावू काढून कंत्रादारांना देतात, त्यासाठी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीची सुध्दा गरज पडत नाही. आपण या विधेयकात एक चांगली सुधारणा केली आहे की, ग्राम पंचायतींना तज्ज्ञ तसेच तांत्रिक सहाय्य किंवा कुशल मनुष्यबळ तात्पुरते घेण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. पण हे सर्व करीत असताना अशा योजनांसाठी पैसे काढताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शक्य होत नसतील तर किमान कार्यकारी अभियंता यांचा तरी या सर्व बाबींवर अंकुश असणे गरजेचे आहे, याचाही विचार करावा.

महोदय, या निमित्ताने मी माझेच उदाहरण देत आहे की, वेंगुर्ला येथे माझी स्वत:चीच जागा होती, तेथे ग्राम पंचायतीला रस्ता करावयाचा होता. अशा प्रकारे रस्ता तयार करावयाचा असेल तर संबंधित जागेच्या मालकाची परवानगी घ्यावी लागते, तसे संमती पत्र मालकाने लिहून दिल्यानंतरच ती जागा 26 नंबरला लागते. त्यानंतरच त्या जागेवर रस्ता तयार करण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. पण एका अधिकाऱ्याच्या समाधानासाठी आमच्या ग्राम पंचायतीने मासिक सभेत ठराव घेतला आणि त्यापुढचा पराक्रम गट विकास अधिकाऱ्यांनी केला. मी आमदार असताना ही गोष्ट घडली पण मी घरी नव्हतो. या रस्त्यासाठी रोजगार हमी योजनेचा पैसा खर्च करण्याचेही आदेश तेव्हा दिले होते व रस्ता मंजूर केला. मागील वेळेस अधिवेशन चालू असताना मी मुंबईतच होतो तेव्हा ही घटना घडली होती. नंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तो रस्ताच रद्द करुन टाकला. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की ग्राम पंचायतीचे सचिव एवढी हिंमत करु शकतात, अशा सचिवांवर काय कारवाई करता येईल याचाही विचार करणे गरजेचे आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

महोदय, आताच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की राज्यात तीन तीन ग्राम पंचायतींचे चार्ज एकाच सचिवांकडे आहेत अशी परिस्थिती आहे. पण या निमित्ताने माझी सूचना अशी आहे की, ज्या ग्राम पंचायतींत हे सचिव जातील तेथे नोंद ठेवण्याची व्यवस्था करावी, कालांतराने यात सुधारणा होऊन बायोमेट्रिकची सुविधा येणारच आहे. छोट्या छोट्या पाडयांसाठी तर 10-12 पाड्यांना एक ग्राम सेवक आहे. अशा परिस्थितीत लोकांना गरज लागली तर ग्राम सेवक कोणत्या एका गावात सापडत नाहीत. तसेच पंचायती राज समितीच्या दौऱ्या निमित्त अनुभव येतो की, हे ग्राम सेवक कोणालाच जुमानत नाहीत. वास्तविक 500 रुपयाच्या वरील रक्कम चेकनेच द्यावयाची असते पण हे ग्रामसेवक महोदय सर्रास कॅशचे वाटप करताना आम्हाला बीड येथील दौऱ्यात आढळून आले, अशा सचिवांवर कारवाई होणे आवश्यक आहे. पण मुळात सचिवांची संख्याच कमी आहे आणि त्यातील काही सस्पेंड झाले तरी हे ग्रामसेवक दुसऱ्या गावात जाऊन हे प्रताप करीतच असतात. तसेच ठराविकच सचिव त्या तालुका व जिल्ह्यात दिसतात एवढे कोडगे झालेले असतात, अशा लोकांच्या बाबतीत कठोर कारवाई कशी करता येईल अशी सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामसेवकांचे गोपनीय अहवाल सरपंचांनी लिहिण्याची तरतूद केली तर ते सुध्दा तपासून पहावे. याचे कारण म्हणजे सचिव सरपंचांना बिलकूलच जुमानत नसतात. तसेच जिल्हा परिषदेची अध्यक्षा जर महिला असतील आणि त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना बोलाविले, लेखी स्वरुपात पाठविले तर ते सुध्दा काही ठिकाणी मानत नाहीत अशी परिस्थिती आहे. अशा अधिकाऱ्यांवर वचक कसा निर्माण होईल अशीही दुरुस्ती यात होण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंद

श्री. राजन तेली .....

तीच परिस्थिती ग्रामसचिवांची आहे. त्यामुळे यासंदर्भात ग्रामसचिवांवर सुध्दा काय कारवाई करता येईल यादृष्टीकोन विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पूर्वी ग्रामसभेच्या 6 सभा घेतल्या जात होत्या परंतु आता त्यांची संख्या 4 करण्यात आलेली आहे. पूर्वी 15 ऑगस्टला एक ग्रामसभा, दुसरी ग्रामसभा 26 जानेवारी रोजी, नंतरची ग्रामसभा मार्चच्या अर्थसंकल्पाच्या वेळी अशा प्रकारे ग्रामसभा घेतल्या जात होत्या. त्यामुळे आता या 4 सभा केव्हा घेतल्या जातील याचे नियोजन करावे अशी विनंती करतो. एक चांगले विधेयक आणल्याबद्दल मी त्याचे स्वागत करतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानतो.

धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ: अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, एक अतिशय चांगले विधेयक सभागृहात मांडले असून या विधेयकाच्या समर्थनासाठी, त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काही काही ग्रामपंचायती खूप मोठया आहेत. मालेगाव तालुक्यातील दाभाडी हे एकटे गाव पंचायत समितीचा मतदारसंघ आहे. त्यामुळे मोठया ग्रामपंचायतींचे वर्गीकरण करणे गरजेचे आहे. सरकारी यंत्रणेतील इलेक्ट्रिशियन, पाटकरी आणि इतर मंडळीना ग्रामपंचायतीमध्ये हजेरी लावणे आपण सक्तीचे करीत आहोत. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीचे, गावाचे क्लासीफिकेशन करण्यात यावे तसेच सचिवांचेही ग्रेडेशन करण्यात यावे व त्या गावाच्या दर्जानुसार तशा दर्जाचे सचिव त्या त्या गावात नेमण्यात यावे अशी मी या विधेयकाच्या निमित्ताने मागणी करीत आहे. जर 4-5 गावांमिळून एक ग्रामसेवक काम करीत असेल तर तो कोणत्या पध्दतीने काम करीत असेल याचा विचारच केलेला बरा.

सभापती महोदय, ग्रामसभेच्या आधी महिलांची स्वतंत्र सभा होणे गरजेचे आहे. महिलांच्या अहवालाची फक्त नोंद घेतली जाणार आहे. जर महिलांनी गावात दारु बंदीची मागणी केली, व्यसनमुक्तीची मागणी केली तर तो ठराव नाकारण्याचा राईट ग्रामसभेला असू नये. निदान याचे अपील सीईओ लेव्हलला किंवा बिडीओ लेव्हलवर ठेवले तर योग्य होईल. ग्रामपंचायतीला यासंदर्भातील निर्णय देण्याचा अधिकार दिला तर, त्या महिलांचा ठराव ग्रामसभा निश्चितपणे नाकारेल. त्यामुळे यासंदर्भातील निर्णय स्थानिक स्तारावर न ठेवता किमान तो एसडीएम पर्यंत तरी ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, असे जर झाले तर ग्रामसेभेचे दोन ठराव होतील व त्या दोन ठरावाच्या बाबतीत आपल्याला अपिलात जाता येईल.

सभापती महोदय, या विधेयकात लोकांचे प्रतिनिधीत्व वाढवून देण्यासाठी महिलांच्या सभेचे आयोजन केलेले आहे, वॉर्डाच्या लेव्हलपर्यंत जाऊन त्या त्या ग्रामपंचायतीच्या वॉर्डामध्ये जाऊन सभा कशा होतील याबाबत आपण विधेयकात निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, नगरसेवक व ग्रामपंचायतीचा सदस्य यातील वर्कींग मधील फरक लक्षात घेतला पाहिजे. आपण मोठया प्रमाणात राईट्स दिलेले आहेत. केंद्राच्या व राज्याच्या योजनेचा फायदा ग्रामपंचायतीला घेता येतो. परंतु त्यासंदर्भात योग्य ती अंमलबजावणी होत नाही हे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अपूर्व हिरे...

त्यामुळे यात जागरूकता कशी वाढविता येईल हे पाहिले पाहिजे. या योजनेचा लाभ कसा घेता येईल, हे पाहिले पाहिजे. तसेच, त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी देखील प्रयत्न आपल्या वतीने केला जावा अशी विनंती करतो आणि एक चांगले विधेयक आणल्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या बिलावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. मी येथे मोजकेच मुद्दे मांडणार आहे.

विधेयकात 6 सभा ऐवजी 4 सभा असा बदल सूचित केला आहे. मला असे वाटते की, एखाद्या गावात अतिशय सौहार्दपूर्ण वातावरण असेल आणि त्या गावातील सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याची संरपंचाची, पंचायत समितीची मानसिकता असेल व गावातील ग्रामसभेला सर्व कळविण्याची आवश्यकता वाटत असेल व वर्षाला 12 ग्रामसभा घ्याव्या असे वाटत असेल तर त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणे बरोबर होणार नाही. त्यामुळे आपण 6 सभा ऐवजी किमान 4 सभा असा शब्द समाविष्ट करावा म्हणजे त्याला अप्पर मर्यादा राहणार नाही, वरची मर्यादा राहणार नाही, अशी सूचना मी या निमित्ताने करतो आहे. चार सभा घेतल्या पाहिजेत अशी मर्यादा घातली पाहिजे म्हणजे त्याला चांगले रूप येईल. अशी मी पहिली सूचना करतो.

खंड 2 मधील उप खंड (2) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "आणि सरपंच अशा सभेची कार्यवृत्ते ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेसमोर आणील किंवा आणण्याची व्यवस्था करील". आपण यास केवळ वैधानिक स्वरूप देऊ नये. कोणतेच बंधन आपण ठेवले नाही तर कार्यवाही नीटपणाने होईल असे नाही. तसे करण्यास त्याला जबाबदार धरले जाईल असा शब्द प्रयोग त्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. जबाबदारी पार पाडण्यास कमी पडल्यास तो कारवाईसही पात्र होईल अशा तऱ्हेची तरतूद असावी अशी सूचना मी या निमित्ताने करीत आहे.

एका सुधारणेचे कौतुक करावे लागेल. पोट कलम (5अ) मध्ये प्रभागातील सर्व मतदारांची सभा घ्यावी अशी तरतूद केली आहे. हा अतिशय स्वागतार्ह मुद्दा पुढे आला आहे. त्याचे आऊटपूट देखील चांगले येईल.

पोट कलम 6 मध्ये देखील चांगली तरतूद करण्यात आली आहे. पोट कलम 11 मध्ये अभिलेख ठेवण्यावसंबंधी सरपंचाला जबाबदार धरले आहे. परंतु अभिलेख कुठे ठेवायचे याचा उल्लेख नाही. तो करणे आवश्यक होते. काही गावे अशी आहेत की, तेथील घराण्यामध्ये पारपंरिक पद्धतीने पती, पत्नी, नातू सरपंच असतात. त्यामुळे ग्रामपंचायतीचे कार्यालय मोकळ असते. सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे .....

दस्तावेज सरपंचाच्या घरात असते. त्यामुळे ग्रामसेवक मोकळा असतो. काही ग्रामसेवक चमत्कारीक असतात. ते 3-4 गावांचे दस्तावेज कुठे ठेवतात हे कोणालाच माहीत नसते, असाही काही प्रकार होतो. दस्तावेज हा त्या त्या ग्रामपंचातीमध्ये असला पाहिजे. दस्तावेज अन्य कारणाने कुठे न्यायचा असेल तर त्यास बीडीओची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असले पाहिजे. किती तरी दस्तावेज कुठे गेले आहेत याची कल्पनाच करवत नाही. त्यामुळे याबाबत जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तरच दस्तावेज सुरक्षित राहील अशा प्रकारची सूचना करतो.

एका बाबीमध्ये देखील शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत. 26 (अ) मध्ये नियोजन करण्याचे व्यापक स्वातंत्र्य देत आहोत. तसे देण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक खेड्यात शिकलेली मुले सरपंच होत आहेत. त्यामुळे गावामध्ये विकासाने झपाटलेली माणसे देखील बघायला मिळत आहेत. त्यांच्याकडे असलेल्या पोटेन्शियलमधूनच त्यांना पुढे संधी मिळणार आहे. त्यांनी अति उत्साहाच्या भरामध्ये काही आगळीक करून ठेवली तर ती सर्वांची डोकेदुखी होईल.

यानंतर श्री.सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

तसे होऊ नये म्हणून काही मार्गदर्शक तत्वे मर्यादित स्तरावर आणावीत. तसेच, या पध्दतीमध्ये, या कक्षेमध्ये आपल्यालाही स्वातंत्र्य मिळावे या करिता एखादे पोट कलम वाढविता आले तर ते वाढवावे अशी सूचना करतो व आपण मला बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, शासनाने ग्राम पंचायतीच्या संदर्भात एक चांगले विधेयक सभागृहामध्ये आणले आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. महाराष्ट्राच्या थ्री टायर पध्दतीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्याची फळे आज सामान्य माणसाला चाखायला मिळत आहेत त्याचा हा एक उत्कृष्ट पुरावा आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने माझ्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, त्या बाबत माझी काही मतभिन्नता आहे. पृष्ठ क्रमांक 2 वर असे म्हटले आहे की, "आणि सरपंच अशा सभेची कार्यवृत्ते ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेसमोर आणील किंवा आणण्याची व्यवस्था करील, आणि ग्रामसभा महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशींचा विचार करील, आणि पंचायत अशा शिफारशींच्या अंमलबजावणीची खात्री करील. परंतु, जर ग्रामसभा, महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशींशी सहमत नसेल तर, ती त्याबद्दलच्या कारणांची नोंद करील". अशाप्रकारची करण्यात आलेली तरतूद योग्य नाही. महिलांची सभा झाल्यानंतर व त्या सभेमध्ये जे काही निर्णय झाले असतील ते बरोबर आहेत की चूक आहेत हे दुसऱ्या दिवशीच्या सभेमध्ये ठरविण्याचा अधिकार कशासाठी घेतला जात आहे, त्या ठिकाणी देखील आपण बायस इंटेन्शननेच वागणार आहात काय? एका बाजूला सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यानंतरही महिलांच्या हातामध्ये सत्ता देणार नाही. म्हणजेच एका हाताने देणार आणि दुसऱ्या हाताने काढून घेणार.

1994 साली वारसाहक्क कायद्यामध्ये दुरुस्ती करीत असतांना माननीय श्री. शरद पवार साहेब म्हणाले होते की, महिलांना इतर हक्क देण्याऐवजी त्यांना आपल्या भावाबरोबर को-पार्शनल केले पाहिजे. तो कायदा करण्याची वेळ आली त्यावेळी संबंधित विभागाच्या सचिवांनी त्या विधेयकामध्ये असे एक पोट कलम घातले की, "महिला को-पार्शनल असतील, परंतु जर त्या महिलेला प्रॉपर्टी विकावयाची असेल तर आपल्या भावाची संमती घ्यावी लागेल". त्यावेळी माननीय श्री. शरद पवार साहेब सभागृहामध्ये आले आणि त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, "महिलांना एका हाताने देऊन दुसऱ्या हाताने त्यांच्याकडून काढून घेता येणार नाही". तेव्हापासून महिलांना को-पार्शनल करीत असतांना भावाच्या संमतीची गरज नाही. अशाप्रकारे 1994 मध्ये वारसाहक्क कायदा मंजूर करण्यात आला जो या देशामध्ये क्रांतिकारी कायदा ठरला. त्यामुळे या विधेयकामध्ये ही तरतूद केल्यानंतर दुसऱ्या दिवशी व्हेरिफिकेशन करण्याची गरज काय? ग्रामसभेच्या व्याख्येमध्ये सर्वसाधारण ग्रामसभा वेगळी आणि महिलांची ग्रामसभा वेगळी असे आपल्याला करता येईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

त्यादृष्टीने या विधेयकामध्ये आज जरी दुरुस्ती करता आली नाही तरी भविष्यात तशाप्रकारची दुरुस्ती आपल्याला करावी लागेल. महिलांना 50 टक्के आरक्षण दिल्यानंतर त्याचे चांगले परिणाम आपण पहात आहोत. परंतु दारुबंदीसाठी महिलांची ग्रामसभा घेतली जाते. त्या बाबतीत मला थोडीशी दुरुस्ती करावयाची आहे. त्या करिता ग्रामसभेमध्ये ठेवण्यात आलेल्या मतदानाच्या टक्केवारीमध्ये पाच-पंचवीस टक्केवारी आपल्याला कमी करता आली तर अधिक बरे होईल. याचे कारण मतदानामध्ये भाग घेत असतांना ग्रामीण भागातील महिला या घरातील दडपणामध्ये असतात. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव, केज तालुक्यातील आडस, बीड तालुक्यातील काळेगाव या गावातील एका 75 वर्षाच्या महिलेने दारुबंदीसाठी पुढाकार घेतला. त्यामुळे त्या गावामध्ये दारुबंदी लागू झाली परंतु नंतर त्या महिलेचे तिच्या नवऱ्याने जे हाल केले हे मी माझ्या डोळयांनी पाहिले आहेत. या करिता ग्रामसभेसाठी आवश्यक असणाऱ्या मतदानाची टक्केवारी आपण थोडी कमी केली तर तिचा आपल्याला निश्चितपणे फायदा होईल.

सभापती महोदय, गावामध्ये पाणीपुरवठयाची योजना घ्यावयाची असेल तर गावामध्ये 60 टक्क्यापेक्षा जास्त शौचालये असल्याचे ग्रामपंचायतीचे आणि बीडीओ यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. परंतु ग्रामीण भागामध्ये अशाप्रकारची खोटी प्रमाणपत्रे दिली जातात. मृत्यूच्या आणि लग्नाच्या नोंदी ग्रामपंचायतीमध्ये करणे सक्तीचे केले आहे. त्याप्रमाणे गावामध्ये होणाऱ्या प्रत्येक लग्नापूर्वी नवरदेवाने "माझ्या घरामध्ये शौचालय बांधले आहे" अशाप्रकारचे एक शपथपत्र ग्रामपंचायतीला सादर केले पाहिजे. तसे शपथ पत्र सादर केले नाही तर ते लग्न अवैध ठरविले पाहिजे. महिला आयोगाने राज्य सरकारला आपल्या कर्मचाऱ्यांकडून "मी हुंडा घेतला नाही, किंवा घेणार नाही"अशी शपथ घेण्याबाबत निर्देश दिले होते. तशाप्रकारे या ठिकाणी देखील आपण शपथ पत्र घ्यावे अशी माझी मागणी आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे .....

तुम्ही सुध्दा कोणाचे तरी पती आहात म्हणून आपण बोलत आहात, आपणास माहीत आहे की, ही बाब महत्वाची आहे. पृष्ठ क्रमांक 03 वर असे म्हटलेले आहे की, "त्या पदाच्या अधिकारांचा वापर करण्याचे आणि त्यांची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील आणि त्यानंतर जर सरपंचाच्या विरुध्द प्रस्ताव संमत करण्यात आला असेल तर असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये उप-सरपंचाकडे निहित होतील आणि जर सरपंच व उप-सरपंच या दोघांविरुध्द प्रस्ताव संमत करण्यात आला असेल तर,ते अधिकार, पोट-कलम (3-ब) अन्वये निर्दिष्ट केलेला विवाद, कोणताही असल्यास, निर्णीत होईपर्यंत, गटविकास अधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा विस्तार अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे निहित होतील" त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, "परंतु, अशा प्रकारे निर्देशित केलेल्या विवादाचा निर्णय सरपंचाच्या किंवा यथास्थिती, उप-सरपंचाच्या बाजूने झाला असेल तर, त्याद्वारे असा प्रस्ताव रद्द होईल व सरपंच किंवा उप-सरपंच यांचे अधिकार, कार्य व कर्तव्ये ताबडतोब पूर्ववत बहाल होतील".

महोदय, गृह खात्यामध्ये ज्या शिपायांच्या भरती केल्या जातात, त्याबाबतची महाराष्ट्र शासनाकडे 4000 प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यातील काही प्रकरणे फिजीकल निर्णयामध्ये आहेत, सिलेक्ट झालेले आहेत, परंतु त्यांच्या विरोधामध्ये कधी तरी फौजदारी संहितेच्या कलमाखाली गुन्हा दाखल झाला आणि ते कोर्टातून निर्दोषही सुटले तरी देखील त्यांना नियुक्त्या दिल्या जात नाहीत. एकीकडे गृह खात्याची ही भूमिका आणि दुसरीकडे उप सरपंच, सरपंच निर्दोष सुटले तर त्यांना मात्र अधिकार बहाल करणार, हे सूत्र सुसंगत असले पाहिजे. एकाच सरकारमध्ये दोन खात्यांचा कार्यभार करतांना त्यात सुसूत्रता असली पाहिजे.आपण असे बघतो की, 99 सदोष सुटले तरी चालतील पण एकाही निर्दोषाला शिक्षा होता कामा नये, या सूत्राने न्यायालय चालते. यासंदर्भात खरे तर गृह निर्माण आणि नगर विकास खाते यामध्ये सुसूत्रता असली पाहिजे, असे **ॲसम्प्शन** करु या.

सभापती महोदय, यामध्ये मला एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे की, या विधेयकातील तरतुदीनुसार सरपंच किंवा उप सरपंच यांच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव पास केला जाईल व त्यात निर्दोष सुटले तर पुन्हा त्यांना अधिकार दिले जातील.सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी भाषणातून असे सांगितले की, जर अविश्वास ठराव पास झाला तर 3 (ब) ची प्रोव्हिजन शासनाने ठेवली त्या शासनाच्या मताशी मी सहमत नाही. ज्यावेळी अविश्वासाचा ठराव दिला जातो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे . . . .

तेव्हा दोन तीन सदस्यांचा सल्ला घेऊन सुधारणा दिली जाते, ती नियमाप्रमाणे दिलेली आहे की नाही ती कोणत्या तारखेला दिलेली आहे, त्यानंतर नोटीस किती दिवसांमध्ये सरपंचाला व उप सरपंचाला इश्यू केलेली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलमाप्रमाणे दिलेली आहे का, बैठक घेतांना नोटीस इशू करतांना सुरुवातीला सदस्यांनी दिलेल्या सूचनेची कॉपी अटॅच केली होती काय, बैठक घेतांना पीठासीन अधिकाऱ्याने ती नोटीस वाचून दाखविली होती काय, अशा सर्व गोष्टी सिध्द झाल्याशिवाय केवळ हात वर केले म्हणून ठराव पास झाला असे होते. पण यावर कोणत्याही परिस्थितीमध्ये अपिल पाहिजे. जिल्हाधिकारी कार्यालय म्हणा, आयुक्त म्हणा, मंत्रालय, किंवा उच्च न्यायालय म्हणा या कोणत्याही स्तरावर अपिल असणे आवश्यक आहे.त्या संदर्भात आपल्याला निगेटिव्ह विचार करता येणार नाही. हात वर केले म्हणजे अविश्वासाचा ठराव कायदेशीर आहे असे गृहित धरता येणार नाही एवढेच मला व्यक्त करावयाचे आहे एवढे बोलून या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपविते.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा (विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, बहुत सारे सम्माननीय सदस्यों ने अभी यहां पर बोलते हुए काफी अच्छे सुझाव दिये हैं. सबसे पहले मैं महाराष्ट्र सरकार के साथ-साथ हमारे माननीय मंत्री श्री जयंत पाटील जी एवं श्री सतेज पाटील को धन्यवाद देता हूं. यह जो कानून है वह बहुत ही प्रोग्रेसिव कानून है, प्रगतिशील कानून है और पंचायत राज सिस्टम में ग्राम पंचायतों को ज्यादा शक्ति देने के साथ-साथ उनको ज्यादा जवाबदारी देने का कानून है. इस संबंध में सरकार ने जो कदम उठाया गया है, वह सराहनीय है.

सभापति महोदय, मैं एक छोटा सा सुझाव देना चाहता हूं, बाकी बातें जो हमारे सम्माननीय सदस्यों ने कही हैं और मैं उनको रिपीट नहीं करना चाहता हूं. यह जो बॉम्बे ग्राम पंचायत एक्ट है उसके बारे में बोलने से पहले मैं यह कहना चाहूंगा कि सम्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी शायद आज चूक गये कि उन्होंने बॉम्बे शब्द पर ऑब्जेक्शन नहीं लिया और उस शब्द को मुंबई करने की बात नहीं की. मेरा कहना है कि इसका नाम बदलकर महाराष्ट्र होना चाहिए क्योंकि यह एक्ट बहुत पहले सन् 1958 में बना है और उस समय बॉम्बे स्टेट का अस्तित्व था लेकिन अभी बॉम्बे स्टेट की जगह महाराष्ट्र राज्य हो गया है. इस एक्ट से संबंधित ज्यादातर काम ग्रामीण क्षेत्रों में होते हैं इसलिए इस एक्ट का नाम तुरन्त बदलना चाहिए. इस एक्ट का नाम महाराष्ट्र ग्राम पंचायत एक्ट होना चाहिए ताकि सुनने में भी अच्छा लगे.

सभापति महोदय, मेरा दूसरा सुझाव यह है कि पंचायत राज सिस्टम आने के बाद ग्राम पंचायतों को आर्थिक दृष्टि से अधिक मजबूत किया जा रहा है. केन्द्र सरकार की बहुत सारी योजनायें डायरेक्ट ग्राम पंचायत तक आती है. महाराष्ट्र सरकार की बहुत सारी योजनायें डायरेक्ट ग्राम प्रचायत तक जाती हैं. ग्राम पंचायत की फाईनेंशियल डीलिंग काफी बढ़ी है लेकिन इसके साथ ही वहां पर करप्शन भी बढ़ा है और बुराईयां भी बढ़ी हैं. आज ग्राम पंचायत में बहुत होड़ लगी हुई है. सम्माननीय सदस्य श्री गुजराथी साहब कह रहे थे कि आज बहुत क्वालीफाईड लोग ग्राम पंचायत का सरपंच बनना चाहते हैं क्योंकि वे ग्राम पंचायत के माध्यम से काफी काम कर सकते हैं और फाईनेंशियल डीलिंग भी अच्छी तरह से कर सकते हैं. वे पढ़े-लिखे लोग हैं.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा का भाषण जारी.....

सभापति महोदय, मुझे लगता है कि यह बहुत आउट डेटेड एक्ट हो गया है. इस एक्ट को अप-टू-डेट करने के लिए एक कॉम्प्रिहेंसिव बिल इस सदन में पास करना चाहिए. इस बिल का तो मैं समर्थन कर ही रहा हूं. यह बिल बहुत अच्छा है और इस बिल को तो पास होना ही चाहिए.

सभापति महोदय, पंचायत राज सिस्टम में ग्राम पंचायत का काफी एम्पॉवरमेंट हो रहा है. ग्राम पंचायत में फाईनेंशियल एम्पॉवरमेंट हो रहा है. ग्राम पंचायत में महिलाओं के संबंध में एम्पॉवरमेंट हो रहा है. ग्राम पंचायत में महिलाओं के लिए 50 प्रतिशत रिजर्वेशन रखा गया है. ग्राम पंचायत एक्ट में कॉम्प्रिहेंसिव सुधार करके एक कंपोजिट एक्ट बनाना चाहिए. ग्राम पंचायत से संबंधित जितने रुल्स या एक्ट हैं उनको एक साथ मिलाकर एक कॉम्प्रिहेंसिव एवं कंपोजिट एक्ट बनाना चाहिए. इसमें सभी छोटी-बड़ी बातों का समावेश होना चाहिए. इसके माध्यम से ग्राम पंचायत से संबंधित सभी बातों का समाधान हो सकता है.

सभापति महोदय, ग्राम पंचायत, सरपंच, उप सरपंच या ग्राम सचिव जब फाईनेंशियल जवाबदारी लेते हैं तो उनकी रेस्पोंसिबिलिटी भी फिक्स करनी पड़ेगी. उनके खिलाफ कार्रवाई का भी प्रावधान करना पड़ेगा. यहां पर बिल क्रमांक 10 पर चर्चा चल रही है. इस बिल के माध्यम से सरपंच, उप सरपंच, ग्राम सचिव को जवाबदार ठहराने एवं उनके खिलाफ कार्रवाई करने के साथ-साथ बी.डी.ओ. को भी डायरेक्ट रेस्पोंसिबल ठहराने की जरुरत है. बी.डी.ओ. के अंतर्गत जितनी भी ग्राम पंचायतें हैं अगर उनमें कोई इरेग्युलरिटी होती है, कानून का उल्लंघन होता है या कोई मिसएप्रोप्रिएशन होता है तो बी.डी.ओ. को इसके लिए जिम्मेदार ठहराना चाहिए क्योंकि बिना बी.डी.ओ. की सांठ-गांठ के ग्राम पंचायत का सरपंच, उप सरपंच या ग्राम सचिव कोई घपला नहीं कर सकता है. ग्राम पंचायत के संबंध में एक कॉम्प्रिहेंसिव एक्ट अगले अधिवेशन में आना चाहिए, ऐसा मेरा सुझाव है. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

अशुद्धि सत्य / शुद्धि नहीं

RDB/ D/AKA/KTG

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना सुरुवातीला या विधेयकातील खंड 5 नुसार मुख्य अधिनियमाच्या कलम 61 नंतर जे 61 अ कलम समाविष्ट करण्यात येत आहे त्यातील पोटकलम (1) आणि (3) मधील तरतुदींचे मी स्वागत करतो. मात्र मूळ अधिनियम क्रमांक 3 च्या कलम 7 ची जी सुधारणा आहे त्यातील पोटकलम 5 मधील सुधारणेला मात्र विरोध करणे भाग आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. अपूर्व हिरे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी त्याकडे लक्ष वेधले आहे. खंड 2 च्या पोटकलम (5) मध्ये सुचविलेली सुधारणा अशी आहे की, "...आणि ग्रामसभा महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशींचा विचार करील, आणि पंचायत अशा शिफारशींच्या अंमलबजावणीची खात्री करील." हे बरोबर आहे परंतु पुढच्या परंतुकामध्ये ज्या दोन ओळी दिलेल्या आहेत त्या अत्यंत घातक आहेत. परंतुकामध्ये असे म्हटले आहे की, "परंतु जर ग्रामसभा महिला सदस्यांच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशींशी सहमत नसेल तर, ती त्याबद्दलच्या कारणांची नोंद करील." फक्त नोंद करील ही बाब अतिशय घातक आहे. म्हणजे ग्रामसभा ते फेटाळून लावील असा त्याचा अर्थ आहे.

सभापती महोदय, भाषा पुरोगामी आहे पण त्याचा परिणाम अत्यंत प्रतिगामी आहे. अत्यंत पुरुषी वर्चस्वातून आलेली ही भाषा आहे. ही भाषा विधेयकाला शोभणारी नाही. सत्ताधारी पक्षाच्या महिला सदस्यांकडून महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाची मागणी केली जाते, महिलांना अधिक अधिकार देण्याची भाषा केली जाते अशा वेळेला अशी तरतूद करुन आपण त्याच्याशी विसंगत भूमिका घेत आहात. त्यामुळे ही भूमिका आपण ताबडतोब मागे घेतली पाहिजे. ही भूमिका ठेऊन जर बिल पास केले तर पक्षाने जी काही भूमिका घेतल्याचे आम्ही वर्तमानपत्रातून वाचतो त्याच्याशी अतिशय विसंगत अशी ही भूमिका राहील. ही भूमिका आपण बदलली पाहिजे.

सन्माननीय सदस्य डॉ. अपूर्व हिरे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी नेमक्या शब्दात सांगितले की, त्यांनी जर दारुबंदीचा ठराव केला तर तो फेटाळून लावता येईल. भांडण लागू नये हे काही त्याच्यावरचे उत्तर नाही. उलट महिला सभेला नकाराधिकार दिला पाहिजे, व्हेटो दिला पाहिजे. ग्रामसभेने जर उलटा निर्णय घेतला तर तो नाकारण्याचा अधिकार महिला सभेला दिला पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

गाव सुंदर असते असे समजण्याचे काही कारण नाही. गावामध्ये देखील दांडगाई जास्त असते. ही दांडगाई कमी करण्यासाठी आपण अधिनियम करीत असतो. छोट्यातील छोट्या माणसाला देखील लोकशाहीने दिलेले स्वातंत्र्य त्याला उपभोगता आले पाहिजे. कलम 61अे मध्ये जी विकासाची संधी त्याला देऊ केलेली आहे ती जर त्याला उपभोगायची असेल तर त्या छोट्या समूहाच्या हातात देखील नकाराधिकार दिला पाहिजे. परंतु तसा तो न देता ग्रामसभेतील बहुमताच्या जोरावर महिला सभेने केलेल्या शिफारशी नाकारण्याचा अधिकार देण्यात आला तर त्या गावाचे वाटोळे झाल्या शिवाय राहाणार नाही. म्हणून गावाचे वाटोळे करणारी ही दुरुस्ती तत्काळ मागे घेतली पाहिजे.

भाषा ही फार पुरोगामी असते. कायद्यातील दुरुस्ती ही वरकरणी पुरोगामी वाटत असली तरी तिचा परिणाम काय होतो हे पाहायचे असते. आपण मागे पंचायत समितीच्या सदस्याने जर शौचालय बांधलेले नसेल तर त्याचे सदस्यत्व रद्द करण्याचे ठरविले होते. मघाशी सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी एका चांगल्या हेतूने मागणी केली. शौचालय असल्याचे ॲफिडेव्हिट देण्यास त्यांनी सांगितले. पण ॲफिडेव्हिट मागितले तर नवरा देईल आणि हुंड्यातून शौचालय बांधून मागेल अशी परिस्थिती आहे. ज्या समाजामध्ये जाती व्यवस्था आहे, परंपरने बांधलेला समाज आहे त्या बाबतीत एखादी सुधारणा पुरोगामी वाटते. सोनाग्राफी मशिन बंद करण्याची मागणी पुरोगामी वाटते. परंतु त्याचे दुष्परिणाम अनेक असतात.

शौचालयासंबंधीच्या दुरुस्तीला मी या सभागृहामध्ये प्रचंड विरोध केला होता. परंतु त्यावेळी ती दुरुस्ती रेटून नेण्यात आली. गरीब माणसाची शौचालय बांधण्याची ताकद नाही. शौचालय बांधण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने ते शौचालय बांधून दिले पाहिजे. गरीब माणसाने काय करायचे ? तो गरीब आहे ही शासनाची जबाबदारी आहे. त्याचे शोषण होत असल्यामुळे तो गरीब आहे. तो काही परंपरेने आणि पूर्वजन्मीच्या पापामुळे गरीब नाही. म्हणून ही तरतूद अधिक घातक आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांच्यासारख्या अत्यंत पुरोगामी मंत्र्यांकडून विषमता निर्माण करणारी, समतेच्या विरोधी असणारी, स्त्री-पुरुष भेद मानणारी अशा प्रकारची घातक तरतूद केली गेली असे कोणी म्हणू नये यासाठी मी हे सांगत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, मागे शिक्षण मंडळाचे सदस्य हे ग्रॅज्युएट असले पाहिजेत अशी तरतूद करणारे विधेयक सभागृहामध्ये आणले होते. एका बाजूला आपण 8वी पर्यन्त शिक्षण देणार, पुढच्या शिक्षणाची हमी देणार नाही आणि सांगणार की ग्रॅज्युएट बनून मंडळावर या, अशी तरतूद करणे किती योग्य आहे. सभापती महोदय, जेव्हा संविधान सभेमध्ये चर्चा झाली त्यावेळी शिकलेल्यांच्या हाती राज्य द्यावे असे सांगितले. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, शिकलेल्यांच्या हाती राज्य दिले तर ठराविक वर्गाच्या हातीच सत्ता जाईल. जो बहुजन वर्ग शिकलेला नाही त्याला अधिक कळते, न शिकलेल्या माणसाला देखील शहाणपण असते. त्याच्या विवेकावर विश्वास ठेवून ही लोकशाही उभी आहे. त्यामुळे या कायद्यामध्ये जी तरतूद केलेली आहे ती घटनाबाह्य आहे. तसेच विधेयकामध्ये जी उद्देश व कारणे दिलेली आहेत त्याच्याही विरुध ही तरतूद आहे. संविधानामध्ये गरिबांच्या, अशिक्षितांच्या, अल्पसंख्याकांच्या, छोट्या समूहाच्या बाजूने जी भूमिका घेतलेली आहे त्याविरुध्द ही तरतूद आहे. स्त्रिच्या संदर्भात कमालीचा दुस्वास करणारी, भेदभाव करणारी अशी ही शासनाची भूमिका आहे. हे शासन स्त्रीयांच्या बाजूने असेल, समतेच्या बाजूने असेल तर कृपा करुन ही दुरुस्ती मागे घ्यावी आणि स्त्रीला नकाराधिकार बहाल करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्व प्रथम आपण मला या विधेयकावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. या विधेयकाच्या संदर्भात माझ्या आधीच्या वक्त्यांनी आपापली मते या ठिकाणी व्यक्त केलेली आहेत. पंचायती राज म्हणजे आपले गाव आणि आपली सत्ता. आपल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक हे अकौण्टींग करीत असतात. त्यावर ग्रामसेवक आणि सरपंच या दोघांच्या सह्या असतात.

...नंतर श्री. अजित..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन...

जो खर्च करण्यात येतो त्याची माहिती पुढील बैठकीत ठेवून ती मंजूर करुन घेतली पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद केली पाहिजे. कारण शासनाकडून ग्रामपंचायतीला जो निधी प्राप्त होतो त्यावर अंकुश बसेल आणि जी विकास कामे होतात त्याचेही चीज होईल.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी ग्रामसेवकांबद्दल सांगितले तेव्हा मी आणखी काही बोलू इच्छित नाही.

सभापती महोदय, ग्रुप ग्रामपंचायतीबद्दल सांगू इच्छितो की, आमच्या जळगाव जिल्ह्यामध्ये 1500 गावे आहेत. त्यातील 1161 गावांमध्ये ग्रामपंचायती आहेत. 339 गावांना ग्रामपंचायती नाहीत. यातील काही गावे अशी आहेत की, त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना आपल्या कामासाठी 10-10 किलोमीटर पायी चालत जावे लागते. ज्या ठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत आहे किंवा जेथून जास्त ग्रामपंचायतीचे सदस्य निवडून येतात तेथेच विकासाची कामे होतात. जेथून कमी सदस्य निवडून येतात त्या भागात विकासाची कामे होत नाहीत. तेव्हा या बाबींकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक-10 मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, 2012 या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी आज सकाळीच एका वेगळ्या विषयाच्या संदर्भात माननीय ग्रामविकास मंत्री यांच्याकडे एक चिठ्ठी पाठविली होती. तेव्हा हे विधेयक चर्चेसाठी आले नव्हते.

सभापती महोदय, आपण विकासाच्या बाबतीत ग्रामसभांना खूप महत्व दिलेले आहे. देशामध्ये किती स्तरीय रचना असावी याचा विचार सुरु असताना आपण मात्र त्रिस्तरीय रचना ठेवावी असा निर्णय घेतलेला आहे. त्या दृष्टीकोनातून हे विधेयक फार महत्वाचे आहे. या विधेयकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी स्वागतार्ह आहेत हे मला येथे नोंदविले पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे ग्रामसभेच्या बैठका सहा वरुन चार वर आणलेल्या आहेत. ग्रामसभा घेतल्यामुळे ग्रामपंचायतीला त्रास होतो असे सरपंचानी सांगितले काय, 26 जानेवारी, 15 ऑगस्ट या दिवशी ग्रामसभा घेतल्या जातात परंतु या दिवशी घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभेमध्ये फार मोठे कामकाज होते असेही नाही. तेव्हा ग्रामसभांची संख्या कमी करण्याची कारणे काय आहेत याचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात द्यावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी कार्यवृत्त नियमित बैठकांसमोर मांडली जातात काय असा प्रश्न विचारला. खरे म्हणजे गाव पातळीवर कोणी वेगळे मत मांडणे म्हणजे त्या व्यक्तीची चूक मानली जाते. कोणी एकाने एक मुद्दा मांडला की तो सर्वांनी उचलून धरायचा हीच आपल्याकडील संस्कृती आहे. त्यामुळे कमीत कमी वादविवाद होतात असे आपण गृहीत धरु या. खरे म्हणजे आता महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. तेव्हा नव्याने निवडून आलेल्या महिला संरपंचाना ग्रामसभेची माहिती मिळणार आहे. सरपंच म्हणजे पुरुष सरपंच ही प्रशासनाच्या मनातील धारणा आता बदलली आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये जे अवघड शब्द आहेत जसे अभिरक्षा, परीरक्षण, पर्यवेक्षक अधिकार. नव्याने सरपंच झालेल्या महिला सरपंचाना या शब्दांचे अर्थ आपण सांगतो काय ? अनेक सरपंच हुशार आहेत, मला त्यांच्या शिक्षणाबद्दल काही बोलायचे नाही. मध्यंतरी एका कार्यक्रमाला अनेक सरपंच आले होते. त्यातील अनेक सरपंच चांगल्या मोठ्या गाड्यातून आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

होते. त्यांनी कसे यावे याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु आपण नवीन सरपंचाना ही सर्व रचना पुढे चालू ठेवण्यासाठी किती दिवसांचे प्रशिक्षण देतो हा महत्वाचा प्रश्न आहे. हे काम महाव्यापक असले तरी ते आपणास केले पाहिजे. सरकारने स्वत:च या सर्व बाबींचा एक आढावा घ्यावा. माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील यांनी यापूर्वी अर्थमंत्री, गृह मंत्री म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे त्यांना मूल्यमापन शब्दाचा अर्थ चांगला माहीत आहे. ग्रामसभा कशी घ्यायची याबाबत आपण सरपंच आणि सदस्यांना प्रशिक्षण देतो काय ? प्रशिक्षण दिल्याप्रमाणे ग्रामसभा घेतली जाते काय याचे मूल्यमापन केले तर या सर्व ग्रामसभा फक्त कागदोपत्री असल्याचे दिसून येईल याकडे मी सरकारचे लक्ष वेधत आहे.

यानंतर श्री.गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

महिलांच्या ग्रामसभेच्या बाबतीत मला माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण महिलांच्या ग्रामसभेच्या बाबतीत खूप कौतुक केले. लहान मूल चालावयास लागते, तेव्हा आपण म्हणतो की, बाळ चांगले चालावयास लागले. बाळ आता बडबड करावयास लागले, बाळ आता घरातील काम करावयास लागले, ते ग्रॅज्यूएट झाले, पोस्ट ग्रॅज्यूएट झाले, ते डॉक्टरेट झाले. माझे असे म्हणणे आहे की, महिलांच्या ग्रामसभेमध्ये जे प्रश्न मांडले जातात, त्याची दखल कोण घेतो, गावाच्या विकासाबद्दल महिलांचे काय म्हणणे आहे, गावात विकास कामाबाबत तातडीच्या मागण्या असतील, पुराचा प्रश्न असेल, टॉयलेटचा प्रश्न असेल, या गोष्टींची दखल सध्या कोणीही घेत नाही. आपण एका बाजूला गावपातळीवर पाठपुरावा असे शब्द वापरतो. माझी या बाबतीत सूचना आहे की, महिला ग्रामसभेचे विषय असतील, त्या विषयाची दखल घेण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक करा. महिला व बालविकास अधिकारी सक्षम असतील तर त्यांच्यावर ही जबाबदारी टाकणे योग्य आहे काय ते तुम्ही ठरवा. परंतु महिला ग्रामसभेमध्ये महिला व बालविकास विभागापुरतेच विषय असतात असे नाही. ग्रामसभेच्या माध्यमातून महिला ग्रामस्थांच्या काही अपेक्षा असतात. त्याकडे माननीय मंत्री महोदय बघणार नसतील, ऐकत नसतील तर त्यांनी केलेल्या अपेक्षांचा उपयोग काय ? माझे ग्रामविकास मंत्र्यांना सांगणे आहे की, संपूर्ण राज्यात महिला ग्रामसभा झालेल्या आहेत, त्यातील दोन टक्के महिला ग्रामसभेने काय म्हणणे मांडले आहे ते बघावे. त्यांच्या मागण्या काय आहेत त्या बाबतची माहिती ग्रामविकास मंत्री आणि ग्रामविकास राज्यमंत्री यांच्याकडून आम्हाला कळावी अशी मी अपेक्षा व्यक्त करते. महिला ग्रामसभा घेत आहेत, त्या ग्रामसभेत काही तरी बडबडतात. आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्या सारखे करता. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नसल्यामुळे महिला वर्ग वैफल्यग्रस्त झालेल्या आहेत. त्या चिडतात आणि त्या कायदा हातात घेतात. त्या कोठे तरी जाऊन दारुची भांडी तोडतात. मला लातूर आणि उस्मानाबाद येथील महिलांनी सांगितले की, ज्यावेळी निधी हवा असतो, त्यावेळी आम्हाला बैठकीसाठी घेऊन जातात. निधी मिळतो किंवा निधीचा निर्णय होतो, तेव्हा आम्हाला बैठकीसाठी बोलाविले जात नाही.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

आपण कलम 61 (अ) चा अंर्तभाव केलेला आहे, विकासाचे नियोजन आणि अधिकार आणि भागीदारी हे शब्द वापरलेले आहेत. तसेच पंचायत विकास, जमीन विकास, पर्यावरण विकास या शब्दांना योजना असा शब्द जोडण्यात आलेला आहे. खरे सांगावयाचे झाले तर वृक्ष तोड, स्वच्छता या सर्व गोष्टी आधी होत्याच. त्याला आपण फक्त योजना असे नाव जोडले आहे. त्याच्यात कंत्राटी, सल्लागार आणि कुशल मनुष्यबळ नेमलेले आहे. भविष्यात ग्रामसभा कंत्राटदारच चालवतील काय अशी आमच्या मनात शंका येऊ लागली आहे. त्या गावात कोणते काम चालणार, कोणत्या कामाचा निधी ग्रामपंचायतीकडे परस्पर येणार, मग या बाबतीत कशा प्रकारचा ठराव करुन घेतला पाहिजे. पर्यावरणाच्या दृष्टीने काय केले पाहिजे. सर्वात जास्त अभ्यास कंत्राटदाराचा होत असल्यामुळे तो सांगेल तसे ग्रामसभेत ठराव होतील अशी देखील शंका येऊ लागलेली आहे.

सभापती महोदय, सरपंचांनी कसूर केल्यास सचिव सभा बोलावतील. सरपंचानी कसूर केली याचे निकष काय आहेत, कसूर या शब्दाची व्याख्या काय आहे या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. राजकारणात आपण खूप हुशार आहोत. आपल्याला न पटणारा सरपंच असेल तर त्याने कसूर केली म्हणून त्याचे विरुध्द अविश्वासाचा ठराव आणला जाईल. अविश्वासाच्या ठरावामध्ये सात दिवसामध्ये अधिकारपद रिकामे झाले असे गृहीत धरले जाणार आहे. राजकीय पक्ष म्हणून मी विचार करते की, मला वाटते ही गोष्ट पक्षासाठी खूप सोयीची आहे. कारण काही सरपंच ऐकतच नाहीत. ते सरपंच आपली झुंडशाही करीत असतात. पक्षांचे नियंत्रण रहावे या दृष्टीने ती चांगली गोष्ट आहे. परंतु काही वेळेला खेडयात अविश्वासाचा ठरावाचा खेळ चालू असतो. मग अशा वेळी लोक कोर्टात जातात. तो अपिलाचा भाग असतो. या संदर्भामध्ये आपली पूर्वीची जी कार्यपध्दती आहे, तहसीलदार, त्याच्या समकक्ष इतर वरिष्ठ अधिकारी आहेत. त्याच्या उपस्थितीच ठरावावर अंमलबजावणी झाली की नाही अशा गोष्टी बघणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महिलांच्या संदर्भात सहा महिन्यांपर्यंत अविश्वासाचा ठराव आणला जाणार नाही. परंतु मला सांगावयाचे आहे की, महिला सरपंचांकडून चुकीच्या गोष्टींवर सहया घेऊन नंतर त्यांचे विरुध्द अविश्वासाचा ठराव आणले जातात. या बाबतीत अधिकारी वर्ग त्यांना फसवीत असतो....

यानंतर श्री. खर्चे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

मग चुकीच्या ठरावावर सही केली म्हणून त्या महिला सरपंचांवर कारवाई केली जाते. पण मागील अधिकाऱ्याने सही करण्यासाठी सांगितले म्हणून सही केली असे गृहित धरुन सही केली जाते. यासंदर्भात महिला सदस्या असोत किंवा सरपंच असोत त्यांना ग्राम पंचायतीच्या कारभारासंबंधी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन असणे अत्यंत आवश्यक आहे. असे मार्गदर्शन असेल तर अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने त्यांच्या सह्या घेऊन त्यांच्यावर कारवाईचे प्रसंग येणार नाहीत. मागील वेळेस पुण्यात महिलांची बैठक मीच घेतली तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना एक सूचना केली व ती त्यांनी मान्य सुध्दा केली. ती सूचना म्हणजे महिला सदस्यांना जर एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटावयाचे असेल तर महिन्यातून एक दिवस तरी त्यांच्याकरिता जनता दरबारप्रमाणे राखीव ठेवावा. तसेच अशा महिला सदस्यांना कामाच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना करण्याची व्यवस्था करावी अशी माझी सूचना आहे. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, ग्राम पंचायतीचा विकास होण्याच्या दृष्टीने गाव स्तरावरील कर्मचारी, पर्यवेक्षकीय अधिकाराचा वापर करण्यासाठी ग्राम पंचायतीला अधिकार देणे, त्यांचे कार्य पार पाडण्यासाठी महिला सदस्यांना प्रत्यक्ष सहभागासाठी प्रोत्साहन देऊन आवश्यक तरतूद करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. त्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मला असे सांगावेसे वाटते की, वर्षभरात ज्या सभा घेणारआहात त्या किमान चार ग्रामसभा असल्या पाहिजे. त्याचबरोबर आरक्षणामुळे महिला सदस्यांची संख्या 50 टक्के झालेली आहे. त्यामुळे महिलांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असे प्रश्न, त्यात पाणी, मुलांचे शिक्षण, आरोग्य व गावातील स्वच्छता यासंदर्भात त्या महिला ज्या ज्या सूचना करतील त्यांचाही समावेश यासंबंधीच्या तरतुदींमध्ये करणे आवश्यक आहे. विधेयकातील पृ.क्र. 2 वर पोट कलम 5 मध्ये म्हटले आहे की, "सरपंच किंवा उप सरपंचाची रिक्त पदे 30 दिवसात भरण्यात येतील" ही तरतूद सुध्दा अधिनियमातील कलम 43 मध्ये सुधारणा करण्यासाठी प्रस्तावित केली आहे, ती आवश्यक आहे. तसेच तांत्रिकदृष्ट्या योग्य ते सहाय्य आणि कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान यांच्या मार्फत पर्यावरणीय समतोल राखून योग्य ती काळजी घेणे, त्याचबरोबर लोकांमध्ये हा विचार रुजला जाईल आणि अद्ययावत विकास केंद्र म्हणून ग्राम पंचायतीचा विकास होण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमात नवीन कलम 61 (अ) समाविष्ट करण्याचा निर्णय स्वागतार्ह असाच आहे. मी मंत्री महोदयांना धन्यवाद देऊ इच्छिते की, त्यांनी इतक्या वर्षाच्या अनुभवातून तळागाळातील लोकांमधील जे प्रश्न समजावून घेतले आणि त्यात कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत त्याचा विचार करुन ही तरतूद केली आहे.

या निमित्ताने मला अशीही सूचना करावयाची आहे की, तीन-चार ग्रामपंचायतींसाठी एकच ग्रामसेवक असतो, त्यामुळे तो कोणत्या गावात असेल हे शोधणे त्रासदायक ठरते. त्यावर अशी सूचना मी करणार आहे की, ठराविक दिवस अमुक गावाला ग्रामसेवक असला पाहिजे, अशी व्यवस्था करावी. या सुधारणांचा मंत्री महोदयांनी विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2012 चे विधान परिषद विधेयक क्र. 10-मुंबई ग्राम पंचायत अधिनियम 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले असून या विधेयकाच्या निमित्ताने चांगली सुधारणा करण्याचा प्रयत्न मंत्री महोदय करीत आहेत त्यावर माझे विचार मी व्यक्त करु इच्छितो.

महोदय, या विधेयकात आणखी काही त्रुटी आहेत हे मी आपल्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. सध्याच्या परिस्थितीत ग्रामसभांची संख्या 6 होती व त्याऐवजी 4 ग्रामसभा घेण्यात येतील असा बदल आपण सभागृहाच्या मान्यतेसाठी आणलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, विधेयकामध्ये ग्रामसभेच्या चार सभा घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे तो बरोबर आहे. परंतु विधेयकाच्या "(5अ) मध्ये असे म्हटले आहे की, प्रभागाचे प्रतिनिधीत्व करणारा प्रत्येक पंचायत सदस्य, ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी आणि ग्रामसभेच्या महिला सदस्यांच्या सभेपूर्वी, अशा प्रभागातील सर्व मतदारांची सभा बोलावेल आणि अशा प्रभाग सभेमध्ये, प्रभागाचा विकास, राज्याच्या किंवा यथस्थिति केंद्र सरकारच्या व्यक्तिगत लाभार्थी योजनांसाठी व्यक्तिगत लाभार्थ्यांची निवड करणे, विकास प्रकल्प व कार्यक्रम यांच्याशी संबंधित प्रश्नांवर आणि प्रभाग सभेला योग्य वाटतील अशा, ग्रामसभेच्या नियमित सभेसमोर विचारार्थ आणि निर्णयार्थ ठेवली जाण्याची शक्यता असलेल्या इतर संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल. असा सदस्य आपला सहीनिशी अशा सभेची कार्यवृत्त ठेवील आणि कार्यवृत्तांची एक प्रत पंचायतीला आवश्यक पाठवील आणि ती प्रत पंचायतीच्या अभिलेखाचा भाग होईल."

सभापती महोदय, समजा एखाद्या ग्रामपंचायतीमध्ये 9 सदस्य असतील त्या ग्रामपंचायतीच्या एका वॉर्डात 4 तर दुसऱ्या वॉर्डात 5 सदस्य असतील व 4 सदस्यांनी आपल्या वॉर्डाच्या विकासाच्या संदर्भात सभा घेतल्या व तो निर्णय ग्रामसभेत बहुमताने फेटाळला गेला तर काय होईल ? गावामध्ये सरपंचाचा प्रभाव असतो. ज्या ग्रामसभा बोलावल्या जातात त्या ग्रामसभेत विशिष्ट लोकांनाच बोलावले जात असते.

सभापती महोदय, या ठिकाणी मी एका तांडयाचे उदाहरण देऊ इच्छितो. या तांडयामध्ये आमदाराच्या स्थानिक विकास निधीमधून एक सभागृह बांधावयाचे होते. परंतु सभागृह बांधण्यास सरपंचाने विरोध केला. त्या ग्रामपंचायतीच्या 4 सदस्यांनी सभागृह आमच्या प्रभागात बांधले जावे अशा सूचनांचे पत्र दिले. त्यामुळे त्या गावात 5 लक्ष रुपये किमतीचे सभागृह मंजूर करण्यात आले. सभागृहासाठी जागा ठरली, वर्क ऑर्डर निघाली परंतु सरपंचाने 8 (अ) दिला नाही. या सरपंचाने अगोदर 8 (अ) दिला होता परंतु नंतर या सरपंचाने विरोध केला. ही बाब ज्यावेळेस बीडीओंना समजली त्यावेळेस गट विकास अधिकाऱ्यांनी त्या गावात आमसभा बोलावण्याचे आदेश दिले. सदर सरपंचाने ग्रामसभा बोलावलीच नव्हती. त्यामुळे त्या गावात गटविकास अधिकाऱ्यांनी सेक्रेटरीला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

आम सभा घेण्याचे आदेश दिले व त्या सभेला मी स्वत: हजर राहीन असे सांगितले. परंतु त्या गावात गुंडगिरीने आमसभा होऊच दिली गेली नाही. अशा सर्व परिस्थितीमुळे त्या गावात दोन वर्ष सभागृह होऊच शकले नाही.

9 सदस्य संख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये 5 सदस्यांचे बहुमत असेल तर त्या ठिकाणचा सरपंच वाटेल तसा निर्णय घेऊ शकतो. त्यागावातील 4 सदस्य असलेल्या समितीने आपल्या वॉर्डाच्या विकासाचे प्रस्ताव वॉर्ड समितीमध्ये मंजूर करुन ग्रामसभेकडे पाठविले व ते ग्रामसभेच्या प्रोसिडींगवर आले व ते प्रस्ताव ग्रामसभेने फेटाळले तर या विषयाचे पुढे काय होईल ? या विधेयकात यासंदर्भात काहीच तरतूद केलेली नसल्यामुळे वॉर्डाच्या सभेला काहीच महत्व राहणार नाही. परंतु त्या वॉर्डच्या नागरिकांनी तशा प्रकारचा ठराव करुन ग्रामसभेकडे दिला व तो ठराव ग्रामसभेने फेटाळला तरी त्या वॉर्डातील नागरिकांनी घेतलेला तो निर्णय असेल त्यामुळे त्याला ग्राहय धरले गेलेच पाहिजे असे मला वाटते. या विधेयकात वॉर्ड सभा झाल्यानंतर ग्रामसभा घेतली जाणार आहे. तशीच परिस्थिती महिलांच्या बाबतीतही होणार आहे. समजा महिलांनी दारुबंदीचा ठराव घेतला परंतु सरपंचाच्या मनात नसेल तर हा ठराव ग्रामसभेत मंजूरच होणार नाही. त्यामुळे यासंदर्भात दुरुस्ती होण्याची आवश्यकता आहे. वॉर्ड किंवा महिला सभेने घेतलेला निर्णय ग्रामसभेत फेटाळला गेला तर या दोन्ही सभा घेण्यास काहीच अर्थ राहणार नाही त्यामुळे यासंदर्भात तरतूद असण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

माझा दुसरा मुद्दा सरपंचांविरूद्ध येणाऱ्या अविश्वासाच्या ठरावा संबंधीचा आहे. सरपंचा विरूद्धचा अश्विासाचा ठराव ठराव पारित झाल्यानंतर त्याचे सर्व अधिकार जातील असे सांगितले आहे. तो ठराव पारित झाल्यावर अपिलामध्ये जाण्यासाठी 7 दिवसांची मुदत दिली आहे. 7 दिवसात त्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील केले पाहिजे व त्या बाबत निर्णय देण्याची मुदत 30 दिवसांची आहे. अशा अनेक ग्रामपंचायती आहेत की, त्यांच्या विरूद्ध अविश्वासाचे प्रस्ताव मंजूर झालेत. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास स्टे दिला नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी त्या विरोधात निकाल दिला. नंतर ते प्रकरण आयुक्तांकडे गेले. सहा-सहा महिने ते प्रकरण आयुक्तांकडे प्रलंबित राहिले. त्यामुळे सरपंचांची निवडणूक थांबली. त्यामुळे ती ग्रामपंचायत 8-8 महिने अधांतरीत राहिली. त्यामुळे गावाचा विकास थांबला. यात आपण अपिलामध्ये जागा दिलेली नाही. जिल्हाधिकाऱ्याने त्याचे अपील मंजूर करो अथवा नामंजूर करो त्याला आता अपिलात जाता येणार नाही, असे सांगितले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी शंका व्यक्त केली आहे ती मला देखील आहे. नगरपालिकेमध्ये कॅमेरे लावून, हात वर करून ठराव मंजूर करतात तसे येथे होत नाही. मी आपल्याला उदाहरण सांगतो. काही ग्रामपंचायतींनी आम्हाला सात दिवसांची नोटीस मिळाली नाही या एका मुद्यांवर अपिले ॲडमिट केलेली आहेत. आम्हाला नोटीस दिली नाही, असे सांगतात.वास्तविक नोटीस घरावर चिकटवली जाते. पण ती नंतर फाडली जाते. त्या एका मुद्यावर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करण्यात येते. शेवटी अशी प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांकडे मॅनेज केली जातात. मग 2/3 मताने जरी तो ठराव मंजूर झाला असला तरी कलेक्टरच्या एका फटक्याने त्याला स्टे दिला जातो किंवा तो ठराव नामंजूर केला जातो. अशा प्रकारच्या प्रॅक्टीसेस झालेल्या आहेत. काही उदाहरणे झालेली आहेत. जिल्हाधिकाऱ्याकडे गडबड झाली तर त्याला पर्याय काय ? 2/3 बहुमताने ठराव मंजूर झाल्यानंतर, एखाद्या जिल्हाधिकाऱ्याने गडबड करून त्या प्रस्तावाला, ठरावाला मान्यता दिलीच नाही तर मग मात्र 2/3 बहुमताला काहीच अर्थ राहणार नाही. यासंबंधी देखील आपण काही तरी सांगितले पाहिजे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काही वेळा काय होते कमी लोकसंख्येचा सरपंच असेल तर त्याच्या विरूद्ध अविश्वासाची कारवाई केली जाते. त्याला अपील करण्याची संधी दिली नाही तर मग सगळेच खोटे दाखविले जाते. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

श्री.पांडुरंग फुंडकर : मी आपल्याला अशी किती तरी उदाहरणे दाखवितो की, 2/3 बहुमताने ठराव पारित झाल्यानंतर देखील जिल्हाधिकाऱ्यांनी स्टे दिला आहे. नंतर त्या विरोधात कलेक्टरने निर्णय दिलेला आहे. त्याबाबत आयुक्तांकडे अपील करण्यात आले आहे. त्या विरूद्ध हायकोर्टात अपील करण्यात आले आहे. वषानुवर्षे हे प्रकरण चालू आहे. त्यामुळे यासंबंधी देखील काही तरी तरतूद केली पाहिजे. अन्यथा ह्या नवीन तरतुदीमुळे चांगले होण्याच्या ऐवजी गुंतागुंतीचे प्रश्न होऊ शकतील काय याचा देखील विचार केला पाहिजे.

वॉर्ड समिती आणि महिलांची समिती याला काही अर्थ राहणार आहे काय ? त्यांनी नुसत्या सभा घेतल्या आणि त्यांचे निर्णय ग्रामसभेमध्ये ते फेटाळले गेले तर त्याला काही अर्थ राहणार नाही. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाला जेवढे महत्व असते तेवढे वॉर्ड सभा आणि महिलांच्या सभेने घेतलेल्या निर्णयाला असले पाहिजे. गावाचा एखादा सामूहिक विषय असेल तर तो ग्रामसभेमध्ये घेऊन त्याला मंजुरी दिली पाहिजे. तशीच मंजुरी वॉर्ड सभेच्या सर्व प्रस्तांवांना दिली पाहिजे. वॉर्ड सभेच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर ग्रामसभेने सामूहिक प्रश्न मंजूर करावा असे मला वाटते. अन्यथा वॉर्ड सभेला आणि महिलांच्या सभेला काहीही अर्थ राहणार नाही.

.....

यानंतर श्री.सरफरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विधेयकाच्या उद्देशाचे, दृष्टिकोनाचे जवळ जवळ सर्वच प्रमुख माननीय सदस्यांनी स्वागत केले आहे. त्याबद्दल मी प्रथम सर्वांचे आभार मानतो.

सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश असा आहे की, ग्रामपंचायतीचे कामकाज चालवित असतांना कामकाजातील कालापव्यय कमी करण्यासाठी काही गोष्टींमध्ये सुधारणा करावी. जेणेकरुन नव्याने येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या कामकाजामध्ये अधिक कटाक्ष आणि उत्तम प्रकारची व्यवस्था कशी निर्माण होईल, येणाऱ्या समस्यांना ती कशी तोंड देऊ शकेल अशाप्रकारची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. या करिता मी सुरुवातीच्या भाषणामध्ये सांगितले की, केंद्रसरकारने सन 2010 हे ग्रामसभा वर्ष जाहीर केले होते. ते साजरे करीत असतांना महाराष्ट्रामध्ये ग्रामसभा बळकटीकरणाची मोहीम राबविण्यात आली, त्या दृष्टीने लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली. आपण गेली तीन वर्षे संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळयामध्ये ग्रामसभा जनजागृतीच्या दिंडीचे विशेष आयोजन केले होते. हे करीत असतांना ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांचे महत्व महाराष्ट्राच्या शेवटच्या स्तरापर्यन्त पोहोचले पाहिजे हा त्यातील महत्वाचा उद्देश होता.

यापूर्वी कायद्याच्या कलम 7 मध्ये 6 ग्रामसभा घेण्याची तरतूद होती. ही तरतूद करीत असतांना महाराष्ट्रातील सर्व गावांमध्ये जास्तीत जास्त ग्रामसभा झाल्या पाहिजेत असा आपला उद्देश होता. परंतु या ठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी त्या ग्रामसभांची संख्या वाढविली पाहिजे असे सांगितले, माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी तर 12 ग्रामसभा झाल्या पाहिजेत असे सांगितले. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, ग्रामसभांची संख्या जसजशी वाढत गेली तसतशी लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती कमी कमी होत गेली, तुरळक होत गेली. त्यामुळे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे या ग्रामसभा केवळ कागदोपत्री राहू लागल्या. या करिता मर्यादित स्वरुपामध्ये ग्रामसभा घेतल्या तर त्या ठिकाणी लोकांची व्यापक स्वरुपामध्ये उपस्थिती होईल या साठी काहीतरी केले पाहिजे. या करिता अनेक लोकांबरोबर चर्चा करुन 6 ऐवजी 4 ग्रामसभा घेण्याचे ठरविण्यात आले. याचा अर्थ आणखी ग्रामसभा घेता येणार नाही असा होत नाही. त्या ग्रामपंचायती 12 ग्रामसभा घेऊ शकतात, 18 ग्रामसभा घेऊ शकतात. जिल्हा परिषदेच्या एखाद्या अधिकाऱ्यांने अमूक विषय आपल्या ग्रामसभेमध्ये घ्यावयाचा आहे असे सुचविले तरी सरपंचाच्या मान्यतेने नवीन ग्रामसभा कधीही घेता येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

सभापती महोदय, या विधेयकामध्ये दुसरा भाग असा आहे की, दोन ग्रामसभांमधील अंतर चार महिने असले पाहिजे. या ग्रामसभा होण्यापूर्वी महिलांची एक ग्रामसभा घेण्यात आली पाहिजे अशी पूर्वीच्या कायद्यामध्ये तरतूद होती. ही तरतूद महिलाविरोधी असल्याचा उल्लेख माननीय सदस्यांनी केला. मला त्या बाबत सांगितले पाहिजे की, पूर्वी जी मूळ व्यवस्था करण्यात आली होती ती महिलांना ताकद देणारी नव्हती, तर फक्त ग्रामसभेपूर्वी महिलांची सभा घेण्यात यावी एवढी मर्यादित स्वरुपाची तरतूद होती. त्या सभेला काही अधिकार नव्हते किंवा त्याची कुठेही नोंद घेण्याबाबत सक्ती नव्हती. त्यामुळे महिलांच्या सभेमध्ये एखादा ठराव संमत झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तो ग्रामसभेने मान्य केल्याचे कधीही वर्तमानपत्रामध्ये छापून आल्याचे आपण वाचले नाही. याचे कारण तसे कधीही होत नव्हते. या विधेयकामध्ये आमच्या सरकारने ही तरतूद मुद्दाम करण्याचे कारण असे की, महिलांच्या घेतल्या जाणाऱ्या सभेच्या इतिवृत्ताची नोंद ग्रामसभेने घेतली पाहिजे. या ठिकाणी माननीय सदस्य डॉ. अपूर्व हिरे यांनी असे सांगितले की, महिलांच्या ग्रामसभेमध्ये जे निर्णय घेतले जातील ते ग्रामसभेने मान्य केले पाहिजेत.

(यानंतर श्रीमती. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या गावामध्ये रहाणाऱ्या सगळया लोकांची मिळून असलेली सभा.त्यामध्ये स्त्री, पुरुष असा वेगळेपणा करणे हा स्त्री-पुरुष समानतेचा अपमान होईल असे मला वाटते.त्यामुळे महिलांची वेगळी सभा करण्यात यावी वगैरे अशी कल्पना नाही.अगोदर महिलांची सभा व्हावी आणि त्या सभेमध्ये त्यांच्याकडून जी मागणी करण्यात येईल ती ग्राम सभेसमोर यावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मग सभा कशासाठी घ्यावयाची ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपल्या ग्रामीण भागातील पध्दती सर्वांना माहिती असतील असे गृहीत धरुन मी बोलत आहे. सर्वच महिला चौकामध्ये येऊन सगळयांच्या देखत आपली मते मांडू शकत नाही. म्हणून त्यांना ही संधी उपलब्ध करुन देत आहोत. एखादी महिला धीट असेल आणि तिने ग्राम सभेमध्ये येऊन थेट बॅटींग केली आणि आपली मते मांडली तर त्याला हरकत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ग्राम सभेमध्ये महिला येऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती माननीय मंत्री महोदय मान्य करीत आहेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी असे मान्य करीत नाही.सन्माननीय सदस्यांनी माझे पुढील वाक्य ऐकले नाही.मी असे म्हटले की, जर एखादी धीट महिला असेल किंवा महिलांचा समूह ग्राम सभेमध्ये आला तर त्यांनी तेथे येऊ नये असे सांगण्याची कायद्यामध्ये प्रोव्हीजन नाही. परंतु त्यांचा समूह ग्रामसभेमध्ये आला तर आनंदच आहे.पण जर असे कोणी असेल की ज्यांना आपली मते मांडता येत नाहीत, उद्याच्या ग्राम सभेला जाता येत नाही. आज आपल्याला वेळ आहे, उद्या वेळ नाही, यासाठी महिलांची अगोदर सभा व्हावी. महिलांच्या सभेमध्ये असे अनेक विषय असू शकतात की ज्याची पुरुषांसमोर चर्चा देखील होऊ शकणार नाही अशा प्रकारचे कोणतेही विषय सभेमध्ये मांडल्यानंतर त्याची जी काही रुपरेषा ठरलेली आहे, ती ग्राम सभेसमोर यावी आणि ते ग्राम सभेने मान्य करीत असताना म्हणजे ते मान्य केले तरी हरकत नाही परंतु ती रुपरेषा अमान्य करताना त्यासाठी कारणे द्यावी लागतात अशा प्रकारची आपण नवीन प्रोव्हीजन करीत आहोत. जेणेकरुन ग्राम सभेच्या पूर्वी महिलांची जी सभा होईल त्याला अनन्य साधारण महत्व प्राप्त होईल.

सभापती महोदय, पूर्वी महिलांनी ग्राम सभेमध्ये दारु बंदीचा ठराव केला. मात्र ही दारुबंदी का नको असे म्हणणाऱ्या सदस्यांची नावे रेकॉर्डवर येतील आणि मग यांना त्याबाबत उत्तर देखील द्यावे लागेल. परंतु ग्राम सभेमध्ये जी मेजॉरिटी आहे, त्याचा आदर लोकशाहीने केलाच पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील . . . .

आपल्याला त्याच्या विरोधात जाता येणार नाही. हे सगळे डेमॉक्रेटीक आहे आणि डेमॉक्रेटीक स्ट्रक्चरमध्ये जी ग्राम सभा आहे त्याठिकाणी जी मेजॉरिटी होईल त्याचा आदर केला पाहिजे. कारण आपणही सगळेजण आपापल्या मतदार संघामध्ये मेजॉरिटीने निवडून आलो आहोत. मघाशी म्हटल्याप्रमाणे मेजॉरिटीचा आदर करणे हे क्रमप्राप्त आहे.त्यामुळे ग्राम सभेध्ये उपस्थित असणाऱ्यांची जी मेजॉरिटी होईल ती अशा प्रकारचे जे काही ठराव येतील त्याबाबत योग्य ती कार्यवाही करील आणि निर्णय घेईल.

सभापती महोदय, मात्र आता आपण आणखी पाऊल पुढे टाकलेले आहे आणि ते म्हणजे ग्रामसभेच्या अगोदर आपल्या वॉर्डमध्ये लोकांच्या कोणकोणत्या गरजा आहेत हे पहाणे. सकाळी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मला एक पत्र पाठविले असून त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, आदिवासी भागातील जी गावे आहेत तेथील अनेक वाड्या, वस्त्यांमध्ये ग्राम पंचायत विखुरलेली असते. त्यामध्ये घ्यावयाच्या निर्णयासाठी प्रत्येक वाडी, वस्ती येथे ग्रामसभेची बैठक व्हावयास पाहिजे. यावर मी त्यांना चिठ्ठीतच असे कळविले की,"मी आज दुपारी सदनामध्ये जे विधेयक मांडणार आहे त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित रहावे आणि सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याचा सदरहू बिलामध्ये समावेश आहे." त्यांचा मुद्दा असा होता की, एखादा वॉर्ड 5-6 छोट्या, छोट्या वस्तीचा असेल तर त्यांच्यावर अन्याय होऊ नये. त्या लोकांचे म्हणणे ग्रामसभेमध्ये यावे म्हणून आपण त्या वॉर्डची स्वतंत्र सभा अगोदर घेण्यात यावी असे सांगितले. त्या सभेमध्ये जे काही निश्चित होईल ते त्या वॉर्डमधील लोकांच्या गरजेनुसार ठरेल आणि ती बाब ग्राम सभेमध्ये आल्यानंतर ग्राम सभेमधील मेजॉरिटी त्याबाबत अंतिम निर्णय घेईल.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी सांगितले की, जर पाच सदस्यांच्या विरोधात चार सदस्य असतील तर मग चार सदस्यांच्या वॉर्डमधील ठराव मान्य केले जाणार नाहीत आणि पाच सदस्यांची मेजॉरिटी असल्याने त्यांच्याच बाबी मान्य होत रहातील असे त्यांनी उदाहरण दिले.परंतु शेवटी मेजॉरिटीचा आदर करावाच लागतो आणि महत्वाचे म्हणजे लोक बहुसंख्येने ज्या बाजूला असतात त्याच बाजूने ग्राम सभेचा अंतिम निर्णय होणार आहे.आपला असाच प्रयत्न आहे की, प्रत्येक वॉर्डमधील प्रश्न ग्राम सभेमध्ये येणे बंधनकारक होते. त्यावर विचार-विनिमय होणे आवश्यक होते. म्हणून एखादा बळकट भाग आहे आणि दोन वॉर्ड मधील पुढारी मोठे आहेत म्हणून त्यांच्या वॉर्डपुरती कामे व्हावीत आणि उरलेले जे वॉर्ड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील . . . .

आहेत त्याबाबतीत या अनुषंगाने अजिबात चर्चा होणार नाही अशा प्रकारची व्यवस्था या कायद्यामुळे मोडेल आणि सर्व वॉर्डमधील मागण्या ग्राम सभेमध्ये येतील हे या निमित्ताने सांगणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

सन्माननीय सदस्यांनी अनेक विषय मांडले परंतु एका महत्वाच्या विषयाला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्याशिवाय कोणी फारसा स्पर्श केला नाही. ग्रामपंचायतीमध्ये जे शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी आहेत त्यांची हजेरी घेण्याचा मूलभूत आणि फार मोठा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये आणि गावातील लोकांमध्ये अकौन्टिबिलिटीचा सेंस तयार होईल की, आमच्या गावामध्ये अधिकारी येतात. 80 ते 90 टक्के अधिकारी रेग्युलर काम करतात पण ते कधी आले, कधी गेले हे गावाला माहीत नसते. पूर्वी ग्रामसभेला अशा स्वरुपाचे अधिकार होते. आता आपण ग्रामपंचायतीला पॉइन्टेड अधिकार देत आहोत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ग्रामपंचायतीचा थोडा अंकुश राहील. हे विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यानंतर आणि या विधेयकावर माननीय राज्यपालांची सही झाल्यावर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये काम करणारे जे शासकीय, निमशासकीय अधिकारी असतील, कर्मचारी असतील त्यांच्यावर ग्रामपंचायतीचा अंकुश राहील हे या निमित्ताने सांगणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी भाषण केले. ज्या पध्दतीने आपण महिलांच्या ग्रामसभेच्या बाबतीत म्हणत आहात त्यामध्ये महिलांच्या ग्रामसभेला फारसा अर्थ राहणार नाही. माझा मुद्दा मी थोड्या व्यापक स्वरुपात स्पष्ट केलेला आहे की, आपण ग्रामसभेचा लोकशाही सेटअप डिस्टर्ब न करता महिलांना अप्रत्यक्षपणे वेगळा अधिकार देत आहोत. हा मुद्दा निश्चितपणे सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येईल असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, नवरदेवाने शपथपत्र लिहून द्यावे आणि शौचालय असेल तरच त्याचे लग्न रजिस्टर्ड करुन द्यावे. हे त्यांनी त्रासाने सांगितले आहे. अनेक वेळा मुलींचे लग्न होते आणि सासरी गेल्यानंतर तिला असे कळते की, त्या घरामध्ये शौचालय सुध्दा नाही. अशी फसगत होणाऱ्या मुलींची संख्या कमी नाही. आधी एकदम चांगले कपडे वगैरे घालून येतात, मुलगी बघतात, लग्न करतात. आपण मोठ्या घरात मुलगी दिली असे म्हणावयाचे आणि मुलगी त्या घरात गेल्यावर शौचालयही नाही असे कळते. त्यामुळे किमान ग्रामपंचायतीच्या सदस्याच्या घरी शौचालय असले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत पाटील ...

पाहिजे अशी कायदेशीर तरतूद आपण केलेली आहे. शौचालय नाही म्हणून बऱ्याच सदस्यांचे सदस्यत्व रद्द व्हावयास लागले. म्हणून पुन्हा कायद्यात बदल केला. जानेवारी महिन्यामध्ये या कायद्याची मुदत संपलेली आहे. त्याच्या आत त्यांनी शौचालये बांधलेली असली पाहिजे. इथून पुढे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला कोणाला उभे राहावयाचे असेल तर शौचालय असल्याशिवाय उभे राहता येणार नाही असा कायदा असल्यामुळे आता हळूहळू महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ज्याला राजकारणात उभे राहण्याची खुमखुमी आहे किमान त्यांच्या घरी तरी शौचालय तयार होईल. सन्माननीय सदस्य सर्व्हेच्या बाबतीत विचारत आहेत. शौचालये बांधलेली आहेत पण आता किती सदस्यांनी शौचालये बांधलेली आहेत याबाबत नवीन सर्व्हे करण्यास सांगितले आहे. जर शौचालय बांधले नसतील तर त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देऊन त्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबतचा कार्यक्रम अंतिम होईल.

श्री. कपिल पाटील : किती घरांमध्ये शौचालये आहेत, कोणत्या वर्गाकडे शौचालये आहेत कोणत्या वर्गाकडे नाहीत असा वर्गीय सर्व्हे केला आहे का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आता महाराष्ट्रामध्ये सर्व घरांचा सर्व्हे चालू आहे. त्यात दारिद्र्य रेषेखाली कोणती कुटुंबे आहेत हे ओळखण्याचे आपले अंतिम उद्दिष्ट आहे. त्या घरात कोणत्या सुखसोयी आहेत याचा सर्व्हे चालू आहे. पण आपल्या चर्चेचा जो मुद्दा आहे त्या बाबत सांगू इच्छितो की, निवडून येण्यासाठी ज्याला निवडणुकीला उभे राहावयाचे आहे, किंवा एखाद्याला निवडणुकीला उभे राहण्याची खूप हौस आली असेल तर त्याने आधी शौचालय बांधले पाहिजे आणि मग ग्रामपंचयतीच्या, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या निवडणुकीला उभे राहिले पाहिजे. माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की, मागच्या निवडणुका त्याच धर्तीवर झाल्या. आपल्या घरी शौचालय आहे की नाही हे प्रत्येकाला ॲफिडेव्हिट करुन सांगावे लागले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी ग्रामसभेचा अध्यक्ष हा ग्रामपंचायतीचा सरपंचच असला पाहिजे अशी अतिशय चांगली सूचना केली. ही चांगली सूचना आहे पण ही बाब तपासून पाहण्यात येईल. ग्रामसभेच्या पहिल्या सभेला सरपंच अध्यक्ष असतो.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

नंतर गावातील कोणीतरी वयस्कर माणूस त्या सभेचा अध्यक्ष होतो. त्याने सर्वांकडे समानतेने पहावे, ग्रामसभेमध्ये काही ठराव झाला तर त्याचे रेकॉर्डिंग व्यवस्थित व्हावे असा उद्देश असतो. त्यामुळे न्यूट्रल भूमिकेच्या माणसाला देखील ग्रामसभेचा अध्यक्ष होता यावे अशी प्रामाणिक भावना त्यामागे आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत जी सूचना केलेली आहे तिचा जरुर विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना या विधेयकातील तरतूद स्त्री विरोधी आहे असे वाटते. उलट स्त्रियांचा अधिकाधिक आदर करणारी ही तरतूद आहे असे मी त्यांना पटवून दिलेले आहे. आदल्या दिवशी महिलांची सभा घ्यावी अशा प्रकारची पूर्वीची तरतूद होती. आता आपण एक पाऊल पुढे गेलो आहोत.

श्री. कपिल पाटील : आता सभा घेतली तर महिलांचे ऐकावे लागेल अशी त्यांना भीती वाटते. या तरतुदी मधून आपण असे सांगत आहात की महिलांचे म्हणणे ऐकण्याची गरज नाही. त्यांचे काही ऐकायचे नसते.

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे गेले 6 वर्षे या विधानपरिषदेचे सदस्य होते त्यावेळी त्यांना ही तरतूद सुचली नाही. आता मी हे कायद्यात सुधारणा करणारे विधेयक आणलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे नव्याने निवडून आल्यानंतर त्यांना काही नव्याने सुचायला लागले आहे. आपण कायद्यामध्ये अशी सुधारणा करीत आहोत की, त्या महिलांच्या सभेमध्ये जे काही ठरेल हे लेखी स्वरुपात ग्रामसभेमध्ये कळविले पाहिजे आणि ग्रामसभेने ते नाकारायचे असेल तर त्याची कारणे दिली पाहिजेत. एखादी चांगली सूचना नाकारणे शक्य होते असे नाही. विरोधी बाजूने एखादी चांगली सूचना आली तर ती सूचना देखील स्वीकारावी लागते. जर आपल्याला पंचायतीच्या राजकारणामध्ये गावात पुन्हा निवडून यावयाचे नसेल आणि चांगल्या सूचनांचा अवमान करणारी राजवट असेल तर तिला दूर सारण्याचे काम ग्रामस्थ करतात.

सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांनी पुढच्या सभेमध्ये मागील खर्चाचे हिशेब ठेवावेत असे सांगितले. अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये आहे. पुढे आपण काय करणार हे पुढच्या सभेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सांगावे लागते आणि मागील खर्चाचा हिशेब ठेवावा लागतो. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी ग्रामपंचयतीच्या सदस्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे असे सांगितले. आता आमच्या विभागाने ग्रामपंचायतीच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था संपूर्ण महाराष्ट्रभर केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, गैरव्यवहाराच्या बाबतीत केवळ कर्मचा-यांवर कारवाई करण्यात येते. जर सरपंचांनी गैरव्यवहार केला तर त्यांच्यावर काय कारवाई करणार ? सरपंचांनी गैरव्यवहार केला तर त्यांच्यावर देखील फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद मूळ कायद्यामध्ये आहे. तसेच अविश्वासाच्या ठरावावर अपिल करण्याची तरतूद असता कामा नये असेही सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितले. या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. आपल्याला हे विसरता येणार नाही की, समाजातील दीनदुबळया घटकांना आरक्षण देऊन ग्रामपंचायतीचा प्रमुख होण्याची, पंचायत समितीचा प्रमुख होण्याची, नगरपालिकेचा प्रमुख होण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये आलेला अविश्वासाचा ठराव हा दोन तृतियांश संख्येने मान्य झाला तरी ज्याच्यावर अविश्वासाचा ठराव आलेला असेल त्याचे म्हणणे मांडण्याची संधी त्याला त्याच सभेमध्ये दिली गेली पाहिजे अशी तरतूद आहे. कदाचित असेही होऊ शकते की त्याला बोलण्याची संधी मिळत नाही.सगळेच न्याय देणारे दरवाजे आपण बंद केले तर अन्याय होण्यास सुरुवात होण्याची शक्यता असते.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.जयंत पाटील..

पूर्वी आयुक्तांकडे निर्णय लागण्यासाठी आठ-दहा महिन्यांचा कालावधी जायचा. आता आपण हे सर्व बंद करुन जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर तीस दिवसांत निर्णय घेण्याची तरतूद केलेली आहे. विलंब टाळण्यासाठी आपण ही तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी 61अ चे स्वागत केलेले आहे. महिलांसाठी 30 टक्के निधी खर्च करावा, ग्रामसभा उधळणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशाप्रकारच्या सूचना त्यांनी केल्या आहेत. मी त्या बाबत एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांमध्ये आणखी सुधारणा करणे शक्य आहे काय याचा अभ्यास करण्यात येईल.

सभापती महोदय, आपण 61 अ मध्ये ग्रामपंचायतीला बाहेरुन सर्व्हीस घेण्या संदर्भात तरतूद करीत आहोत. यामुळे ग्रामपंचायतीमध्ये अधिक नावीन्य येईल आणि काही सुधारणा देखील होतील. काही चांगल्या पध्दतीचे विचार निश्चितपणे रुढ होतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, या विधेयकावर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम" असे नामकरण करण्या बाबतचे विधेयक आणावे असे सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी सांगितले. "मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958"चे नामकरण "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम" असे करण्या बाबतचे विधेयक नागपूर अधिवेशनात मांडण्यात आले आहे. त्या शिवाय अशी नामांतर करण्याची विधेयके एकत्रितपणे मांडण्यात आली आहेत. ती सर्व विधेयके या सभागृहात मंजुरीसाठी येतील. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी जी अपेक्षा व्यक्त केलेली आहे ती पूर्ण होईल.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीमध्ये काही चांगल्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने आपण ही पावले टाकीत आहोत. ग्रामपंचायतीमधील सर्वच घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. ग्रामपंचायतीमध्ये निर्णयाची दिरंगाई टाळण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून करीत आहोत. त्याच बरोबर राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये फक्त कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून त्यांच्या पगारावर ग्रामपंचायतीचा फंड जाण्यापेक्षा बाहेरच्या सेवा घेऊन आणखी सुधारणा करण्याचे ठरविले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील..

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे मांडले त्या सर्वांचे समाधान झाले असेल असे मी समजतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना मी सांगू इच्छितो की, गावाला गावाची योजना करण्याचा अधिकार दिलेला आहे. देशात आणि महाराष्ट्रात एक काळ असा गेला की, आपण ब्युरोक्रॅटीक ॲप्रोचने योजना करीत आलो. मग असे ठरले की, गावातील जनतेला अधिकार द्यायचा म्हणून आपण गावाला अधिकार दिले. गावाने आपल्या योजना आणि एजन्सीज ठरवावयाच्या. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे गावाने घेतलेल्या काही योजना अपूर्ण राहिल्या. त्यातील ज्या योजना फायद्याच्या होत्या तेवढ्याच पूर्ण झाल्या व ज्या अडचणीच्या होत्या त्या न करण्याकडे कल गेला किंवा त्यामध्ये अपहार झाला. तेव्हा ग्रामपंचायत मोठमोठे प्रोजेक्टस घेते त्यावेळी ग्रामपंचायतीवर पंचायत समितीचे काही तरी नियंत्रण असले पाहिजे असे मंत्री म्हणून माझेही मत झाले आहे. कारण एक कोटी, चार कोटी. सहा कोटी रुपयांची योजना सुरु होते तेव्हा त्यातून आपल्याला काही आर्थिक फायदा होतो काय असे पाहणारी माणसे चुकून तेथे असतील तर मग त्या योजनेचा बोजवारा उडाल्या शिवाय राहणार नाही.

यानंतर श्री.गिते..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

क्षमतेपेक्षा मोठया योजना असतील, 50 लाखा पेक्षा मोठे टेंडर असेल, त्याचे सुपरव्हीजन किमान पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी स्वत: करावे, असे मला वाटते. ग्रामीण पातळीवरील लोकांना ताकद दिली पाहिजे, लोकांना अधिकार दिले पाहिजेत. परंतु दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग होणार नाही, या बाबतची काळजी गटविकास अधिकारी यांनी घेतली पाहिजे असे माझे मत आहे. त्या बद्दलचे आदेश आम्ही लवकरात लवकर काढून आणि ते आदेश पाणी पुरवठा विभागास कळविण्याची देखील व्यवस्था करु. ग्रामपंचायत टेंडर काढेल, "अंडर सुपरव्हीजन ऑफ बी.डी.ओ." बी.डी.ओ.येथपर्यंत हस्तक्षेप करु शकेल की, जेथे गैरप्रकार होतो आहे, तेथेच ते थांबविण्याचा प्रयत्न करतील.

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सूचना केली आहे, त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, जेवढे शक्य आहे, तेवढया सुधारणा करुन आपण तसे नवे आदेश निर्गमित करु. तशा नव्या सुधारणा निर्गमित करु. शेवटी महाराष्ट्रातील खेडे गावात गेलेला पैसा कार्यक्षतेने वापरला गेला पाहिजे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून एखादी पाण्याची योजना केली गेली असेल, एखादा रस्ता कॉक्रीटचा केलेला असेल, तर किमान पुढची वीस वर्षे त्या कामाची, त्या जागेवर मागणी येऊ नये, अशी व्यवस्था महाराष्ट्रात करणे गरजेचे आहे. आज योजना केली आणि तीच योजना चार वर्षांनी अपुरी पडते, सात वर्षांनी नवा अर्ज येता, दहा वर्षा नंतर ती योजना नव्याने करावयास लागतो. पुढील 20 वर्षाच्या लोकसंख्येचा अंदाज काढतो, योजनेचे डिझाईन, ड्रॉईंग तयार होते, योजनेस सात वर्षानंतर पुन्हा सुरुवात होते. आपण मृगजळा सारखे धावतो आहोत. गाव पूर्णपणे समाधानी करण्यासाठी जे पैसे दिले जात आहेत, ते पैसे पारदर्शी पध्दतीने खर्च केले गेले तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात चांगल्या प्रकारच्या सुधारणा निश्चितपणे होतील. त्या उद्देशाने हे नवीन विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली चर्चा केलेली आहे. अतिशच मौलिक सूचना त्यांनी केलेल्या आहेत. त्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे आहे ते मला पूर्णपणे कळले आहे. ते या मुद्दयांशी सुसंगत असेल किंवा नसेल, परंतु आपले मुद्दे मला कळलेले आहेत. त्या मुद्दांचा निश्चितपणे आदर करुन भविष्यात विचार करु एवढेच या निमित्ताने सभागृहाला सांगतो. सभापती महोदय, सदर विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी आपल्या मार्फत सदनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 10 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 10 संमत झाले आहे.

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO.XI 0F 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT,1965.)

श्री. भास्कर जाधव : (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्र.11-मुंबई महानगर पालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगर पालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

महोदय, हे विधेयक मांडत असताना यात काय काय अंतर्भूत आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. खरे तर या विधेयकात जी सुधारणा आपण करीत आहोत त्यात फक्त दोनच बाबी महत्वाच्या आहेत. त्या म्हणजे महानगर पालिका आणि नगरपालिकांच्या विषय समित्या तसेच स्थायी समिती यामध्ये सभासद घेतले जातात, त्यासंबंधीची तरतूद अशी आहे की, रजिस्टर्ड पार्टी, मान्यताप्राप्त पार्टी अथवा एखादा रजिस्टर्ड गट असेल त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात सदस्य घेतले जातात. कधी कधी एखादा छोटा पक्ष अथवा गट असतो त्यातील सदस्य निवडून आलेले असतात पण त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधीत्व अशा समित्यांवर मिळत नाही. पण या विधेयकात सुचविण्यात आलेल्या तरतुदीनुसार एखादा स्वतंत्र निवडून आलेला सदस्य अथवा छोटा गट असेल व त्याचा एखादा सदस्य निवडून आला असेल त्यालाही प्रतिनिधीत्व देण्यात येईल. त्यात सर्वात प्रथम मोठ्या गटाला त्या गटातील संख्येच्या प्रपोर्शनेटमध्ये प्रतिनिधी मिळावे, मग संख्येने कमी कमी होऊन शेवटच्या सदस्याला सुध्दा अशा समित्यांवर सदस्यत्व मिळावे अशी ही सुधारणा आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

दुसरी तरतूद अशी आहे की, गेल्या वेळेस सभागृहाने एक विधेयक मंजूर केले होते व त्यानुसार मुंबई महानगर पालिका अथवा अन्य महानगर पालिकांच्या आयुक्तांचे आर्थिक अधिकार वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु मुंबई महानगर पालिकेचा "बेस्ट" उपक्रमाचे अध्यक्ष असतात, त्यांचे आर्थिक अधिकार वाढविण्याचे राहून गेले होते. म्हणून मुंबई महानगर पालिकेच्या आयुक्तांप्रमाणे त्यांचेही आर्थिक अधिकार वाढवून देण्यात यावेत. अशा दोन तरतुदी आहेत.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्र.12 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक साधे आहे परंतु चांगल्या पध्दतीने आणले आहे.(अडथळा) नियुक्तीच्या संदर्भातील गोंधळ, संख्याबळाप्रमाणे होणारे वाद, सभागृहात माझी सत्ता असली पाहिजे यासाठी स्वत:मध्ये दुसऱ्यांना सामील करुन घेणे व त्यातून मिळालेली सत्ता. मला सत्ता मिळाली की, दुसरे नाराज होतात. त्यातून जे निर्माण होते त्यातून माझे सामर्थ्य 15.47 त्याचे सामर्थ्य 15.49 असे होते. आमच्या एक सन्माननीय सदस्या 0.47 मतांनी निवडून आलेल्या आहेत. अर्धे मत इकडे तिकडे झाले असते तर पचांईत झाली असती. आज सत्तेची ओढाताण अशा प्रकारे चालली आहे.

सभापती महोदय, पूर्वी 14.49 ला 15 धरले जात होते व 15.51 ला 16 धरले जात होते. परंतु आता संघर्ष 00.1 पर्यंत गेलेला आहे व त्यासाठीच हे विधेयक येथे आणलेले आहे.(अडथळा)

पूर्वी महाराष्ट्रात आमदारांच्या, खासदारांच्या निवडणुकीला महत्व होते. जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांच्या, महानगरपालिकेच्या महापौर, अध्यक्षांच्या निवडणुकीला महत्व होते. परंतु आता संपूर्ण महाराष्ट्रात स्थायी समितीच्या चेअरमनला फार महत्व आले आहे. मंत्री पदाला किंमत नाही त्यापेक्षा जास्त किंमत स्थायी समितीच्या अध्यक्षाला आलेली आहे. मंत्री झाल्यानंतर जेवढे ढोल ताशे वाजत नाही तेवढे ढोल ताशे स्थायी समितीच्या अध्यक्षाच्या निवडणुकीत वाजत असतात. महानगर पालिकेच्या राजकारणाची भयंकर परिस्थिती असल्यामुळे हा संघर्ष निर्माण झालेला आहे. पक्षाच्या सामर्थ्याप्रमाणे प्रतिनिधीत्व दिले जाते. आता ते 00.1 पर्यंत आल्यामुळेच हे विधेयक येथे आणले गेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

प्रश्न असा आहे की, एका पक्षाचे 17 सदस्य, दुसऱ्या पक्षाचे 16 सदस्य अन्य पक्षाचे 18 सदस्य निवडून आलेत व सभागृहाच्या कामकाजासाठी 5 सदस्य घ्यायचे असतील तर त्यासाठी सूत्र ठरलेले असते. दोन स्वीकृत सदस्यांसाठी 28 सदस्य असणे आवश्यक असतील आणि एका पक्षाचे 22 सदस्य असतील तर दोन सदस्य घेता येणार नाही. त्यामुळे दुसरा सदस्य निवडणून आणण्यासाठी स्पर्धा सुरू होते. यासाठी इकतून तिकडून संख्या गोळा करावी लागते. यात स्थायी समितीचा सदस्य हा एकमेव विषय आहे. त्यामध्ये सर्व सत्य दडलेले आहे. हे त्या पुरते मर्यादित नाही. आता नवीन विषय तयार झालेला आहे. आपणा सर्वांना वाटेल की, या विधेयकावर एवढे बोलण्या सारखे काय आहे ? मी ग्रामीण भागामध्ये फिरतो. तेथे जे अनुभवतो ते मी येथे मांडतो. त्याप्रमाणे मी मघाशी बिलावर बोललो आहे.

स्थायी समितीला महत्त्व नाही तेवढी किंमत स्वीकृत सदस्याला निर्माण झाली आहे. या सदनाच्या भवितव्यासंबंधी देखील मला चिंता वाटते. कदाचित त्यावेळी आम्ही नसू. आणखी 15-20 वर्षाने या सदनामध्ये समाजसेवक येणार नाहीत. पक्षाचे कार्यकर्ते येणार नाहीत. समाजसेवेसाठी झिजणारे येणार नाहीत. येथे फक्त पैसे कमाविणारेच येतील. मला एक दु:ख होते. ते मोठे झाल्याबद्दल मला दु:ख नाही. जो तो आपल्या मार्गाने व पद्धतीने मोठा होतो. योग्य-अयोग्य ते त्यांना माहीत. जे कात्रीत सापडत नाहीत ते सज्जन असतात, जे सापडतात ते दुर्जन ठरतात. पकडला तो चोर, सुटला तो मोठा. या राजकीय सत्तेतून आणि सामर्थ्यातून माझा पैसा वापरून मी करोडपती झालो आहे. पैसा वापरणे हे दुर्दैव आहे. साहेब आपण कार्यकर्ता द्यावा मी त्याला लोकसेवेसाठी सभागृहामध्ये पाठविन असे आज कोणालाही वाटत नाही. आता सर्व काही मीच आहे. लुटणार पण मीच, लुटलेल्या मालातून घेणारा देखील मीच आहे. अशी आज परिस्थिती आहे. आमच्याकडे तर तराजू आहे. दोन्ही कडे समसमान आहेत. स्वीकृत सदस्य हा गंभीर प्रश्न झालेला आहे. देऊन सुद्धा स्वीकृत सदस्याला स्वीकारले नाही. त्यामुळे माझ्या सारखा न स्वीकारणारा नेता स्वीकृत होत नाही. पक्षाला दोन पैसे मिळतात वगैरे मलाच लेक्चर देतात. हा स्वभावाचा भाग आहे. कार्यकर्त्याच्या जीवाला बाजी लावणारा मी नेता आहे. त्यामुळे मी ते स्वीकारत नाही. मी येथे आपल्याला एक उदाहरण देणार आहे. स्वीकृत सदस्याकरिता हे विधेयक लागू आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, संख्याबळ हे पीठासीन अधिकाऱ्यांनी जाहीर करायचे आहे. महापौर असले उप महापौर असेल त्यांनी ते जाहीर करायचे असते. स्वीकृत सदस्याचा अधिकार सभेला नाही. पीठासीन अधिकाऱ्यांना नाही. तो अधिकार महापालिकेच्या आयुक्तांना आहे. हा अधिकार आयुक्तांनी कायद्याच्या अधीन राहून वापरला पाहिजे. मी येथे एक घोळ आपल्या निदर्शनास आणणार आहे. मी हे अधिकृतपणे सांगत आहे. येथे संबंधित विभागाचे सन्मानीय सचिव देखील आहेत. यावर नियंत्रण कोण आणणार ? नुकतीच अकोला महानगरपालिकेची निवडणूक झाली. येथे विचित्र पद्धतीने सदस्य निवडून आलेले आहेत. ही महापालिका दोन वर्षात बरखास्त करावी लागेल अशी परिस्थिती आहे. हा नंतरचा भाग आहे.

अकोल्यामध्ये शिवसेना भाजप युतीने एकत्रपणे निवडणूक लढविली. आम्ही अधिकृतरित्या लढलो. एकमेकाला जागा वाटून लढलो. दोन्ही पक्षाचे सदस्य युतीचे सदस्य म्हणून निवडून आले आहेत. चिन्ह मात्र आपापल्या पक्षाचे वापरले आहे.

यानंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

निवडणुकीनंतर भाजपचे 18 आणि आमचे 8 सदस्य निवडून आले. त्यानंतर भाजपची मंडळी आमच्याकडे आली आणि आम्ही त्यांना सांगितले की, आपले एकूण 26 सदस्य झाले आहेत. या पेक्षा आणखी जर आपल्याला कुणी समर्थन देत असतील तर त्यांचे समर्थन आपण घ्या, आम्ही देखील तुमच्याबरोबर आहोत. त्यावेळी मी म्हटले होते की, आमची 8 संख्या असल्यामुळे नियमानुसार आम्हाला जे मिळावयास हवे ते मिळणारच आहे. त्याच्या पलिकडे जर आपण आणखी 10-12 सदस्य जमविले आणि त्यामधून महापौर, उप महापौर, स्थायी समिती ही पदे देण्याबाबत तुम्ही आम्हाला विचारले नाही तरी आम्ही तुम्हाला विचारणार नाही. याचे कारण आमचा तो अधिकार नाही. त्यानंतर दुर्दैवाने अशी परिस्थिती निर्माण झाली की, कॉग्रेसचे 18 सदस्य, राष्ट्रवादी कॉग्रेसचे 5 सदस्य, युनायटेड फ्रंटचे 5 सदस्य असे आघाडीचे एकूण 32 सदस्य झाले. त्यानंतर श्री. बाळासाहेब आंबेडकर यांच्या भारिप बहुजन महासंधाचे 7 सदस्य आले आणि अपक्ष 4 सदस्य आले. योगा योगाने कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस हे सर्व एकत्र आले. त्यांची संख्या 32 झाल्यामुळे त्यांचा महापौर झाला. या ठिकाणी कायद्यातील तरतुदीप्रमाणे केलेली आघाडी पहिल्यांदा रजिस्टर करावी लागते. त्यामध्ये असे बंधन घालण्यात आले आहे की, एकदा त्या आघाडीमध्ये सामील झाल्यानंतर पुढील टर्मपर्यन्त त्यांना आघाडीपासून वेगळे होता येत नाही. अशाप्रकारची एक चांगली तरतूद या कायद्यामध्ये केली आहे. ज्या सचिवांनी ही तरतूद केली असेल त्याचे जाहीररित्या कौतुक केले पाहिजे. लोकशाहीला काळिमा फासणाऱ्या प्रकारांवर निर्बंध आणणारी कोणतीही गोष्ट ही कौतुकास्पद असते.

सभापती महोदय, त्या ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, नवरा-बायको, पती-पत्नी असे दोन सदस्य निवडून आले आहेत. त्यांची नावे श्री. संजय वहाडणे आणि सौ. माधुरी वहाडणे अशी आहेत. त्या ठिकाणी सत्तेसाठी खेचा खेच सुरु झाली. त्यावेळी भाजपने आघाडी असतांनाही आम्हाला बाजूला ठेवून दुसऱ्यांना बरोबर घेऊन आयुक्तांकडे अर्ज केला त्याला आम्ही हरकत घेतली नाही. आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही आता स्वतंत्र असल्यामुळे आपण आमच्या नादी लागू नका. आमचे 8 सदस्य असल्यामुळे आम्ही आमचा गट नेता नेमून आमचे कामकाज सुरु केले. आम्ही तुमच्याबरोबर नाही असे तुम्हीच जाहीर केल्यामुळे आम्ही आमचे निर्णय स्वतंत्रपणे घेऊ असे त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी सदस्यांची यादी रजिस्ट्रेशनसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

पाठविली. त्यामध्ये असा प्रश्न निर्माण झाला की, त्यांची सदस्य संख्या 22 झाली अधिक श्री. वहाडणे पती-पत्नी दोघे मिळून त्यांची 24 संख्या झाली. त्यांचे प्रकरण न्यायालयापर्यन्त गेले होते त्यावेळी त्यांनी न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र लिहून दिले. त्यानंतर त्यांनी एक महिन्यांनी सांगितले की, आम्ही या आघाडी बरोबर नाही आता आम्ही दुसऱ्या आघाडी बरोबर आहोत. त्यामुळे आपल्या प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार या पती-पत्नींचे सदस्यत्व रद्द झाले पाहिजे. सदरचे प्रकरण आयुक्तांकडे पडले आहे. हा पध्दतीचा भाग झाला. त्या बाबत सचिवांनी आयुक्तांना सांगून या प्रकरणामध्ये तातडीने कारवाई करावी या अपेक्षेने आम्ही मागणी केली.

सभापती महोदय, ही महानगरपालिका निवडून आल्यानंतर त्या ठिकाणी स्थायी समितीचा घोळ झाला, सर्व प्रक्रिया उशिरा पार पडली. तरी सुध्दा तेथील स्वीकृत सदस्य अजूनही निवृत्त होत नाहीत. स्वीकृत सदस्यांची परिस्थिती अशी आहे की, भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्याकडे असलेले चार सदस्य मिळून त्यांचा एक बिंदू पन्नास म्हणजे 22 सदस्य होतात. त्या ठिकाणी निवडून येण्याकरिता चौदा बिंदू आणि काही प्रमाण लागते. म्हणजेच ज्यांच्याकडे 14 सदस्य आहेत त्यांचा एक सदस्य निवडून येतो, दुसरा सदस्य निवडून यावयाचा असेल तर 28 सदस्य असले पाहिजेत. नियमात अशी तरतूद आहे की, पहिले प्राधान्य हे पक्षाला असते त्यानंतर दुसऱ्यांना असते. पक्षाचे सदस्य कमी असतांना बाकीचे सदस्य एकत्र येऊन कडबोळे तयार झाल्यानंतर पहिले प्राधान्य पक्षाला दिले जाते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व इतर पक्ष असे मिळून एकूण 32 सदस्य आहेत. त्यांची टक्केवारी 2.1917 इतकी आहे. हा कायदा आता झाला आहे.त्या नंतर भारिपचे 0.4794 टक्केवारी, शिवसेना पक्षाची टक्केवारी 54.79 आहे. त्यात 2 सदस्य आहेत ते इकडे, तिकडे किंवा कुठेही गेले तरी, त्या दोन्ही पक्षांचे 2-2 सदस्य होऊ शकत नाही. तसे झाल्यास जो पाचवा सदस्य आहे, तो आपल्या कायद्यानुसार भारिप व शिवसेनेमध्ये गेल्यास त्याचा फायदा शिवसेनाला मिळाला पाहिजे, कारण भारिपची सदस्य संख्या 7 व शिवसेना पक्षाची सदस्य संख्या 8 इतकी आहे. त्यामुळे ते जास्त होतील. हा वादाचा विषय नाही.

सभापती महोदय, वादाचा विषय असा आहे की, सत्तेत आले त्या 2 सदस्यांना कुठेही धरले तरी, 2 सदस्यांच्या संख्येत फरक पडत नाही. त्यामुळे आयुक्तांनी आपले अधिकार वापरुन आणखी 4 महिन्यांपासून 5 सदस्यांना घटनेने, कायद्याने, न्यायाने अधिकार दिला असताना देखील त्या पक्षाच्या कार्यकर्त्याला तेथे "स्वीकृत सदस्य" म्हणून जाऊ देत नाहीत. त्यांना तेथे का जाऊ देत नाही? आयुक्तांनी त्यांना का थांबवावे, या संबंधी सभेचा व महापौरांना अधिकार नाही. या संबंधी आयुक्तांना अधिकार आहेत, हे प्रकारे गणित पक्के असल्यास, तसेच कागदावरील गणित जसाच्या तसे आहे, ते बिघडू शकत नाही. तर अधिकार का करीत नाही, असा माझा प्रश्न आहे. अशा प्रकारे या विषयाला जास्त गांभीर्य आहे. आपण सदरहू विधेयक आणले आहे, त्या साठी मी आपले स्वागत व अभिनंदन करण्यासाठी उभा राहिलो आहे. परंतु तसे करीत असताना, मला वाटले म्हणून आपले अभिनंदन केले, असे नाही. त्या मागील कारणमिमांसा सांगूनच ते केले पाहिजे. त्याचे महत्व व गांभीर्य किती आहे, या बाबत सदनाला माहिती देणे गरजेचे आहे. भविष्यात हा प्रश्न आता गावागावांमध्ये एवढ्या बिंदूनेच सरकणार आहे.

सभापती महोदय, विधानपरिषदेच्या निवडणूकीत सेनेच्या एकूण 44 सदस्यांनी दोन सदस्य निवडून आणले. मागील विधान परिषदेच्या निवडणुकीत श्री.अनिल परब यांना दुसऱ्या पसंतीची मते मिळाली असती ते 1.15 ने निवडून आले असते. विधान परिषदेचा सदस्य होण्यासाठी बिंदूवर भविष्य अवलंबून असते. चिठ्ठी तर सोडाच, त्याला बिंदूचा काही चान्सच नाही. काही करताच येत नाही म्हणून मी अकोला महापालिकेची परिस्थिती सभागृहासमोर मांडली आहे. यादृष्टीने या विधेयकाला महत्व असून माननीय महोदयांनी महत्वाचे विधेयक मांडले आहे. या निमित्ताने या बाबतची सर्व परिस्थिती समोर आली आहे. या विधेयकामुळे आता सर्व आमदारांच्या लक्षात येईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

की, हे विधेयक किती महत्वाचे आहे. मला, आपल्याला व सर्वांना नेतृत्व करीत असताना तारेवरच्या कसोटीवर जावे लागते. हे बिंदू वाढविण्याकरिता आता नगरसेवकांचे दर कसे वाढतील ? त्यामुळे आपला कायदा हा अतिशय मोलाचा आहे. सुरुवातीला जी आघाडी होईल, त्याच्यावरच सर्व काही होईल, तेच बरोबर आहे, त्याच्या पलीकडे जाता येणार नाही. त्याच्या पलीकडे जो फुटेल, त्याचे पद जाईल.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अकोल्यासंबंधी गांभीर्याने घ्यावे व यामध्ये स्वत: लक्ष घालावे.आयुक्तांना आहे त्यानुसार स्वीकृत सदस्यांबाबत निर्णय देण्यास सांगावे. हे जे दोन सदस्य आहेत, ते या पक्षातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून या पक्षात असे करुन संपूर्ण अकोल्याची सत्ता नाचवित आहे.तेथील महानगर पालिकेचे कामकाज अतिशय विस्कळीत झाले आहे. महानगरपालिका चालली पाहिजे.माननीय मुख्यमंत्री स्वत: त्या ठिकाणी आले होते. त्यांनी स्वत: पालकत्व स्वीकारले आहे. काँग्रेस पक्षाची सत्ता आल्याबद्दल आम्हाला आनंद आहे. महापालिकेत त्यांची सत्ता आली, त्यांनी पालकत्व स्वीकारले आहे. त्या नगरीला पैसे मिळतील, हा विषय नाही. मुख्य विषय असा आहे की, दोन जणांच्या पैशावर एखादी महानगरपालिका दोलायमान करुन टाकली जाते अशा प्रकारचा या विधेयकाच्या माध्यमातून मी हा विषय उपस्थित केला आहे. मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो.हा अतिशय चांगला कायदा आहे. त्याच्या पुढचे पाऊल म्हणजे पहिल्या पसंतीनंतरच्या मतांबाबत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यानुसार निवडणूक संपलेली आहे. निवडणुकीतील फोडाफोडी संपविण्याच्यादृष्टीने शासनाने विधेयकाच्या माध्यमातून जे पाऊल उचलले आहे त्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नोंद

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने माझी अशी शंका आहे की, परवा कणकवली नगरपालिकेत महिला व बालकल्याण समितीची निवडणूक झाली होती. तेथे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासंबंधी आपल्याला सर्व माहिती आहे. त्या निवडणुकीत 3 महिल्या उमेदवार उभ्या होत्या. त्यात अध्यक्ष निवडताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तटस्थ राहिले. शेवटी दोन निवडणूक लावून निवडणूक झाली नाही. तेथे काँग्रेस पक्षाची सत्ता आहे.अशा प्रकारे अडचणी निर्माण होतात. कमिट्याच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यात महिला बालकल्याण समितीमध्ये 3 महिला सदस्या आहेत. त्यात नगराध्यक्ष यांना भाग घेता येत नाही. त्यामुळे दोन महिला सदस्या राहिल्या.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ...

मग दोन सदस्य शिल्लक राहिले. त्या ठिकाणी दोनदा प्रयत्न केल्यानंतर सुध्दा महिला व बालकल्याण समिती स्थापन झालीच नाही. हे विधेयक अतिशय चांगले आहे परंतु अशा ज्या काही अडचणी निर्माण होतात त्या बाबतीत काय करणार अशी माझी साधी शंका आहे. त्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदय श्री. भास्करराव जाधव यांच्या बरोबरच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचेही आभार मानतो की, त्यांनी खरोखरच या गोष्टी मांडून आम्हाला बोलण्यास प्रवृत्त केले. एक गोष्ट माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. महानगरपालिकेमध्ये गटनेते नियुक्त केले जातात. गटनेते नियुक्त केल्यानंतर सत्ताधारी पक्षाचा जो गटनेता असतो तो सभागृह नेता होतो. दुसऱ्या स्थानावर असलेल्या पक्षाचा गट नेता विरोधी पक्षनेता होतो. हे साधे लॉजिक असताना ज्या पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमध्ये नियुक्ती झाली तीच परिस्थिती नाशिक महानगरपालिकेमध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, नाशिक महापालिकेमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा महापौर आहे. त्या ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त नगरसेवक असलेला पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे आणि तिसऱ्या स्थानावर शिवसेना आहे. त्या महापालिकेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे 20 नगरसेवक आहेत, शिवसेनेचे 19 नगरसेवक आहेत म्हणजे एक कमी नगरसेवक आहे. आता ज्या निवडणुका झाल्या त्यामध्ये तुमचे आणि त्यांचे बऱ्यापैकी जमले. नियमाप्रमाणे त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विरोधी पक्ष नेता नियुक्त व्हावयास पाहिजे परंतु महापौराचा अधिकार असल्यामुळे तो नियम तोडून आता त्यांनी असे सांगितले की, आमची आरपीआय बरोबर आघाडी होती आणि त्या पक्षाचे 3 नगरसेवक निवडून आले असल्यामुळे आमची संख्या 22 झालेली आहे म्हणून आमचा विरोधी पक्ष नेता करा. तसे जर असेल तर त्या ठिकाणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित आघाडी म्हणून निवडणुका लढलेले आहेत. काँग्रेसचे 15 आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे 20 असे मिळून 35 सदस्य होतात. त्यामुळे या ज्या नियुक्त्या करावयाच्या आहेत त्या बाबतीत तेथील आयुक्तांना अधिकार दिले पाहिजेत. जी काही खातरजमा करावयाची असेल ती आयुक्तांनी करुन घेतली पाहिजे. काही कायदेशीर सल्ला घ्यावयाचा असेल तर तो घ्यावा. आज त्या ठिकाणी चार-पाच महिने होऊनही स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्त्या झालेल्या नाहीत, विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती झालेली नाही. या बाबतीत शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयकावर आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात आपण मागच्या वेळी बिल आणले होते त्यावेळी मला बोलावयाचे होते पण त्यावेळी बोलण्यासाठी वेळ न मिळाल्यामुळे मी आता बोलत आहे. मुंबईच्या संदर्भात माझे दोनच मुद्दे आहेत. मुंबई महानगरामध्ये ज्या जुन्या हेरिटेज इमारती आहेत त्या संदर्भात हेरिटेज कमिटी आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत ही हेरिटेज कमिटी अस्तित्वात नाही. या गोष्टीला दीड ते दोन वर्षे झालेली आहेत. मुंबई महानगरामध्ये हायराईज कमिटी सुध्दा आहे. ती समिती सुध्दा सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे लोकांचे खूप नुकसान होत आहे. हायराईज कमिटी आणि हेरिटेज कमिटीच्या संदर्भात आपण लवकरात लवकर विचार केला तर बरे होईल. या संदर्भात शासनाने काही तरी निर्णय घ्यावयास पाहिजे आणि काही तरी कायदा करावयास पाहिजे. आपण काही कारणास्तव कमिटी बरखास्त करतो किंवा ती कमिटी बरखास्त झाली तर पुन्हा ती कमिटी किती कालावधीमध्ये स्थापित करणार या बाबतीत काही तरी कायदा करावयास पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. शिगम....

,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयकाचे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले आहे. ज्यांनी या विधेयकाच्या बाबतीत न बोलता सहकार्य केले त्यांना मी धन्यवाद देतो आणि विशेषत: सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी अगदी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, साधारणपणे विधेयकाचे सखोल वाचून करुन आणि ते समजून घेऊन या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्य येत असतात. या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेताना या विधेयकामुळे कोणकोणते तिढे सुटणार आहेत आणि कोणकोणत्या अडचणी दूर होणार आहेत तसेच आणखी कोणत्या सुधारणा या कायद्यामध्ये करणे आवश्यक आहे हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिले. सन्माननीय सदस्यांनी ज्या काही शंका व्यक्त केल्या त्यांचे निरसन या विधेयकाच्या माधमातून होणार आहेत.

सभापती महोदय, एखाद्या सभागृहामध्ये जर 100 सदस्य असतील आणि एखाद्या समितीवर 16 सदस्य घ्यावयाचे असतील तर 100 भागिले 16 या पध्दतीने सदस्य संख्या ठरविली जाते. एखाद्या पक्षाचे 26 सदस्य असतील तर त्यांचे गुण 4.16 होतात. त्यामुळे त्या पक्षाचे 4 सदस्य घेतले जातील. दुस-या पक्षाचे 32 सदस्य असतील तर त्यांचे 5.12गुण होतात म्हणून त्यांचे 5 सदस्य घेतले जातील. एखाद्या पक्षाचे 13 सदस्य असतील तर त्यांचे 2 गुण होतात म्हणून 2सदस्य घेतले जातील. एखाद्या पक्षाचे 14 सदस्य असतील तर त्यांचे 2.24 गुण होतात म्हणून 2 सदस्य घेतले जातील. पण एखाद्या पक्षाचे 15 सदस्य असतील तर त्यांचे गुण 2.40 होतात म्हणून त्यांचा एक सदस्य घेतला जाईल. या प्रमाणे पॉईण्ट नुसार प्रतिनिधित्व मिळेल. त्यामुळे माझ्या पक्षाची सत्ता असल्यामुळे माझ्याच पक्षाचे सदस्य घ्यावेत असे म्हणता येणार नाही आणि तो विषय या तरतुदीमुळे निकालात निघू शकेल.

सभापती महोदय, जे रजिस्टर आणि रेकग्नाईज्ड पक्ष असतात त्यांच्या उमेदवारांना निवडून आल्या नंतर एक महिन्याच्या आत जिल्हाधिका-यांसमोर जाऊन गट करावा लागतो. तो गट केल्यानंतर त्यामधे काही त्रुटी असतील तर त्या दूर होतात. या संदर्भात माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता. त्यामुळे ही चुकीची तरतूद झालेली आहे का हे पुन्हा एकदा पहावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी त्यांच्या नगरपालिकेसंबंधी सांगितले, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्या नगरपालिकेमध्ये देखील अशाच प्रकारचा तिढा निर्माण झालेला आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

मी सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी महाराष्ट्रातील किती नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये तांत्रिक मुद्यांचा आधार घेऊन निवडणुका आणि नेमणुका होण्याचे बाकी राहिले असेल, विशेष करुन आयुक्त पातळीवर त्या बाकी राहीले असेल तर तत्काळ त्याचा आढावा घेऊन त्यासंबंधी निर्णय घेण्यास आयुक्तांना भाग पाडण्यात येईल. मी हेही सांगू इच्छितो की, मागील दोन अडीच वर्षामध्ये नगरविकास विभागाची जास्तीत जास्त विधेयके ही या सभागृहामध्ये चर्चेसाठी आलेली आहेत. ज्या ज्या ठिकाणी चुका दिसतात, दोष दिसतात ते दूर करण्याचा मी आणि माझ्या विभागाचे अधिकारी आम्ही सातत्याने करीत आहोत. या सभागृहाने देखील नगरविकास विभागाची सर्वच विधेयके बिनविरोध संमत केलेली आहेत. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या काही नवीन सूचना केलेल्या आहेत त्याचाही विचार करुन कायद्यामध्ये पुनश्च सुधारणा करण्यासाठी आम्ही तत्काळ सभागृहासमोर येऊ. परंतु जेवढी पारदर्शकता कायद्यामध्ये आणण्याची आवश्यकता आहे तेवढी निश्चितपणे आणू अशा प्रकारचा मी आपणास विश्वास देतो.

सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी हेरिटेज आणि हायराईज कमिटीचा उल्लेख केला. हायराईज कमिटीमधील सदस्यांनीच कसा गोंधळ केला आणि त्यांना कसे जेलमध्ये जावे लागले हे आपणा सर्वांना माहीत आहे. तेव्हा पासून ही कमिटी बरखास्त झालेली आहे.ही कमिटी पुन्हा नेमण्याची आवश्यकता आहे. त्याचा देखील विचार केला जाईल. या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेऊन शासनाला चांगल्या सूचना केल्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो आणि हे विधेयक संमत करावे अशी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीन सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 11 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2012चे वि.प.वि. क्रमांक 11 संमत झाले आहे.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अर्धा-तास चर्चेची सूचना पुढे ढकलण्यासंबंधी</u>

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पहिल्या क्रमांकाची अर्धा तास चर्चेची सूचना पुढे ढकलण्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी विनंती केलेली आहे. तेव्हा ही अर्धा तास चर्चेची सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पुणे विद्यापीठाला महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देणे व पूर्णाकृती पुतळा उभारणे

मु.शी.: पुणे विद्यापीठाला महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देणे व पूर्णाकृती पुतळा उभारणे या संबंधी श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"पुरोगामी राज्य असा लौकिक असलेल्या राज्यातील पुणे शहर विद्येचे माहेरघर असून याच शहरात थोर कृतीशील समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांनी शिक्षणाची चळवळ सुरु करुन बहुजनांना व स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली, पुणे शहरात शिक्षणाचे महान कार्य करणाऱ्या समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला देऊन त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात होत असलेली मागणी, आद्यप्रवर्तक महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव विद्यापीठाला देणे तसेच पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, पुरोगामी राज्य असा लौकिक असलेल्या राज्यातील पुणे शहर विद्येचे माहेर घर म्हणून ओळखले जाते. यामागील पार्श्वभूमी देखील थोर आहे. कारण थोर कृतीशील समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यामध्ये शिक्षणाची चळवळ सुरु करुन बहुजनांना आणि स्त्रियांना खऱ्या अर्थाने शिक्षणाची जाण करुन त्यांना समाजामध्ये अतिशय चांगले स्थान देण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे शिक्षणाचे खरे जनक व आद्यप्रवर्तक असे त्यांना म्हटले तर काही हरकत नाही असे मला वाटते. अशा महान व्यक्तींनी पुण्यामध्ये शिक्षणाचे महत्व सुरु करुन संपूर्ण भारतवासियांना, सर्वसामान्य जनतेला शिक्षणाची दारे उघडी करुन दिली. त्यामुळे आज बहुजनांबरोबर आमचे मागासवर्गीय बांधव सुध्दा अतिशय चांगल्या पध्दतीने शिक्षित होऊन समाजामध्ये मानसन्मानाने जगत आहेत आणि सर्व श्रेय महात्मा ज्योतिबा फुले यांना आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव...

सभापती महोदय, महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्याला हा मार्ग दाखविला नसता तर आज महिलांना 50 टक्के आरक्षण मिळाले आहे ते कदाचित मिळाले नसते आणि याचे सर्व श्रेय महात्मा ज्योतिबा फुले यांना आहे. अशा थोर महात्म्यांचे स्मरण व्हावे आणि त्यांच्या पासून सर्वसामान्यांना प्रेरणा मिळावी यासाठी पुणे विद्यापीठामध्ये महात्मा ज्योतिबांचा पुतळा उभारावा अशी सर्वसामान्यांची भावना आहे. परंतु महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारण्यामध्ये आपण असमर्थ ठरलो आहोत.

सभापती महोदय, मागील अधिवेशनात देखील मी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मला सांगण्यात आले की, "पुतळा उभारण्या संदर्भात एक समिती नेमलेली आहे आणि ती समिती नियमावली करणार आहे. कारण पुतळा उभारल्यानंतर त्या पुतळ्याचे संरक्षण करण्या संबंधीचा मुद्दा येतो." मी आपणास सांगू इच्छितो की, आपणास महापुरुषांचे पुतळे प्रेरणादायी ठरलेले आहेत.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठ हे भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द आहे. आज पुणे शहरामध्ये पुणे विद्यापीठ मोठ्या दिमाखात उभे आहे.

यानंतर श्री.गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंत जाधव...

त्या ठिकाणी नियमावली तयार करावयाची, त्या ठिकाणी पुतळयाचे संरक्षण कसे करावयाचे असे प्रश्न कोणाच्या बुध्दीतून तयार होत आहेत हा एक संशोधनाचा विषय आहे. या महान समाज सुधारकांचा पुतळा बसविण्यास एवढी असमर्थता का दाखविण्यात येत आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, कृतीशील समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला देण्यात यावे व त्या ठिकाणी त्यांच्या पुतळयाचे अनावरण करण्यात यावे अशी जनतेकडून प्रचंड मागणी होत असताना ती मागणी मान्य करण्यासाठी शासनाला कोणत्या प्रकारच्या अडचणी आहेत यासंबंधीचा खुलासा या ठिकाणी करण्यात यावा. महात्मा ज्योतीराव फुले यांचा पुतळा बसविण्यासाठी नियमावली तयार करावी लागत आहे, त्यांच्या पुतळयाचे संरक्षण कशा पध्दतीने करावयाची अशा प्रकारची हकनाक कारणे काढून टाळाटाळ करण्यात येत आहे असा माझा स्पष्टपणे आरोप आहे. पुणे विद्यापीठास महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव देण्यासंबंधी आणि त्यांचा पुतळा उभारण्यासंदर्भात शासन का कुचकामी ठरले आहे याचा खुलासा उत्तराच्या भाषणात केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेची ही मागणी लक्षात घेता पुणे विद्यापीठास ज्योतीराव फुले यांचे नाव देण्याबाबत तसेच त्या ठिकाणी त्यांचा पुतळा उभारण्याबाबत शासनाने आजच या सभागृहात घोषणा करावी, अशी मी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, त्या ठिकाणी महात्मा ज्योतीराव फुले यांचा पुतळा बसविण्यास काही आर्थिक अडचण येत असेल तर महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने पुतळा उपलब्ध करुन देण्याची आमची तयारी आहे. त्यामुळे तेथे पुतळा बसविण्याबाबत शासनाने आजच घोषणा करावी, अशी मी या निमित्ताने पुनश्च विनंती करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 19 जुलै, 2012 रोजी दुपारी 3.30 वाजता,कक्ष क्रमांक 145, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन शुक्रवार, दिनांक 20 जुलै ते बुधवार, दिनांक 25 जुलै, 2012 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज खालीलप्रमाणे निश्चित केले.

शुक्रवार, दिनांक 20	: शासकीय कामकाज (विधेयके)
शनिवार, दिनांक 21	: बैठक होणार नाही.
रविवार, दिनांक 22	: सुट्टी
सोमवार,दिनांक 23	: (1) शासकीय कामकाज (विधेयके) (2) निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप
मंगळवार,दिनांक 24	: (1) शासकीय कामकाज (विधेयके) (2) अंतिम आठवडा प्रस्ताव
बुधवार,दिनांक 25	: शासकीय कामकाज (विधेयक)

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे विद्यापीठाला महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देणे व पूर्णाकृती पुतळा उभारणे

मु.शी.: पुणे विद्यापीठाला महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देणे व पूर्णाकृती पुतळा उभारणे याबाबत श्री.जयवंत जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चेची सूचना.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुणे विद्यापीठास महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव देण्याबाबत व त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत अर्धा तास चर्चेची सूचना सन्माननीय सदस्य श्री.जयवंत जाधव यांनी सभागृहात उपस्थित केली त्याबद्दल त्यांना प्रथम धन्यवाद देतो व त्यांच्या मागणीला मी पूर्ण समर्थन देतो.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : अर्धा तास चर्चेच्या सूचनेवर अतर सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही. सन्माननीय सदस्यांना उप प्रश्न विचारता येतात. परंतु सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील बोलण्यासाठी खूपच आग्रह करीत असल्यामुळे मी त्यांना बोलण्यासाठी अपवादात्मक परिस्थिती म्हणून परवानगी दिली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी या सभागृहात अनेक वेळा अर्धा तास चर्चेच्या सूचना ऐकलेल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्य भाग घेत असतात अशी परिस्थिती देखील मी पाहिलेली आहे. ही चर्चा अर्ध्या तासात संपली पाहिजे एवढेच बंधन आहे. महात्मा फुले यांनी बहुजनांना या देशात ज्यांना शिक्षण नाकारले गेले होते, त्या सगळया वर्गाला शिक्षण देण्याचे काम केले. शिक्षणाचा हक्क देण्याचा निर्णय भारत सरकारने अलीकडेच घेतलेला आहे.

यानंतर श्री. कानडे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

दोन वर्षापूर्वी संसदेने हा पहिला कायदा पास केला. पण त्यापूर्वी 150 वर्षापूर्वी हंटर कमिशन समोर महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे अशी मागणी केली होती. एवढेच करुन ते थांबले नाहीत तर त्यांच्याही खूप आधीपासून म्हणजे 1 जानेवारी, 1847 मध्ये त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु केली. त्यानंतर आणखी काही वर्षांनी त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले व त्यांच्या सह शिक्षिका श्रीमती फातिमा शेख यांच्या मदतीने समाजाचा रोष पत्करुन, दगड धोंडे स्वीकारुन प्रौढांसाठी शाळा सुरु केली व शिक्षणाचा हक्क सर्वत्र पसरविला. म्हणून महात्मा फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला द्यावे. खरे तर असा ठराव विधिमंडळातच आणला पाहिजे व त्याची घोषणा शासनाने आजच सभागृहात करावी. महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा पुणे महापालिकेच्या प्रांगणात बसविण्यासाठी विरोध झाला होता आणि त्यांच्या मृत्यूनंतर 50 वर्षापर्यंत सुध्दा पुणे महानगर पालिकेच्या प्रांगणात महात्मा फुले यांचा पुतळा उभारला गेला नव्हता, तो खूप उशिरा बसविण्यात आला या प्रसंगाची आठवण मी मुद्दाम या निमित्ताने करुन देऊ इच्छितो. त्याच धर्तीवर विद्यापीठाच्या प्रांगणात महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारण्याचा निर्णय होत नसेल तर त्याचेच वैषम्य अधिक आहे. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी पुणे विद्यापीठाला थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देणे आणि विद्यापीठाच्या आवारात त्यांचा पुतळा उभारणे यासाठी वेळोवेळी विद्यापीठाला पत्र दिले आणि विधान परिषदेत आवाजही उठविला. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, विद्यापीठ स्वायत्त संस्था असून त्यासंबंधीचा निर्णय सिनेट आणि मॅनेजमेंट कौन्सिलतर्फे घेतला जातो. मॅनेजमेंट कौन्सिलने विद्यापीठाला नाव देण्याच्या संदर्भात अगोदर चर्चा केली आणि सांगितले की, पुणे विद्यापीठ हे ग्लोबल विद्यापीठ आहे आणि संपूर्ण जगात पुणे विद्यापीठाचे नाव आहे. अशा विद्यापीठाला वेगळे नाव दिले गेले जगभरात पुणे विद्यापीठाची जी वेगळी ओळख आहे ती राहणार नाही, त्यात अडचण येऊ शकते.

श्री. कपिल पाटील : माझी मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराला हरकत आहे की, आताच त्यांनी सांगितले की पुणे विद्यापीठ ग्लोबल स्वरुपाचे आहे व त्याचे नाव बदलले तर त्याचा अवमान होईल.....

श्री. डी.पी.सावंत : महोदय, पुणे विद्यापीठाची एक स्वतंत्र ओळख जागतिक पातळीवर आहे अशा परिस्थितीत या विद्यापीठाचे नाव बदलले तर ती ओळख राहणार नाही असे मी म्हणालो. विद्यापीठाचा अवमान होणार आहे असा शब्दप्रयोग मी केलाच नाही. तसेच यापूर्वी पुणे विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलचा ठराव असा आलेला आहे, याबद्दल मी वाच्यता केली. पुतळयाच्या बाबतीत यापूर्वी दोन वेळा ठराव आला आहे.

श्री. कपिल पाटील : आपण जी माहिती दिली त्यामागचा हेतू तसाच होतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, विद्यापीठ ही स्वायत्त संस्था आहे. यासंदर्भातील निर्णय सिनेट व कौन्सिल तर्फे घेतले जातात. विद्यापीठांना तसेच महाविद्यालयांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाते असते. स्वायत्त संस्थेवर आपले विचार थोपवणे योग्य होत नाही. त्यामुळे विद्यापीठाला मॅनेजमेंट कौन्सिलतर्फे काम करण्याची मुभा देण्याचा प्रयत्न शासनाकडून नेहमी होत असतो.

सभापती महोदय, पुतळयाच्यासंदर्भात व्यवस्थापन समितीने नाही म्हणून सांगितले होते परंतु एक वर्षापूर्वी दि. 30.7.20011 रोजी जी बैठक झाली होती त्या बैठकीत महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळाकृती पुतळा पूर्णाकृती करण्याचा ठराव मॅनेजमेंट कौन्सिलने घेतलेला होता. परंतु 2005 च्या शासन निर्णयानुसार शासकीय, निमशासकीय जागेमध्ये जेव्हा पुतळे उभारले जातात तेव्हा अनेक संस्थांची परवानगी घ्यावी लागत असते व त्यासाठी साधारणत: 7-8 महिन्यांचा कालावधी लागत असतो. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांना सांगू इच्छितो की, महात्मा फुले यांचा पुतळा बसविण्याचा निर्णय झालेला असून हा पुतळा लवकरात लवकर उभारला जावा यासंदर्भात विद्यापीठाला सूचना दिली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी पुणे विद्यापीठाला महात्मा फुले यांचे नाव तसेच महात्मा फुले यांचा पुतळा विद्यापीठात बसविण्याची मागणी केलेली आहे. पुणे विद्यापीठ हे आता पुण्याचेच नाही तर राज्याचे व देशाचेही राहिले नाही तर ते संपूर्ण जगाचे झालेले आहे. जागतिक स्तरावर पुणे विद्यापीठाने वेगळा ठसा निर्माण केलेला आहे. पुणे विद्यापीठाचे नाव बदलल्यानंतर पुणे शहरातील विद्यार्थ्यांचे कोण कोणते नुकसान होणार आहे याबाबत पुणे शहराचा नागरिक म्हणून विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार सभागृहाने करावा अशी माझी विनंती आहे. या विषयाच्या संदर्भात अगोदर चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विषय उपस्थित केला आहे की, पुणे महानगरपालिकेत महात्मा फुले यांचा पुतळा बसविण्याच्या वेळेस विरोध झाला होता. माझ्या माहिती प्रमाणे इंग्रजांच्या काळात हा विरोध झाला होता. पुणे महानगर पालिकेत महात्मा फुले यांचा पुतळा आम्ही मान-सन्मानाने बसविला आहे. माझी राज्य शासनाला अशी विनंती आहे की, पुणे विद्यापीठातही पुतळा बसवा परंतु पुतळा बसविण्यासाठी जागेचा प्रश्न, निधीचा प्रश्न, जे काम अपूर्ण राहिले त्यासाठी हा ठराव देऊन आपण दुर्लक्ष तर करीत नाही ना ? महानगरपालिकेने अनेक कोटी रुपये खर्च केलेले असून महात्मा फुलें यांची वास्तू पूर्ण न होण्यासाठी आपण हा खर्च करीत आहोत काय? या सर्व गोष्टींचा आपल्याला विचार करावा लागणार आहे. भिडे वाडयाचा प्रश्न अनेक वर्षापासून भिजत पडला आहे त्यामुळे या सर्व बाबीकडे शासनाने प्राधान्याने लक्ष द्यावे विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना एक दोन प्रश्न विचारु इच्छितो. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, पुणे विद्यापीठास ग्लोबल स्वरुप आले आहे. मी याच विभागाचा आमदार असल्यामुळे प्रा. गौतम मेंगाळे यांनी पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे यासंदर्भात शासनाला अनेकवेळा निवेदने दिलेली आहेत. पुणे विद्यापीठाला संत तुकारामांचेही नाव देण्यात यावे असेही सांगणारा एक वर्ग आहे. पुणे विद्यापीठाला संत ज्ञानेश्वरांचे नाव द्यावे असेही सांगणारा वर्ग आहे. समाजामध्ये अशा प्रकारची चर्चा सुरु झाली की, त्याला एक वेगळेच वळण लागत असते. त्यामुळे मी एवढेच सांगू इच्छितो की, शासनाच्या मनामध्ये या विषयाच्या संदर्भात व्यापक चर्चा घडवायचा विचार असेल तर तो सर्व सहमतीने करण्यात येणार आहे काय ?

सभापती महोदय, आपण विद्यापीठांना थोर पुरुषांची नावे देत आहोत. शिवाजी विद्यापीठ, नागपूर येथील विद्यापीठाला संत तुकडोजी महाराजांचे, अमरावती विद्यापीठाला गाडगे महाराजांचे नाव दिलेले आहे. यासंदर्भात माझा अनुभव असा आहे की, विद्यापीठामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या महापुरुषांचे खऱ्या अर्थाने कर्तृत्वच माहिती नसते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

त्या विद्यापीठाच्या विद्वत्ता सभेने त्या महापुरूषाचे चरित्र, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचे जीवनकार्य त्यांच्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कॉलेजमध्ये शिकविण्यास सांगितले पाहिजे. तसे केले नाही तर त्या व्यक्तिचे फक्त नावच राहते. कर्तृत्व मात्र बाजूला राहते. त्या दृष्टीने काही प्रयत्न होणार आहे काय ?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून विषय उपस्थित केला आहे त्याचे मी समर्थन करतो. त्यांनी येथे उपस्थित केलेला विषय हा विद्यापीठाच्या नावाचा नसून महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा उभारण्यासंबंधातील आहे. याबाबत माननीय मंत्र्यांनी शासनाच्या वतीने अत्यंत नि:संदिग्धपणे सांगितले आहे की, अशा प्रकारचा पत्रव्यवहार झालेला आहे. पुणे विद्यापीठाच्या कौन्सिलने ती बाब मान्य केली आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे की, महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा बसविला जावा. त्यांनी निर्णय घेतला असेल तर त्याची अंमलबजावणी होण्यासाठी शासन पाठपुरावा करणार आहे काय ?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महात्मा जोतिराव फुले हे कृतिशील समाजसुधारक होते. विद्यापीठामध्ये मॅनेजमेंट कौन्सिल काम करते. ज्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती घडविली त्यांचे नाव आपल्या विद्यापीठात आले तर आपल्या विद्यापीठाचे स्थान जगात व अंतराळात कमी होऊ शकेल अशी भीती मॅनेजमेंट कौन्सिलला वाटत असेल. याबाबत शासन काही करू शकत नाही काय ? आताच्या युगात पुणे विद्यापीठाचा नामविस्तार झाला तर त्यांची ओळख कुठल्याही पद्धतीने कमी होईल अशी शक्यता वाटत नाही. यासाठी पुणे विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलला आपल्याकडे बोलावून त्यांचे प्रबोधन शासन करणार आहात काय ? कुसुमाग्रजांची पुतळ्या संबंधी कविता आहे. ती मी संपूर्ण सांगत नाही.

मध्यरात्र उलटल्यानंतर शहरातील पाच पुतळे एका चौथऱ्यावर जमले आणि टीप गाळू लागले....

कोण काय म्हणाले कोण काय म्हणाले.....

महात्मा गांधी म्हणाले, माझ्या पाठीमागे फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

अशा प्रकारची ती कविता आहे. सगळी कविता मी आपल्याला सांगत नाही. यात महात्मा फुले यांचे उद्‌गार असे आहेत की :-

"मी तर उरलो फक्त माळ्यांचा, टिळक उरले फक्त चित्पावन ब्राह्मणांचे..... "

अशा पद्धतीची ती कविता आहे. समाज विघटन करणारे घटक दूर करायचे असतील तर त्यासाठी काही तरी मार्ग काढला पाहिजे. पुतळा हा सिम्बॉल असतो. पुतळा ही राष्ट्रीय संपत्ती असते. तो एक विचार असतो. त्या पुतळ्याची स्थापना पुणे विद्यापीठात करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे यासंबंधातील प्रक्रिया लवकरात लवकर संपवून तो पुतळा पुणे विद्यापीठाच्या आवारात उभारण्यासाठी निश्चित अशी वेळेची मर्यादा घालणार काय ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : मंत्री महोदय, माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांची अर्धा तास चर्चा पुणे विद्यापीठाला महात्मा जोतिबा फुले यांचे नाव देऊन पुतळा उभारण्यासंबंधातील आहे. मघाशी आपण उत्तरात सांगितले की, पुणे विद्यापीठ स्वायत्त संस्था आहे. हे जरी खरे असले तरी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतरण हे महाराष्ट्र शासनानेच केले आहे. कोणते नाव द्यायचे किंवा द्यायचे नाही हा विद्यापीठाचा व शासनाचा अधिकार आहे. त्यावर मी काहीही बोलत नाही. विद्यापीठाला तसे नाव देऊ शकत नाही असे आपण म्हणू शकत नाही.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांनी महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, महात्मा ज्योतिराव फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई फुले यांचा पुतळाही एकत्र बसविला जावा. याचे कारण असे की, येत्या सहा महिन्यामध्ये आम्ही नांदेडला दोघांचा एकत्र पुतळा बसविणार आहोत. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले काम लक्षात घेऊन त्या दोघांचा एकत्र विचार करणे गरजेचे आहे असे माझे वैयक्तिक मत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेला जरुर निर्देशित करण्यात येईल. सन 2005 च्या शासन निर्णयाप्रमाणे पुतळा बसविण्यापूर्वी एम.एस.ई.बी. ची एन.ओ.सी. घेण्याकरिता आठ महिने, एक वर्ष लागते. या करिता व्यवस्थापन परिषदेला हा पुतळा लवकरात लवकर आवारामध्ये बसविण्याबाबत निर्देश देण्यात येतील असे मी सांगितले आहे. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नाम विस्ताराबाबत आम्ही व्यवस्थापन परिषदेचे प्रबोधन करु कां असे विचारले. आपण या ठिकाणी उपस्थित असलेले सर्व माननीय सदस्य आणि पुणेकरांनी व्यवस्थापन परिषदेबरोबर बसून त्यांचे प्रबोधन केले व तसा प्रस्ताव त्यांच्याकडून शासनाकडे आला तर शासन त्या बाबत जरुर विचार करील.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सदर अर्धा तास चर्चा संपली आहे. सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□ित होऊ□ उद्या शुक्रवार, दि□ि□ 20 जुलै 2012 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□ 02 मिनिटां□ी, शुक्रवार, दि□ि□ 20.7.2012 च्या स□ाळी 11.00 वाजेपर्य□ स्था□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही